# विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ- वाणिज्य शिक्षक मंडळ, नागपूर

अंक ९ वा/ वर्ष २०१७

## चर्चासत्र नववे २०१७

आर. के. कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, पुलगाव, जिल्हा वर्धा




www.vjcectb.com

दि. १७ व १८ ( शुक्र. व शनि. ) नोव्हेंबर २०१७

Scanned by CamScanner

# स्मरणिका संपादक मंडळ



प्रा. नामदेव घोळसे
मुख्य संपादक



डॉ. दत्तात्रय सोनेगांवकर
सहसंपादक



डॉ. रजनी हुद्दा



डॉ. रश्मी दुरगकर



सदस्य
प्रा. विजय बालपांडे



प्रा. चंद्रकांत जुळे



प्रा.अजय कोयाळ



प्रा. डॉ. गजानन धांडे



प्रा. भरत काळे



प्रा.सुरेश अंधारे



प्रा. मनीष तंवाखे

Scanned by CamScanner

# केंद्रीय कार्यकारिणी



अध्यक्ष
प्रा. डॉ. अशोक गव्हाणकर



सचिव
प्रा. मनीष तंबाखे



उपाध्यक्ष
प्रा. डॉ. गजानन धांडे



कोषाध्यक्ष
प्रा. सुरेश अंधारे



सहसचिव
प्रा. भरत काळे



सदस्य
प्रा. डॉ. चेतन हिंगणेकर



सदस्य
प्रा. विठ्ठल गिरडकर



सदस्य
प्रा. विजय वालपांडे



सदस्य
प्रा. चंद्रकांत जुळे



सदस्य
प्रा. संजय ठाकरे



अध्यक्ष
प्रा. रत्नाकर बोमिडवार
गडचिरोली जिल्हा



अध्यक्ष
प्रा. डॉ. विजय मसराम
चंद्रपूर जिल्हा



अध्यक्ष
प्रा. अशोक चेटुले
भंडारा जिल्हा



अध्यक्ष
प्रा. डॉ. महेंद्र लोधी
नागपूर ग्रामिण



Scanned by CamScanner

# उद्घाटन सोहळयाचे मान्यवर

कार्यक्रमाचे उद्घाटक



**मा. डॉ. मुरलीधर चांदेकर**
कुलगुरु
संत गाडगे महाराज अमरावती विद्यापीठ,
अमरावती

कार्यक्रमाचे अध्यक्ष



**मा.मोहन बाबु अग्रवाल**
अध्यक्ष,
आर. के कनिष्ठ महाविद्यालय,
पुलगाव, जिल्हा वर्धा

विशेष अतिथी



**मा. नूरसिंग जाधव**
आर. के कला, वाणिज्य व
विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, पुलगाव

प्रमुख पाहुणे



**मा. श्री अनिलजी पारधी**
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग

चर्चासत्र अध्यक्ष



**डॉ. माधुरी लेले**



अध्यक्ष
**प्रा. डॉ. अशोक गव्हाणकर**



सचिव
**प्रा. मनीष तंबाखे**

Scanned by CamScanner

# समारोपीय सोहळ्याचे मान्यवर

मुख्य अतिथी



मा. श्री [illegible]

[illegible]

विशेष अतिथी



प्रा. अजय [illegible]

[illegible]

कार्यक्रम अध्यक्ष



डॉ. माधुरी [illegible]



प्रा. डॉ. अशोक [illegible]

अध्यक्ष



प्रा. मनीष [illegible]

सचिव



डॉ. हसनअली [illegible]

माजी अध्यक्ष

केंद्रीय कार्यकारिणी



प्रा. राजाभाऊ [illegible]

माजी सचिव

केंद्रीय कार्यकारिणी

Scanned by CamScanner



# स्मरणिका

पुलगाव चर्चा सत्र - २०१७

दिनांक १७ व १८ नोव्हेंबर

## स्थळ

**आर. के कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, पुलगाव, जिल्हा वर्धा**

**स्मरणिका संपादक**

**प्रा. नामदेवराव घोळसे**

निवृत्त प्राध्यापक

धनवटे नॅशनल कॉलेज नागपूर

**स्थानिक कार्यवाह**

**प्रा. अजय कोयाळे**

Scanned by CamScanner



प्रा. डॉ. माधुरी लेले

अध्यक्षीय भाषण

# जागतीकीकरणानंतर भारतीय अर्थव्यवस्थेतील परिवर्तन

ब्रिटीशांनी भारतात औपचारिक व अनौपचारिकरीत्या जवळपास 300 वर्षे राज्य केले व 1947 वर्षात भारतातील राजकीय, सामाजिक नेतृत्वाने ब्रिटीश प्रवृत्तीला विरोध करीत व संघर्षाची भूमिका स्वीकारत स्वातंत्र्य प्राप्त केले. ब्रिटीश कालावधीत भारतीय अर्थव्यवस्था त्यांनी राबविलेल्या स्व स्पर्शी धोरणामुळे दिवसेंदिवस कमकुवत झाली. एकसुदृढ व गतिमान व रचनात्मक दृष्ट्या प्रभावशाली असलेली अर्थव्यवस्था ब्रिटीश धार्जीण झाली. यातूनच विषमता, गरीबी, बेकारी, सामाजिक द्वेष, व्यापार रचनेतील बदल, औद्योगिक धोरणातील निश्चिततेचा अभाव लान व मोठे उद्योग यांची ब्रिटीश उद्योगाबरोबर स्पर्धेतून माघार व त्यातूनच निर्माण झालेला बेरोजगार अजूनही भारतीय अर्थव्यवस्थेतून समूळ नष्ट होतांना दिसत नाही. गरीबी, सामाजिक विषमता, बेरोजगारी, सामाजिक संरचनेतील आमूलाग्र बदल, समुहद्वेष ही भारताला ब्रिटीशांकडून प्राप्त झालेली देन होय. दादाभाई नौरोजी यांनी त्यांच्या ब्रिटीश संसदेत केलेल्या भाषणात व त्यांनी लिहिलेल्या Poverty of India या पुस्तकात स्पष्ट केले की, भारताला ब्रिटीशांच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे गरीब केले. 16 व्या शतकाच्या पूर्वी भारताची अर्थव्यवस्था मजबूत व आंतरराष्ट्रीय व्यापारात भारताचा वाटा 25% जास्त होता जेव्हा की भारताची लोकसंख्या आजच्या अवाढव्य असलेल्या लोकसंख्येपेक्षा कितीतरी कमी होती.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताचे धोरण ठरवितांना जगात अस्तित्वात असलेल्या भांडवलवाद की साम्यवाद यापैकी कोणत्या अर्थव्यवस्थेची निवड करावी असा प्रश्न तत्कालीन राज्यकर्त्यांपुढे उभा राहिला. परंतु भारताचे द्रष्टे पंतप्रधान पंडीत नेहरू आणि त्यांचे सहकारी यांनी या दोन आर्थिक प्रणालीत सुवर्णमध्य साधत 'मिश्र अर्थव्यवस्था' स्वीकारली. कल्याणकारी राज्याची संकल्पना स्वीकारल्यामुळे भांडवलवादापेक्षा समाजवादाकडे झुकलेली आर्थिक धोरणे अंगीकारली.

स्वदेशी उद्योगांना संरक्षण आणि साधन सामुग्रीचा महत्तम वापर या उद्देशाने निर्यातीला प्रोत्साहन आणि आयातीवर बंधने घालण्यात आली. सामाजिक न्यायाच्या दृष्टीकोनातून सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग, सार्वजनिक वितरण प्रणाली आणि नियोजनाद्वारे विकास या त्रिसुत्रींचा स्वीकार शासनातर्फे करण्यात आला. अर्थ व्यवस्थेत पदोपदी सरकारी हस्तक्षेप अनिवार्यपणे होता. वित्तव्यवस्थेवर नियंत्रण मिळविण्यासाठी 1969 मध्ये बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. देशांतर्गत उद्योगांना स्पर्धा नको यासाठी 'लायसन्स राज' अस्तित्वात आले. थोडक्यात उद्योगांच्या विकासाच्या योजना आखायच्या पण प्रत्यक्षात उद्योजकांना नैराश्य येईल असे कायदे असल्याने उद्योगधंदाचा विस्तार पाहिजे त्याप्रमाणात झाला नाही. चढत्या दराने कर, कामगारांना संरक्षण देणारे कायदे, बँक, विमा इत्यादी क्षेत्रात सरकारचा एकाधिकार या सर्वांचा नकारात्मक परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर अपरिहार्यपणे झाला.

एकीकडे भरमसाठ वाढत चाललेली लोकसंख्या तर दुसरीकडे रोजगार संधींची कमतरता, यातून निर्माण झालेले बेकारी आणि दारिद्र्याचे दुष्टचक्र, एम.आर.टी.पी. सारख्या कायद्यामुळे उद्योगांच्या विस्तारावर मर्यादा, उत्पादन कमी आणि मागणी अधिक यातून किंमतवाढ, भ्रष्टाचार, काळाबाजार आणि नफेखोरी यासारख्या अनिष्ट प्रथा, सतत तोट्यात चालणारे सार्वजनिक उद्योग, आर्थिक विकासासाठी शासनाने घेतलेले देशविदेशातील भरमसाठी कर्ज व त्यावरील व्याज या सर्वांचा परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर पडल्याशिवाय कसा राहील ? भारताची आर्थिक परिस्थिती खालावली. 1991 मध्ये भारत जगातील 160 देशांपैकी 20 वा गरीब देश म्हणून गणला गेला. कर्जबाजारीपणात भारताचा तिसरा क्रमांक आला. तर मानवी विकास निर्देशांकात 123 व्या क्रमांकावर आला. विदेशी चलनाचा साठा तर केवळ एका आठवड्याच्या आयातीएवढा शिल्लक होता. 67 टन सोने आंतरराष्ट्रीय मुद्रानिधीला विकण्याची नामुष्की भारतावर आली.

**नवीन आर्थिक धोरण** - या सर्व परिस्थितीतून मार्ग काढण्यासाठी आणि त्याचवेळी जागतिक बलाढ्य, प्रगत देश व जागतिक वित्तिय संस्थांचा आलेला वाढता दबाव यामुळे भारताने जुलै 1991 ला नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. त्याशिवाय भारताजवळ दुसरा पर्यायही उपलब्ध नव्हता.

जागतिक व्यापार संघटनेच्या करारानुसार 'मुक्त अर्थव्यवस्थेचा' स्वीकार भारताने केला. शासनाचा कमीत कमी हस्तक्षेप ही नवीन आर्थिक धोरणाची आवश्यक अट होती उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकिकरणाच्या त्रिसुत्रीवर हे धोरण आधारित होते. एक मुक्त आर्थिक धोरण ज्यात विदेशी गुंतवणुकीला परवानगी, जागतिक वित्तसंस्थांकडून

अंदाजपत्रकाचे उद्दिष्ट ठरविण्यात आले होते परंतु आजही हे उद्दिष्ट 63 हजार करोड रुपयापेक्षा जास्त स्वरुपात प्राप्त करता येऊ शकले नाही. परंतु जागतिकिकरणानंतर भारताचा अर्थव्यवस्थेतील समाजवादीरचना, किंवा आर्थिक समाजवाद व समाजवादीय अर्थव्यवस्था याला तिलांजली द्यावी लागली. यातील समाजाचा मनुष्य चेहरा आर्थिक नियोजन पुरस्कृत उद्दिष्टातून वगळण्यात आला व त्याचाही परिणाम वेगवेगळा राबविलेल्या धोरणातून दिसतो आहे. नेहरुंनी स्वीकारलेल्या समाजवादी ध्येय धोरणाला बाजूला ठेवण्यात आले असले तरी आज समाजवादाला जागतिकिकरणाचे उद्दिष्टे पूर्णतः पर्यायी असतांना दिसत नाही. कारण आंतरराष्ट्रीय स्पर्धा अंतर्गत अर्थव्यवस्थेतील संरचनात्मक बदल, आर्थिकस्थिरीकरण व विदेशी गुंतवणूकीत दिलेली पूर्णतः सुट, भांडवली बाजारातील विदेशी निवेश या सर्वांचा परिणाम अर्थव्यवस्थेत भांडवलवादी व्यवस्थेची पुसटशी रचना समाजवादाच्या पलिकडे जाऊन कार्य करु लागली आहे. देशांतर्गत उद्योग व्यवसायाचा व सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांना स्पर्धा करावी लागत आहे. भांडवल पुरवण्याचा अभाव व तंत्रज्ञानाचा अपूर्ण विकास या दोन वैविध्याच्या आधारावर संरचना व बाजारपेठ यांची पूर्वस्थापना करण्याचा व गुंतवणूकीत वाढ करण्याचा प्रयत्न मागील 30 वर्षाच्या कालावधीत करण्यात येत आहे. रोजगाराभिमुख गुंतवणूक व्हावी याकरिता पायाभूत सुविधांचा विकास, आरोग्य, शिक्षण, वीजपूरवठा व पाणी वितरण, कृषी सिंचन लहान व मध्यम उद्योग यांचा पर्याप्त विकास व्हावा व त्यातून रोजगार निर्माण होऊन बेकारीचे प्रमाण कमी व्हावे व अर्थव्यवस्थेतील त्वरक व गुणक यांचा सकारात्मक परिणाम व्हावा याद्दृष्टीने प्रयत्न करण्यात आले, व त्याच प्रयत्नांमुळे भारताच्या आर्थिक विकासाचा दर 7.5 टक्के पेक्षा जास्त ठेवण्यात यश प्राप्त झाले. समाजवादी अर्थव्यवस्थेतील नियोजनाद्वारे ठरवुन दिलेली उद्दीष्टे खुल्या स्पर्धेतून साध्य करण्यास भारतातील धोरण राबविणाऱ्यांनी व प्रभावी संरचना तयार करणाऱ्यांनी अमलात आणण्याचा प्रयत्न केला. परिणामतः अनेक क्षेत्रात त्याचे दूरगामी परिणाम पाहायला दिसत आहे, विदेशी भांडवलाचा आधार हा अर्थव्यवस्थेतील गुंतवणूकीचा आधार मानला गेला तरी देशाची निर्यातवृद्धी वाढावी व आयात निर्यात ठेवून व्यापारातून विदेशी विनिमयाचा भाग वाढवावा या उद्दिष्टांची पूर्ती मात्र पाहिजे त्या प्रमाणात होऊ शकली नाही. याकरिता विदेशी भांडवल बाजारातील विदेशी निवेश यांची देशी गुंतवणूक भांडवली बाजारात प्रभावशाली ठरु नये म्हणून बाजारात आणण्याचा प्रयत्न होत आहे, यात म्यूच्युअल फंड, विमा कंपनीचे गुंतवणूक या गुंतवणूकी प्रमुख होय. यामुळेच भारतीय भांडवल बाजार विदेशी गुंतवणूकदारांनी गुंतवणूक आपल्या देशात नेण्याचा प्रयत्न केल्यावरही भारतीय भांडवल बाजारावर त्याचा परिणाम झाला नाही. सप्टेंबर 2017 च्या अखेरीस 60 मिलीयन डॉलरपेक्षाही जास्त एवढे डॉलर भारतीय भांडवली बाजारातून विदेशी गुंतवणूकदारांनी काढून घेतले. याची भरपाई म्हणून भारताने आता 20 हजार कोटीपेक्षाही जास्तीची रक्कम भारतीय भांडवल बाजारात गुंतवणे गरजेचे आहे. तरच भांडवल बाजारातील संतुलन कायम राखणे शक्य होतील. वर्तमान भारतीय अर्थव्यवस्थेचा अभ्यास करतांना विविध वैशिष्ट्ये हे विरोधाभास दर्शवितात. याचे प्रमुख कारण म्हणजे अर्थव्यवस्थेतील सुधारणा संदर्भात घेतल्या गेलेल्या ह्या मुलभूत धोरणांची अंमलबजावणी अनेक वर्षापासूनचा प्रलंबीत असलेला एक देश एक कर GST सरकारने लागू केला. अवघ्या अप्रत्यक्ष कर संरचनेतील घडवून आणलेला हा मुलभूत बदल होय म्हणजेच अप्रत्यक्ष करप्रणालीत असेलली गुंतागुंत व त्यामुळे वस्तूंच्या किंमतीत होणारी वाढ ... संरचनेमुळे एकस्वरुप होणे शक्य होईल. अप्रत्यक्ष कराच्या संरचनेमुळे किंमतीतील भिनन्ता प्रादेशिक असंतूलन निर्माण करीत होते व प्रदेशनिहाय एकाच वस्तूच्या किंमतीत जो फरक आढळत होता तो कमी होण्यास मदत होईल शिवाय सरकारच्या महसूलात वाढ घडून येईल. प्रत्येक व्यापारीवर्ग, उत्पादक वर्ग, सेवा पुरविणारे घटक यांना सरकारकडे आपल्या व्यवसायाचे पंजीयन करणे अनिवार्य करण्यात आले आहे. जो पर्यंत पंजीयन (Registration) होणार नाही तो पर्यंत व्यवसायधारकाला 'कर आदान सूट' (Tax Input Credit) प्राप्त होणार नाही. याचाच अर्थ वस्तू व सेवांचा विनिमय होताना पूर्वी जे व्यवहारातून आर्थिक गळतीचे प्रमाण (Economic Likages) जे होते ते कमी करणे शक्य झाले आहे. परंतु त्याच बरोबर GST मधील दरातील गुंतागुंत त्याचा स्तर हे सुलभ करणे आवश्यक आहे. अन्यथा व्यापारी वर्ग सेवा देणारे यांना GST चा विरोधाभास होईल. भारतीय अर्थव्यवस्था सध्या मंदीच्या प्रक्रियेतून प्रवास करीत असली तरी हा प्रवास जास्त काळ चालणार नाही कारण आंतरराष्ट्रीय वित्तिय संस्थेच्या अनुमानानुसार चालू आर्थिक विकासदर 16-17 मध्ये 5.7% हा 17-18 मध्ये 7.1 च्या पुढे राहण्याची शक्यता वर्तविली आहे. निश्चितीकरणानंतर मुद्रेचा पुरवठा व मागणी यांच्यात असंतूलनाच्या परिणाम आर्थिक व्यवहारावर निर्माण आल्याचे दिसून येते. याचा परिणाम प्रामुख्याने बांधकामातील ..., पायाभूत सुविधा, निर्यातदर, खाजगी गुंतवणूक, चालू खात्यावरील तूट, राजकोषीय तुटीतील वाढ, महागाई, बेरोजगारी, सामाजिक विषमता या सर्व प्रश्नांची निर्मिती झाली याचाच परिणाम अर्थव्यवस्था मंदावण्यामध्ये झाला व आर्थिक विकास हा कमी झाला. यातील विरोधाभास म्हणजे भारतीय भांडवलबाजारातील निर्देशांकातील वाढ होय. (25 सप्टे. 2017 पर्यंत याच बरोबर भारताच्या विदेशी गंगाजळीत 400 बिलियन डॉलर पर्यंतची झालेली वाढ होय. विदेशी विनिमयदराचे मूल्यांकन निवडक ... देशाच्या चलनाच्या मुल्याच्या आधारावर निश्चित केले जाते, हा ... घेऊन 2004-05 चा आधार "वास्तविक परिणामकारक विनिमयदर" Real Effective Exchange Rate अनुसार रुपयाचे ... Appriciation of Rupees होते आहे. याचा परिणाम अर्थव्यवस्थेतील काही घटक विकासाकरिता प्रेरक ठरत आहे ... विरोधाभास जागतिकिकरणाच्या विविध प्रभावशाली ... अर्थव्यवस्थेतील अंतर्गत विरोधाभासाच्या प्रक्रियेतून प्रभावित ... असलेली दिसून येते. सोबत वाढ व घट होणारे वक्र स्वतंत्ररित्या ... आहे.

नॅशनल काऊंसील ऑफ अप्लाईड एकोनॉमिक रिसर्च ...



Scanned by CamScanner

मोठ्या प्रमाणावर नवप्रवर्तनाचा वापर हे महत्वाचे कारण होय. बाह्य संस्था / किंवा कामगाराकडून काम करुन घेण्याच्याही प्रमाणात वाढ झाली आहे. नीती आयोगाच्या कृती आराखड्यात जे अनेक प्रस्ताव दिल्या गेले आहेत त्यात रोजगाराच्या न्यूनता कमी करण्याकरिता "कोस्टल एम्प्लॉयमेंट झोन्सची" (CEZ) निर्मिती करण्याचा प्रस्ताव ठेवण्यात आला आहे. सिंगापूर, तैवान, द.कोरिया व चीन यांच्याप्रमाणे जागतिक बाजारपेठेची निर्मिती करुन उत्पादन व रोजगार संबंधी कार्य करण्यात आलेले आहे. शहरसंबधीत बेरोजगारीच्या प्रश्नावर उपाय म्हणून शेती सारख्या क्षेत्राची उत्पादकीय क्षमता वाढविण्यात असंख्य सुशिक्षीत युवक या क्षेत्राकडे वळल्यास बेरोजगारी नियंत्रीत होऊ शकेल. याकरिता शेतीतील सिंचनाचे क्षेत्र वाढविणे, पिक पद्धतीत सुधारणा घडून आणणे, सुधारित बियाणांचा वापर करणे, व्यवसायाकडे शेतीत वाढ करणे, शेतीला अखंडीत वीजपुरवठा करणे, या उपाययोजना केल्यास शेतीतील उत्पादनात वाढ होणे शक्य होईल. बेरोजगारातील सर्वात चांगला उपाय म्हणजे अर्थव्यवस्थेत संतुलित रोजगार क्षमता उपाय करणे होय. क्षेत्रनिहाय व भविष्यातील मागणी याचा कृती आराखडा तयार केल्यास संतुलित रोजगार निर्माण होऊ शकेल. अर्थव्यवस्थेचे संक्रमण होत असतांना सुरुवातीच्या काळात विविध कार्य करण्याकरिता कुशल व अर्धकुशल श्रमिकांचा पुरवठा हा अधिक असतो. परंतु अर्थव्यवस्था संक्रमण कालावधीच्या जेव्हा जेव्हा पुढच्या टप्प्यात प्रवेश करते तेव्हा अर्धकुशल व अकुशल श्रमिकांचा पुरवठा अत्यधिक होतो. परिणामतः मजूरी किंवा भृती चे दर वाढूनही श्रमिक कार्य करण्यास प्राप्त होत नाही. सॅम्स पीत्रोदा यांनी उच्च शिक्षणाच्या संदर्भात अहवाल सादर करीत असतांना ही बाब स्पष्ट केली. 2005 मध्ये स्टोनर, प्लंबर, लाईनमन, यंत्र जोडणारे, शेतीकाम करणारे श्रमिक यांचा मोठ्या प्रमाणात तुटवडा भारतासारख्या अधिक लोकसंख्या असलेल्या देशाला जाणवेल. याचे महत्वाचे कारण लोकसंख्येचे साक्षरतेतील वाढ, कला कौशल्यात सुधारणा, हंगामी कार्याऐवजी काळातील नियमितता, शैक्षणिक व आरोग्य विकास इत्यादी होय. याचा सामुहिक परिणाम रचनात्मक बेकारी व छुपी बेकारीत होते.

मा. पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या निर्णयामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेण्याच्या उद्देशाने प्रस्तुत शोधनिबंधात विवेचन केलेले आहे. अर्थव्यवस्थेतील 500 रु च्या 1000 रु. च्या नोटा रद्द झाल्याच्या पार्श्वभूमीवर त्याचे जे सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम झाले त्याबद्दल थोडक्यात विवेचन करण्यात आले आहे. नोटाबंदी चा निर्णय हा निश्चितच देशहिताचाच आहे. त्यातून काळा पैसा, भ्रष्टाचार, महागाई, दहशतवाद इत्यादी समस्यातून काही प्रमाणात मुक्ती मिळू शकते. परंतु या निर्णयाच्या अंमलबजावणीत राहिलेल्या त्रुटीमुळे सामान्य जनतेला त्रास सहन करावा लागला. त्याच राजकीय विरोधसुद्धा मोठ्या प्रमाणावर झाला. नोटाबंदीमुळे निर्माण झालेल्या टंचाईतून मार्ग काढण्यासाठी कमी रोकडमध्ये व्यवहार :(Less Cash Transaction) हा मार्ग उत्तम आहे अनेक प्रगत देशांमध्ये आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात मोबाईल किंवा कार्डद्वारे होतात. त्याचबरोबर बँकांचे बुडीत कर्ज वसूल करण्याची मोहिम राबविणे देखील तेवढेच गरजेचे आहे. शिक्षण क्षेत्रातील भ्रष्टाचार दूर करण्यासाठी सुद्धा cash less व्यवहार उपयोगी पडतील. अनेक व्यावसायिक डॉक्टर्स, वकिल, सी.ए यांच्या व्यवहारांवर याच माध्यमाने नियंत्रण ठेवण्याची आवश्यकता आहे.

थोडक्यात नोटाबंदीच्या निर्णयाबद्दल वरील उपायांची जोड मिळाल्यास हा एक क्रांतिकारी निर्णय सिद्ध होईल यात शंका नाही. यातून भारत एक समृद्ध व संपन्न देश बनेल. भ्रष्टाचार मुक्त अर्थव्यवस्था हे मा. पंतप्रधानाचे स्वप्न आहे. पंतप्रधानांनी काळा पैसा नष्ट करण्याकरिता पावले उचलली तशीच बुडीत कर्जाच्या वसुलीची योजनाही तातडतोब तयार केली पाहिजे. काळा पैसा पर वाधणी क्षेत्रात मोठ्या प्रमाणात फिरतोय. राजकीय नेत्यांनी सुरु केलेल्या शाळा, महाविद्यालयात कॅपिटेशन फीच्या माध्यमातून, व्यावसायिक लोकांनी (डॉक्टर, इंजिनिअर्स, वकील, मोठे उद्योजक) बुडविलेल्या करातून तसेच एक्साईज ड्यूटी व आयात-निर्यात व्यापारातून काळा पैसा वाढत जातो. या सर्व बाबींना राजकीय संरक्षण देखील असतेच त्याशिवाय हे शक्यच नाही. राजकीय पक्षांना निवडणुका लढण्यासाठी या अवैध मार्गांनी साठविलेल्या पैशांची गरज असते. त्यामुळे समाजातील सर्वच मोठे व प्रभावशाली घटक काळा पैशांच्या निर्मितीला कारणीभूत असतात. मा. पंतप्रधानांनी याविरुद्ध उघडलेली मोहिम यशस्वी करावयाची असेल तर प्रथम यांच्याविरुद्ध कारवाई करणे आवश्यक आहे. पाचशे व हजार रु च्या नोटा रद्द झाल्याने त्या सर्व विविध बँकांमध्ये जमा होतील. बँकेजवळील निधीत वाढ होईल. या निधीचा वापर पुनर्गुंतवणुकीसाठी करता येईल. देशाच्या आर्थिक विकासाला गती मिळेल, राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल. गरीबी दूर होईल.

नोटाबंदीच्या निर्णया इतकाच धाडसीच प्रभावशाली निर्णय पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांनी घेतला. तो म्हणजे 'एक देश एक कर' यासंकल्पने अंतर्गत वस्तू व सेवाकर (GST) हा सध्याच्या अर्थव्यवस्थेवर प्रभाव टाकणारा एक महत्त्वाचा घटक आहे. मेक इन इंडिया, जनधन योजना, गॅस सबसिडी सोडण्यासाठी आवाहन, जनविमा योजना, नोटाबंदी आणि आता वस्तू व सेवा कर या सर्व धाडसी निर्णयामागे भारतातील अर्थव्यवस्थेला चालना देण्याची भूमिका आहे. आर्थिक व्यवहारांना शिस्त लावण्याचा प्रयत्न आहे. यात अनेक समाजघटक असंतुष्ट होतील, अनेकांचा विरोध होईल यात शंकाच नाही परंतु भविष्यातील सुंदर आणि समृद्ध भारताच्या निर्मितीसाठी अशाप्रकारची आर्थिक शिस्त, आर्थिक साक्षरता अत्यंत आवश्यक आहे. परंतु यात यश प्राप्त करण्याकरिता जनतेचा सहभाग देखील तितकाच महत्वाचा आहे. भारतीयांनी श्रम, उत्पादकता, कार्यक्षमता, प्रामाणिकता, शिस्त, चारित्र्य या सर्व पैलूंवर सकारात्मक विचारांनी अंमल केलातर अशक्य काहीच नाही. उद्याचा भारत कल्याणकारी राज्याची संकल्पना पूर्ण करील यात शंका नाही.

अर्थातच 2014 नंतर नवीन निवडल्या गेलेल्या सरकारने, शासन पातळीवर अनेक योजनांचा सुरु करण्यास आरंभ केला. भारत सरकारच्या वर्तमान पंतप्रधानांनी, जनधनयोजना, स्टार्टअप इंडिया, मेक इन इंडिया, यासारख्या असंख्य योजना राबवून स्वयं रोजगाराभिमुख



Scanned by CamScanner

संस्थेद्वारा प्रस्तूत करण्यात आलेल्या अहवालानुसार "व्यापार धीटपणा दर" Buisiness Confidence Index जो 2014 मध्ये 142 इतका होता तो ऑगस्ट 2016 ला 121.6 इतका झाला. त्यानंतरच्या कालावधीत त्यात 133.3 इतकी वाढ ऑक्टोबरच्या 2016 मध्ये झाली. व जानेवारी 2017 मध्ये निश्चितीकरणानंतर त्यात 112.00 इतकी घट झाली. व GST नंतर जुन 201 7मध्ये 136 इतकी वाढ झाली. यावरुन भविष्यात भारताच्या व्यापाराची दिशा कशी राहील हे स्पष्ट होते. निश्चिलीकरण, GST व अयोग्य मान्सून यांचा दिर्घकालीन परिणाम अर्थव्यवस्थेवर होणे संभव आहे. यातून उद्योग, व्यापार व सेवाक्षेत्राकरिता वेगळे "Bail out package" सरकारने घोषित केल्यास व्यापार संरचना सुधारणे शक्य होतील. भारतातील लघू, मध्यम व हस्तकला व्यवसाय करणारे उद्योग जे अर्थव्यवस्थेतील रोजगार उपलब्ध करुन देणारे प्रमुख आज निश्चिलीकरणानंतर मंदीतून जातांना दिसत आहेत. शिवाय असंघटीत क्षेत्र ज्याचे प्रमाण अर्थव्यवस्थेत 80 टक्केपेक्षाही जास्त आहे. अशा असंघटीत क्षेत्रात काम करणाऱ्या उद्योग प्रवाह यावर संकूचनाचा मोठ्या प्रमाणावर प्रतिकुल परिणाम झाला. यातूनच ग्रामीण व अर्धशहरी नोकरीत वाढ झाली. व मध्यम उद्योगातील एकूण सकल घरेलू राष्ट्रीय उत्पादनात 38 टक्के इतका वाटा आहे तर देशाच्या एकूण निर्यातीत 42 टक्के इतका हिस्सा आहे यावरुन लघू व मध्यम उत्पादन क्षेत्राचे अर्थव्यवस्थेतील योगदान किती आवश्यक आहे हे स्पष्ट होते.

बृहत उद्योगाचा उत्पादन निर्देशांक जुलै 2017 मध्ये 1.2% इतका होता. जुलै अगोदरच्या तिमाहीमध्ये तो 0 पेक्षा कमी झाला यातूनच औद्योगिक वस्तू निर्मित करणाऱ्या उद्योगात मंदी व बेकारी, यातूनच पुरवठा आकूंचन असा तिहेरी सापळा एकाच वेळी निर्माण झालेला दिसतो. मंदीसदृश्य स्थितीचा परिणाम अधिकोषीय उचल Bank Credit दर झाला व तो मागील 2014-15 च्या निम्नस्तरावर जास्त पोहोचला. ऑगस्ट 2017 मध्ये उपभोक्ता किंमत निर्देशांक दर 3.6 टक्के झाल्यामुळे उपभोगीय व आवश्यक वस्तूंच्या किमतीत वाढ याचे मुख्य कारण म्हणजे चालू वर्षीय सद्यस्थिती लक्षात घेतल्यास मान्सून वेळेवर न येणे व आल्यावरही त्याची मात्रा कमी असणे याचा परिणाम चालू कृषी उत्पादन व भाजी फळफळावळे यावर झाला व उपभोक्ता महागाई निर्देशांकात वाढ झाली. त्याचबरोबर चालू वित्तीय लेखावरील तूट एकूण सकल घरेलू उत्पादनाच्या 2.4% ने वाढली. भारताच्या वर्तमान महसूल व खर्च याचा विचार केला असता भविष्यातील राजकोषीय तूट ही 3.4% एकूण सकल घरेलू उत्पादनाबरोबर असेल. मागील दोन तिमाही मध्ये एकूण सकल सकल घरेलू उत्पादना बरोबर अनेक बाबींचा परिणाम झाल्यामुळे त्याच्या विकास वाढीचा दर मंदावला. ही मंदी अर्थव्यवस्थेतून अल्पकालावधीतून कमी करावयाची असेल तर परिवर्तनीय सुधारणा Transformational Reforms करणे गरजेचे आहे. व दीर्घकालीन प्रवृत्तीत बदल घडून आणण्याकरिता व स्थिरीकरणाकरिता धोरणे निश्चित व सदृढ असणे गरजेचे आहे. मागील पाच तिमाहीच्या अहवाला वरुन असे दिसून येते की, भारताच्या आयातीत मोठ्या प्रमाणात वाढ झाली व परिणामता चालू खात्यावरील तूट अधिक झाली. यातील अंतर निर्माण होण्याचे कारण म्हणजे धोरणे अर्थव्यवस्थेच्या रचनात्मक बदली सुसंगत पद्धतीने कार्य करु शकले नाही. ध्येयधोरणे व वास्तविकता यातील अंतरातील वाढीमुळे विकासाचा दर कमी होण्यास साह्य होते. गत कालावधीत अधिक असलेली आयात निश्चितीकरणाच्या कालावधीत आयातीतीतल एकूण वाढ ही जवळपास 13 टक्के इतकी आहे. आयातीत वाढ होण्याचे कारण म्हणजे जोरी इलेक्ट्रॉनिक वस्तू, पेपर्स, प्लास्टिक व कॅमिकल्स इत्यादी होय. अ आयातीच्या कारणामुळे देखील विकासदराच्या 300 मूळअंकात घट (30 bps) झाली. निश्चितीकरणानंतर निर्माणी उद्योगातील पुरवठा साखळी पूर्णतः नेस्तनाबूत झाली. पुरवठ्यातील असलेली एकवाक्यता टिकू राहीली नाही. याचा परिणाम आयात करण्यामध्ये झाला. निश्चितीकरणाच्या प्रभावाने देशी मागणीत घट झाली. एकूणच मागणी आणि पूरवठा निश्चितीकरणाच्या घटकाने प्रभवित झाले. यातून सामान्य श्रमिकांना प्राप्त होणारा रोजगार काही कालावधीकरिता का होईना तो संपला आहे. देशातील एकूण गुंतवणूक कच् च्या 29.5 टक्के आहे. वर्तमान कालावधीतील ही गुंतवणूक रोजगार निर्माण करणारी असली तरी भूतकाळातील गुंतवणूकीच्या 34 टक्के पेक्षाही अधिक असलेली ती कमी आहे. आज चालू वर्षातील राजकोषीय तूट ही 94 टक्के पेक्षा जास्त त चालू खात्यावरील तूट देखील वाढली आहे. खाजगी उपभोग एकूण सकल घरेलू राष्ट्रीय उत्पादनाच्या 55.6 पेक्षा जास्त तर 15-16 मध्ये 55 टक्के इतका होता. जागतिक अर्थव्यवस्थेत मंदी असली तरी भारतीय अर्थव्यवस्था धिम्या गतीने पुढे जात आहे. त्यात माहिती तंत्रज्ञान, वित्तसेवा, सेवाव्यापार यासारख्या क्षेत्राचा वाटा अधिक आहे. प्रामुख्याने ही सेवाक्षेत्रे असल्यामुळे त्यातून आवश्यक रोजगाराची मात्रा निर्माण हो नाही. सामान्य अनुमानानुसार भारतात जवळपास एक कोटी साठ लाख पेक्षाही जास्त तरुण दरवर्षी रोजगार मागण्यास समर्थ होतात परंतु त्यापैकी 20 लक्ष लोकांना रोजगार प्राप्त होतो. सन 2011 ते 2015 च्या कालावधीत शेतीवर आधारित रोजगाराच्या संख्येत 2 कोटीपेक्षा जास्त घट झाली. याचा परिणाम आर्थिक विकासात वाढ होते हे स्पष्ट होते. परंतु झालेली वाढ सर्व समावेशक आहे की नाही हे यावरुन दिसून येत नाही. जानेवारी 2017 मध्ये, देशात 40 कोटी लोकांना रोजगार प्राप्त होण्याची स्थिती होती, तर बेरोजगारांची संख्या 25 कोटीपेक्षाही जास्त होती. जुलै 2017 मध्ये नोकरी करीत असलेल्या नागरिकांच्या संख्येत घट होऊन 4 कोटी पेक्षा कमी झाली. तर नोकरी मागणाऱ्यांच्या संख्येत 13 कोटी एवढी वाढ झाली. रोजगार निर्माण क्षमता ही शासकीय स्तरापेक्षा खाजगी क्षेत्रापेक्षा क्षीण झाली आहे. कारण शासनाद्वारे नियमित रोजगार उपलब्ध करुन देण्याची व्यवस्थाच बंद झालेली दिसून येते. केवळ तत्वाच्या आधारावर किंवा काम संपेपर्यंत श्रमिकांना रोजगार उपलब्ध करुन दिला जातो व यातूनच बेरोजगाराचा प्रश्न संचित होतो. भारतात बेरोजगारीची समस्या ही ज्वलंत समस्या होय हे निती आयोगाने देखील मान्य केले आहे. एखादया युवकाकडे पूर्ण उत्पादक क्षमता किंवा उच्च दर्जाची कला-कुशलता असतानाही कमी क्षमतेचे काम किंवा न्युन रोजगार ही देशातील गंभीर समस्या होय. पारंपरिक आणि मोठ्या प्रमाणावर रोजगार निर्मित करु शकणाऱ्या उत्पादन क्षेत्रात मागील काही काळात



Scanned by CamScanner

व्यापार होणे देशात निर्माण करण्याकरिता प्रयत्न केल्या जात आहे. आजचा तरुण हा नोकरी मागणाऱ्या पेक्षा नोकरी देणारा असावा असा वर्तमानकालीन सरकारचा प्रयास व कयास आहे. वैश्विक अर्थव्यवस्थेची प्रतिकूल परिस्थितीतून भारतीय अर्थव्यवस्था संक्रमीत होताना जगाच्या पाठीवर ती दुसऱ्या क्रमांकाची असणे हेच वर्तमान सरकारने केलेल्या कामगिरीची उल्लेखनीय बाब असेल. भविष्यातील ध्येय धोरणे व अर्थव्यवस्थेच्या विकासाकरिता असलेले विविध प्रारूपे यांचा 'स्थिती प्रारूप' संबंध ठेवून कृती आराखडा (Action Plan) तयार केल्यास दोन अंकी विकासाचा दर येत्या वर्षात प्राप्त करणे शक्य होईल. आर्थिक विकास प्रक्रियेत उद्योग विकास याचा थेट संबंध औद्योगिक घटनांशी येतो. या औद्योगिक क्षेत्राच संबंध प्राथमिक क्षेत्राशी साधल्यास उद्योग प्राथमिक क्षेत्र यांच्यात एक श्रृंखला तयार होऊन दोन्ही क्षेत्राचे आर्थिक संतूलन साधने शक्य होईल. व यामुळे प्राथमिक क्षेत्रात कार्य करणाऱ्यांना सुद्धा प्राप्त होतील. उदा. कापूस तयार करणारा शेतकरी हा कपडा तयार करणाऱ्या उद्योगाच्या व्यवस्थापनाशी अंशधारक / भागधारक म्हणून जोडला गेल्यास शेतकऱ्यांना आत्महत्या सारख्या प्रश्नांना सामोरे जावे लागणार नाही याकरिता शासन स्तरावर धोरणात्मक दिशा निश्चित करणे गरजेचे आहे. संपूर्ण देशातूनच प्राथमिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व समाजाच्या प्रत्येक व्यक्तीची खळगी भरण्याचे कार्य करणाऱ्या शेतकऱ्यांना स्वतः कापूस पिकवून व अन्नधान्य प्राप्त होत नसेल तर शासनाची धोरणे व भारत सरकारच्या कृषी आयोग प्राथमिक क्षेत्राच्या अभ्यास कोठेतरी कमी पडतो असे दिसून येते.

लाखा पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी आजपर्यंत आत्महत्या केल्याचे दिसून येते. पण कृषीवर आधारित एकाही उद्योजकांनी व्यवसाय बुडाला म्हणून आत्महत्या केल्याचे निदर्शनास येत नाही. यात महाराष्ट्रातील व त्यात विदर्भातील शेतकऱ्याच्या आत्महत्येचे प्रमाण आजपर्यंत 35,000 पेक्षाही जास्त आहे. उद्योजकांना व व्यावसायिकांना वाणिज्याच्या क्षेत्रात लागू केलेल्या सर्व बाबींचा लाभ मिळतो. बँकाकडून ऋण, विविध वित्तीय संस्था, शासकीय अनुदाने, कर्जाची पूनर्रचना, अधिकोष, अधिकोषाची सुविधा, चालू खाते या बाबींच्या पुरवठ्यामुळे उद्योग क्षेत्रात कार्य करतांना उद्योग समुहांना वित्तीय समस्या जाणवत नाही. संकटे आली तरी उतो त्याच्यातून मार्ग काढतो किंवा शक्य न झाल्यास उद्योग सरकारच्या हवाली करुन तो त्यातून आपली सुटका करुन घेतो व अधिकोषाचे घेतलेले ऋण परत न केले तरी त्याच्या ऋणाचा डोंगर NPA म्हणून अधिकोषाच्या खात्यात / लेख्यात भर घालीत असतो. शेतकऱ्याच्या बाबतीत मात्र कुठलाच NPA नाही. शासनाद्वारे कर्जमाफीची घोषणा केली जाते, याचा तुलनात्मक आढावा घेतल्यास सर्वच राज्यातील शेतकऱ्यांनी कर्जमाफी ही वर्तमानकालीन उद्योग व्यवसायापासून निर्माण झालेल्या एकूण 8,80,000 रुपयाच्या NPA पेक्षा कमी आहे. उद्योग व्यवसायात काम करणाऱ्या उद्योग जगतातील उद्योगपतींना नफा / लाभ प्राप्त होतअसतांना छय का निर्माण होतो किंवा NPA हा मुद्दाम घडून आणल्या जातो का ? हा भयंकर प्रश्न आहे. अधिकोषात ठेव ठेवणारे हे सामान्य नागरीक असतात. शिवाय करस्पाने सरकारला महसूल प्राप्त होतो व यासर्वांचा हिशेब NPA च्या स्वरुपात लोकांपुढे येतो. हा अर्थव्यवस्थेतील सर्वात मोठा विरोधाभास होय. सुशिक्षित व्यक्ती, नोकरदार, उद्योगपती, सेवाक्षेत्रात कार्य करणारे सर्व राजकीय वर्तुळात कार्य करणारे राजकीय पुढारी या सर्वांना दोन्ही वेळचे पोटभर अन्न पुरविणारा शेतकरी अशिक्षित, प्रशिक्षणाचा अभाव, अधिकोषीय सोयी सुविधांचा अभाव, अडते, दलाल, कमीशन एजंट यांचा त्रास, कृषीमाल विकल्या गेल्या नंतरही पैसे विलंबाने देण्याची सोय या सर्व कुचंबनेत शेतकरी आपले जीवन कोणतीही तक्रार न करताना जगतो. हा विरोधाभासाच्याही पुढे असलेला विरोधाभास आहे. न्याय अन्यायाच्या बाबतीत जेव्हा सर्वसामान्यपणे बोलले जाते तेव्हा न्यायालय अन्यायाचे अस्तित्व टिकून ठेवते हे यावरुन स्पष्ट होते. याकरिता सक्षम कृषीधोरणांची स्वतंत्र गरज भारताला आहे. व नियोजनाद्वारे सर्वसमावेशक सुविधा व शेतकऱ्यांना शेतकरी म्हणून न पाहता प्राथमिक उद्योजक म्हणून त्याचा स्तर वाढविल्यास व उद्योगांना देण्यात येणाऱ्या सर्व सोयी सवलती (चालू खाते उघडण्याची मूभा) दिल्यास परिवर्तन काही कालावधीत घडून येणे शक्य होईल. याकरिता शेतकऱ्यांना शिक्षण, प्रशिक्षण, वार्तालाप, स्वंत्र माहिती केंद्रे यांची सुरुवात करणे अति अनिवार्य आहे. तरच भारतीय शेती व भारतीय शेतकरी यांना आनंदाचे दिवस पहायला मिळेल.

एकूणच अर्थव्यवस्थेत कार्य करणारा प्रत्येक माणूस हा त्या अर्थव्यवस्थेचा आधार असतो. हा त्यांच्यात असलेल्या निपुणतेमुळेच अर्थव्यवस्थेतील समीकरणे बदलविता येतात. भारताला भविष्यात नेण्याकरिता चांगल्या मनुष्यबळाची गरज आहे व हे सर्व चांगले मनुष्यबळ शिक्षणाच्या सहायाने निर्माण होते. शिक्षण क्षेत्रातील कामगिरी व संशोधन प्रक्रियेतून निर्माण होणारा नवप्रवर्तनवाद वर्तमान काळातील नवनवीन संशोधन व (Patent) प्राप्त करण्याकरिता उपयुक्त ठरतो. उच्च भारतातील उच्च शिक्षणाचे नामांकन 27% पेक्षा अधिक नाही. हेच प्रमाण कॅनडा 92%, यु.एस.ए. 86%, ऑस्ट्रेलिया 90% इतके आहे. प्राथमिक शिक्षणाचे नामांकन बिहार व यु.पी. सारख्या राज्यात 65% अधिक नाही. शिक्षणाचे आधुनिकीकरणात शिक्षणाचा स्तर सर्वच स्तरातून संशोधन कृतीवर आधारित असावा ज्याचा लाभ सर्वच विद्यार्थ्यांना प्रत्येक स्तरातून शिक्षण घेत असताना प्राप्त होईल. कारण व्यापार व्यवसाय व आंतरराष्ट्रीय व्यापारावर नवप्रवर्तन व संशोधन आता अनिवार्य झाले आहे. प्रत्येक क्षेत्रात आरोग्याचे असो, वाहतुकीचे असो, बांधकामाचे असो, संरक्षण साहित्य निर्माण करण्याचे असो, उद्योग कृषी व अन्य या सर्वात आमुलाग्र परिवर्तन गरजेचे आहे. हे केवळ शिक्षणातील पुढच्या अवस्थेतून प्राप्त होते. नवीन संशोधनातून नवीन बाजारपेठा प्राप्त करुन त्याचा आर्थिक विकासाकरिता उत्तम उपयोग करुन विदेशी व्यापार लाभधारक ठेवता येतो. म्हणूनच भारताचे पंतप्रधान अलिकडील अमेरिका दौरा आटपून आल्यानंतर एका दूरदर्शन वाहिनीवरुन देशाला संबोधित करीत असतांना भारताला संशोधनाची व नवप्रवर्तनाची किती गरज आहे हे त्यांनी त्यांच्या मुलाखतीतून स्पष्ट केले होते.

आज जगाला अर्थव्यवस्थेच्या आर्थिक विकासाचा दर 3.5%



Scanned by CamScanner

इतका आहे. पुढील वर्षी तो 3.6% इतका होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. यूरोप मधील झालेले मोठे बदल ब्रेकसीट मधून U.K. यांनी स्वतःला स्वतंत्र केले. संपूर्ण युरोप मंदीतून वाटचाल करीत आहे. जर्मनीच्या जून्या प्रमुख पुन्हा एकदा प्रमुखपदी विराजमान झाल्या आहेत. आफ्रिका खंड, गल्फ राष्ट्रे व अन्य राष्ट्रे यांच्याही अर्थव्यवस्था अधिक सक्षम व्हाव्या याकरिता ते प्रयत्नशील आहे. अमेरिकेने राजकीय व्यवस्थेत परिवर्तन झाल्याबरोबरच TPP सारखा करार मोडीत काढण्यात आला. आंतरराष्ट्रीय मंदी, आर्थिक, राजकीय व्यवस्थेतील परिवर्तन, तेलाच्या किंमती, भारतीय अर्थव्यवस्थेतील निश्चिलीकरण व अप्रत्यक्ष कर संरचनेतील बदल, निर्माण उद्योगाच्या निच्चांक विकासदर, कृषीक्षेत्रातील परिवर्तन, सेवाक्षेत्रातील विकासदराची संथगती, वित्तीय संस्थांची नाजूक स्थिती, शैक्षणिक व आरोग्याचा दर्जा व सुविधा याकडे शासनाद्वारे विशेष लक्ष पुरविणे गरजेचे आहे.

भारताची अर्थव्यवस्था आर्थिक विकासदरांच्या तौलनिक अभ्यासावरून ती दुसऱ्या क्रमांकाची आहे. क्रयशक्तीच्या तुलनेत ती चौथ्या क्रमांकावर आहे. या सर्व परिभाषेचा वापर संख्याचा वापर करून आर्थिक प्रगतीचे दर आपण निश्चित करतो हे आज आवश्यक असले तरी मार्शलच्या व्याख्येप्रमाणे संपूर्ण मानवी समाजातील किंवा समुहातील मानव याचाच अभ्यास अर्थशास्त्रात महत्वाचा मानला आहे. म्हणून समाज मानवी मूल्य अबाधित राहावे व प्रत्येक व्यक्तीला जीवन जगण्याचे ... समाजजीवनातील विनाद्वेष व्यवस्था यातूनच देशात मानवी ... सहजपणे घडून येईल. सुजलाम सुफलाम व वसुधैव कुटुंबकम विचारधारेतून भारताची ओळख जगात होईल व यातूनच आर्थिक ... दर सहजपणे प्राप्त करणे शक्य होईल.

**Referance :**


The Economiz Times – Sunil R.Sinh Devendrak Paul, 29/09/17

2. India Express – Shahaji Vikraman & Ha Damodar 18/9/17

3. InIndia Express – By Sujit Balla, 19/09

4. The Indian Express – Sazzid Z. Che 30/09/2017

6. नागपूर टाईम्स संवाद - हरीषशेख 10/...

7. रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरची पत्रपरिषद, महाराष्ट्र ... 8, 16, व 18 डिसेंबर 2016


Scanned by CamScanner

# जीएसटी ची संकल्पना

प्रा. डॉ. राजाभाऊ बुरनकर

देशात राज्य सरकारे आणि केंद्रसरकार यांना कर लावण्याचे स्वातंत्र्य घटनेने बहाल केले आहेत. कारण कर लावूनच केंद्र सरकार व राज्य सरकारे आपला महसूल प्राप्त करीत असतात. कराची संकल्पना अर्थशास्त्रात सर्वप्रथम मसग्रेव्ह यांनी मांडली होती. त्यांच्यामते कोणताही कर सरकार जेव्हा जनतेकडून किंवा प्रजेकडून प्राप्त करते तेव्हा त्या प्राप्त केलेल्या किंवा गोळा केलेल्या करावर पूर्णपणे जनतेचा अधिकार असतो व तो असायलाही पाहिजे. देशातील घटनेने देश शासन व्यवस्थेद्वारे चालविण्याकरीता लोकशाही प्रणालीचा वापर करणाऱ्या देशात जनप्रतिनिधीद्वारे सरकार चालविले जाते याचाच अर्थ जनतेचे प्रतिनिधी म्हणजेच सरकार होय. याचा जनतेला जनप्रतीनिधी निवडून दिल्यावर विसर पडतो व हिच लोकशाही व्यवस्थेची लंगडी बाजू ठरते. मसग्रेव्ह यांनी स्पष्ट केल्याप्रमाणे शासनाद्वारे गोळा केलेला कर व लोकांच्या कल्याणावर केलेला खर्च हा समान असणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हांच देशातील जनतेचे महत्तम कल्याण साधणे शक्य होते.

राज्यघटनेच्या परिशिष्ट यादीतील क्र.- 01 मध्ये असलेल्या कर विषयावर केंद्रशासन कर लावू शकते. यात आयात कर, अबकारी कर व सेवाकर अंर्तभूत आहेत. या बाबीवर राज्यशासन कर आकारू शकत नाही. राज्यघटनेच्या परिशिष्ट क्र. - 02 मध्ये असलेल्या कर विषयावर राज्यशासन कर लावू शकते. यामध्ये विक्रीकर (VAT), प्रवेश कर, मनोरंजन कर इत्यादींचा समावेश आहे. यावर केंद्रशासनाला कर लावण्याचा अधिकार नाही. परंतु घटनादूरस्तीमुळे कराचे विविध विषय समाप्त करून वस्तू आणि सेवेचा पूरवठा हा एकच विषय ठेवून केंद्र आणि राज्य या दोघांनाही कर लावण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. प्रत्येक राज्याला कर लावण्याचा अधिकार आहे. असे असल्यावर कोणत्या वस्तू व सेवेवर करदर किती असावा, कायद्याची अंमलबजावणी कशी असावी यामध्ये काही प्रमाणात मतभेद होणार हे स्पष्ट होते. प्रत्येक राज्याने आपल्या मर्जीप्रमाणे निर्णय घेतले, कर दर बदलले तर त्यामुळे अपेक्षीत परिणाम साधला जाणार नाही. ही वस्तूस्थिती होती यावर उपाय शोधने गरजेचे होते. संपूर्ण देशाचा विचार करून सर्वानुमते निर्णय घेतले तरच देशभर एककर ही संकल्पना प्रत्यक्षात येऊ शकते. याकरीता जीएसटी परिषदेची स्थापना करण्यात आली. याकरीता घटनेमध्ये आवश्यक तो बदल करण्यात आला. या परिषदेचा अंतर्गत केंद्राप्रमाणे राज्यानाही प्रतिनिधीत्व देण्यात आले आहे. म्हणजेच परिषद सर्वांगीचा विचार करूनच सर्वानुमते शासनाला सूचना करून शकेल अशी परिषदेची रचना निश्चित करण्यात आली आहे. या संदर्भात अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार शासनाकडे राहील.

नागरीक, लोक, छोटे मोठे व्यापारी, उद्योजक यांना असे वाटते की, जीएसटी ची आकारणी केल्यावर पून्हा एकदा सेवाकर किंवा विक्रीकर लावण्यात येणार आहे का ? हा संदिग्ध प्रश्न निर्माण होणे साहजीक आहे. परंतू ज्या दिवशी जीएसटी लागू करण्यात आला तेव्हापासून केंद्र सरकारचे आणि राज्य सरकारचे आजेदर असलेले कर अधिकार समाप्त करण्यात आले. व असे अधिकार रद्द झाल्यामुळे पून्हा ज्या कर संरचनेमुळे कर लावले जाणार नाहीत हे निश्चित झाले. राज्यघटना दुरूस्ती मंजूर झाली असल्याने केंद्र आणि राज्यांना वस्तू व सेवा कर लावण्याचा अधिकार प्राप्त झाला आहे. याची व्याख्या करीत असतांना सेवा म्हणजे काय ? वस्तूवर कसा कर आकारावा व त्याचा दर किती असावा जीएसटी कर कायद्याची अंमलबजावणी कशा प्रकारची असेल व्यापारी व उद्योजकांची नोंदणी प्रणाली कशी असेल, यात गुंतलेला अधिकारी वर्ग, अधिकारी वर्गाचे अधिकार, व्याजाची रक्कम, दंड, यांची आखणी यासर्व बाबींचा विचार करणे गरजेचे होते व याचे उत्तर राज्यघटनेत मिळणार नाही हे निश्चित होते. यापूर्वी राज्यात कर आकारणीच्या, रिटर्न भरण्याच्या इनपूट क्रेडीटच्या पध्दती वेगवेगळ्या होत्या व केंद्र सरकारची पध्दती भिन्न होती. म्हणून देशात एकच कर आणावयाचा असेल तर राज्यांअंतर्गत कायद्यात सुधारणा आणने गरजेचे होते. या संदर्भात प्रत्येक राज्याला वेगवेगळी कार्य सोपविण्यात आली होती. विवरणपत्रे तयार करण्याची जबाबदारी महाराष्ट्र सरकारकडे सोपविण्यात आली होती. जनतेने केलेल्या सूचनेचा वापर करून 14 जून 2017 ला केंद्र शासनाने जीएसटी कायद्याचे प्रारूप प्रसिध्द केले होते. जीएसटी परिषदेने 25 नोव्हेंबर 2016 ला सर्वांच्या सूचना विचारात घेऊन केंद्रीय वस्तू व सेवाकर कायदा (CGST), एकात्मीक वस्तू सेवाकर कायदा (IGST), संघ राज्य वस्तू सेवा कर कायदा (UGST) आणि वस्तू सेवा कर कायदा (राज्यांना भरपाई देण्याबाबत) कायदा असे एकूण चार कायदे संसदेद्वारा मंजूर करण्यात आले. त्याचप्रमाणे राज्याने आपले कायदे मंजूर केलेत. वस्तू आणि सेवा यांचे वर्गीकरण आणि त्यावरील करदर ही क्लिष्ट आणि कठीण बाब म्हणून



Scanned by CamScanner

केंद्र आणि राज्य यात एकमत घडून आणण्यात यश प्राप्त झाले व 1 जुलै पासून हा कर अमलात आणून त्याची अंमलबजावणी संपूर्ण संघराज्यात करण्यात आली. यापूर्वी जीएसटी कर अधिकाऱ्यांना योग्यरीत्या समजावा याकरीता सर्व वरिष्ठ संबंधीत अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले.

केंद्र व राज्य शासनातून जीएसटी मुळे रद्द करण्यात आलेले कर पुढील प्रमाणे आहे

केंद्र सरकार वस्तूच्या उत्पादनावरील कर. औषधे आणि प्रसाधने वस्तू निर्माणावर लागणारा अबकारी कर, अतिरीक्त अबकारीकर, सेवाकर, केंद्रीय विक्रीकर, वृत्तपत्र आणि जाहीरात कर, आयात करीत असतांना भरावा लागणारा काउंटर व्हेलींग शुल्क व विशेष अतिरिक्त शुल्क.

**राज्यस्तरावर रद्द झालेले कर :-**

विक्रीकर, ऐशआराम कर, मनोरंजनकर, लॉटरीकर, प्रवेशकर, पेट्रोलियम, स्टॅम्पड्युटीकर या करावरील भार जीएसटी पासून वेगळा ठेवण्यात आला आहे. तंबाखू व मद्य यावर कर लावण्याचे अधिकार बदलण्यात आलेले नाही. राज्यांचे सर्व अप्रत्यक्ष कर रद्द करण्यात आले आहेत.

जीएसटी अमलात आल्यानंतरही व्यापारी व उद्योजकांना द्यावे लागणारे कर :-

1) व्यवसाय कर (Professonal Tax)

2) मुद्रांक शुल्क (Stamp Duty)

3) वाहतूक कर (Road Tax)

4) मालमत्ता कर ((Property Tax)

पर्यावरण कायदे, शॉप अॅक्ट, अन्न व भेसळ कायदे, कामगार कायदे याचा उद्देश वेगळा असल्याने या कायद्या अंतर्गत नोंदणी तपासणी या बाबी पूर्वीप्रमाणेच चालू राहतील.

**भारतीय जीएसटी करप्रणालीचा स्वातंत्र्यपणा :-**

केंद्र आणि राज्य यांच्या दरम्यान कराची विभागणी झाल्यामुळे केंद्र आणि राज्यशासनाने आपआपले अधिकार सोडले. भारतातील जीएसटी करप्रणाली ही द्विस्तरीय स्वरूपाची आहे केंद्रशासनाचा कर (CGST) व राज्यशासनाचा (SGST) असा आहे. यासंदर्भात भरावयाची विवरणपत्रे, व्याख्या, कायदा कोणत्यारकमेवर कर आकारायचा या सर्व बाबी सारख्या आहेत. जीएसटी अंमलात आल्यावर एकाच व्यव्हारावर दोनदा कर भरावे लागतील यातला अर्धा कर केंद्रशासनाला तर अर्धा कर राज्यसरकारला देय राहील. जगातील जवळपास 150 देशात जीएसटी अथवा व्हॅट या नावाने सर्व व्यवहारावर कर लावला जातो. कर लावण्याची ही सर्वात सरळ, स्पष्ट व कर न देण्यातून कोणीही सुटणार नाही अशी ही कर प्रणाली आहे. भारतात विविध प्रकारची विविधता, व्यापाराचे स्वरूप व्यव्हाराचा आकार, अन्य राष्ट्रापेक्षा अधिक गुंतगुंतीचा असल्यामुळे जीएसटी चा सरळ मार्ग शोधणे सध्या तरी शक्य नाही. जीएसटी समजून घेण्याकरीता कोणते कर कोणत्या व्यव्हारावर लागतात, कोणत्या कराची वजावट प्राप्त होते आणि कोणत्या कराची प्राप्ती होत नाही व या सर्वाचा किंमतीवर कसा परिणाम होतो हे समजूण घेतले पाहीजे. खाणीतून अथवा शेतमालापासून एखादी पदार्थाची निर्मिती होते. खाणीतून खणीज किंवा शेतातून शेतमाल उत्पादनस्थळापर्यंत आणने ही पहिली अवस्था असते. खाणीतून खणीज काढतांना शासनाला रॉयल्टी देणे बंधनकारक आहे. शेतीतील कच्चामाल कृषीविपणन व्यवस्थाद्वारा विकला जातो. यातूनच वेगवेगळ्या स्तरावर वेगवेगळा कर देणे आवश्यक असते. विक्रीकर, प्रवेश कर, उत्पादन कर, सेवाकर, आयात कर इत्यादी होय. हे कर वेगवेगळ्या टप्यावर द्यावे लागतात. त्याचा किंमतीवर कोणता परिणाम होईल हे महत्वाचे आहे. जीएसटी मध्ये केवळ रॉयल्टी आणि कस्टम ड्युटी या कराची वजावट मिळणार नाही. त्यामुळे वस्तू व सेवांचे दर कमी करणे शक्य होणार नाही. परंतू अल्पमुदतीत किंमत अधिक वाढण्याची शक्यता यात जास्त असते. कारण व्यापारी त्याला मिळणारी सवलत ग्राहकास त्वरीत उपलब्ध करून देत नाही. जीएसटी कायद्यानुसार विक्रेत्याने जीएसटी पासून मिळणारे लाभ आपल्या विक्रेत्यांना दिले पाहीजेत. व्यापाऱ्यांना विशेष ग्राहक उपयोगी वस्तूंचे निर्माते व वितरकांनी मिळणारा फायदा वस्तूच्या किंमती कमी करून ग्राहकांना द्याव्यात म्हणजेच जीएसटी करपध्दती ही वस्तूत व्यवहार्य ठरेल.

**जीएसटी ची व्याप्ती:-**

अबकारी कर उत्पादकाला भरावा लागत असे. मुल्यवर्धीतकर विक्रेता भरत होता, सेवाकर सेवादेणाऱ्यांना लागत होता. परंतू जिएसटी कर प्रणाली अंमलात आल्यानंतर वस्तू व सेवा या दोन्ही क्षेत्रातील विविध बाबी जीएसटीत समाविष्ट करण्यात आल्या परिणामतः जी व्यक्ती व्यापार व्यवसाय करणारी असो, उद्योजक असो, सेवा देणारे असो, असा सर्व वर्ग जीएसटीच्या कक्षेत आणण्यात आला आहे. या कायद्यानुसार त्यांना करपात्र व्यक्ती म्हणून संबोधले जाईल. या अंतर्गत खाली व्यक्ती व संस्थाचा समावेश करण्यात आला आहे.

1) नैसर्गीक व्यक्ती (Individual)

2) अविभक्त हिंदू कुटुंब पध्दत (Hindu Undivided Family)

3) व्यवसाय संस्था (Firm)

4) कंपनी (Company)

5) भागीदारीचा व्यवसाय (Partnership Business)

6) व्यक्तीचा संघ (Association of Persons)

7) केंद्र, राज्य, प्रांतिक अथवा कंपनी कायद्याने प्रस्थापीत महामंडळे (Corporation)

8) भारताबाहेर तेथील कायद्याने स्थापित निगम/निकाय (Body-Corporation)

9) सहकार कायद्यानुसार नोंदणिकृत सहकारी संस्था (Co-operative Society)

10) स्थानिक प्राधीकरण (Local Tribunal)

11) केंद्रशासन किंवा राज्य शासन (Central Govt. and



Scanned by CamScanner

# जीएसटी - अपूर्ण क्रांती

डॉ. प्रा. गजानन घाडे
(एम.कॉम., बी.एड.,
पी.एच.डी.)

प्रा. भुपेश वसंतराव वाघाडे
(एम.ए.अर्थशास्त्र,
बी.एड. एम.फील, नेट)

**1) वस्तु व सेवा करप्रणाली**

स्वातंत्र्यानंतरची सर्वात मोठी आर्थिक सुधारणा समजले जाणारे वस्तु व सेवा कर (GST) विधेयक 6 मे 2015 रोजी लोकसभेने मंजूर केले 122 वी घटनादुरुस्ती असणारे हे विधेयक 352 विरुध्द 73 मतांनी संमत झाले. वस्तू व सेवावरील विविध अप्रत्यक्ष कर रद्द करून संपूर्ण देशात करप्रणाली उभारणे आता शक्य होणार आहे. 1 जुलै 2017 पासून (GST) ची अमलबजावणी सुरु झाली. या विधेयकाला 20 राज्यांनी मान्यता दिली. राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांनी 8 सप्टेंबर 2016 रोजी विधेयकावर स्वाक्षरी केली.

देशाच्या अप्रत्यक्ष करप्रणालीचा संपूर्ण ढाचा बदलून टाकणारी ही प्रणाली असून यामुळे आर्थिक सुधारणाच्या दिशेने देशपातळीवर उचललेले हे महत्वपुर्ण पाऊल आहे.

**2) प्रणाली म्हणजे काय ?**

(GST) करप्रणाली अवलंब जगात सर्वात प्रथम फ्रान्सने इ.स.1954 साली केला. त्यानंतर जगातील बहुतेक राष्ट्रांनी ही प्रणाली अंगीकारली असून सध्या (GST) प्रणाली असणाऱ्या देशांची संख्या 150 असून अधिक आहे. (GST) प्रणाली नसणाऱ्या देशांमध्ये अमेरिकेची गणना होते. (GST) प्रणाली राबविणारे प्रमुख देश व त्या देशातील (GST) चा प्रमाण दर (Standard Rate) पुढलप्रमाणे.

| क्र. | देश | GST आरंभ | प्रमाणदर (%) |
|---|---|---|---|
| 1 | ब्रिटेन | 1 एप्रिल 1973 | 20 |
| 2 | कॅनडा | 1 जाने. 1991 | 5(Hamonised Sales Tax (HST)<br>0 ते 15 % |
| 3 | ऑस्ट्रेलिया | 1 जुलै 2000 | 10 |
| 4 | चीन | 1 जाने 1994 | 17 |
| 5 | न्यूझीलंड | 1 ऑक्टो. 1986 | 15 |
| 6 | सिंगापूर | 1 एप्रिल 1994 | 7 |
| 7 | युरोपीय महासंघ | — | किमान 15 |
| 8 | भारत | 1 जुलै 2017 | 0,5,12,18,28 |

**3) (GST) चा अर्थ :-**

Goods and services Tax नावातच स्पष्ट असणारा हा वस्तू व सेवावरचा कर आहे. वस्तूचे उत्पादन, विक्री, उपभोग आणि सेवा पुरवठा यावर आकारलेला राष्ट्रीय स्तरावरील अप्रत्यक्ष कर म्हणजे GST

हा एक प्रकारचा VAT- Value Added Tax म्हणजे मूल्यवर्धित कर आहे. हा कर किरकोळ विक्रेत्यापासुन उत्पादकापर्यंत तसेच सेवा पुरवठादार या सर्वांनाच लागू होतो या व्यवस्थेत उपभोग/वापर यावर आधारीत कररचना अपेक्षित आहे. आणि कराची देयता ठरविण्यासाठी यात Tax Credit (वजावट) ची पद्धत वापरली जाते. म्हणजेच खरेदी करताना भरलेले कर विक्री करताना आकारलेल्या करातून वजावट मागता येते. वस्तू व सेवांच्या अखेरच्या उपभोक्त्यावर कराचा बोजा असतो म्हणून त्याला Last Point Retail Tax असे ही म्हणता येईल.

वस्तू व सेवा कर (GST) प्रणाली अस्तित्वात आल्यानंतर देशपातळीवर अप्रत्यक्ष करासंबधीचे व्यवहार हे सुरळीत, जलद आणि अधिक पारदर्शी होण्यास मदत होईल. वस्तू व सेवा कर या अप्रत्यक्ष कराविषयची प्राथमिक माहिती पुढीलप्रमाणे -

1) (GST) हा सुपर्ण देशासाठी एकच अप्रत्यक्ष कर आहे. त्यामुळे देशपातळीवर एकात्मिक बाजारपेठ तयार होण्यास मदत होईल.

2) वस्तु व सेवांवर स्वतंत्र कर न लावता या दोन्ही बाबींसाठी (GST) हा एकच कर असेल हा कर वस्तू व सेवांच्या पुरवठ्या दरम्यान (supply) आकरला जाईल

3) पुरवठ्यादरम्यान वेगवेगळ्या टप्प्यावर आकारण्यात येणारा हा कर त्या टप्प्यात होणारया फक्त मूल्यवर्धनावर (Value Addition) आकारला जाईल.

4) पुरवठासाखळीच्या शेवटी असणारा घटक म्हणजे ग्राहकाला तो घेत असलेल्या वस्तूवर विक्रेत्याने केलेल्या मूल्यवर्धनाच्या (या ठिकाणी नफा) प्रमाणातच कर भरावा लागेल.

सर्व आर्थिक उलाढाल दोन पध्दतीने होते. एक म्हणजे वस्तूची विक्री दुसरी म्हणजे सेवांच्या पुरवठा. या दोन्ही उलाढालीवर एकत्रित कर लावला की तो वस्तू व सेवा कर

Scanned by CamScanner

काही महत्वाच्या संकल्पना

1) केंद्रीय वस्तू व सेवा कर Central Goods and Services Tax (CGST) :- या कराची आकारणी केंद्राकडून केली जाईल. प्रत्येक वस्तू व सेवेवर हा कर आकारला जाईल.

2) राज्य वस्तू व सेवा कर State Goods and Services Tax- (SGST) :- या कराची अंमलबजावणी राज्याकडून केली जाईल.

3) एकात्मिक वस्तू व सेवा कर (Integrated Goods and Services Tax (IGST) :- दोन राज्यांदरम्यान होणाऱ्या वस्तू व सेवांच्या व्यापारावर केंद्राकडून हा कर आकारला जाईल.

4) महसूल तटस्थ दर (Revenue Neutral Rate – RNR) म्हणजे असा दर ज्यामुळे सरकाच्या महसुलात घट होणार नाही




RNR अशा पद्धतीने निर्धारित केला जाईल ज्यामुळे सरकारला अपेक्षित महसूल मिळेल.

2) (GST) प्रणालीची आवश्यकता

(GST) ची आवश्यकता ही दोन घटकांच्या आधारे स्पष्ट करता येईल. एक म्हणजे अप्रत्यक्ष कर प्रणालीत असणारे दोष (GST) मुळे दूर होण्यास मदत होईल आणि दुसरे म्हणजे (GST) प्रणालीचे स्वतःचे काही फायदे आहेत शिवाय जागतिक पातळीवर 150 हुन अधिक देशांनी (GST) प्रणालीचा स्वीकार केला आहे. देशात सध्या अस्तित्वात असणाऱ्या अप्रत्यक्ष करप्रणालीतील खालील दोषपुर्ण बाबीमुळे भारताला (GST) प्रणालीची आवश्यकता असल्याचे लक्षात येते.

1) अप्रत्यक्ष करप्रणालीतील Cascading Effect म्हणजेच करावर कर अधोरोपीत होण्यामुळे वस्तू व सेवा महाग विकल्या जातात.

2) वस्तू व सेवा ही उत्पादकापासून उपभोक्त्यापर्यंत पोहचेपर्यंत विविध टप्प्यातून जाते केंद्र व राज्य सरकार या विविध टप्प्यांवर करआकारणी Taxable Event करतात यामुळे कर आकारणी किचकट होते.

3) सध्या वस्तूवर उत्पादन शुल्क व VAT हे दोन मुख्य कर आकारले जातात तर सेवांवर सेवाकर हा एकच कर आकारला जातो एकात्मिक करप्रणाली अपेक्षित असताना वस्तू व सेवांवरील करांची तफावत असुसंगत आहे.

4) सध्या वस्तू व सेवांवर होणारी कर आकारणी वेगवेगळी असली तरीही काही वेळा दुहेरी कर आकारणी Double Taxation होते उदा. सॉफ्टवेअर VAT सोबतच सेवाकराचीही आकारणी होते.

5) अप्रत्यक्ष कराच्या मोठ्या संख्येमुळे व प्रत्येक करासाठी वेगळी शासकीय यंत्रणा असल्याने उद्योजक, व्यापारी आणि सेवापुरवठादारांना कर भरणा व परतावा यासाठी प्रत्येक यंत्रणेसोबत स्वतंत्रपणे व्यवहार करावा लागतो. उदा. एका उद्योजकाला उत्पादन शुल्क, VAT केंद्रीय विक्रीकर इत्यादी साठी वर्षभरात साधारण 100 वेळा शासकीय कर यंत्रणेसोबत व्यवहार करावा लागतो.

3) (GST), घटकराज्य आणि महाराष्ट्र

(GST) ची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यघटनेमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक होते. तसेच या घटना दुरुस्तीस प्रत्यक्ष अंमलबजावणीसाठी किमान 16 राज्यांनी संमती देणे आवश्यक होते. 8 सप्टेंबर 2016 पर्यंत या विधेयकास मंजुरी दिली.

29 ऑगस्ट 2016 रोजी महाराष्ट्र राज्य विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांनी 122 व्या घटनादुरुस्ती विधेयकाला एकमताने संमती दिली. त्यासाठी विशेष अधिवेशन बोलविण्यात आले. या विधेयकामुळे राज्याच्या महसुलावर विपरीत परिणाम होणार नाही. व मुंबईसारख्या मोठ्या शहरांची आर्थिक स्थिती बिघडणार नाही. असा निर्वाळा मुख्यमंत्री व वित्तमंत्री यांनी दिला.

4) वर्तमान कर प्रणालीतील तुलनात्मक लाभ व नुकसान

अ) 1) (GST प्रणाली चे फायदे

A उद्योगक्षेत्रासाठी

1) (GST) प्रणालीसाठी देशव्यापी व एकात्मिक स्वरुपाची माहिती तंत्रज्ञान (IT) यंत्रणा उभारण्यात येणारा असून या यंत्रणेच्या माध्यमातून करदात्यांना नोंदणी, परतावा (Returns) देयके (Payment) इत्यादी सुविधा ऑनलाईन उपलब्ध होतील. यामुळे वेळेची बचत होईल. शिवाय पारदर्शकता वाढण्यास मदत होईल.

2) वस्तू व सेवांसाठी एकाच प्रकारची करप्रणाली देशपातळीवर असल्यामुळे उद्योगस्नेही वातावरण निर्माण होण्यास मदत होईल. वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळ्या करप्रणालीमुळे पूर्वी उद्योगक्षेत्राला निर्माण होणारी समस्या (GST) मुळे निकालात निघेल.

3) (GST) प्रणालीत Cascading Effect ला जागा असणार नाही, त्यामुळे सुलभ करप्रणाली अस्तित्वात येईल.

4) (GST) ही IT आधारीत प्रणाली असल्याकारणाने व्यवहारावरील खर्च (Transaction Cost) कमी होईल त्यामुळे उद्योग व व्यापार क्षेत्रात स्पर्धा वाढण्यास मदत होईल.

5) केंद्र व राज्याचे अप्रत्यक्ष कर (GST) मध्ये समाविष्ट



Scanned by CamScanner

झाल्यामुळे देशांतर्गत वस्तू व सेवा उत्पादकांना केंद्रीय विक्रीकरापासून मुभा मिळेल. त्यामुळे या उत्पादकांचा उत्पादक खर्च कमी होईल. याचा फायदा जागतिक स्पर्धेत उतरू पाहण्याचा वस्तू व सेवा पुरवठादारांना होईल.

**B केंद्र व राज्य सरकारासाठी**

1) विविध अप्रत्यक्ष करांचा समावेश (GST) मध्ये करण्यात आला असल्याने केंद्र व राज्य सरकारला एकात्मिक अशा (GST) ची अंमलबजावणी करणे सुलभ ठरणार आहे.

2) IT आधारीत करप्रणाली असल्याने कर आकारणी व वसुलीमध्ये पारदर्शकता येण्यास मदत होईल. कर गळतीलाही आळा बसेल.

3) (GST) प्रणालीमुळे सरकारला कर गोळा करण्यासाठी लागणारा खर्च कमी होईल. म्हणजेच सरकारची महसूल उत्पादकता वाढेल.

**C) उपभोक्त्यांसाठी**

1) एकात्मिक अशा प्रकारच्या (GST) प्रणालीमुळे उपभोक्त्यांना छुप्या करांपासुन मुक्ती मिळेल. मोठ्या संख्येत असणारे केंद्र व राज्यपातळीवरील अप्रत्यक्ष कर उपभोक्त्यांच्या दृष्टीनेही फायदेशीर नव्हते (GST) यावरील योग्य उपाय ठरेल.

2) करगळतीला आळा आणि कार्यक्षम करआकारणी यामुळे उपभोक्त्यावर पडणारा करावा बोजा कमी करण्यास (GST) साहाय्यभूत ठरेल.

**2) (GST) चे इतर फायदे**

अनेक अर्थांनी (GST) ही क्रांती आहे. व्यक्तिगत उत्पन्नावर आणि कंपन्यांच्या नफ्यावर भरला जाणारा आयकर तसंच आयातीवर आकारला जाणारा आयातकर या दोन गोष्टी वगळता बाकीचे सगळे महत्त्वाचे कर (GST) आपल्या कक्षेत घेणार आहे. सध्या वस्तूच्या उत्पान्नावर अबकारी कर, विक्रीकर, राज्यांचा विक्रीकर आणि सेवांच्या पुरवठ्यावर सेवाकर लागू होतो. जीएसटी कुठल्या वस्तूच्या आणि सेवेच्या पुरवठ्याच्या वेळी होणार आहे. हा मूल्यवर्धित कर आहे. कुठलीही वस्तू किरकोळ ग्राहकांच्या हातात पडेपर्यंत उत्पादन आणि विक्रीच्या लांबलचक साखळीतून येत असते. कच्चा माल, उपउत्पादक, मुख्य उत्पादक, वितरक, घाऊक व्यापारी, किरकोळ व्यापारी अशा या साखळीतल्या प्रत्येक टप्प्यावरचा पुरवठादाराला आधीच्या टप्प्यांवर भरल्या गेलेल्या करांच क्रेडीट (GST) मिळेल. त्यामुळे प्रत्येकाला आप-आपल्या टप्प्यात जेवढ मूल्यवर्धन केलं त्यावरच कर भरावा लागेल. आधीच्या टप्प्यांवरच्या करावर कर लादला जाणार नाही पण केवळ मूल्यवर्धित करपध्दती हे (GST) चे नावीन्य नाही. सध्याचे अबकारी, सेवाकर आणि विक्रीकरही मूल्यवर्धित आहेत. पण ते एकमेकांशी पूर्णतः जोडलेले नाहीत. खरेदी केलेल्या कच्च्या मालावरच्या अबकारी करांच क्रेडिट शिल्लक असेल तर सध्या कंपन्या ते विक्रीकर भरताना वापरू शकत नाही. तसंच खरेदी केलेल्या यंत्रसामग्रीवरच्या करांचं क्रेडिट सध्या सहसा कंपन्यांना वापरता येत नाही (GST) करांची साखळी एकसंघ असल्याने मूल्यवर्धित करआकारणी आणखी परिपूर्ण आणि अखंड बनेल.

2) (GST) अंमलबजावणीनंतर कर चुकवणाऱ्या उत्पादक आणि विक्रेते मंडळींचं प्रमाण लक्षणीयरीत्या कमी होईल अशी सर्वांची अपेक्षा आहे. कारण प्रत्येक टप्प्यावरच्या व्यवसायाला आधीच्या टप्प्यावरच्या करभराचं क्रेडिट मिळवण्यासाठी आधीच्या टप्प्यावर करभरणा झाल्याची नोंद (GST) प्रणालीत असायला हवी. त्यामुळे आधीच्या टप्प्यांवरच्या व्यवसायाकडुन करचुकवेगिरी होऊ नये, यांची दक्षता पुढच्या टप्प्यावरच व्यवसाय घेतील. अशा सामूहिक प्रमाणिकपणाचा प्रत्यक्ष काही अंशी सध्याच्या मूल्यवर्धित करपद्धतीमध्ये येणं अपेक्षित असलं तरी (GST) मध्ये ते आणखी प्रकर्षाने आणि प्रभावीपणे येईल कारण इथे एकाच प्रणालीत साऱ्या व्यावसायिकांच्या नोंदी असतील आणि मूल्यवर्धित कराची साखळी आधी नमूद केल्याप्रमाणे परिपूर्ण असेल.

3) (GST) सध्या एका मर्यादेपेक्षा छोट्या व्यावसायिकांना कर जाळयातून वगळलेल असलं तरीही अखंड मूल्यवर्धित कर साखळीचा परिणाम म्हणून (GST) त करप्रणालीची व्याप्ती मोठी राहील. आणि त्यापासुन दूर राहणं असंघटित क्षेत्राला सध्याच्या तुलनेत कठीण राहील. यातून असंघटित क्षेत्रातल्या करचुकवेगिरीला आळा बसला तर ज्या ज्या क्षेत्रामध्ये संघटित क्षेत्रातल्या उद्योगांना सध्या असंघटित क्षेत्राच्या कडव्या आणि विषम स्पर्धेच्या सामना करावा लागत आहे. त्यांना थोडाफार दिलासा मिळेल.

4) भारतीय उद्योगांच्या स्पर्धात्मकतेला (GST) च्या राज्यात आणखी एका बाबतीत दिलासा मिळेल. सध्या आयातीवर आयातकराबरोबरच एक एक अबकारी समान करही (कांउटरव्हेलिंग ड्युटी किंवा सीव्हीडी) लादला जातो. मात्र बऱ्याच वस्तूंच्या बाबतीत आयातीची आवश्यकता लक्षात घेऊन (आणि कधी कधी देशी बनावटीच्या वस्तूची उपलब्धता नसल्यामुळे) सरकारने सीव्हीडीत सवलती दिल्या आहे. देशाच्या जवळपास एकतृतीयांश आयातीवर अशा सवलती आहेत. असा अंदाज एका अहवालात व्यक्त केला होता. अशा वस्तूच्या देशी स्पर्धकांचं पारडं सध्या एका बाबतीत खाली असतं. ती वस्तू बनवण्यापूर्वीच्या टप्प्यांवरचा करआकारणीचा कुठलाही बोजा आयात मालावर नसतो, . कारण कुठलाही देश निर्यातीवर अप्रत्यक्ष करांचं ओझं टाकत नाही. स्पर्धा करणाऱ्या देशी उद्योगाला मात्र अबकारी करातून आयातीवरच्या सवलतीइतकीच सवलत मिळाली तर आधीच्या टप्प्यावर भरल्या गेलेल्या करांचा बोजा शिल्लक राहतोच (GST) च्या प्रणाली मध्ये आधीच्या टप्प्यांवरचा करांचं पूर्ण क्रेडिट मिळाल्यामुळे देशी उद्योगांचे हे लंगडेपण नाहीसं होईल आणि त्यांना आयातीशी समान पायरीवर उभं राहुन स्पर्धा करता येईल.

5) नव्या करप्रणालीतलं सगळ्यात क्रांतीकारक पाऊल म्हणजे सध्या आंतरराज्य विक्रीकर प्रचलित असणारा दोन टक्के केंद्रीय विक्रीकर (GST) मध्ये सामावला जाणार आहे. हा कर सध्या दोन टक्के असला तरी



Scanned by CamScanner

केंद्रीय विक्रीकरात खरेदीवर भरलेल्या कराचं नंतर क्रेडिट घेण्याची सोय नाही त्यामुळे या दोन टक्के कराच्या रकमेवर इतर कर आकारले जाऊन त्या कराची पुढच्या टप्प्यात चक्रवाढ होते खरेदीवर भरलेल्या करांच क्रेडिट मिळत नसल्यामुळे परदेशातून आपल्या देशात येणाऱ्या मालावर जसा आयातकर असतो तसाच हा एका राज्यातुन दुसऱ्या राज्यात होणाऱ्या पुरवठ्यात एका प्रकारचा आयातकरच आहे. आंतरराज्य पुरवठ्यावरचा हा कर टाळण्यासाठी अनेक कंपन्यानी निरनिराळ्या राज्यांमध्ये गुदाम उघडली आहेत.

6) केंद्रीय विक्रीकर आता मोडीत निघणार असल्यामुळे आणि प्रत्येक वस्तुवरचा देशभरातला कर एकसमान होणार असल्यामुळे कुणालाही उत्पादन विक्री साखळीतली कुठली गोष्ट कुठल्या राज्यात करायची आहे. हे ठरवतांना करदरांचा आणि त्यांच्या परिणामाचा विचार करायला लागणार नाही. निखळ आर्थिक स्पर्धात्मकतेचे निकष लावून असे निर्णय घेता येतील. त्यातून देशांतर्गत व्यापार वाढेल आणि उद्योगांची कार्यक्षमता वाढेल दुसरी गोष्ट म्हणजे प्रवेशकर आणि इतर जकातसदृश करही आता इतिहासजमा घेणार आहेत त्यातून मालवाहतूक करणाऱ्या ट्रकांचा वेग वाढेल आणि अनावश्यक गुदामांची गरज नसल्यामुळे एकुणच मालवाहतुकीची कार्यक्षमता वाढेल तसेच खर्चही कमी होईल. या सगळ्या बदलांमुळे जीएसटी हे उद्योग व्यवसायांसाठी एका परीने भारतजोडो अभियान ठरणार आहे.

**क) 1) (GST) प्रणालीचे तोटे**

1) GST चे बरेच फायदे असले तरीही ही संपूर्ण क्रांती नाही. कारण पेट्रोल डिझेलसह पाच पेट्रोलियम पदार्थ सध्या GST च्या बाहेर राहणार आहे. आणि राज्याकडुन वीजनिर्मितीवर लावला जाणारा वीज करही कायम राहणार आहे. अलीकडच्या वर्षामध्ये आंतरराष्ट्रीय बाजरातले कच्च्या तेलाचे दर घसरले असले तरी बराचसा फायदा ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याऐवजी सरकारने पेट्रोल आणि वीज यांच्यावरचे कर सध्या केंद्राच्या एकूण अबकारी कर वाढवुन वित्तीय तूट नियंत्रणात ठेवण्यासाठी त्याचा वापर केला होता. परिणामी पेट्रोल डिझेल, आणि वीज यांच्यावरचे कर सध्या केंद्राच्या एकूण अबकारी कर संकलनाच्या जवळपास साठ टक्के आहेत. अबकारी कर आणि सेवाकर यांच्या एकूण रकमेचा विचार केला तर त्यातही त्यांचा वाटा सुमारे 35% भरतो राज्यांच्या स्वतःच्या अप्रत्यक्ष करमहसुलातही साधारण एक चतुर्थांश महसूल पेट्रोल, डिझेल आणि विजेवरच्या करांमधून येतो जिथे कराचे दर वाढवूनही मागणीवर फारसा परिणाम होत नाही आणि जिथे करबुडवेगिरीचा धोकाही कमी आहे. अशा या सरकारी महसुलसाठीच्या दुभत्या गाईवरच्या अधिकार सोडण्याची सध्या तरी सरकारची तयारी दिसत नाही.

2) सध्याही या वस्तुंवर भरलेल्या करावर पुढच्या टप्प्यातल्या उद्योगांना क्रेडिट मिळत नाही. तीच परिस्थिती यापुढेही कायम राहणार आहे. परिणामी कराची एकसंध साखळी असण्याचे जे जे फायदे आधी नमूद केलेले आहेत, त्यांच्यात पेट्रोल डिझेल, वीजवापरण्यासाठी एक मोठं भगदाड राहणार आहे. या गोष्टीवरचे राज्यस्तरीय कर निरनिराळ्या राज्यांमध्ये निरनिराळे आहेत. विशेषतः वीजकराच्या पातळीत [illegible] आहे. त्यामुळे वीजनिर्मिती उद्योगांना देशभर समान [illegible] येणार नाही. तेल कंपन्यांनाही त्यांनी खरेदी केलेल्या [illegible] आणि सेवांवरच्या जीएसटीचं क्रेडिट त्यांच्याकडुन देय [illegible] करांमध्ये वापरता येणार नसल्यामुळे या कंपन्यांच्या नफ्यावर मोठा [illegible] परिणाम होणार आहे. पाच पेट्रोलियम पदार्थांचा जीएसटीमध्ये भविष्यात कधी तरी समावेश करण्याबद्दल जीएसटी परिषद निर्णय [illegible] असं सांगण्यात आलंय तोपर्यंत जीएसटीच्या फायद्यामध्ये हे [illegible] कायम राहणार आहे.

3) राज्यांच्या महसूलाला भगदाड पडता कामा नये आणि [illegible] जनतेवर अतिरीक्त भार पडुन महागाईला चालना मिळता कामा नये [illegible] महसूल समतोल दर (RNR) निश्चित करावा [illegible] अर्थमंत्रालयाचे मुख्य आर्थिक सल्लागार डॉ. अरविंद सुब्रमणियम [illegible] समितीने प्रमाणित दर 18% ठेवण्याची शिफारिश केली होती [illegible] टप्पे (स्लॅब) सुचविले होते. जीवनावश्यक व महत्वाच्या वस्तूसाठी [illegible] ऐषोआरामाच्या वस्तूसाठी 40% आणि उर्वरित सर्व वस्तूसाठी [illegible] प्रमाणित दर ठेवण्याची शिफारिश त्यांनी केली होती. प्रमाणित दर [illegible] पेक्षा पुढे गेल्यास महागाई अपरिहार्य असल्याची स्पष्ट कबुली [illegible] सुब्रमणियम यांनी दिली. त्याला डावलून राजकीय तडजोडी [illegible] 0,5,12,18, व 28% दर निश्चित करण्यात आले. हीच खरी [illegible] आहे.

**ड) GST व स्थानिक स्वराज्य संस्था**

**महत्वाचे मुद्दे जे जाणीवपूर्वक बाजूला ठेवले आहे.**

1) स्थानिक स्वराज्य संस्थेचा महसूल घटनादुरुस्ती [illegible] चर्चा केंद्रशासन व राज्य शासन या दोन पक्षातच झाली स्थानिक [illegible] संस्थाचे मत कोणीच विचारले नाही.

2) घटनादुरुस्ती नंतर ऑक्ट्रॉय प्रवेश कर एलबीटी या [illegible] कर नाहीसे होणार आहेत त्याऐवजी कोणतेही नवीन कर [illegible] नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांना नुकसान भरपाई राज्य[illegible] सोपविलेली आहे. त्यांना महसूल कसा मिळणार याचा उल्लेख [illegible] दुरुस्ती विधेयकात नाही महसूल हानी झाली तर राज्य शासनाला [illegible] केंद्राकडून नुकसान भरपाई मिळणार आहे. स्थानिक स्वराज्य [illegible] निश्चित महसूल हानी होणार आहे. पण त्याची भरपाई करण्यात [illegible] जबाबदार नाही. गेली दोन वर्षे एलबीटी संदर्भात शासनाने घोळ [illegible] घातला आहे. पण त्या पूर्वी महाराष्ट्रात सर्व स्थानिक स्वराज्य [illegible] मिळून या प्रकारच्या करातून एकत्र उत्पन्न जवळपास 15000 [illegible] रुपयांचे होते. यांत मुंबई महानगरपालिकेचा वाटाच 7000 कोटी [illegible] आहे. याची किंमत शून्य होणार आहे. महाराष्ट्रात प्रत्येक [illegible] स्थानिक स्वराज्य संस्था शाळा चालवितात ज्या राज्यामध्ये [illegible] नाही, तेथे अशी शाळा नाहीत. घटनादुरुस्तीनंतर या शाळांचे [illegible] होणार?



Scanned by CamScanner

3) पहीली पाच वर्षे राज्य शासनाला केंद्राकडून नुकसानभरपाई मिळेल. त्यातुन काही वाटा स्थानिक स्वराज्य संस्थांना मिळेल असे मी धरून चालतो पण या पाच वर्षानंतर पुढची 25 वर्षे कशी चालवयाची ?

4) मुंबई महानगरपालिका केवळ शाळाच चालवीत नाहीत तर नागरीकांना पाणी मिळावे म्हणून महानगरपालिकेने तलाव, धरणे बांधले आहे. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणावर सुटला आहे. जिज्ञासूनी बंगलुरू किंवा चेन्नईला जाऊन तेथील परिस्थिती पहावी. पण यापुढे अशी भांडवली गुंतवणूक करणे महापालिकेला जमेल का?

5) दुसरा मुद्दा आहे विधिमंडळाच्या स्वायत्तेचा आपल्या घटनेप्रमाणे संसद किंवा सर्वोच्च न्यायालयदेखील राज्य विधिमंडळाला कोणते कायदे करावेत ते सांगू शकत नाही. पण नवीन दुरुस्तीद्वारे एक नवीन संस्था जीएसटी कौन्सिल ही संस्था धोरणविषयक हरप्रकारच्या शिफारशी करणार आहे. या शिफारशी बंधनकारक आहेत. असे निर्णय एक -दोन वर्षात येऊ लागतील यामुळे राज्य विधीमंडळाच्या आणि संसेदेच्या सार्वभौमत्वावर बंधने येणार आहेत त्यांच्या परिणामाची चर्चा झाली आहे काय?

6) पुढचा प्रश्न आहे. प्रशासनाचा प्रत्येक व्यवहारवर केंद्र शासन कर घेणार आणि राज्य शासनदेखील कर घेणार पण दोन्हीकडच्या अधिकाऱ्यांनी वेगवेगळे निर्णय घेतले तर काय करायचे ? त्यामध्ये केंद्रशासनाचा वरचष्मा राहील. असे चित्र आहे. नवीन कायद्याचे एक कच्चे प्रारूप प्रसिध्द झाले आहे. ते पाहून या शंकेला बळकटी येते. राज्यांनी आपली प्रशासन व्यवस्था गुंडाळून ठेवावी असा नेम दिसतो. पण काहीच कारण नसताना स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महसुलाला आणि स्वायत्ततेला धक्का लावला आहे. यावरचे स्पष्ट उत्तर राज्य शासनाने द्यायचे आहे.

**इ) सध्या घडणीतील दोष**

**GST चे अनेक फायदे असले तरी ही संपूर्ण क्रांती नाही?**

1) GST हे खरे तर एकाच प्रमाणित दराने (त्यात फक्त गरजेच्या वस्तू सेवांसाठी सवलत दर आणि निव्वळ शानशौकीच्या वस्तू व सेवांसाठी अवगुण दर यांचा अपवाद करून सर्वांसाठी एकाच दराने आकारला जाणारा कर असायला हवा होता सध्या तो तसा नाही. 0,5,12,18,28, अथवा त्याहून अधिक असे विविध दर आपल्याकडे सध्या लागू झालेले आहेत. तेही तथाकथित पाप किंवा अवगुण वस्तूंच्या प्रकारांनुसार लागू आहेत.

2) GST अंमल (प्रशासन) एकाच, एकीकृत कर छत्राखाली व्हावयास हवा होता, पण सध्या तसे नाही. राज्य आणि केंद्र सरकार यांनी दीड कोटी रुपयांहून अधिक उलाढाल नसलेले करदाते 90:10 या प्रमाणात वाटून घ्यायचे आहेत. आणि दीड कोटीहून अधिक वार्षिक उलाढाल असलेल्या करदात्यांचे वाटप 50:50 टक्के या प्रमाणात होणार आहे. पण करदांत्यापैकी कोणाच्या अमलाखाली कोण (केंद्र वा राज्य) येणार ? याची निश्चिती, मला वाटते की, बहुधा लॉटरी वगैरेसारख्या काही प्रकारातूनही झाल्यास नवल नाही?

3) जीएसटी साठी कर -विवरणपत्रे कमी करता आली असती पण तसे झाले नाही. दरमहा तीन अधिक वर्षभराचे एक याप्रमाणे (37 विवरणपत्रे करदात्यांना (व्यापार/उद्योगांना) सरकारकडे सादर करावी लागणार आहेत. जर एखादा उद्योग बहुराज्यीय असेल आणि नेमके त्याच वाट्याला राज्य GST प्रशासन आलेले असेल तर तेवढ्या राज्यामध्ये या उद्योगाची कार्यालये आहेत तेवढ्या सर्व राज्यातून दरमहा तीन अधिक वर्षभराचे एक अशी इतकी सारी विवरणपत्रे भरावी लागतील.

4) GST वर्गीकरणातील झगडे व गोंधळ टाळावयास हवे होते, पण तसे झाले नाही. दर ठरवताना ते अनेकदा बदलण्यात आले. दरम्यान हितसंबंधी गटाच्या वक्तव्यांना उधाण आलेले दिसले आणि संभ्रम वाढला त्यामुळे झगडे अटळ ठरतात उदा. किटकॅट हे बिस्किट मानायचे की चॉकलेट साहजिकच आहे. चॉकलेट आणि बिस्किटे यांची GST आकारणी निरनिराळ्या दरांनी होणार आहे. मला वाटते की, यासारखे काही प्रश्न सर्वोच्च न्यायालयानेच सोडवावेत अशी विनंती केली जाण्याचीही वेळ येऊ शकते?

5). GST कर प्रशासनाला ऐन वेळची ठरवाठरवी (मनमानी) करू देण्यास कमीत कमी वाव ठेवावयास हवा होता. तसेही झालेले नाही. त्याच अगदी उलट, 'नफेखोरी विरोधी यंत्रणा' उभारून तिला पाशवी अधिकार देण्यात आलेले आहेत. ज्या कोणी ही (नफेखोरी विरोधी यंत्रणेची) विचित्र कल्पना मांडली, त्यांस खचितच अर्थशास्त्र, ज्यावर बाजार किंवा स्पर्धा या कशाकशाची माहिती नसावी म्हणजे आर्थिक नियमनाबाबत एका अख्ख्या शतकभराच्या अनुभवाकडे त्यांचे दुर्लक्ष झालेले आहे. किंवा तो डिरिजी वादी राजवटीचा अवशेष आहे. सरकारलाच सारे कळते आणि व्यापाऱ्यांनी काय विकावे तसेच किती किमतीला विकावे हे सांगण्याचा हक्क तर सरकारकडे आहेच. शिवाय ते सरकारचे कर्तव्यही आहे. असे मानणाऱ्या राजवटीला डिरिजी वादी म्हटले जाते.

6) GST कर प्रणाली लागू केल्यानंतर सुरुवातीला येणारा कर संग्रहण फार उत्साहवर्धक नाही जुलै महीन्यात 95000 कोटी रू. ऑगस्ट महीन्यात 90669 कोटी रू. त्याच बरोबर नोंदणीकृत व्यावसायिक करदात्यांची प्रांरभिक संख्या जुलै 59.57 लाख वरून ऑगस्टला 37.63 लाख असे गळतीचे चित्र दिसू लागले आहे. ते नक्कीच अपेक्षित नाही. म्हणून जर या उणिवा दूर झाल्या नाहीत तर GST एक अपूर्ण क्रांतीच ठरते.

**ई) GST व महागाई**

बरेचदा डॉक्टर मंडळी रोग्याला एखादं इंजेक्शन किंवा जालीम औषध दिल्यावर असं सांगतात की याच्यामुळे एखाद दोन दिवस थोडासा ताप येऊ शकतो, पण त्याच्यामुळे घाबरून जायचं कारण नाही! प्रतिक्रीयात्मक ताप म्हणून ओळखला जाणारा तो ताप तात्कालिक असतो आणि मोठ्या उपाययोजनेच्या एकंदर प्रक्रीयेत तो अपरिहार्यही असतो जीएसटी लागू झाल्यामुळे आपल्या अर्थ व्यवस्थेलाही कदाचित कशा एका



Scanned by CamScanner

छोटया तापातून जावं लागेल.

1) जीएसटी हे एक मोठं परिवर्तन आहे. आधीचे करांचे क्रेडिट GST मध्ये करण्यात आले आहे पण तरीही आपल्यापाला हे क्रेडिट नीट वापरता येईल काय, संक्रमणाच्या काळात काही अडचणी येतील काय, अशा आशंकांमुळे बरेचसे व्यवसायिक आपला साठा कमीत कमी राखण्याच्या प्रयत्नात आहेत. अशा बातम्या आहेत. इलेक्ट्रॉनिक वस्तुंच्या व्यापाऱ्यांनी आपला जुना साठा कमी करण्यासाठी सवलतीच्या योजनाही सुरू केल्या. मे महिन्यासाठीच्या खरेदी अधिकाऱ्यांच्या सर्वेक्षणात असं दिसून आलंय की बऱ्याच छोटया मोठ्या उद्योगांनी आपला साठा कमी करायला सुरुवात केली आहे. याचा एकूण आर्थिक उलाढालीवर तात्कालिक विपरीत परिणाम होऊ शकतो. नोटाबदलाच्या परिणामातून अलीकडेच सावरणाऱ्या अर्थव्यवस्थेला हा आणखी एक तात्कालिक धक्का पचवावा लागेल.

2) दुसरा मोठा वादाचा मुद्दा म्हणजे जीएसटीच्या अंमलबजावीनंतर महागाईचा वेग वाढेल काय?

आंतरराष्ट्रीय अनुभव असं सांगतो की जीएसटी अमलात आल्यानंतर काही महिने -कधी कधी वर्षभरापर्यंत -महागाईत भर पडते कॅनडा ऑस्ट्रेलिया, न्युझीलंड, सिंगापुर आणि मलेशिया या देशांचा तो अनुभव होता. ब्रिटन आणि जर्मनीच्या अनुभव वेगळा होता पण त्या दोन्ही देशांमधली अर्थव्यवस्था त्या वेळी जरा नरमलेली होती. त्यामुळे तिथे महागाई नियंत्रणात राहिली. भारतीय अर्थव्यवस्थेत नरमी असल्याची चिन्हे दिसतात विकासदर 5.7 शेकडा पर्यंत घसरला आहे म्हणून भारतात GST मुळे महागाई वाढण्याची शक्यता कमी आहे असे मला वाटते. जीएसटीमुळे महागाई वाढण्याचा धोका हा दोन कारणामुळे असतो एक तर त्या प्रक्रियेत बऱ्याच वस्तुंचे करदर एक साथ बदलतात ज्या वस्तूंचे करदर घसरले आहेत त्यांच्या किमता कमी व्हाव्यात, अशी अपेक्षा असली तरी किमतीचा एक खास गुणविशेष आहे. किरकोळ बाजारातल्या वस्तू आणि सेवांच्या किमती या अनेकदा वर चढायला आतुर पण खाली उतरताना जडशील असतात ग्राहक आणि विक्रेते यांच्या बाबतील माहितीची जी दरी असते तीही अशा असमान बाजार प्रतिक्रीयेला काही अंशी कारणीभूत असते. त्यामुळे करभारातले बदल खालच्या बाजूला कमी प्रमाणात पोचवले जातात तर वरच्या बाजूला पुरेपुर पोचवले जातात.

3) अर्थात जीएसटी मुळे महागाई वाढू नये यासाठी सरकारनेही मोठी फिल्डींग लावली असल्याचं सांगितलं जातंय एकतर GST परिषदेने वेगवेगळ्या वस्तुंचे करदर ठरवताना बऱ्याचशा वस्तुंवरचा करदर सध्याच्या अबकारी कराच्या आणि विक्री कराच्या बेरेजेपेक्षा कमी ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. जीएसटी च्या बाबतीत सुरुवातीच्या काळात तज्ज्ञांच्या ज्या समित्या स्थापन झाल्या होत्या त्यांनी बहुतेक सर्व वस्तु आणि सेवा एकाच करपातळीवर असाव्यात अशी सूचना केली होती. नंतरच्या सामित्यांनीही फार तर तीन करपातळ्या असाव्यात असं सुचवलं होतं. त्या सगळ्या गुंडाळून ठेवून 0,5,12,18 व 28 टक्के असे पाच करदर (शिवाय काही उपकर!) ठरवण्यात आले आहेत. त्यातही अमूक रकमेपर्यंतच्या हॉटेलच्या बिलावर कमी दर असेही प्रकार करदर ठरवताना केले गेले आहेत. या तडजोडीमुळे करप्रणालीतली गुंतागुंत आणि विवादांची शक्यता वाढण्याचा धोका पत्करूनही जीएसटी परिषदेने सर्वसामान्यांच्या खिशावरचा अप्रत्यक्ष कराचा भार वाढू नये यासाठी नक्कीच प्रयत्न केले आहेत. सध्या लागू असणारे कराचे दर आणि जीएसटी परिषदेने आता केलेले जीएसटीचे दर यांची तुलना केलेल्या अभ्यासकांच्या गटाचं निरीक्षण असं आहे की, बऱ्याचशा जीवनावश्यक वस्तूंवरचा करभार कमी होणार आहे. तर बऱ्याचशा सेवांवरचा करभार वाढणार आहे. ग्राहक किंमत निर्देशांकात असणाऱ्या वस्तू आणि सेवांचे भाव करदरामधल्या बदलांप्रमाणेच कमी जास्त झाले. तर एंकदरीने निर्देशांक 0.33 टक्क्यांनी खाली येईल, असं नोमुरा या संस्थेने केलेल्या आकडेवाडीत दिसून आलं.

4) प्रश्न असा आहे की, जीएसटीचे फायदे उद्योग व्यवसायांकडून ग्राहकांपर्यंत पोचवले जातील का, उलट काहींना अशीही शंका आहे की मोठ्या पावसात जसे ऑफिसात पोचू शकणारेही पावसाचं निमित्त करून दांडी मारतात तसं आता जीएसटीच्या नावाखाली उत्पादन विक्री साखळीतली काही मंडळी संधी मिळेल तिथे नफेखोरी करून त्यांचं खापर जीएसटीच्या नावावर फाडू पाहतील! जीएसटी कायद्यात अशा तात्कालिक नफेखोरीविरुध्द उपाययोजना करण्याची तरतूद आहे. करदरांमधल्या बदलाचं किमतीमधलं संक्रमण आणि सरकारची नफेखोरीविरुध्दची उपाययोजना यांचा एकूणातला परिणाम होऊन महागाई दर कुठल्या दिशेने वळेल, त्याबद्दल सध्या तरी फार ठामपणे सांगता येणं कठीन आहे. महागाईच्या बाबतीत जीएसटीचा सुरुवातीचा कालखंड महत्वाचा ठरणार आहे. रिझर्व्ह बँकेने यापूर्वीच्या मुद्रांधोरणामध्ये जीएसटीमुळे महागाई वाढण्याच्या जोखमीचा उल्लेख केला होता परंतु जून मध्ये मुद्रांधोरणात आपलं ते मत बदलून बँकेने असं म्हटलंय की जीएसटीच्या अंमलबजावणीमुळे महागाई वाढण्याची शक्यता कमी आहे. सप्टेंबर RBI रिपोर्टमध्ये पुन्हा महागाई वाढण्याची शक्यता RBI ने वर्तवलेली आहे.

5) या संक्रमणकाळातली आणखी एक अनिश्चितता आहे. ती सरकारी महसुलाबद्दल- विशेषतः राज्य सरकारांच्या महसुलाबद्दल जीएसटीच्या आगमनानंतर निवृत्त होणारे जुने कर हे केंद्र तसेच राज्य सरकारांच्या अखत्यारीतले होते. ते कर आकारण्याचे आपापले घटनात्मक अधिकार सोडून देवून केंद्र आणि राज्य सरकारांनी जीएसटीचे अधिकार जीएसटी परिषदेच्या माध्यमातून संयुक्तरीत्या राबवण्याचे मान्य केलं ही उदात्त संघराज्यीय तडजोड अनेक वर्षांच्या वाटाघाटीनंतर झाली राज्यांना यातून पहिल्यांदाच सेवांवरील कर आकारण्यात थेट वाटा मिळणार आहे पूर्वी सेवांकर कर लादायचा अधिकार फक्त केंद्राला होता (केंद्राच्या एकूण करसंकलनातून वित्त आयोगाच्या समीकरणानुसार राज्यांना वाटा मिळे ती बाब निराळी) पण तरीही राज्याना अशी शंका सतावत होती की जीएसटी साम्राज्यात त्यांच्यापैकी काहीचा महसूल बुडू शकेल जीएसटीमध्ये ज्या राज्यांमध्ये उत्पादन विक्री साखळीच्या शेवटच्या टप्यावरचा अंतिम पुरवठा होईल म्हणजेच ज्या राज्यांमध्ये वस्तू आणि सेवांच्या ग्राहकांकडून उपभोग घेतला जाईल-त्या राज्यांना जीएसटीचा



Scanned by CamScanner

राज्याच्या कराचा भाग मिळणार आहे. ज्या राज्यामध्ये साखळीतल्या आधीच्या टप्यांवरचा व्यवहारांचं प्रमाण तुलनेने मोठं आहे. (उदाहरणार्थ, महाराष्ट्र आणि गुजरात सारखी राज्य) त्यांचा जीएसटीतून येणारा महसूल राज्याच्या सकल उत्पन्नाच्या प्रमाणात कमी राहण्याची शक्यता आहे. अशा सगळ्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारचं मत जीएसटीच्या प्रणालीला अनुकूल करून घेण्याकरता केंद्राने असं कबूल केलं की राज्यांना जीएसटीनंतरच्या काळात त्यांच्या कर उत्पन्नाच्या वाढीत खोट आली तर त्याची भरपाई केंद्राकडून पाच वर्षांपर्यंत मिळणार आहे. राज्यांना ही भरपाई देता यावी यासाठीची रक्कम केंद्र सरकार कोळसा, तंबाखूजन्य उत्पादन, मोठ्या गाड्या आणि इतर काही चैनीच्या वस्तूवरच्या उपकरातून उभारणार आहे. राज्याना जसं केंद्र सरकार भरपाई देणार आहे. तसंच जकात आणि इतर प्रवेश कर बंद केल्यामुळे स्थानिक स्वराज्य संस्थाचे जे उत्पन्न बुडेल त्याची भरपाई राज्य सरकार करणार आहेत.

6) GST अमलात आल्यापासून आजतागायत त्यात अर्धा डझनाहूनही अधिक मोठे बदल केले गेले. या प्रत्येक बदलानंतर संगणक प्रणाली ते करगणती यात प्रत्येक संबंधितास सुधारणा कराव्या लागल्या त्यामुळे नव्या कायद्याने तयार झालेला गोंधळ अधिकच वाढतो. आताही वातानुकुलित आणि विगर वातानुकुलित खाद्यगृहे यांना दोन वेगवेगळ्या दर रचनेत ठेवल्याने झालेला गोंधळ दूर करण्यासाठी या करात पुन्हा बदल केला जाणार आहे. म्हणजे पुन्हा नव्याने मांडणी. बदलाची तयारी असणे तसे स्वागतार्हच, परंतु इतके सारखे बदलणे हे कृतीतील विचारांचा अभाव दर्शविते. विचारपूर्वक कृती ऐवजी कृतीनंतर विचार अशी टीका होणे हे काही शहाणपणाचे नाही.

**अर्थ तज्ञांचे मत :-**

1) अलीकडे अर्थविषयक कोणतीही चिंता व्यक्त केली की सरकारचे उत्तर एकच असते.

These are all short term issues तात्पुरत्या असे योग्य असले तरी याचे उत्तर विख्यात अर्थशास्त्री प्रो. जॉन मेनॉर्ड केन्स याने आपल्या "A Tract on Monetary Reform"या ग्रंथात देऊन ठेवले आहे.

"But this long run is a misleading guide to current affairs. In the long run we are all dead." 'दीर्घकालीन फायद्याचे' या आश्वासनास अर्थशास्त्रात तसा अर्थ नाही. तसे म्हणणे ही दीर्घकालीन दिशाभूल ठरू शकते

2) भारतीय अर्थव्यवस्थेतील हा विरोधाभास सांगताना प्रख्यात अर्थतज्ञ जॉन रॉबिन्सन असे म्हणतात "what ever you can rightly say about India the opposite is also true GST म्हणजे अर्थव्यवस्थेत लगेच अपेक्षित बदल होतील हा दृष्टीकोन नक्कीच फलदायी नाही.

3) वस्तू व सेवा कर ज्या प्रकारे लागू करण्यात आला त्या संदर्भात माजी पंतप्रधान व अर्थतज्ञ डॉ. मनमोहन सिंग यांनी असे म्हटले की, हा कर म्हणजे संघटित ठकबाजूला रसेच कायदेशीरपणे केलेली लूटच आहे. माझ्यामते सरकारने पेट्रोल व डिझेलवरील कराबाबत जे धोरण ठेवले आहे, त्यालाही संघटीत व वैध मार्गाने केलेली लूटच म्हणावे लागेल.

4) श्री माजी वित्तमंत्री व अर्थतज्ञ डॉ. पी चिदंबरम असे म्हणतात की, जीएसटी सारखी चांगली कल्पना प्रत्यक्षात आणताना मात्र विस विशीत कायदा आणि घाईघाईने त्याचा दोषपूर्ण अंमलबजावणी अशी गत होऊन उत्पादन क्षेत्रातील अनेक उद्योगांना फटका बसला आहे. बाळ तर जन्मले आहे. हे बाळ बाळसेदार नसेल उलट जन्मतःच काही दोष त्याच्यात आहेत.. मात्र त्यामुळेच त्याची आता नीट काळजी घेतली पाहिजे हे बाळ आमचे आहे आणि त्यामुळेच आम्ही या बाळाचे स्वागत करतो.

जीएसटीच्या संदर्भातल्या नजीकच्या काळातल्या अनिश्चितता बाजूला सारल्या तर दीर्घकालीन दृष्टीने ही करसुधारणा भारतीय अर्थव्यवस्थेला नक्कीच बळकटी देणारी ठरणार आहे. भारतीय उद्योगांच्या स्पर्धात्मकतेला आणि कार्यक्षमतेला ती लाभदायक ठरणार आहे. जीएसटी मुळे भांडवली वस्तूंवरच्या करांचं क्रेडिट आता उद्योगांना मिळणार असल्यामुळे प्रकल्पांचं अर्थकारण सुधारेल त्यामुळे सध्या कुंठलेला गुंतवणुकीचा प्रवाह वाहता होण्यात खारीचा का होईना पण हातभार लागणार आहे. असंघटीत क्षेत्र करसाखळीच्या व्याप्तीत आल्यामुळे सरकारचा महसूल वाढणार आहे. कदाचित सुरुवातीच्या अनुभवानंतर जीएसटीत सध्या घुसडलेल्या तडजोडी हळूहळू दूर करून जीएसटीचे फायदे आणखी निर्भेळ बनवण्याबाबतही कालांतराने राजकीय मतैक्य घडायला लागेल. थोडक्यात जीएसटीमुळे आर्थिक वाढीच्या आणि महागाईच्या बाबतीत तात्कालिक प्रतिक्रियात्मक ताप येण्याची शक्यता जरी असली तरी आपल्या अर्थकारणाच्या दीर्घकालीन स्वास्थ्यासाठी हे औषध फलदायी ठरेल, असा विश्वास बाळगायला हरकत नाही.

●●●

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर
९ वे चर्चासत्र २०१७ ला
हार्दिक शुभेच्छा !



श्री विजय शहाकार
मुख्याध्यापक

श्री गजानन बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे
**श्री गजानन विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय**
नवीन सुभेदार ले-आउट, नागपूर
फोन : २७५१६६२

# वर्तमानकालीन भारत आणि जीएसटी

कु. भारती सुरेश अंबुलकर
कनिष्ठ महाविद्यालयीन
शिक्षका (मराठी,
अर्थशास्त्र) एम. ए. मराठी
अर्थशास्त्र बी.एड.

भारत हे गणराज्य आहे. आणि या गणराज्यात बऱ्याच बाबतीत विविधता आढळते. तसेच काही राज्यात काही गोष्टी विपुल प्रमाणात आहेत. तर काही राज्यात त्याच गोष्टी अल्प प्रमाणात आहेत. एकंदरीत संपूर्ण भारत एकसंघ आहे असे आपण मानतो तरीही विविध राज्यात आर्थिक विषमता फार मोठया प्रमाणात आहे. तसेच कर प्रणाली हे देखील वेगवेगळया राज्यांकरीता वेगवेगळी आहे. परंतु 2014 मध्ये संपूर्ण देशामध्ये 'एक देश एक कर' या गोष्टीने जोर धरला व संपूर्ण देशामध्ये वस्तू व सेवांसाठी एक करप्रणाली असावे असा विचारप्रवाह सुरू झाला.

19 डिसेंबर 2014 रोजी जीएसटी विधेयक लोकसभेत मांडले गेले व चर्चेअंती पारीत झाले. त्यानंतर राज्यसभेचे शिक्का मोर्तब आणि अनिवार्य 15 राज्यापेक्षा अधिक राज्यांनी विधानसभेत हे विधेयक पारीत केल्यानंतर आता या विधेयकाचा मार्ग मोकळा झाला आहे.

अप्रत्यक्ष कराचे गेल्या बऱ्याच वर्षापासूनचे स्वरूप पाहिल्यास राज्य सरकाराना साधारणतः 60 टक्के उत्पन्न हे अप्रत्यक्ष करपद्धती पासून मिळते. म्हणून जितकी चांगली पद्धती तेवढे राज्यसरकारचे जास्त उत्पन्न. जी. एस. टी. ने अप्रत्यक्ष कराचे एकंदर स्वरूपच बदलून टाकले आहे.

**वस्तुसेवा कराची व्याख्या:-**

वस्तुसेवा कराची व्याख्या करताना असे म्हटले आहे की, कोणताही माल पुरवठा केल्यामुळे तसेच सेवा दिल्याबद्दल दारू, गॅस, पेट्रोल व पेट्रोलजन्य पदार्थ सोडून त्या व्यवहारावर लागणारा कर अशी ही बहुसमावेशक व्याख्या आहे. याशिवाय सेवा या शब्दाचीही व्याख्या यामध्ये देण्यात आली आहे. वस्तुशिवाय जो काही व्यवहार केला आहे अशा व्यवहाराला 'सेवा' असे म्हटले आहे.

**रद्द होणारे कायदे :-**

वस्तुसेवा कर (जीएसटी) जेव्हा लागू होईल त्यावेळेस साधारणतः पुढील 15 कायदे रद्द झालेले असतील 1) सेंट्रल एक्साइज ड्युटी 2) अॅडिशनल एक्साइज ड्युटी 3) एक्साइज ड्युटी लेव्हीड अंडर दि मेडिकल टॉयलेट प्रिपरेशन अॅक्ट 4) सेवा कर 5) केंद्रीय विक्री कर 6) अॅडिशनल कस्टम्स ड्युटी 7) स्पेशल अॅडिशनल ड्युटी ऑफ कस्टम्स 8) ऑल सरचार्जेस अॅण्ड सेस रिलेटेड टु सप्लाय ऑफ गुड्स अॅड सर्विसेस

वरील सर्व आठही केंद्र सरकारचे अप्रत्यक्ष कर कायदे आहेत. हे वस्तुसेवा कर आल्यानंतर आपोआप रद्द होतील. याशिवाय राज्यसरकारचे खालील अप्रत्यक्ष कराचे कायदे सुद्धा या नविन व्यवस्थेत रद्द होतील. ते पुढील प्रमाणे.......

1) मुल्यवर्धित कर कायदा (व्हॅट) विक्रीकर कायदा 2) इनटरटेनमेंट टॅक्स 3) पर्चेस टॅक्स 4) ऑक्ट्रॉय व ऐंट्री टॅक्स 5) लक्झरी टॅक्स 6) टॅक्स ऑन लॉटरी टेडिंग अॅण्ड गॅम्बलिंग 7) ऑल सरचार्जेस अॅड सेस रिलेटिंग टू सप्लाय ऑफ गुडस् सर्व्हिसेस

अशाप्रकारे केंद्र सरकारचे आठ व राज्य सरकारचे सात असे एकंदर पंधरा अप्रत्यक्ष कर कायदे नवीन व्यवस्थेमध्ये रद्द होतील.

यापुर्वीचा अनुभव असा आहे की, नवीन कर विषयक कायदा आला की जुना एखादा कायदा रद्द होईल असे पण तसे न होता नवीन कायदे येतच राहिले. व संबंधिताची कर विषयक देयता वाढतच जात होती. यालाच करावर कर म्हणजे लगोरी पद्धतीने एकावर एक असे पिरॅमिडीक कर वाढतच जात असे यालाच पिरॅमिडीकल इफेक्ट वा कास्केडिंग इफेक्ट म्हणतात. वस्तुंच्या मूळ किमतीवर कराचे एवढे ओझे वाढत जाते की, वस्तुची किंमत बरेच वेळा त्यामुळे दुप्पट होत असे. याव्यतिरिक्त पंधरा कार्यालयामधिल विविध नोटिसेस करदात्याला येत असत व त्याचा संपूर्ण वेळ कर कायद्यांची पुर्तता करण्यात जात असे.

**जीएसटी कौन्सिल :-**

ही एक नवीनच संस्था या कायद्याच्या योग्य अंमलबजावणीसाठी निर्माण करण्यात आली. या कौन्सिलमध्ये केंद्रिय अर्थमंत्री व राज्य सरकारची अर्थमंत्री होते. तसेच काही तज्ञव्यक्तीचाही यात समावेश होता. ही समिती विविध सुचना करेल सद्यस्थितीत आज जी 10 लाखाच्या उलाढालीची मर्यादा आहे ती दुप्टीने म्हणजे 20 लाख करण्यात आली आहे. विविध राज्यांच्या गरजा वेगवेगळया आहेत. या सर्वावर विचार करून कौन्सिल याबाबत योग्य ते मार्गदर्शन करेल.

याशिवाय आज बऱ्याच राज्यात करमुक्त वस्तुंची यादी वेगवेगळी आहे. यामध्ये सुद्धा सुसूत्रता आणण्याचे काम ही कौन्सिल



Scanned by CamScanner

करेल. वस्तुंच्या व्यवहाराबाबतही ही कौन्सिल मार्गदर्शन करेल म्हणजे एखादा व्यवहार एकापेक्षा जास्त राज्यात झाल्यास त्याची करदेयता कशी असावी यावर योग्य निर्णय घेण्यास मदत करेल. जेव्हा राष्ट्रीय आपदा येऊन राष्ट्रीय संकट येते तेव्हा कराचा विशिष्ट दर काय असावा ही बाब सुद्धा कौन्सिलच्या अखत्यारीत येईल.

काही राज्ये अगदी लहान व आर्थिक दृष्ट्या मागासलेली आहे. जसे की नार्थ इस्टमधील राज्ये तसेच जम्मु व काश्मिर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड वगैरे यासाठी जीएसटी कसे असावे याबाबतचा निर्णय ही कौन्सिल घेईल. अशा प्रकारचे राष्ट्रीय स्तरावरील कौन्सिल अप्रत्यक्ष कराचे बाबत स्थापन व्हावी ही बाब अतिशय न्यायसंगत अशीच आहे. देशाचा आर्थिक विकास समान व्हावा हा सुद्धा यात उद्देश आहे.

**राज्यांचे होणारे वित्तिय नुकसान व त्यांना देण्यात येणारे अनुदान**

या नवीन पद्धतीमुळे राज्यांचे होणारे वित्तिय नुकसान भरून देण्याची जबाबदारी केंद्र सरकारने उचलली आहे. अर्थमंत्र्याच्या म्हणण्यानुसार पहिल्या वर्षी राज्यांचे होणारे वित्तिय नुकसान भरून काढण्यासाठी 50 हजार करोड रु. विशेष निधी तयार करण्याचे केंद्राने ठरवले आहे.

**वस्तु व सेवा कराचे दर**

जीएसटी चे दर अखेर निश्चित झाले आहे. 5 टक्के 12 टक्के, 18 टक्के आणि 28 टक्के अशा चार स्तराला जी. एस. टी. कौन्सिलने मंजुरी दिली. जी.एस. टीचे बारा टक्के व 18 टक्के दर हे सर्वसाधारण व नियमित असतील. ग्राहक महागाई दर व महागाईवर ज्यांचा परीणाम होतो, अशा 50 टक्के उत्पादनावर जीएसटी नसेल हा निर्णय एक मताने झाला.

**जीएसटी चे चार स्तर**

- **5 टक्के टॅक्स :** साधारणतः सामान्य लोकांच्या दैनंदिन उपयोगाच्या वस्तुंवर 5 टक्के टॅक्स लागेल, यामध्ये प्रोसेस्ड फुड याचा समावेश केला गेला. 'सोने' यावर चार टक्के टॅक्स लावण्याचा प्रस्ताव आहे, परंतु यावर निर्णय होणे बाकी आहे.
- **12 टक्के टॅक्स :** अर्थमंत्र्याच्या म्हणण्यानुसार 12 टक्के हा एक प्रमाणित दर आहे. यामध्ये वायरिंग नेटवर्किंगच्या वस्तु, कम्पुटर, लॅपटॅप, मोबाईल हॅंडसेट या सारख्या वस्तुंचा समावेश असु शकतो.
- **18 टक्के टॅक्स :** सर्विस टॅक्स 15 ते 18 टक्के निश्चित झालेला आहे. साबण, तेल, शेविंग स्टीक, टुथपेस्ट, घडयाळ, भांडे, फर्निचर, मार्बल या वस्तुंचा समावेश यामध्ये होऊ शकतो. सध्या स्थितीत यापैकी काही वस्तुंवर 30 ते 31 टक्के टॅक्स लागतो.
- **28 टक्के टॅक्स :** कार, टी.व्ही, फ्रिज, वाशिंग मशिन यावर 28 टक्के टॅक्स लागतो. सध्या या वस्तुंवर 30 ते 31 टक्के टॅक्स लागतो. कार वर तर 37 टक्के टॅक्स सध्या लागतो. लक्झरी गाडी, पान मसाला, कोल्ड ड्रिंक्स या वस्तुंवर 28 टक्के टॅक्स लागेल, तसेच यावर सेस सुद्धा लागेल. यावर 40 ते 65 टक्के टॅक्स लागेल.

विलासी अथवा जेटलीच्या म्हणण्यानुसार धान्य... जीवनावश्यक वस्तुंवर कोणताही टॅक्स लागणार नाही. ... आरोग्य यावर 5 टक्के टॅक्स लागेल.

**महागाईवरील परीणाम**

जीएसटीमुळे महागाई वाढेल अशी शंका सर्वांच्या ... परंतु अर्थमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार जीवनावश्यक वस्तुंवर ... लागणार नाही. तसेच ज्या वस्तू व उत्पादनाचा खप मोठ्या प्र... होतो. त्यासाठी ग्राहकांना अधिक रक्कम मोजावी लागू नये ... त्यावर जी. एस. टी. आकारने अवघ्या 5 टक्के दरानेच होईल. ... वस्तू व सेवांवर 12 ते 18 टक्के टॅक्स लागू शकतो. परंतु सर्विस ... वाढल्यामुळे सेवा महाग होईल.

- **28 टक्के टॅक्सेसचा परीणाम :-** एक्साइज ड्युटी ... प्रक्रियेच्या वेगवेगळ्या स्तरावर लागू होत असे, परंतु जीएसटी मु... अंतिम वस्तुवर म्हणजे जास्त मुल्यावर लागू होईल. त्यामुळे त्या ... किंमत वाढू शकते.

**नवीन पद्धतीचे फायदे**

**साधारणतः** या पद्धतीमध्ये राज्य व केंद्र सरकारला मिळू... सेवा कर राबवावा लागणार आहे. (कॉन्करंट पावर) केंद्र सर... खालील वस्तुंवरचा आपला एक्साइज ड्युटी लावण्याचा अधिकार ... ठेवला आहे. यात 1) पेट्रोलियम क्रुड 2) हायस्पीड डिझेल 3) पेट्... नॅचरल गॅस 5) एव्हीएशन टर्बाईन फ्युएल 6) तंबाखू व तंबाखूच्या ... उत्पादन अश्या वस्तुंचा समावेश आहे. पूर्वीच्या कायद्यामध्ये ... डिक्लेअर्ड गुडस् नावाच्या नव वस्तुंची यादी होती. ती आता रद्द झाली ...

नवीन व्यवस्थेत तीन प्रकारचे अप्रत्यक्ष कर लागणार आहे ... एसजीएसटी म्हणजे राज्य शासनाने लावलेला गुडस् सर्विस टॅक्स ... सीजीएसटी म्हणजे केंद्र सरकारने लावलेला गुडस् सर्विस टॅक्स ... आयजीएसटी म्हणजे इंटिग्रेटेड गुडस् सर्विस टॅक्स असे त्याचे नाव ... अंतर्गत राज्य व्यापारावर व सेवांवर कर लागणार आहे. याशिवाय 1... कर हा केंद्र सरकार दोन वर्षपर्यंत वसुल करू शकेल व राज्य सर... या नवीन व्यवस्थेमुळे काही हानी येत असेल तर पाच वर्ष पर्यंत ... भरपाई करून देण्याची यात व्यवस्था आहे.

**विदेशातील स्वरूप :**

आजच्या पद्धतीत विदेशात जर माल किंवा सेवा दिल्यास ... अप्रत्यक्ष कर लागत नाही. तशीच व्यवस्था या कायद्यातही आहे. ... देशात सर्वच वस्तुंवर कराचा एकच युनिफॉर्म असा आहे. जसे ... सिंगापुर, न्युझीलंड वगैरे इंडोनेशिया पाच प्रकारची कर दर आहे. ... 30 वस्तू करमुक्त आहे. तर अन्य काही देशात कर मुक्त वस्तूंची ... नाही. न्युझीलंडने जेव्हा ही पद्धती स्विकारली तेव्हा त्या देशाचे ... उत्पन्न 45 टक्क्यांने वाढले.

1) आस्ट्रेलियात हा कराचा दर 10 टक्के आहे. 2) फ्रॉन्समध्ये 19.6 ... आहे 3) कॅनडात 5 टक्के 4) जर्मनीमध्ये 19 टक्के कर 5) ...



Scanned by CamScanner

फक्त 5 टक्के एवढा कमी कराचा दर आहे. 6) सिंगापुरमध्ये 7 टक्के 7) न्यूझीलंडमध्ये 25 टक्के 8) भारतात 20 टक्के असण्याची शक्यता वर्तविली आहे. 9) न्यूझिलंडमध्ये एकच प्रकारचा कर दर असून तो 15 टक्के आहे. 10) पाकिस्तानात कराचा दर 18 टक्के असून येथे सरकारला यापासून चांगले उत्पन्न मिळते.

इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणजेच भरलेल्या कराची वजावट ज्याला सेट ऑफ म्हणतात. अशी वजावट राज्य वस्तू सेवा कराची वजावट राज्यसेवा कराच्या वस्तूतूनच मिळेल. तसेच केंद्रिय सेवा कराची वजावट केंद्रिय व्यवहाराच्या वस्तूतूनच मिळेल. याशिवाय इंटिग्रेटेड जीएसटीची वजावट आंतरराष्ट्रीय व्यवहारावर फक्त मिळेल. अशी आज तरी व्यवस्था दिसते.

करदात्यांना जी नोंदणी घ्यावी लागते, ती पॅन (परमानंट अकाउंट नंबर) बेसीसवर केली जाईल.

**या पद्धतीमुळे होणारे तोटे**

भारताच्या आर्थिक इतिहासात ही एक क्रांतीकारक घटना ठरली आहे. संपूर्ण भारत जरी एकसंघ आहे असे आपण मानतो तरी विविध राज्यात आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात आहे. अशा आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या राज्यात उत्पन्नाचे मोठे स्वरूप मिळेल. संपूर्ण भारत देश प्रचंड मोठे बाजारपेठ ठरून वस्तूंच्या किंमती बाबत बराच [illegible] असेल. परीणामत: आजच्या मोठमोठ्या बाजारपेठा या खंडीत होण्याची शक्यता आहे. गेल्या अनेक वर्षांपासून स्थापन झालेल्या अशा बाजारपेठेचे स्वरूप एकदम वेगळेच झालेले असेल.

छोट्या छोट्या व्यापाऱ्यांना नोंदणी घेणे कठीण होईल परीणामत: त्यांना खरेदी करताना कर हा तर लागेलच पण विक्री करताना त्याचा सेटऑफ मिळणार नाही. त्यामुळे इतर मोठ्या व्यापाऱ्यांपेक्षा त्यांना कर जास्त भरावा लागेल. छोट्या अनोंदित व्यापाऱ्यांना सेट ऑफचा फायदा न मिळाल्याने छोट्यांना मोठा कर असे डिस्क्रिमिनेट चित्र निर्माण होईल.

पब्लिक फायनान्सची काही तत्वे म्हणजे कॅनन्स आहेत. त्या तत्वांवरच कर रचना उभारली असते. या कॅनन्समध्ये असे म्हटले आहे की, अर्धा इंची चार तोट्यांनी टाकी भरावी, मात्र एखाद दोन इंची तोटी लावली व टाकी भरण्याचा प्रयत्न केला व काही अडचण आल्यास टाकी रिकामे राहण्याची शक्यता असते. अर्धा इंची 4 तोट्यांपैकी एखादी तोटी बिघडली तरी इतर तीन तोट्यांन मधून एक इंच पाणी येतच राहील. यावर तज्ञांनी विचार करावयास पाहिजे. जुन्यापद्धतीत अनेक फायदे होते. म्हणजेच पाणीपुरवठा करणाऱ्या अनेक तोट्या होत्या. आता अशी व्यवस्था अयशस्वी झाल्यास फारच मोठे संकट येईल. असा एका तज्ञांच्या चर्चेचा सूर होता.

Scanned by CamScanner

करेल. वस्तुंच्या व्यवहाराबाबतही ही कौन्सिल मार्गदर्शन करेल म्हणजे एखादा व्यवहार एकापेक्षा जास्त राज्यात झाल्यास त्याची करदेयता कशी असावी यावर योग्य निर्णय घेण्यास मदत करेल. जेव्हा राष्ट्रीय आपदा येऊन राष्ट्रीय संकट येते तेव्हा कराचा विशिष्ठ दर काय असावा ही बाब सुद्धा कौन्सिलच्या अखत्यारीत येईल.

काही राज्ये अगदी लहान व आर्थिक दृष्ट्या मागासलेली आहे. जसे की नार्थ इस्टमधील राज्ये तसेच जम्मु व काश्मिर, हिमाचल प्रदेश, उत्तराखंड वगैरे यासाठी जीएसटी कसे असावे याबाबतचा निर्णय ही कौन्सिल घेईल. अशा प्रकारचे राष्ट्रीय स्तरावरील कौन्सिल अप्रत्यक्ष कराचे बाबत स्थापन व्हावी ही बाब अतिशय न्यायसंगत अशीच आहे. देशाचा आर्थिक विकास समान व्हावा हा सुद्धा यात उद्देश आहे.

**राज्यांचे होणारे वित्तिय नुकसान व त्यांना देण्यात येणारे अनुदान**

या नवीन पद्धतीमुळे राज्यांचे होणारे वित्तिय नुकसान भरून देण्याची जबाबदारी केंद्र सरकारने उचलली आहे. अर्थमंत्र्याच्या म्हणण्यानुसार पहिल्या वर्षी राज्यांचे होणारे वित्तिय नुकसान भरून काढण्यासाठी 50 हजार करोड रू. विशेष निधी तयार करण्याचे केंद्राने ठरवले आहे.

**वस्तु व सेवा कराचे दर**

जीएसटी चे दर अखेर निश्चित झाले. आहे. 5 टक्के 12 टक्के, 18 टक्के आणि 28 टक्के अशा चार स्तराला जी. एस. टी. कौन्सिलने मंजुरी दिली. जी.एस. टीचे बारा टक्के व 18 टक्के दर हे सर्वसाधारण व नियमित असतील. ग्राहक महागाई दर व महागाईवर ज्यांचा परीणाम होतो. अशा 50 टक्के उत्पादनावर जीएसटी नसेल हा निर्णय एक मताने झाला.

**जीएसटी चे चार स्तर**

- **5 टक्के टॅक्स :** साधारणतः सामान्य लोकांच्या दैनंदिन उपयोगाच्या वस्तुवर 5 टक्के टॅक्स लागेल. यामध्ये प्रोसेस्ड फुड याचा समावेश केला गेला. 'सोने' यावर चार टक्के टॅक्स लावण्याचा प्रस्ताव आहे. परंतु यावर निर्णय होणे बाकी आहे.
- **12 टक्के टॅक्स :** अर्थमंत्र्याचा म्हणण्यानुसार 12 टक्के हा एक प्रमाणित दर आहे. यामध्ये वायरिंग नेटवर्किंगच्या वस्तु, कम्पुटर, लॅपटॅप, मोबाईल हॅडसेट या सारख्या वस्तुंचा समावेश असु शकतो.
- **18 टक्के टॅक्स :** सर्विस टॅक्स 15 ते 18 टक्के निश्चित झालेला आहे. साबण , तेल ,शेविंग स्टीक, टुथपेस्ट, घडयाळ ,भांडे, फर्निचर, मार्बल या वस्तुंचा समावेश यामध्ये होऊ शकतो. सध्या स्थितीत यापैकी काही वस्तुंवर 30 ते 31 टक्के टॅक्स लागतो.
- **28 टक्के टॅक्स :** कार, टी.व्ही, फ्रिज, वाशिंग मशिन यावर 28 टक्के टॅक्स लागतो. सध्या या वस्तुंवर 30 ते 31 टक्के टॅक्स लागतो. कार वर तर 37 टक्के टॅक्स सध्या लागतो. लग्जरी गाडी, पान मसाला, कोल्ड ड्रिंक्स या वस्तुवर 28 टक्के टॅक्स लागेल, तसेच यावर सेस सुद्धा लागेल. यावर 40 ते 65 टक्के टॅक्स लागेल.

वित्तमंत्री अरुण जेटलीच्या म्हणण्यानुसार धान्यासारख्या जीवनावश्यक वस्तुंवर कोणताही टॅक्स लागणार नाही. तसेच शिक्षण, आरोग्य यावर 5 टक्के टॅक्स लागेल.

**महागाईवरील परीणाम**

जीएसटीमुळे महागाई वाढेल अशी शंका सर्वांच्या मनात आहे. परंतु अर्थमंत्र्यांच्या म्हणण्यानुसार जीवनावश्यक वस्तुवर कोणताही कर लागणार नाही. तसेच ज्या वस्तू व उत्पादनाचा खप मोठ्या प्रमाणात होतो. त्यासाठी ग्राहकांना अधिक रक्कम मोजावी लागू नये यासाठी त्यावर जी. एस. टी. आकारने अवघ्या 5 टक्के दरानेच होईल. औद्योगिक वस्तू व सेवांवर 12 ते 18 टक्के टॅक्स लागू शकतो. परंतु सर्विस टॅक्स वाढल्यामुळे सेवा महाग होईल.

- **28 टक्के टॅक्सेसचा परीणाम :-** एक्साइज ड्युटी उत्पादन प्रक्रियेच्या वेगवेगळ्या स्तरावर लागू होत असे, परंतु जीएसटी मुळे ती अंतिम वस्तुवर म्हणजे जास्त मुल्यावर लागू होईल. त्यामुळे त्या वस्तूची किंमत वाढू शकते.

**नवीन पद्धतीचे फायदे**

साधारणतः या पद्धतीमध्ये राज्य व केंद्र सरकारला मिळून वस्तू सेवा कर राबवावा लागणार आहे. (कॉन्करंट पावर). केंद्र सरकारने खालील वस्तुंवरचा आपला एक्साइज ड्युटी लावण्याचा अधिकार पण ठेवला आहे. यात 1) पेट्रोलियम क्रुड 2) हायस्पीड डिझेल 3) पेट्रोल 4) नॅचरल गॅस 5) एव्हीएशन टर्बाईन फ्युएल 6) तंबाखू व तंबाखूजन्य उत्पादन अश्या वस्तुंचा समावेश आहे. पूर्वीच्या कायद्यामध्ये जी. एस. डिक्लेअर्ड गुडस् नावाच्या नव वस्तुंची यादी होती. ती आता रद्द झाली आहे.

नवीन व्यवस्थेत तीन प्रकारचे अप्रत्यक्ष कर लागणार आहे. एसजीएसटी म्हणजे राज्य शासनाने लावलेला गुडस् सर्विस टॅक्स, सीजीएसटी म्हणजे केंद्र सरकारने लावलेला गुडस् सर्विस टॅक्स, आयजीएसटी म्हणजे इंटिग्रेटेड गुडस् सर्विस टॅक्स असे त्याचे नाव असून अंतर्गत राज्य व्यापारावर व सेवांवर कर लागणार आहे. याशिवाय 1 टक्का कर हा केंद्र सरकार दोन वर्षपर्यंत वसुल करू शकेल व राज्य सरकारला या नवीन व्यवस्थेमुळे काही हानी येत असेल तर पाच वर्ष पर्यंत त्याची भरपाई करून देण्याची यात व्यवस्था आहे.

**विदेशातील स्वरुप :**

आजच्या पद्धतीत विदेशात जर माल किंवा सेवा दिल्यास त्यावर अप्रत्यक्ष कर लागत नाही. तशीच व्यवस्था या कायद्यातही आहे. अनेक देशात सर्वच वस्तुंवर कराचा एकच युनिफॉर्म असा आहे. जसे सिंगापुर ,न्युझीलंड वगैरे इंडोनेशिया पाच प्रकारची कर दर आहे. सौदी 30 वस्तू करमुक्त आहे. तर अन्य काही देशात कर मुक्त वस्तुंची यादी नाही. न्युझीलंडने जेव्हा ही पद्धती स्विकारली तेव्हा त्या देशाचे उत्पन्न 45 टक्क्यांने वाढले.

1) आस्टेलियात हा कराचा दर 10 टक्के आहे. 2) फ्रॉन्समध्ये 19.6 टक्के आहे 3) कॅनडात 5 टक्के 4) जर्मनीमध्ये 19 टक्के कर 5) ...

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर ९वे चर्चासत्र २०१७ ला आमच्या शुभेच्छा

Scanned by CamScanner

फक्त 5 टक्के एवढा कमी कराचा दर आहे. 6) सिंगापुरमध्ये 7 टक्के 7) स्विर्झलंडमध्ये 25 टक्के 8) भारतात 20 टक्के असण्याची शक्यता वर्तविली जाते. 9) न्यझिलंडमध्ये एकच प्रकारचा कर दर असून तो 15 टक्के आहे. 10) पाकिस्तानात कराचा दर 18 टक्के असून येथे सरकारला यापासून चांगले उत्पन्न मिळते.

इनपुट टॅक्स क्रेडिट म्हणजेच भरलेल्या कराची वजावट ज्याला सेट ऑफ म्हणतात. अशी वजावट राज्य वस्तू सेवा कराची वजावट राज्यसेवा कराच्या वस्तुतूनच मिळेल. तसेच केंद्रिय सेवा कराची वजावट केंद्रिय व्यवहाराच्या वस्तुतूनच मिळेल. याशिवाय इंटिग्रेटेड जीएसटीची वजावट आंतरराष्ट्रीय व्यवहारावर फक्त मिळेल. अशी आज तरी व्यवस्था दिसते.

करदात्यांना जी नोंदणी घ्यावी लागते. ती पॅन (परमानंट अकाउंट नंबर) बेसीसवर केली जाईल.

**या पद्धतीमुळे होणारे तोटे**

भारताच्या आर्थिक इतिहासात ही एक क्रांतीकारक घटना ठरली आहे. संपूर्ण भारत जरी एकसंघ आहे असे आपण मानतो तरी विविध राज्यात आर्थिक विषमता फार मोठ्या प्रमाणात आहे. अशा आर्थिक दृष्ट्या मागासल्या राज्यात उत्पन्नाचे मोठे स्वरूप मिळेल. संपूर्ण भारत देश प्रचंड मोठे बाजारपेठ ठरून वस्तुंच्या किंमती बाबत बराच ताळमेळ बसेल. परीणामतः आजच्या मोठमोठ्या बाजारपेठा या खंडीत होण्याची शक्यता आहे. गेल्या अनेक वर्षापासुन स्थापन झालेल्या अशा बाजारपेठेचे स्वरूप एकदम वेगळेच झालेले असेल.

छोट्या छोट्या व्यापारांना नोंदणी घेणे कठीण होईल परीणामतः त्यांना खरेदी करताना कर हा तर लागेलच पण विक्री करताना त्यांचा सेटऑफ मिळणार नाही. त्यामुळे इतर मोठ्या व्यापाऱ्यापेक्षा त्यांना कर जास्त भरावा लागेल. छोट्या अनोंदित व्यापाऱ्यांना सेट ऑफचा फायदा न मिळाल्याने छोट्यांना मोठा कर असे डिसप्रपोर्शनेट चित्र निर्माण होईल.

पब्लिक फायनान्सची काही तत्वे म्हणजे कॅनन्स आहेत. त्या तत्वांवरच कर रचना उभारली असते. या कॅननमध्ये असे म्हटले आहे की, अर्धा इंची चार तोट्यांनी टाके भरावे, मात्र एकच दोन इंची तोटी लावली व टाकी भरण्याचा प्रयत्न केला व काही अडचण आल्यास टाके रिकामे राहण्याची शक्यता असते. अर्धा इंची 4 तोट्यापैकी एखादी तोटी बिघडली तरी इतर तीन तोट्यांन मधून एक इंच पाणी येतच राहील. यावर तज्ञांनी विचार करावयास पाहिजे. जुन्यापद्धतीत अनेक फायदे होते. म्हणजेच पाणीपुरवठा करणाऱ्या अनेक तोट्या होत्या. आता अशी व्यवस्था अयशस्वी झाल्यास फारच मोठे संकट येईल. असा एका तज्ञांच्या चर्चेचा सूर होता.


विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर
९ वे चर्चासत्र २०१७ ला हार्दिक शुभेच्छा !



डॉ. मिलिंद ए. बारहाते
प्राचार्य
सी.पी. ॲण्ड बेरार (ई.एस.) महाविद्यालया
तुळशीबाग, महाल नागपूर





Scanned by CamScanner

# GST an ELIXIR

Prof. Dr. Ashok Gavhankar

Introduction : The union finance minister in the budget speech has reiterated the resolve for the smooth introduction of goods and services then neigh effect from April 2010 however after many more exercised had taken place mean. While central govt. position ruled changed for and due to inadequate preparation of GST has delayed and finally bill regarding on GST was passed in both the houses and land employment. Since, 1st of july 2017 the journey of GST signify under the Chief person of Asim das Gupta who was leading the concept of GST from 2003 and it has slapped by announcing the exact ment in India set tax as unpleasant for all.

A major that inform initiative line the introduction of GST however required considerable preparatory work. Although sustained progress has been made in refostery in central excise duties into a 'CENVAT' and the caseadiye type state sale tax in to an extra state VAT Much more preparatory works needs to be done before moving over to a comprehensive GST. In India the introduction of (MODVAT) in 1986 of converting the Central excise duty with more than 20 rates without adequate preparation led to Serious compliause problem with the manufactures claiming credit as Society refused for input tax. Which were paid and this Continues to play the tax system. SO, adequate and plenty expression had taken in regard the smooth separation of GST, still the many deficiencies sten offer the implementation of GST in many manner. Since, its rate decided to various goods and services as tax an it Tax input credit system was also complicated and indeed govt. many times hold the meeting and with GST Council and restructerised its newly implemental GST tax structures still reseutarent among the producers, manufactures, a are going on and not stable.

Constitutional changes : The proposed dual GST requires both central and state govt. should have the power to tax both goods and services up to the retail stage. After the amend cent to the constitution a separate entry (q2c) was inserted in the Union list to employer it to heavy its tax on services. Prior to this the service tax was envied on the basis of residual power entrusted to the Union govt. in the constitution. However, the goods are concerned the Union govt. can levy (duties of excise on tub ace and other goods manufactured or produced in India (Entry 84)

Policy and Institutional Reforms : A number of Reforms measures have to se under taken by both Central and State govt. before implementing the GST and those should be initiated without any lost of time. In the case of tax on services the reform is even more fundamental. The Centre has continued the selective taxation of services in spite of the recommendation of the expert on Service Tax. In 2001 that the tax should be convert ted into a general tax with a small list of exemptions for equity as administrations seasons



Scanned by CamScanner

and small negative list of services with significant externalities levying a general tax on services will obviate the need for designing each service only "Serene' will need to be designed reforms at state end. The reformed required to levy the GST at the state level are equally formidable. The state govt. should be empowered to levy taxes on services & comprehensive GST at the state level which provided complete input the tax credit and refunds the taxes on experts entirely required that the state should have a concurrent power to tax services. In they are assigned powers to levy taxes only on services falling within their geographical range then crediting input tax on with interstate span is simply not possible . It will who make the state GST extremely complicated and concurrent power to tax services to the states, however, creates to problem of assigning revenues from services the problem of assigning having interstate jurisdiction e.g. like Telecommunication the services are generated somewhere purchased somewhere use, Consulted in a different place and paid for in yet another place.

GST structures : It is also necessary to have a re-look at the structures of state GST. The empowered committee of state Finance Minister has been discussing this issue and the available information is that they are thinking its various tax structure rate link to 28% of cause the Central Govt. may provide comfort by stating that the losses to any state would be compensated to a certain number of years.

Revenue Neutral Rate and compensation payable – The report that the National Institute of public finance and policy has Mu determined the revenue neutral rate CRNR as 27% has unnecessary inflamed the debate. The present tax segimy generally levies exersice at 12.5% and value added tax (VAT) at 14.5 % leading to an aggregate of 27%. so the GST appeases to bring is write on ratio Cmstitution amendment bill (CAB) stew calmly provide that the RNR will hat exceed 18 % but the debate had taken bleed and urgent the following issues water to RNR the RNR car be determined only if the tax base of GST, the liability thus had the exemptions and the rate structure is agued upon while computing the RNR for centre is relatively simple computing the RNR for state indindully is a difficult tool at best and impossible at lorry given difficulties in estimating the projected shame of service tax state wise after alacrity for input tax credit at the RNR is objectively computed and the tax effectively collected by both the centre and the state there allow be to weed for ostentation the RNR determination will thus essentially be a leap a faith in the first year.

GST Counsil and Government- Article 27 a the constitution amendment bill (CAB) provides the important manubstation of GST guild thud be to ability to enforce to its seeommandation in the seconds every decision of GST Council section 4 and 5 talk seeommawations of the GST council This ambivalent attitude to the Binding of the council tell'll derive it of much need strength while allowing free play to states to implement whatever brand of GST they wish further compounded by the definition of GST Proposed in the CAB as any tax on supply of good as searches the GST thuds should be animated based consumption type value added tax as recommended by the GST council at the GST council is only to wanes recommended does hat anise as the state need hat comply within them.

Under the GST native the burden of taxation will be allocated fluidly between manufacturing and services by lower tax rate resulting in increased tax base and unified exemption is anticipated to help in establishing effective and transfrant tax administration expected to remove the cascading effects of tax and help in establishing of common National wound in urgent inviolate tax system centric tax (GST) is paid of on intrastate commerce



Scanned by CamScanner

goods 2% standing rate of GST is levied and distributed to exporter state as its origin based tax The input credit of GST cause offset with GST liabilities only but in proposed GST tax negative GST is levied on interstate commerce and supply both is goods and Services sue to this an effective politics system will come cap which will present the tax lading through alone housing by big corporate this will protect small and medium enterprises from unhealthy cooption of big corporations no GST unhealthy completion of big corporation No GST will be levied on exports because of which input credit of exporter will hat be affected and he/she can use those input credit in further

Concretion & GST reform is essential and it will be a land work in the history of tax reform in India in a open market economy in India it is necessary to minimize the distortions caused by tax policy and simplify the tax to minimize compliance cors nevethcess it is necessary that this mayer reform initiative should be proceed by sufficient preparation to ensure a smooth switch over considering the present state of puronedencess the prospeet of making a smooth transition hopefully both centre and state governments will imitate it with very causefully eustead of chaufing tax rate structure frequently Reference –


1) Feasibility of introducing GST April 2010 – M-Gondia –Rao political and Economic Weekly July 18 2009

2) What is the implementation of the goods and devices tax political and economic weekly Sept-12-2015

3) GST in India A rep tax reform Monika – Sharwat Upaasana Dhoria JRF, Delhi-University-India


Scanned by CamScanner

# वस्तु व सेवाकर प्रणाली रचना व परिणाम (GST)

प्रा. दिलीप एच. टेम्पलवार
इंदिरा गांधी कनिष्ठ महा.
येनापूर
ता. चामार्शी,
जि. गडचिरोली
मो.नं. 9423668374

सरकार व विरोधी पक्ष यांच्या मध्ये उत्तम संवाद असेल तर देशाच्या हिताची अनेक चांगली विधायके कायद्यात रुपांतरीत होवु शकतात. त्याचे चांगले उदाहरण म्हणजे जीएसटी होय.

**"नही लगेगा अब एक्स्ट्रा वेट,**

**पुरे देश मे अब एक ही रेट"**

"एक देश एक कर " हे उद्दिष्ट लक्षात घेवून करण्यात आलेल्या स्वातंत्र्योत्तर काळातील अप्रत्यक्ष कर प्रणाली बाबतचा हा सर्वात महत्वाचा बदल आहे. वस्तु व सेवा कर ही एक सर्वात विशाल कर रचना आहे. ज्यामुळे देशातील आर्थिक विकासात वृद्धी करण्याच्या उद्देशाने उचललेले एक महत्वाचे व धाडसी पाऊल होय. जे 1 जुलै 2017 पासून पुर्ण भारतात या पुढे लागू राहणार आहे. जीएसटी लागू करण्यासाठी भारताच्या राज्य घटनेत दुरुस्ती करून नवीन कायदे करण्यात आले. "गुड्स ॲन्ड सर्व्हिसेस कौऊन्सिल "ही मध्यवर्ती वैधानिक संस्था जीएसटी चे नियमन करतो केंद्रीय अर्थमंत्री हे या कौऊन्सिल चे प्रमुख आहेत.

जीएसटी लागू करण्यासाठी 30 जून 2017 च्या रात्री संसदेचे अधिवेशन झाले. त्यात राष्ट्रपतीने मध्यरात्रीच्या सुमारास जीसटी लागू करण्याची अधिकृत घोषणा केली आणि 1 जुलै 2017 पासून संपुर्ण भारतात जीएसटी हा एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यात आला.

जगातील जवळजवळ 150 विकसीत देशात याच पद्धतीची कर प्रणाली कार्यान्वित आहे. त्यामुळे कर आकारणीत सहजता येणार आहे. व भारताची राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय बाजारातील प्रतिमा उंचावण्यास मदत होईल. व तसेच जीएसटी मुळे सामान्य उपभोक्त्यावरील कराचा भार पुर्वीपेक्षा नक्कीच कमी होईल असे आर्थिक तज्ञ मानतात.

**काय आहे जीएसटी :-**

जीएसटी हा एक अप्रत्यक्ष कर आहे. जो देशभरात कोणत्याही प्रकारच्या वस्तु व सेवांच्या निर्मिती, विक्री व उपभोगावर लावला जातो. केंद्र सरकार व राज्य सरकार निरनिराळे कर लावतात त्या सर्व कराची जागा जीएसटीने घेतली आहे. जीएसटी मुळे केंद्रीय अबकारी कर, वॅट, करमणुक कर, जकात, प्रवेश कर, चैनिच्या वस्तुवरील कर, केंद्रीय विक्री कर इत्यादी सर्व कर रद्द होणार आहे. व त्याऐवजी केवळ एकच कर जीएसटी लागणार आहे.

मात्र यात तंबाखु, मद्य, ई. सारख्या वस्तुंचा समावेश नाही. कच्चे तेल, पेट्रोल, डिझेल इत्यादी बाबींचा विशिष्ट कालावधीनंतर जीएसटी मध्ये समावेश केला जाईल. या कर प्रणालीद्वारे प्राप्त कर उत्पनात केंद्रशासन व राज्यशासन यांचा समान वाटा असणार आहे.

**वस्तु व सेवाकराची आवश्यकता :-**

भारतातील करप्रणाली अत्यंत गुंतागुंतीची आहे. भारतीय घटनेतील तरतुदी नुसार वस्तुच्या विक्रीवर कर लावण्याचा अधिकार राज्यशासनाला असतो व वस्तुंच्या उत्पादन व सेवांवर कर लावण्याचा केंद्रशासनाकडे असतो. त्या मुळे भारतात केंद्राद्वारे व राज्यांद्वारे आकारल्या जाणाऱ्या करांमध्ये भिन्नता आहे. त्या मुळे देशातील जीएसटी पुर्वीची कर रचना अत्यंत गुंतागुंतीची व क्लिष्ट स्वरूपाची होती. त्यामुळे छोटे उद्योग व कंपनी साठी वेगवेगळ्या कर कायद्याचे पालन करणे ही एक तारेवरची कसरत होती.

जीएसटी पुर्वीच्या अप्रत्यक्ष कर प्रणालीमध्ये करावर कराची आकारणी केली जात होती. उदा. केंद्रसरकार द्वारे उत्पादीत वस्तुवर लावण्यात येणाऱ्या केंद्रीय उत्पादन करावर विक्री कराची आकारणी होत असे. म्हणजेच करावर कर (Cascading of Tax) आकारणी होत होती.

**अप्रत्यक्ष कर केंद्रशासन व राज्यशासनाद्वारे आकारले जायचे व त्यामध्ये खालील त्रुटी होत्या -**

1) मुल्यवर्धित कर राज्यशासना तर्फे व उत्पादन शुल्क व सेवाकर हे केंद्रशासनाद्वारे स्वतंत्रपणे लावले जात असल्याने एका कराची वजावट (क्रेडीट) दुसरा कर भरतांना दिली जात नव्हती.

2) पुर्वीच्या केंद्रीय विक्रीकर कायद्यानुसार आंतरराष्ट्रीय माल विक्रीवर ज्या राज्यातून मालाची विक्री झाली त्या राज्याकर 2 टक्के केंद्रीय विक्रीकर लावला जातो परंतु ज्या राज्यामध्ये वस्तुची खरेदी झाली त्या राज्यामध्ये आकारण्यात आलेल्या केंद्रीय विक्रीकराची वजावट मिळत नाही. त्यामुळे कराचा भार मूळ किंमतीत मिळून किंमत वाढते. वरील सर्व समस्येवर उपाय म्हणुन जीएसटी कर प्रणालीकडे पाहिले जाते.

**जीएसटीमुळे राज्याचे होणारे वित्तीय नुकसान व भरपाई :-**

उत्पादन शुल्क, विक्री कर, सेवा कर ई. ला पर्याय ठरणाऱ्या

Scanned by CamScanner

जीएसटीची कर आकारणी ही उत्पादन स्थळ अथवा सेवांच्या उगमस्थाना ऐवजी ग्राहकांच्या मागणीवर आधारीत असणे हा एक मोठा फेरबदल यात आहे. त्यामुळे आजवर औद्योगिक दृष्ट्या प्रगत व मोठ्या असलेल्या महाराष्ट्र, तामीळनाडु, गुजरात, ई. राज्यांचा कर महसुलातील असलेला मोठा वाटा धोक्यात येणे स्वाभाविक आहे. बदललेल्या निकषाने औद्योगिक दृष्ट्या तुलनेने मागास असलेल्या उत्तरप्रदेश, केरळ, प.बंगाल ई. चा करातील वाटा मात्र वाढेल

सेवाकरावर केंद्राने कब्जा केल्यामुळे राज्यांच्या महसुलावर मोठा फटका बसणार आहे. महाराष्ट्राचे सेवाकरांपासून मिळणारे सुमारे 50 हजार कोटी रूपये, तसेच आंतरराज्य व्यापारातील कराचे सुमारे 60 हजार कोटी रूपये थेट केंद्राच्या तिजोरीत जाणाची शक्यता व्यक्त केली जाते. त्याच प्रमाणे इतरही प्रगत राज्यांचे वित्तीय नुकसान होण्याची शक्यता आहे. व त्यामुळे राज्यांची वित्तीय स्वायत्तता धोक्यात येण्याची भीती व्यक्त केली जाते. यावर उपाय म्हणून जीएसटी लागू झाल्यानंतर पहिले पाच वर्ष केंद्रसरकार कडून, कर बुडण्याची भीती असलेल्या राज्यांना महसुलातील तोट्याची भरपाई करून दिली जाईल. पहिली तीन वर्ष 100 टक्के भरपाई व चैथ्या वर्षी 75 टक्के व पाचव्या वर्षी 50 टक्के भरपाई दिली जाणार आहे.

**जीएसटी नंतरही लागु राहणारे पुर्वीचे कर :-**

जीएसटी लागु झाल्यानंतरही पुढील कर मात्र पुर्वीप्रमाणेच राहणार आहे.-

व्यवसाय कर, मुद्रांक कर, वाहतुक कर, वाहन खरेदी करतांना भरावा लागणारा कर, मालमता कर, स्थानीक स्वराज्य संस्थेकडून लावला जाणारा कर ई. प्रत्यक्ष कर असून ते दैनंदिन व्यवहारावर लागत नाही. आयातीवर पुर्वीप्रमाणेच बेसीक कस्टम ड्युटी भरावी लागणार आहे.

**वस्तु व सेवा कर दर संरचना**

| प्रकार | कराचा दर | वस्तु व सेवा प्रकार |
|---|---|---|
| शुन्याधारित | ०% | जीवनावश्यक वस्तु (अन्नधान्यासहित) |
| निम्नदर | ५% | सर्वसाधारण वापरात असणाऱ्या वस्तु व सेवा |
| दोन प्रमाण दर | १२%,१८% | ऐशआरामी वस्तु व सेवा (पोळ्या प्रमाणात समावेश) |
| उच्चतम दर | २८% | लक्झरी मोटार, तंबाखु उत्पादने शीतपेये इत्यादी |
| अतिरिक्त सेस | ----% | लक्झरी मोटार, तंबाखु उत्पादने शीतपेये इत्यादी व इतर |

**जीएसटी अंतर्गत वस्तु व सेवांवर कर लावण्याची पध्दत:-**

जीएसटी मध्ये वस्तु व सेवांच्या प्रत्येक पुरवठा व्यवहारावर (करमाफ वस्तू व सेवा व्यतिरिक्त) दोन कर लावण्यात येतील एक केंद्रशासनामार्फत त्यास केंद्रीय वस्तु व सेवा कर (GST) व दुसरा कर राज्यशासना मार्फत लावण्यात येतो त्यास राज्यवस्तु सेवा कर (GST) असे म्हणतात. तसेच आंतरराज्य वस्तु व सेवांच्या पुरवठ्यावर व आयातीवर सुध्दा केंद्रशासना मार्फत एकात्मिक वस्तु व सेवा कर (GST) लावण्यात येतो.

CGST Act, SGST Act, UTGST, GST (Compensation of State) (राज्यांचा जर कर महसुल कमी झाला तर त्याची भरपाई केंद्रामार्फत या कायद्याद्वारे केली जाईल) ई. कायदे संसदेमार्फत पारीत करण्यात आले आहेत. एसजीएसटी ॲक्ट हा प्रत्येक विधी मंडळामार्फत पारीत करणे आवश्यक असते.

| सीजीएसटी (केंद्रीय वस्तु व सेवा कर) | एसजीएसटी (राज्य वस्तु व सेवा कर) | आयजीएसटी (आंतरराज्य वस्तु व सेवा कर) | जीएसटी कक्षेबाहेरील वस्तु |
|---|---|---|---|
| १) उत्पादन शुल्क | १) मुल्यवर्धीत कर | १) केंद्रीय विक्री कर | १) मद्य |
| २) अतिरिक्त उत्पादन शुल्क | २) लॉटरी बेटींग व गॅम्बलींग कर | २) सीव्हीडी | २ कच्चेतेल, डिझेल, पेट्रोल. |
| ३) सेवा कर | ३) करमणूक व मनोरंजन कर | ३) एसएडी | ३) नैसर्गिक गॅस, विमानाचे इंधन |
| ४) अधिभार व उपकर | ४) ऐश, आराम कर | | ४) विद्युत ड्युटी ई. |
| | ५) खरेदी कर | | |
| | ६) जकात,एलबीटी व इतर प्रवेश कर | | |
| | ७) जाहीरात कर | | |
| | ८) अधिभार व उपकर | | |

**सीजीएसटी, एसजीएसटी व आयजीएसटी मध्ये अंतर्भुत होणारे कर पुढील कोष्टकात दर्शविले आहेत.**

**जीएसटी करप्रणालीचे फायदे :-**

पुर्वीच्या विविध कर आकारण्याच्या गुंतागुतीच्या पद्धतीऐवजी वस्तु व सेवा कर प्रणालीमुळे पुढील फायदे दिसून येतात.

1) जीएसटी करप्रणालीमुळे कर भरणे सोपे होईल कर भरण्याच्या व आकारण्याच्या पध्दतीत सहजता व सुलभता येईल.

2) कराची चोरी, कर न भरणे किंवा कमी भरणे यावर आळा बसेल

3) भविष्यात देशाच्या जीडीपी (स्थूल देशांर्तगत उत्पादनात) वाढ होईल.

4) व्यापारी व उद्योजकाना विविध प्रकाराचे कर भरण्यापासून सुटका मिळेल.

5) कर रचना सोपी व कार्यक्षम झाल्यामुळे सरकारचे कर उत्पन्न वाढेल व वस्तुच्या किंमती कमी होतील.

6) रिटेल क्षेत्रासाठी लिस्ट रेटल आणि इंव्हेनटरी खर्च कमी होईल

7) भरलेल्या जीएसटी साठी सप्लॉय चेन मधील घटकांना क्रेडिट देणे सोपे होईल.

8) जीएसटी मुळे असंघटीत उद्योगही कराच्या जाळ्यात येईल व सरकारचे उत्पन्न वाढेल

9) भारतातील व्यापार व उद्योग व्यवसायांत एकसुत्रता येईल त्यामुळे उद्योग व्यवसायाच्या वाढीस मदत होईल व रोजगार वाढेल.

Scanned by CamScanner

10) आर्थिक वर्षात 20 लाख रुपयापर्यंत एकूण उलाढाल असलेल्या करदात्यांना सूट देण्यात येईल.

11) जीएसटी मुळे चांगली उत्पादने देशात सर्वत्र उपलब्ध होतील व त्यामुळे ग्राहकांना वस्तू व सेवाच्या निवडीला वाव मिळेल

12) कर विभाग अधिकारी वर्गाद्वारे करात हेराफेरीची शक्यता कमी होईल व भ्रष्टाचारांत आळा बसेल.

**वस्तु व सेवा कर प्रणालीचे तोटे**

जीएसटी प्रणालीचे विविध फायदे असले तरी त्यांत काही दोश संभवतात ते प्रामुख्याने गरीबाच्या मुळावर येणार आहेत ते दोश पुढील प्रमाणे.

1) वस्तू व सेवा करावरील 18 टक्के कराची मर्यादा भविष्यात वाढणार नाही, असे सरकार द्वारे ठोस आश्वासन नाही त्यामुळे ही कर मर्यादा भविष्यात वाढल्यास महागाई वाढेल.

2) रियल इस्टेट क्षेत्र जीएसटी मध्ये अंतर्भूत झाल्यास या क्षेत्राला मोठा फटका बसेल व घराच्या किंमती वाढतील आणि हे क्षेत्र अडचणीत येईल त्यामुळे मजूरांपासुन तर तज्ञानापर्यंत बेकारी वाढेल

3) केंद्र सरकारला भविष्यात देशातील 29 राज्ये व 7 केंद्रशासित प्रदेशांशी जुळवून घेऊन ही कर प्रणाली राबविणे तारेवरची कसरत ठरु शकते.

4) जीएसटी प्रणाली मोठ्या प्रमाणावर माहिती तंत्रज्ञानाच्या (IT) देशपातळी वरील सक्षमतेवर अवलंबून आहे, जी देशातील बऱ्याचशा भागात अजूनही कार्यक्षम नाही.

5) अशिक्षित व पुरेसे शिक्षण न झालेल्या व्यापार व व्यावसायिकांसाठी ही पद्धत डोकेदुखी ठरु शकते.

6) विविध राज्यांत भिन्न राजकीय पार्टीचे सरकार असल्यास केंद्र व राज्य सरकाच्या संबंधात कटुता निर्माण होण्याची शक्यता असते

**वस्तु व सेवा कर प्रणालीचे परिणाम**

वस्तु व सेवाकर प्रणालीचे अनेक फायदे व तोटे आहेतच परंतु या प्रणालीचे अर्थव्यवस्थेच्या सर्व क्षेत्रावर पुढील प्रमाणे परिणाम दिसून येतील.

1) विविध राज्ये एकाच वस्तुवर वेगवेगळ्या दराने कर लावत असे त्यामुळे एकाच वस्तुची वेगवेगळ्या राज्यात वेगवेगळी किंमत असायची आता मात्र तसे होणार नाही.

2) आता राज्ये आकारत असलेले विविध कर रद्द झाल्यामुळे राज्यांच्या करापासून मिळणाऱ्या उत्पन्नात बरीच घट होईल असे राज्य सरकारांना वाटते त्यामुळे अशा राज्यांना सुरवातीच्या काळात बऱ्याच सवलती देण्यात येतील.

3) प्रत्येक राज्य सरकारला कराच्या उत्पननत येणारे नुकसान केंद्र सरकार 5 वर्षांपर्यंत राज्यांना देईल जीएसटी लागू झाल्यामुळे लॉजिस्टिक, इ-कॉमर्स, ऑटोमोबाईल एफएमजीची, एन्टरटेनमेन्ट या क्षेत्रातील कंपन्यांना फायदा होईल.

4) ज्या कंपन्यांच्या मालाची आंतरराज्यीय वाहतुक होते आणि माल या गोदामातून त्या गोदामात किंवा एका शहरातून दुसऱ्या शहरात वाहतूक होते, त्यांच्या या वाहतूकीवर लागणाऱ्या करात बचत होईल.

5) कराची रक्कम ठरविणे, कर जागोजागी भरणे तसेच त्यांच्या पावत्या सांभाळून ठेवणे हे सर्व कागदपत्राचे काम कमी होईल.

6) प्रत्येक टोल नाक्यावर टोल भरण्यासाठी लांबच लांब रांग लागणे कमी होईल, वाहतूकीची कोंडी कमी होईल व वेळेची बचत होईल.

7) विविध क्षेत्रातील कंपन्यांना जीएसटीमुळे फायदा होईल त्या कंपन्या पुढीलप्रमाणे :

**अ) लॉजिस्टीक** :- TIC, VRL, SN, OWMAN डिस्ट्रीपार्क ALLCARGO कंटेनर कॉर्पोरेशन लॉजिस्टीकचे ऑऊटसोर्सिंगकरणे फायदेशीर आणि सोपी होईल त्यामुळे लॉजिस्टी कंपन्याचा व्यापार वाढेल

**ब) एफएमजीची** :- ब्रिटीनिया, बाटा, एक्साईज, अमर राजा,हिमामी, डॉबर Godfrey आयटीसी, रिलॉक्सो Indag रबर ज्योती लॅब टाईल्स पेन्ट उत्पादन करण्याऱ्याना कंपन्याना जीएसटी मुळे थेट फायदा झाला नाही तरीही कमी वेअरहाऊस खर्च, अतिकार्यक्षम सप्लाय चैनचे नियोजन व योग्य इंव्हेनटरी नियोजन यामुळे अप्रत्यक्ष फायदा होईल.

**क) प्लास्टीक उद्योग** :- या उद्योगांत असंघटीत क्षेत्र जास्त आहे. त्यामुळे या क्षेत्रातील उद्योजक डीलर्सना जास्त मार्जिन देत असत. आता जीएसटी मुळे ते सर्व कराच्या जाळ्यात येतील व पुर्वीइतके मार्जिन देऊ शकणार नाही. याचा फायदा PLASTBEND सारख्या कंपन्याना होईल

**ड) ऑटोमोबाईल** :- मारुती, महिंद्र, वीएसटी, एस्कार्टस या क्षेत्राला थेट फायदा होईल सध्या एक्साईज आणि व्हॅट मिळून जेवढी रक्कम द्यावी लागते त्यापेक्षा कमी रक्कम जीएसटी मुळे द्यावी लागेल.

**ई) एन्टरटेनमेंट** :- Dish TV, PVR, INOX, LEISURE Box रेव्हेन्यु प्रमाणे कर आकारात हा प्रत्येक राज्यात वेगवेगळ्या दराने आकारला जातो हा कर लावतांना 100 टक्के ऑक्युपन्सी गृहीत धरली आहे. त्यामुळे या कंपन्याना जीएसटी मुळे फायदा होईल.

**निष्कर्ष** :- कोणत्याही देशांतील कर प्रणाली हि त्या देशातील आर्थिक प्रणाली मुख्य आधार स्तंभ असते. हा आधार जितका मजबूत असेल तेवढीच त्या देशाची आर्थिक संरचना सुदृढ असते. या दृष्टीने वस्तु व सेवाकर 'वस्तु व सेवाकर' या प्रणालीकडे पाहीले तर जगातील या कर प्रणालीचा अवलंब करणाऱ्या देशाचा अनुभव सकारात्मक व उत्साह जनक दिसुन येतो.

भारतासारख्या उभरत्या आर्थिक शक्तीसाठी आर्थिक सुधारणा अनिवार्य आहे. व त्याचाच एक महत्वाचा भाग म्हणून जीएसटीचे स्वागत करणे गरजेचे वाटते म्हणूनच आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष (IMF) ने जीएसटीला महत्वाचे करसुधारणा धोरण म्हटले आहे, ज्यामुळे



Scanned by CamScanner

सुरुवातीला जरी आर्थिक वृद्धीदर कमी झाला तरीही भविष्यात मात्र भारताचा जीटीपी वाढणार आहे. व देश हितासाठी फायद्याचे ठरणार आहे. व त्यासाठी मात्र सम्पुर्ण देश पातळीवर माहिती तंत्रज्ञानाचे जाळे व्यापक व सक्षमतेने उभारणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे भविष्यात व्यावार, व्यवसाय, उद्योग क्षेत्र व सम्पुर्ण अर्थव्यवस्थेतीली बदलांचा सुक्षमपणे अभ्यास करुन त्यानुसार जीएसटी कार्यप्रणालीत लवचिकता आणणे गरजेचे वाटते सरकारच्या नोटबंदी धोरणाचे आपण स्वागत केलेच आहे. आता जीएसटी चे स्वागत करु या व आशावादी राहू या म्हणून म्हणे -

जीएसटी आया जीएसटी आया ।
पुरे देश में एक परिवर्तन लाया ।
जीएसटी बील करो स्वागत ।
इससे मिलेगीं अर्थव्यवस्था को ताकद ।

## References:-


1) The Economic Times
2) GST India (2015) Economic Policy
3) Citation - Dant S.A. Research paper on"An Impact of Goods & Services Tax
4) वस्तु व सेवाकर अहवाल (महाराष्ट्र राज्य)
5) आर्थिक तज्ञांचे लेख (लोकसत्ता वर्तमानपत्र)


Scanned by CamScanner

# जीएसटी अप्रत्यकर

प्रा. विठ्ठलराव गि...
नवप्रतिभा कनिष्ठ महावि...

देशात जीएसटी ची अंमलबजावणी झाल्यानंतर संपूर्ण अप्रत्यक्ष कराची संरचना केंद्र सरकार व राज्य सरकार द्वारे होत असलेल्या पद्धतीला पूर्ण विराम देण्यात आल. अप्रत्यक्ष रचना प्रत्येक राज्याची अशी स्वतंत्रीत्या अंमलात आणल्या जाणारी होती. याचा परिणाम विविध वस्तूवरील कराचे दर भिन्न भिन्न ठेवण्यात येत होते व देशात 7 टक्के पेक्षा जास्त कर अप्रत्यक्ष कररचनेतून प्राप्त होत होता. जीएसटी ची अंमलबजावणी नंतर प्रत्येक वस्तूवरील कराचे निर्धारण हे वित्तीय मंत्रालय व जीएसटी परिषदेद्वारे निश्चित करण्यात आलेले आहे. म्हणजेच वस्तूची विक्री करीत असल्यानंतर कोणत्याही राज्यात निर्धारित केलेल्या करा नुसारच कराचे दर आकारे जातील म्हणजेच जोडल्यावर करचा आघात Tax INCIDENCE स्पष्टरेषीय स्वरूपात होतील. विविध वस्तूवरील प्रत्येक राज्याद्वारे आकारण्यात येणारे कराचे दर समाप्त होतील. यामुळे राज्य सरकारचे जे आर्थिक नुकसान होणार आहे ते आर्थिक नुकसान केन्द्र सरकार द्वारे प्रत्येक राज्यांना केंद्राला प्राप्त होणाऱ्या महसुलातून देण्याचे आश्वासन राज्यांना दिले जाते जीएसटी ची अत्यंत बजावणी झाल्यानंतर सर्वच प्रकारचे कर उदा. Octrai पासून तर VAT पर्यन्त हे जीएसटी मध्ये समाविष्ट करण्यात आले आहे. यामुळे व्यापारी वर्ग किंवा उद्योजक यांना विविध ठिकाणी जाऊन कराचा भरणा करावा लागणार नाही. जीएसटी कर हे याकरीता प्रत्येकाला नोंदणी क्रमांक घेणे अनिवार्य करण्यात आले आहे. नोंदणी क्रमांक घेतल्यावर त्याल जीएसटीचे लाभ उपलब्ध करून दिल्या जाणार आहे. दिल्लीत आयोजीत केलेल्या बैठकीत जीएसटी ची न्यूनतम करभरण्याची सीमा दीडकोटी रुपयापर्यन्त वाढविली आहे. व प्रत्येक महिन्याला भरावे लागणारे विवरणपत्र त्याची कालमर्यादा तीन महिने इतकी निश्चित करण्यात आली आहे.

कर आदान समायोजनचे नियम (Input Tax Credit) प्रत्येक करपात्र व्यक्तीला कमीत कमी दोन कायद्याखाली कर द्यावा लागणार आहे. आंतरराज्य पूरवठा केला असेल तर त्याला तिसरा कर द्याव लागेल व त्यातून त्याला सपूट टॅक्स क्रेडीट प्राप्त होतील व्यवसायाकरीता आणि व्यवसायाशी संबंधीत जी आवक असेल त्यावर जो कर दिला असेल त्याची वजावट घेण्याचा अधिकार करदात्याला आहे राज्यशासनाला दिलेला हा SGST केंद्रशासनाला द्यावयाच्या करातून SGST वजा करता येणार नाही.

आंतरराज्यीय पूरवण्यावर जो इंटिग्रेटेड IGST द्यावा लागे त्या करीता नियम स्वतंत्ररित्या तयार करण्यात आला आहे. IGST चा भरण्या करण्याकरीता IGST चे क्रेडीट त्यानंतर CGST चे क्रेडीट आणि नंतर SGST चे क्रेडीट या पद्धतीने वापरण्यात येतील. IGST चे इनपुट टॅक्स क्रेडीट वापरुनही शिल्लक असेल तर प्रथम CGST कर भरण्याकरीता वापरले जाईल व त्यातूनही काही शिल्लक राहिले तर SGST चा कर भरण्याकरीता वापरले यातील राज्य कराप्रमाणेच केंद्रशासीत प्रदेश कराकरीता नियम तयार करण्यात आलेले आहे.

आपसमेळ कर - जीएसटीची कर भरण्याची न्यूनतम सीमा वाढविण्यात आली आहे. पूर्वी ही मर्यादा 20 लाख रुपये ऐवढी होती. अशाव्यापाऱ्यांना जीएसटी मध्ये नोंदणी घेणे बंधनकारक नसले तरी अनेक किरकोळ व्यापारी असे आहेत की, ज्यांना जीएसटी कायद्याप्रमाणे हिशोब व खर्च ठेवणे दुरापास्त आहे. कारण एकल व्यापारी वर्गाचे प्रमाण भारतात सर्वात जास्त आहे. कराप्रमाणे त्याची विक्रीकरणे अधिकोषीय व्यवहार ऋणकोकडून कर्ज वसूली यासर्वांचा हिशोब एकल व्यापारी एकटाच करीत असतो अशा उपक्रमात घट पडू नये म्हणू जीएसटीच्या कर उरदराप्रमाणे कर भरण्याऐवजी एकूण उलाढालीच्या आधारावर कर भरण्यात सूट देण्यात आली आहे. अशाप्रकारची ही आपसीसमट योजना होय. याकरीता काही अटी खाली प्रमाणे आहेत. अटी (01) व्यापाऱ्याची वर्षातील उलाढाल अगोदर ह्या वर्षातील 75 लाखा पेक्षा कमी असावी.

(02) PAN धारण करणाऱ्या पण वेगवेगळी नोंदणी असणाऱ्या व्यापाऱ्यांचे एकूण व्यापारातील लेनदेन एकजीतपणे मोजली जाईल.

(03) आपसमेळ योजनेचा फायदा घेण्याकरीता 1 जुलै 2017 पासून एक महिन्याच्या आत त्याकरीता आवश्यक असलेला अर्ज भरावा लागेल.

(04) या योजनेनुसार करदेय बिलमध्ये, कर लावता येणार नाही व करआदान समायोजन देखील त्यात प्राप्त होणार नाही.

(05) 75 लाखापेक्षा लेनदेन किंवा उलाढाल झाल्यास या योजनेचा ला...



Scanned by CamScanner

प्राप्त होणार नाही.

काही राज्यातील उदा. अरुणाचलप्रदेश, आसाम, मणीपूर, मेघालय, मिझोरम, नागालँड, सिक्कीम त्रिपुरा व हिमाचल प्रदेश या करीता ही मर्यादा पन्नास लाखा एवढी निर्धारीत केली आहे.

खालील स्थितीत या योजनेनुसार भरण्यापासून सवलत प्राप्त होणार नाही.

(01) सेवा पुरविणारे (02) जीएसटी अंतर्गत कर लागत नाही अशा वस्तूंचे व्यापारी (03) वस्तूंचा आंतरराज्यीय पुरवठा केला असेल तर (04) इलेक्ट्रॉनिक्स, कॉमर्स ऑपरेटर्सच्या मार्फत जर वस्तूंचा पुरवठा केला असेल तर (05) जीएसटी परिषद ने सूचित केलेल्या वस्तूंची यादी. एकाच वेळी PAN असलेल्या परंतू वेगवेगळ्या दोन राज्यात किंवा एकाच राज्यात भिन्न भिन्न नोंदणी केली असेल तर या योजनेनुसार कर भरण्याचा पर्याय सर्व नोंदणी करीता आवश्यक राहील. योजना पुढील प्रमाणे आहे व कर दर्शविले आहे.

| अ.क्र. | विवरण | CGST | SGST | एकूण |
|---|---|---|---|---|
| (01) | (02) | (03) | (04) | (05) |
| अ | उत्पादक | 01% | 01% | 2% |
| ब | होटल व रेस्टॉरंट | 2.5% | 2.5% | 5% |
| क | अन्य | 5% | 5% | 1% |

या योजनेचा ज्यांना लाभ मिळणार नाही अशा व्यवसायाचा संपूर्णपणे CGST होत राहील ते खालील प्रमाणे आहेत.

(1) आईस्क्रीम (2) पानमसाला (3) तंबाखू व तंबाखू जल पदार्थ.

टॅक्स इनव्हाईस - या कायद्याप्रमाणे नोंदणीधारक व्यक्तीने वस्तूंचा पुरवठा करताना वस्तूचे वर्णन (नग, वजन, लिटर) त्याची किंमत आणि त्यावरील कर यांचा तपशील असलेले टॅक्स इन्व्हाईस दिले गेले पाहिजे. सेवेचा पुरवठा केल्यापासून नियमानुसार ठरविलेला मुदतीच्या आत संबंधी वर्णन किंमत आणि याची रक्कम असा तपशील टॅक्स इन्व्हाईस मध्ये असल पाहिजे याठिकाणी पुरवण्याची वेळ याचा अर्थ वस्तू- सेवा दिल्या अगोदर झाल आहे असे म्हणता येणार नाही. पुरवठा प्रत्यक्षात झाल्यावरच टॅक्स इन्व्हाईस दिला जाईल.

जीएसटी नुसार ज्या वस्तू किंवा सेवेचा पुरवठा केला जाईल त्याच्या बिलाच्या तपशील बाबत काही नियम स्पष्ट केले आहेत त्या नियमानुसार तपशील होणे बंधनकारक आहे. आपणास मोठे लाभ घेणाऱ्यांना टॅक्स इनव्हॉईस होता येणार नाहीत.

(1) PAN IN नंबर (2) टॅक्स इनव्हॉईसची तारीख (3) Accounting Code (4) वस्तू व सेवा पुरवठ्याचे वर्णन (5) बिलाची एकूण रक्कम (6) कराची एकूण रक्कम राज्याची (1) CGST (2) SGST (3) IGST (4) आंतराज्यीय पुरवठा अनेक तर पुरवण्याचे ठिकाण आणि राज्याचा कोड नंबर (5) Reverse Charges पद्धतीने भरावयाचा असेल तर ते नमूद करावे. 200 रुपयापेक्षा अर्धी किंमतीच्या वस्तू सेवा किंवा दोन्हीचा पुरवठा केल्यास इन्व्हाईस होण्याची गरज नाही. परंतु उपयोगाकाने मागणी केल्यास ते देणे अनिवार्य ठरेल. आंतरराज्य पुरवठा केंद्रशासनाने केंद्रीय जीएसटी कायदा केला आहे. आणि प्रत्येक राज्याने स्वतंत्रपणे राज्य IGST कायदा अमलांत आणला आहे. प्रत्येक करपात्र व्यक्तीला या कायद्याखाली नोंदणी आवश्यक केली आहे. या व्यतीरिक्त IGST इंटग्रिट जीएसटी याप्रमाणे असेल परंतू याची नोंदणी घेण्याची तरतुद नाही. IGST कायद्या अंतर्गत काही नियम तयार केलेले आहेत यावरून स्पष्टीकरण प्राप्त होते.

(01) वस्तूंचा आंतरराज्य पुरवठा (02) राज्याअंतर्गत पुरवठा (03) सेवेचा आंतराज्यीय पुरवठा (04) राज्याअंतर्गत पुरवठा (05) वस्तूंची आयात व निर्यात (06) सेवेची आयात व निर्यात आंतरराज्यी पुरवठा ओळखण्या करीता खालील बाबी स्पष्ट केल्या आहेत. नियम -

(1) वस्तूचा पुरवठा करणाऱ्याचे स्थान, आणी पुरवठा केलेले ठिकाण वेगवेगळ्या राज्यात दोन वेगवेगळ्या केंद्र शासीत प्रदेशात किंवा एक राज्य किंवा एक केंद्रीय शासीत प्रदेश असेल तर तो आंतरराज्यीय पुरवठा समजण्यात येईल अशा पुरवण्यावर IGST कर लावल्या जाईल.

(2) सेवेचा पुरवठा करणाऱ्याचे स्थान आणि पुरवठा केलेले ठिकाण वेगवेगळ्या राज्यात असेल किंवा दोन वेगवेगळ्या केंद्रशासीत प्रदेशात किंवा एक राज्य व एक केंद्रशासीत प्रदेशात तर तो आंतरराज्यीय पुरवठा समजल जाईल. यावर IGST आकारण्यात येईल.

(3) एखादी वस्तू विदेशातून आणताना ती वस्तू या भारतातल्या कस्टम सीमेच्या आत येत नाही तोपर्यन्त आंतराज्य पुरवठा समजल जाईल.

(4) सेवेची परदेशातून आयात आंतरराज्य पुरवठा समजल्या जाईल.

(5) देशातून विदेशात पुरवठा करण्यात भारतीय असेल तर त्याला आंतरराज्यातील पुरवठा समजला जाईल.

(6) SEZ मधील पुरवठा आंतराज्यी पुरवठा समजला जाईल.

जीएसटी मधील हे नियम सरळ व सोपे नाही म्हणून ते प्रत्येकाने समजून घेणे अनिवार्य आहे.

जीएसटी संक्रमण काळ अनेक कायदे जीएसटी मुळे रद्द होणार व त्याऐवजी एकच कायदा येणार म्हणून व्यापार व्यवहार हे बंद होणार नाहीत. वस्तूंची खरेदी अगोदर झाली असेल व विक्री GST आल्यावर होणार असेल कोणाच्या बाबतीतही घडेल. ज्याच दिवशी जीएसटीची अंमलबजावणी झाली असे त्यादिवशी व्यापारी वर्गाकडे जूना स्कंध शेष असेल काही उत्पादन प्रक्रियेत अडकल असेल त्या अंतर्गत रद्द झालेले करांचा समावेश असेल अशा या गुंतागुंतीच्या प्रक्रियेमुळे अनेक समस्या निर्माण झाल्या असतील याकरीता GST मध्ये विशेष प्रावधान आहे. यालाच संक्रमण तरतुदी असे म्हणतात. ज्या वस्तूच्या उत्पादनास



Scanned by CamScanner

एकसाईज लागू आहे व ज्या उत्पादकांनी अगर सेवा होणाऱ्या व्यापाऱ्यातील सेंट्रल एक्साईसखाली नोंदणी केली आहे. अशा सर्व व्यापाऱ्यांना सिनव्हेट चे नियम लागू राहील या नियमानुसार अशा वस्तूवरील व सेवेवरील भरलेला एक्साईस अथवा सेवाकर घेतल्यावर त्याचे जे टॅक्सइन्व्हाईस प्राप्त होते व त्याअंतर्गत जो कर दाखल असेल व त्याची हिशोब पुस्तकात नोंदणी असेल तर तो कर Cenvat Credit करीता वापरता येतो. 01 जुलै 2017 रोजी वापर न केलेला जो एक्साईज/सेवाकर असेल तेवढ रक्कम जीएसटी कर भरण्याकरीता वापरता येतील. जीएसटी कायद्यातील तरतुदीनुसार त्याचा उपयोग कर भरण्याकरीता वापरता येईल. म्हणजेच GST Input Credit नियमानुसार कर वापरता आल पाहिजे. उत्पादीत माल जर दूसऱ्याच्या उत्पादनात वापरण्याचा असेल आणि उत्पादकाने माल व्यापाऱ्याला आधीच विकला असेल व त्या व्यापाऱ्याने दूसऱ्या उत्पादनाला विकत असेल तर पहिल्या उत्पादकाने झालेल्या एक्साईजचे क्रेडीट दुसऱ्या उत्पादकाने हस्तांतरीत करण्याकरीता मध्यस्त व्यापाऱ्याला एक्सरसाईस कायद्यानुसार पहिला विक्रेता म्हणून नोंदणी करता येयील. त्याच्या कडील शिलूक मालच्या किमतीत एक्साईजची रक्कम समाविष्ट केल्या जाते. अशा उद्योग किंवा व्यापाऱ्यांना शिलूक मालतीत एक्साईजचे इनपुट टॅक्स क्रेडीट जीएसटी अंतर्गत वापरता येयील. याशिवाय ज्यांना कायद्यानुसार नोंदणी घेणे आवश्यक किंवा बंधनकारक नव्हते करमुक्त व्यापारी किंवा करमुक्त सेवा देणारे अशा आयातदार व्यापाऱ्यांना देखील दोष मालवरील टॅक्स क्रेडीट जीएसटीमध्ये वापरता येयील. याकरीता काही अटी आहेत

(01) शिलूक वस्तू जीएसटीमधील करपात्र/सेवा पूरवठा करण्याकरीता वापरल्या पाहजेत किंवा तसा उद्देश असला पाहिजे.

(2) जीएसटीच्या इनपुट क्रेडीट नियमानुसारही कर वापरता आला पाहिजे.

(3) अगादेरचे कागदपत्र व्यापाराकडे असणे आवश्यक आहे.

(4) सेवा देणाऱ्यास या नियमानुसार कमी करण्याचा तरतुदी लागू नसाव्यात.

भारतात असे असख्य व्यापारी वर्ग आहे की, त्यांनी खरेदी केलेल्या मालावर उत्पादनाकडे किती एक्साईज भरला आहे याची नोंद नाही. शिलूक मालतील एक्साईज राशी कशी ठरवायची याकरीता GST अंतर्गत नियम तयार केलेले आहेत. त्यानियमाचा वापर करून व्यापाऱ्यांना त्यातून सूट प्राप्त होतील. सेवा ही शिलूक माला सारख्या दृश्य स्वरूपात दाखवता येत नाही. परंतु सिनव्हेट क्रेडीटच्या नियमानुसार सेवा देण्याकरीता घेतलेल्या वस्तू/सेवावरील क्रेडीट जमाखर्चात दाखविता येतो. असे जमा झालेले सर्व क्रेडीट जीएसटी कर मागण्याकरीता वापरता येतील. उपलब्ध पण न वापरलेले सिनव्हेट क्रेडीट जीएसटी करीता वापरता येयील व त्याची तरतुद CGST अंतर्गत नमुद केली आहे. GST जून याची वजावट प्राप्त होतील.

इमारती, रस्ते, फ्लायओव्हर धरणे, पाईपलाईन टाकणे अशा स्वरूपाची कार्य बांधकाम करावे म्हणून संबोधली जातात. त्यात रोजच्या रोज काही कार्य चालू असते म्हणजेच रोजच्या रोज पूरवठा होत असतो पण त्याचे देयक कार्याचे काही कार्य पूर्ण झाल्यावरच त्याचे शोधन होते. जीएसटी अंमलत झाल्यावर त्या दिवशी देखील अशी कार्य वेग वेगळ्या टप्प्यावर पूर्ण झाली असतील. जीएसटी येण्यापूर्वी आतापर्यंत कायद्याप्रमाणे कर भरावा आणि जीएसटी लागू केल्याचा दिवसापासून जे पुरवठा झाला त्यावर जीएसटी नुसार कर भरावा लागेल अशी तरतूद या कायद्यात केली आहे. बांधकाम पूरवठा कधी झाला हे सिद्ध करणे कठीण कार्य आहे. अशा स्थितीत जीएसटी अमलंत येयील त्याच्या पूर्वीच्या दिवशी नोंदकार्य पूर्ण झालेले असेल तेवढच बिलींग करणे उचित ठरेल.

अशा प्रकारे भारत सरकारने जीएसटी कायदा अप्रत्यक्ष कराकरीता अंमलात आणला आहे आरंभीच्या काही काळात व्यापाऱ्यांना, उद्योजकांना, विक्रेत्यांना या सर्व बाबींचा आर्थिक त्रास जाणवेल. पण काही काळानंतर सर्वांनाच याचा सवय झाल्यास ते सर्वांकरीता भविष्यात फायद्याचे राहणार आहे.

संदर्भ :-


(1) राजस्व :- सु.रा. ओझरकर

(2) जीएसटी कायदा अद्यावत सुधारणा सह ॲड गोविंद पटवर्धन

(3) Economic Times 11-10-17

4) Inian Express A Better GST Oct 9, 2017



विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ, नागपूर द्वारा आयोजित द्वैवार्षिक चर्चा सत्र २०१७ ला

हार्दिक शुभेच्छा !

श्री. छत्रपती कनिष्ठ महाविद्यालय

चिटणविसपुरा नागपूर



सुरेश पांडुरंगजी अंबारे

प्लॉट नं. एन ४४, रेशीमबाग, नागपूर मोबाईल नं. ९४०३८५२७७०





Scanned by CamScanner

# वस्तू व सेवा कर प्रणाली रचना व परिणाम

प्रा. पंकज नखले

**सारांश :**

जीएसटी पुर्वी अस्तीत्वात जुन्या असलेल्या गुंतागुंतीच्या अप्रत्यक्ष करांच्या जाळ्यांचा अंत करण्यासाठी आणि त्यांच्या जागी एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यासाठी जीएसटी प्रणाली आणली गेली आहे. 'एक देश एक कर' हे वस्तू आणि सेवा कराचे गुड्स अँन्ड सर्व्हिसेस टॅक्स जीएसटी हे कर आधुनिक जगात सर्वात प्रागतिक मानला जातो. जगभरात 160 पेक्षा जास्त देशामध्ये जीएसटी कर अस्तीत्वात आहे 12 देश जीएसटी अमलबजावणीच्या प्रक्रियेत आहेत भारत हा देश 29 घटकराज्य व 7 केंद्रशासित प्रदेश एवढ्या मोठ्या विशाल विविधतेने नटलेला देश आहे. प्रत्येक राज्याची कर प्रणाली वेगवेगळी आहे. त्यावर वस्तू व सेवा कर प्रणाली मोठा पर्याय ठरु शकते.

घटनादुरुस्ती कायद्यासह 35 कायदे जीएसटी च्या पाठिशी उभे राहीले आहेत. 101 वा घटनादुरुस्ती कायदा, सीजीएसटी कायदा, 3 युजीएसटी कायदे, आईजीएसटी कायदे, 28 जीएसटी कायदे, आणि जीएसटी कायदा या 35 कायद्यांमुळे मात्र केंद्राच्या व राज्यांच्या शेकडो कायद्यांची गरज राहीली नाही. हे शेकडो कायदे आता बाद झाले आहेत. जीएसटी चे चार स्तर निश्चित केले आहे. 5% 12% 18% 28% वस्तु गट या स्तराबाहेर ठेवण्यात आले आहे. सोने व चांदी, मौल्यवान खडे, तयार हिरे व दागिन्यांवर 3% आणि न घासलेल्या हिऱ्यावर 0.25% जीएसटी चा दर निश्चित झाला आहे.

**बिज संज्ञा :**

1) GST (Goods & Service Tax) वस्तू आणि सेवा कर

2) CGST (Central GS + Act) केंद्रीय वस्तू व सेवा कर कायदा

3) SGST (State GST Act) राज्य वस्तू व सेवा कर कायदा

4) UTGST (Union Territory GST Act) केंद्रशासित प्रदेशासाठीचा वस्तू व सेवा कर कायदा

**प्रस्तावना :**

आपण आपल्या दैनंदिन जीवनात कोणत्या ना कोणत्या प्रकारे कराचा भरणा करीत असतो. सरकारच्या विविध योजनांना अर्थसहाय्य करण्यामध्ये आपण भरत असलेल्या कराची भूमिका महत्वाची असते. गेल्या काही वर्षात करांमध्ये अनेक प्रकारच्या सुधारणा झाल्या आहेत. विशेषतः अप्रत्यक्ष करप्रणालीमध्ये सरकारने बदलांची प्रक्रिया सुरु केली आहे. भारताला अधिक कर अनुकूल बनवण्याबरोबरच कर प्रणालीमधील गुंतागुंत आणखी कमी करण्याचा त्यामागे उद्देश आहे. यापैकी सर्वात मोठ्या' सुधारणेसाठी केलेला पाठपुरावा म्हणजे वस्तु व सेवा कर (जीएसटी) होय.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतरचे सर्वात महत्वाचे अप्रत्यक्ष कर सुधारणा विधेयक म्हणून बोलबाला झालेले आणि संपुर्ण देशात एक कर प्रणाली आणण्याचे उद्दिष्ट असणारे 122 वे घटनादुरुस्ती विधेयक संसदेने मंजूर केले आहे. जवळपास 20 वर्षाचा प्रदीर्घ प्रतिक्षेनंतर 1 जुलै 2017 पासून 'जीएसटी' प्रणाली म्हणजेच 'वस्तू व सेवा कर प्रणाली (Goods & Service Tax) अमलात आली. वस्तु व सेवा कर किंवा (Goods & Service Tax) हा अप्रत्यक्ष कर असून तो वस्तू किंवा सेवांच्या उत्पादन विक्री आणि वापरावर एकात्मक पध्दतीने आकारला जातो. यात सेंट्रल एक्साईज ड्युटी, सर्वीस टॅक्स, सेंट्रल सेल्स टॅक्स, लक्झरी टॅक्स संपुष्टात येईल. जीएसटी मध्ये वस्तु आणि सेवांवर तीन प्रकारचे कर आकारले जाईल. पहिला म्हणजे सेंट्रल जीएसटी जे केन्द्र सरकार आकारेल. दुसरा म्हणजे स्टेट जीएसटी जे राज्य सरकार त्यांच्याकडे होणाऱ्या व्यवहारावर आकारेल. जर कोणता व्यवहार दोन राज्यांमध्ये होत असेल तर त्यांच्यावर आईजीएसटी म्हणजे इंटिग्रेटेड जी.एस.टी. आकारला जाईल. हा कर केन्द्र सरकार वसूल करेल आणि त्यांचे दोन राज्यांमध्ये समान प्रमाणात वाटप करेल.

उद्दिष्टे - :

1. जीएसटी या नवीन कर प्रणाली संरचणेतील विविध तरतुदींच्या अभ्यास करणे.
2. जीएसटी करांची आवश्यकता अभ्यासणे.
3. जीएसटी पूर्व स्थितीतील करसंरचनेचे विश्लेषण करणे.
4. जीएसटी चा अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रावरील ____ संभावित



Scanned by CamScanner

परिणाम अभ्यासणे.

**गृहितके :**

1. जीएसटी मुळे सर्वसामान्य उपभोक्तांना/ग्राहकांना लाभ होईल.
2. जीएसटी मुळे करसंरचनेतील क्लिष्टता दूर होवून कर प्रणालीमध्ये सुलभता येईल.
3. जागतिक पातळीवर बहुसंख्य राष्ट्राच्या ओढा जीएसटी या कर प्रणालीकडे आहे.
4. जीएसटी मुळे करचुकवेगिरीला आळा बसेल व सरकारी महसुलामध्ये वाढ होईल.

**संशोधन पध्दती :**

जीएसटी कर प्रणाली भारतीय अर्थव्यवस्थेच्या संदर्भात कशी राहणार यासाठी याविषयीच्या संदर्भातील विविध दुय्यम समंकाचा वापर करण्यांत आला आहे. विषयाच्या अनुषंगाने विविध, मासिके, वर्तमानपत्रे, शोधप्रबंध, शोधनिबंध यामध्ये प्रकाशित तसेच अप्रकाशित साहित्याचा उपयोग करण्यांत आला आहे. विविध चर्चासत्रामध्ये प्रकाशित संशोधपर लेख, सरकाराकडून प्रकाशित साहित्य तसेच जीएसटी च्या अनुषंगाने होणाऱ्या तज्ञांच्या चर्चा यांचा दुय्यम समंक म्हणून या शोधनिबंधात वापर करण्यांत आला आहे.

[illegible] GST

| | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | GST |
|---|---|---|---|---|---|
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | Central Excise Act 1944 | Finance Act 1994 | MH VAT Tax Act 2002 | Central Sales Tax Act 1956 | [illegible] |
| [illegible] | 12.5 % | 15 % | [illegible] | 2% | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | | [illegible] |
| [illegible] | [illegible] | [illegible] | [illegible] | | [illegible] |

[illegible] GST [illegible]

| वस्तु | क्षेत्र | CGST | SGST/UTGST | IGST |
|---|---|---|---|---|
| [illegible] | — | (लागू नाही) | (लागू नाही) | (लागू नाही) |
| [illegible] | [illegible] | 0 % | 0 % | 0 % |
| [illegible] | — | 0.125 % | 0.125 % | 0.25 % |
| [illegible] | | 1.5 % | 1.5 % | 3% |
| [illegible] | [illegible] | 2.5 % | 2.5 % | 5 % |
| [illegible] | [illegible] | 6 % | 6 % | 12 % |
| [illegible] | [illegible] | 9 % | 9 % | 18 % |
| [illegible] | [illegible] | 14 % | 14 % | 28 % |

**कर कोणी भरायचा ?**

1. ज्या पुरवठादारांची वार्षिक उलाढाल 20 लाख रुपये व त्याहून जास्त आहे त्यांना जीएसटी भरणे अनिवार्य आहे.
2. विशेष दर्जा राज्योसाठी ही वार्षिक उलाढाल मर्यादा 10 लाख रुपये ठेवण्यात आली आहे.

**प्रमुख क्षेत्रात जीएसटीचे परिणाम**

**1. स्थावर मालमत्ता :**

स्थावर मालमत्ता क्षेत्रात अनेक परिणाम होतील, जुन्या कायद्यानुसार सेवा कर मुल्यवर्धित कर मुद्रांक शुल्क बांधकाम कर व खरेदी कर, अबकारी कर यांचा समावेश आहे. त्यामुळे घराच्या किंमती वाढतात, मात्र जीएसटीमुळे स्थावर मालमत्ता क्षेत्रात पारदर्शकता येईल व करचुकवेगिरी कमी होईल कारण करावर कर राहणार नाही एकच कर राहील.

**2. आरोग्य क्षेत्र :**

औषधी उत्पादन क्षेत्रावर चांगला परिणाम होऊन सध्या या क्षेत्रात आठ कर आहेत ते जातील व एकच कर असेल जीएसटीमुळे पुरवठा सुधारुन औषध क्षेत्र दोन टक्कांनी वाढेल. कराधारीत पत वाढेल व अनूपालन चांगले राहील त्यामुळे कंपन्यांना समान संधी राहील या सर्वांचा फायदा ग्राहकांना मिळेल. आरोग्य विमा व निदान केंद्र यांना फायदा मिळेल की नाही हे अजून निश्चित नाही कारण ते सेवेशी निगडीत आहेत. आरोग्य



Scanned by CamScanner

क्षेत्रातील करसवलतीचे फायदे राहतील की नाही हे समजलेले नाही.

**3. बँकिंग व आर्थिक सेवा :**

भारतात बँकिंग व आर्थिक सेवा यात आधि 14. 5 टक्के कर होता जीएसटी 18 ते 20 टक्के आहे तर नक्कीच सेवा महागणार आहे. कर्जावरील व्याज व रोख्यातील व्यवहार परदेशी चलन व किरकोळ सेवा जीएसटी मध्ये येतील. बँकिंग क्षेत्राने या सेवा जीएसटीत आणू नयेत असे सुचविले आहे. पण अजून शिफारशी स्विकारल्या नाहीत.

**4.सामान्य नागरिकांवर परिणाम :**

पूर्वी 12.5 टक्के अबकारी कर तसेच 5 ते 15 टक्के व्हॅट म्हणजे मुल्यावर्धित कर होता. जीएसटीमुळे 18 टक्के ही कराची मर्यादा राहील. काही वस्तूंच्या किमती कमी होतील खरेदी किमती कमी होतील. कपडे, पुस्तक, स्वयंपाकाचा तेल महागणार बाहेरचे खाने महाग पडेल, फोनचे बिल वाढेल, रेल्वे, हवाई प्रवास महागेल. बँग,ज्युस, इलेक्ट्रानिक, ऑनलाईन खरेदी महाग होईल.

**GST चे फायदे -**

1. आधिच्या गुंतागुतीच्या करप्रणाली GST मुळे साधी-सोपी होणार आहे. आकरल्या जाणाऱ्या वस्तु व सेवांसाठीच्या वेगवेगळ्या व कित्येक अप्रत्यक्ष कराऐवजी ही एकात्मिक कर पद्धत नागरीकांसाठी सुलभ ठरणार आहे.

2. GST कर पध्दतीमुळे संपुर्ण देशातील बाजारपेठेचे एकत्रीकरण होणार असुन याव्दारे आंतरराज्य व्यवहारामध्ये वाढ होण्याची शक्यता वाढली आहे.

3.आधी वस्तु व सेवा व्यवहारातील विविध टप्यावर कर आकारणी केली जात होती. त्यामुळे करावर कर आकारला जायचा व आपोआप वस्तु व सेवांच्या किमतीमध्ये वाढ व्हायचा यामुळे करांवर कर आकारणीवर आळा बसणार असुन ही गोष्ट महागाई कमी करण्यास फायदयाची असु शकते.

4.GST कर प्रणालीतील कर माहिती तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आकारणीस सुलभता येईल व त्यामुळे कर संकलनामध्ये वाढ होणे तसेच भ्रष्टाचारास आळा बसणे अपेक्षित आहे.

5.जगातील जवळपास 160 हुन अधिक देशांनी याआधीच GST कर प्रणाली आत्मसात केली असुन GST करप्रणाली आर्थिक सुधारणांचा अविभाज्य घटक ठरली आहे.

6.विविध करांमुळे जे गोंधळ सामान्य नागरिकांना सहन करावे लागत होते ते दुर होतील. जीएसटीमध्ये केंद्रीय, राज्य व एकात्म जीएसटी असे कर राहतील. त्यामुळे आंतरराज्य व्यवहार सुरळीत होतील.

**GST समोरील आव्हाने, टिका, तोटे -**

1. बहुतांश राज्यांना करामुळे आपल्या महसुली उत्पन्नावर पाणी पडण्याची भिती वाटत होती. म्हणुन हेच विधेयकाला संसदेच्या मंजुरीस उशीर लागला होता.

2. GST विधेयकामध्ये पेट्रोलियम उत्पादने व मद्य या वस्तुंना कर प्रणालीच्या बाहेर ठेवले आहे.ही उत्पादने सरकारला भरपुर महसुल प्राप्त करून देणारी असतांना त्यांना कर प्रणाली बाहेर ठेवण्यामागची सरकारची भुमिका स्पष्ट नाही.

3. तज्ञांच्या मते GST कर प्रणाली ही दीर्घ कालावधीनंतर फायद्याची ठरणार आहे. त्यामुळे अंमलबजावणीनंतर काही कालावधीसाठी तरी जनतेला उच्च कर आकारणी सोसावी लागण्याची शक्यता आहे.

4. काही तज्ञांच्या मते GST विधेयकातील कर म्हणजे दुसरे-तीसरे काही नसुन अनुक्रमे उत्पादन शुल्क व व्हॅट यांची नवी नावे आहेत.

5. GST अंमलबजावणीसाठी आय.टी. सेवा पुरविण्याचे काम IT या खाजगी कंपनीकडे देण्यात आले आहे. संपुर्ण देशातील नागरीकांची संवेदनशील माहीती हाताळण्याचे काम खाजगी कंपनीकडे देणे सुरक्षेच्या दृष्टीने कितपत योग्य असल्याची टिका केली जात आहे.

6. करपात्र वस्तुंचे वर्गीकरण 5-12-18-28 टक्के असा कर आकारणीत केले जाणार आहे आणि हे वर्गवारी करण्याचा अधिकार सरकारी अधिकाऱ्यांना दिला गेला आहे. हा एका अर्थी विशेषाधिकार झाला आणि जेथे म्हणुन असे विशेषाधिकार असतात तेथे भ्रष्टाचारास हमखास वाव असतो.

निष्कर्ष :

1. कर संकलनात वाढ साधणारे हे पाउल आहे. यामुळे वस्तू व सेवांच्या किमती घटणे निश्चित आहे.

2. आजही या कर प्रणालीबद्दल लोक अनभिज्ञ आणि संभ्रमात आहेत.

3. या कायद्यामुळे उत्पादक राज्य विरुध्द लोकसंख्येनी मोठी, ग्राहसंख्या अधिक असलेली राज्य यांच्यात सुरुवातीपासूनच संघर्षाची ठिणगी दिसून येते.

4. भारतासारख्या विशाल लोकसंख्येच्या देशात GST अमलबजावणी अशक्य.

5. अनेक वस्तू व सेवाकर या यंत्रनेच्या बाहेर असल्याने अडचणी जाणवतात.

6. सध्याची GDP घट हि तात्पूरती असेल मात्र दिर्घकालीन विचार करता GDP वाढ झालेली दिसेल.

7. GST हा अप्रत्यक्ष कर असून हा कर श्रीमंत आणि गरीब असा भेद करीत नाही. परिणामतः श्रीमंताना अधिक परवडतो गरीबांना मात्र जाचक ठरतो.

संदर्भ ग्रंथ सुची :-


1. देसले किरण - दिपस्तंभ (अर्थशास्त्र) 2017
2. दै. लोकमत - 31 जुलै 2017
3. दै. लोकसत्ता - 30 ऑगस्ट 2017
4. लोकप्रभा (मासिक) 7 जुलै 2017
5. वृत्त परिक्रमा (मासिक)




Scanned by CamScanner

# जीएसटी - एक अर्थक्रांती

प्रा. प्रदिपकुमार एन. सोमकुंवर
डॉ. बी. आर. आंबेडकर
कनिष्ठ महाविद्यालय,
हिंगणघाट

माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांनी जीएसटी संदर्भात 2003 मध्ये समिती स्थापन केली होती. डॉ. विजय केळकर हे या समितीचे अध्यक्ष होते त्यांनी जीएसटी संदर्भात अहवाल दिला होता. त्यानंतर 2006-07 च्या अर्थसंकल्पामध्ये तत्कालीन अर्थमंत्री पी. चिदम्बरम यांनी जीएसटीची संकल्पना सर्वप्रथम मांडली होती. 2003 मध्ये समिती स्थापन झाल्यानंतर 2017 मध्ये 122 संशोधनानंतर 1 जुलै 2017 रोजी जीएसटी लागू करण्यात आला. म्हणजेच 14 वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर जीएसटी शब्द जनतेपर्यंत पोहचला. जीएसटी म्हणजे वस्तू व सेवा कर. देशभरात एकच कर प्रणाली, सर्व प्रकारच्या वस्तू आणि सेवांसाठी एकच करपद्धती लागू करणे असे या विधेयकाचे उदात्त स्वरुप आहे.

वस्तू व सेवा कर प्रणाली म्हणजे कोणत्याही वस्तूचे उत्पादन विक्री, आणि वापर यावर आकारला जाणारा एक व्यापक कर म्हणजे जीएसटी देशभरात सर्व वस्तूंवर एकच कर असावा व देशभरात एकच बाजारव्यवस्था शक्य व्हावी हा प्रणालीचा हेतू आहे.

अप्रत्यक्ष करांच्या रचनेतील सर्वात मोठी सुधारणा म्हणजे जी. एस. टी. होय. जवळपास 165 देशामध्ये जीएसटी लागू आहे. परंतु या देशांमध्ये भारताप्रमाणे वस्तू व सेवांवर अलग अलग दर नाहीत आस्ट्रेलियात 10%, न्यूझीलंड 15%, फ्रांस 19.6%, जर्मनी 19% स्वीडन व डेन्मार्क 25% जीएसटी आहे.

**जीएसटी ची आवश्यकता:-**

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर सर्वात मोठी आर्थिक कर सुधारणा म्हणजे जीएसटी होय. यामुळे केंद्र व राज्यसरकार द्वारे लावण्यात येणारे वेगवेगळे कर संपुष्टात आणून पूर्ण देशाला एकच अप्रत्यक्ष करप्रणाली लागू करण्यात आली व जुलै 2017 पूर्वी केंद्र व राज्यसरकार वेगवेगळे कर लावत होते परंतु जीएसटी आल्यामुळे एकच कर लावल्या जातो. त्यामुळे 17 प्रकारचे कर व 23 प्रकारचे अधिभार रद्द झाले आहेत व त्याचा परीणाम वस्तूचे दर कमी होण्यात होईल. मे 2017 मध्ये जम्मू-काश्मिरमध्ये झालेल्या सर्व राज्यांच्या अर्थमंत्र्यांच्या बैठकीत विविध वस्तू आणि सेवांवरील करांच्या चैकटी निश्चित केल्या गेल्या त्यापाठोपाठ महाराष्ट्र सरकारनेही तीन दिवसाचे विशेष अधिवेशन बोलावून या करांच्या अंमलबजावणीस हिरवा झेंडा दाखविला. देशातील जवळपास सर्वच राज्यांनी अशी अधिवेशने बोलावून या घटनादुरुस्तीस मान्यता दिली आहे.

**राज्याचे होणारे वित्तीय नुकसान:-**

जी. एस. टी मूळे व्यापारी, उद्योगाइतकीच किंबहुना अधिकच केविलवाणी अवस्था राज्या-राज्याच्या मुख्यमंत्र्यांची होणार आहे. त्यातही भाजपशासित मुख्यमंत्र्यांची. उदा. देवेंद्र फडणवीस वस्तू आणि सेवा करामूळे देशातील सर्वाधिक नुकसान होणारे राज्य महाराष्ट्र आहे. आणि कायद्याचा सर्वाधिक लाभ होणारे राज्य बिहार असेल, हे असेच होईल याचे कारण या कराची रचना हा कर अंतीम उत्पादीत वस्तुवर आकारला जातो. परिणामी महाराष्ट्र हे जास्तीत जास्त कर मिळवून देणारे राज्य आहे परंतु तरीही त्यास वर्षाला किमान सात हजार कोटीचे नुकसान सहन करावे लागेल याचे कारण याकराचे संकलन केंद्रीय पातळीवर होते आणि त्याच व्यवस्थेकडून त्या रकमेचे वितरण केले जाते. याचा अर्थ असा की महसूल मिळवायचा महाराष्ट्राने आणि तरीही त्यातील आपला वाटा मिळायची वाट पाहावी लागणार आहे तो महाराष्ट्रालाच तसेच वस्तू व सेवा करामुळे मुंबईला सहा हजार कोटी मिळवून देणारी जकात बंद झाली.

वस्तू व सेवा कर लागू झाल्यानंतर राज्याचा विकास होईल. असे चित्र निर्माण केले जात असले तरी ही वस्तुस्थिती नाही. आधीच राज्याची आर्थिक परिस्थिती तेवढी चांगली नाही. गेल्या आर्थिक वर्षात 56 हजार कोटीची वार्षिक योजना सादर करण्यात आली होती प्रत्येक्षात 26 हजार कोटी खर्च झाले याचाच अर्थ सरकार विकास कामावर खर्च करु शकत नाही किंवा सरकारजवळ तेवढे पैसे नाहीत. जीएसटी लागू झाल्यामुळे सर्वच आघाड्यावर त्याचा फटका बसणार आहे. जीएसटी कायद्यासाठी 'एक देश एक कर' अशी घोषणा करण्यात आली होती परंतु प्रत्यक्षात तसी परिस्थिती नसून 5, 12, 18 आणि 28 असे करांचे चार टप्पे करण्यात आले आहेत. 18 ते 28 या दोन टप्प्यांमध्ये देशातील 82% वस्तू कर रचनेत येणार आहेत. कर दराच्या बाबतील आपण जगात प्रथम क्रमांकावर आहोत.

महाराष्ट्राला खिळखिळे करण्याचे काम कायम दिल्लीने केले आहे आताही या धोरणात कोणताही बदल नाही. राज्याचा आर्थिक वाटा



Scanned by CamScanner

कधीही पूर्णपणे दिल्लीने दिलेला नसून जीएसटी मुळे साठच्या नाड्या यापुढे दिल्लीच्याच हाती राहणार आहेत. जीएसटी लागू होण्यापूर्वी महाराष्ट्र सरकारने महानगरपालीकांमधील स्थानिक संस्था कर (एलबीटी) रद्द करण्याची घाई केली ही घाई केली नसती तर जीएसटी लागू झाल्यावर या कराची नुकसान भरपाई केंद्रसरकार कडून राज्याला मिळाली असती यातून राज्याचे मोठे नुकसान झाले. हे नुकसान जवळपास 25 हजार कोटी रुपये आहे. ज्या राज्यातील ग्राहक जास्त असतील त्या राज्यांना करात जास्त वाटा मिळेल हा निकष बघता उत्तरप्रदेश, पश्चिमबंगाल, केरळ यांना करात जास्त वाटा मिळेल, तामिळनाडू, महाराष्ट्र व गुजरात या राज्यांना महसूल बुडण्याची भीती वाटते.

**वस्तु व सेवा कराचे दर :-**

वस्तू व सेवा कर आपल्या देशात एकाच्या ऐवजी चार टप्पे घेऊन सुरू झालेला आहे. 5% , 12% , 18% आणि 28% अशा कर आकारणी गटात सर्व वस्तू आणि सेवांचे वर्गीकरण केले गेले याच्या जोडीला 28% कर द्याव्या लागणाऱ्या वस्तू आणि सेवांवर 5% ते 15% इतका अतिरिक्त अधिभार लावला जाईल याचाच अर्थ प्रत्यक्षात 28% वर्गवारीतील वस्तू आणि सेवा 33% ते 43% इतका कर देतील. व जवळपास 40 वस्तू व सेवांना कराच्या जाळ्यातून वगळण्यात आले आहे. याचाच अर्थ विविध राज्य सरकारे या 40 घटकांवर आपल्याला हवा तसा कर लावू शकतील. यातील सर्वात धक्कादायक बाब म्हणजे पेट्रोल, डिझेल यांच्या जोडीला मद्याचा देखील यात अंतर्भाव करण्यात आला आहे. सध्या परिस्थितीत विविध राज्यात इंधनाचे दर वेगवेगळे आहेत त्यामुळे इंधनाची आंतरराज्यीय तस्करी मोठ्या प्रमाणात होते. तीच बाब मद्याबाबतही आहे.

**जीएसटीमुळे महागणाऱ्या वस्तू:-**

ॲल्युमिनियम फॉइल, पॅकबंद जेवण, ब्रँडेड कडधान्ये, इन्स्टन्ट कॉफी, शुगर सिरप, प्रोटिन पॅक.

**जीएसटीमुळे स्वस्त होणाऱ्या वस्तू:-**

बेकरी उत्पादने, मिठाई, मांस, मासे यांचे पदार्थ, वनस्पती तूप, तेल, सोयाबिन, भुईमूंग

**जीएसटी लागणार नसलेल्या वस्तू:- (कर मुक्त वस्तु)**

ताजे किंवा गोठवलेले बटाटे, टोमॅटो, कांदे, लसूण, कोबी, कॉलीफ्लॉवर, नवलकोल, ब्रोकोली, सॅलडची पाने,गाजर, बीट, मुळा, काकडी, शेंगा भाज्या, वाळवलेल्या भाज्या, पावडर स्वरूपातील भाज्या, फळे इ.

**राज्यांना देण्यात येणारे अनुदान:-**

जीएसटी मुळे राज्यांचे जे नुकसान होईल ते भरून काढण्यासाठी केंद्र सरकारकडून पहिली पांच वर्ष राज्यांना नुकसान भरपाई मिळणार आहे. ही नुकसान भरपाई केंद्र सरकार 2015-16 या आधार वर्षाच्या आधारे देईल. ही नुकसान भरपाई दरवर्षी 14% दराने वाढवून मिळणार. महानगरपालिका आणि नगरपालिकांचे जकात, एलबीटी सह विविध प्रकारचे कर रद्द झाल्यामुळे महानगरपालिकांचे किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांचे जे नुकसान होणार आहे त्याची भरपाई महाराष्ट्र सरकार करणार आहे. 31 मार्च 2017 ही तारीख आधार मानून दरवर्षी निरंतर 8% दराने चक्रवाढीनुसार मदतीच्या रकमेत वाढ करण्यात येईल. असे अर्थमंत्री मुनगंटीवार यांनी जाहीर केले. जीएसटी मुळे होणारे नुकसान भरून काढण्यासाठी करमणूक/मनोरंजन कर वसुलीचे अधिकार महापालिकांना देण्यात आले असून मद्य आणि इंधनावरील कर वसुलीचे अधिकार राज्य सरकारने स्वतःकडे घेतले आहेत. तसेच नैसर्गिक आपत्ती किंवा दुष्काळी परिस्थिती निर्माण झाल्यास जीएसटी कायद्याच्या 279-क तरतुदीनुसार विशेष कर लावण्याचा राज्याला अधिकार मिळाला आहे.

**केंद्र सरकारवरील वित्तीय भार:-**

अनेक ऐशारामी वस्तू तसेच सेवांवर 28% वस्तू व सेवा करासह 5% ते 15% अधिभार प्रस्तावित करण्यात आला आहे. यामुळे या माध्यमातून होणारे कर-संकलन कमालीचे वाढणार आहे. केंद्रातील आर्थिक व्यवहार सूत्रांनुसार ही रक्कम 55000 कोटी रुपयांहून अधिक असेल. कोळसा, सोने, वाहने आदी वस्तूंवर अधिभार लागणार आहे. तसेच वाहतूक, आदरातिथ्य आदी काही सेवांवरही अधिभार लावण्यात आला आहे. महसूल विभागाच्या अंदाजानुसार कोळसा आदी वस्तूंच्या माध्यमातून 22000 कोटी रुपयांचा अधिभार जमा होईल. तर तंबाखूजन्य पदार्थांवरील अधिभारातून 16000 कोटी रुपये सरकारी तिजोरीत येतील. त्याचबरोबर पानमसाला, शीतपेय, महागडी वाहने यांद्वारेही अधिभाराची मोठी रक्कम जमा होईल. हा वाढता अधिभारच सरकारचे नुकसान भरून काढेल. असा विश्वास सरकारकडून व्यक्त करण्यात आला आहे. वस्तू व सेवा करामुळे राज्यांचे होणारे नुकसान सरकार सुरुवातीच्या काही वर्षात भरून काढणार आहे. वाढीव अधिभारामुळे या नुकसानीचा केंद्र सरकारवरील भार काहीसा कमी होईल.

**जी. एस. टी चा महागाई वरिल परिणाम:-**

आंतरराष्ट्रीय अनुभव असे सांगतो की, जीएसटी अंमलात आल्यानंतर काही महिने कधीकधी वर्षभरापर्यंतही महागाईत भर पडते व नंतर महागाई कमी होत जाते. कारण सुरुवातीला बऱ्याच वस्तूंचे करदर इतक्या वेळेस बदलतात. ज्या वस्तूंचे करदर कमी झाले आहेत त्या वस्तूंच्या किंमती कमी व्हाव्यात अशी अपेक्षा असली तरी किंमतीचा एक खास गुणविशेष आहे की, किरकोळ बाजारातल्या वस्तू व सेवांच्या किंमती अनेकदा वर चढायला आतूर पण खाली यायला जडशील असतात. त्यामुळे सुरुवातीला महागाई दिसून येते व नंतर किंमती कमी होण्याची प्रक्रिया सुरू होते. तसेच अनेक वस्तू व सेवांच्या किंमती जीएसटी मुळे कमी झालेल्या आहेत व अनेक वस्तूंच्या किंमती स्थीर आहेत त्यामुळे महागाई वाढण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. ज्याप्रमाणे बरेचदा डॉक्टर रोग्याला इंजेक्शन किंवा औषधी दिल्यानंतर असे सांगतात की याच्यामुळे एक दोन दिवस ताप येऊ शकतो व नंतर रोग पूर्णपणे नाहिसा होईल. त्याचप्रमाणे जीएसटी चे आहे.

**जी. एस. टी. चे लाभ किंवा फायदे:-**



Scanned by CamScanner

1) भारतीय अर्थव्यवस्थेला वेग येईल.

2) जी. एस. टी लागू झाल्याने कर भरण्याचे प्रमाण वाढून महसुलात वाढ होईल आणि भारताची प्रगती होईल.

3) कर चुकविण्याचे प्रमाण कमी होईल.

4) जीएसटी लागू झाल्याने व्यवसाय आणि कारभारांमध्ये सुलभता येईल.

5) विदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढेल.

6) वित्तीय तुट नियंत्रणात राहील.

7) जीएसटी मध्ये कराची साखळी एकसंघ असल्याने मूल्यवर्धीत कर आकारणी आणखी परिपूर्ण आणि अखंड बनेल.

8) जीएसटी मुळे असंघटीत उद्योगही कराच्या जाळ्यात येईल.

9) करप्रणाली सोपी झाल्यामुळे कराचे प्रशासन सोपे आणि पारदर्शक होईल.

10) जीएसटीच्या प्रणालीमध्ये आधीच्या टप्प्यावरच्या कराचे पूर्ण क्रेडिट मिळाल्यामूळे देशी उद्योगांचे लंगडेपण नाहिसे होईल व स्पर्धा क्षमता वाढेल.

11) केंद्रीय विक्रिकर व प्रवेश कर रद्द झाल्यामुळे अंतरराज्य व्यापारात वाढ होऊन एकाच वस्तूची सगळीकडे किंमत सारखी होण्यास मदत होऊन ग्राहकांना वस्तु निवडयास वाव मिळेल.

12) देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नात वाढ होईल.

13) जीएसटी मुळे वेगवेगळया प्रकारचे कर भरण्याची गरज राहणार नाही.

14) संपूर्ण देशात वस्तू खरेदी करण्यासाठी एकच कर आणि एकाच दराने कर दयावा लागेल. पूर्ण देशात एकाच किंमतीला एक प्रकारचे सामान खरेदी करता येईल.

**जी. एस. टी. चे तोटे किंवा नुकसान:-**

1) जगातील कोणत्याही संघराज्यीय देशाने वस्तू आणि सेवा कर आणला नाही. याचे कारण राज्याच्या उत्पन्न आणि उत्पादन व्यवस्थेवर गदा येते.

2) या कायदयाने सर्व अर्थाधिकार केंद्राच्या हातात जातात. आणि राज्यांना केंद्राच्या तोंडाकडे पाहात बसावे लागते.

3) एक देश एक कर या तत्वाला बगल देऊन कराचे चार टप्पे करण्यात आले.

4) 40 वस्तूंना वस्तू व सेवाकराच्या जाळयातून वगळण्यात आले आहे. हे सुध्दा या कराच्या मुळ तत्वाच्या विरुध्द आहे. यामूळे राज्य सरकारे या 40 वस्तूंवर आपल्याला हवा तसा कर लावू शकतील त्यामुळे एकाच वस्तूची किंमत वेगवेगळया राज्यात वेगवेगळी राहिल. व तस्करीचे प्रमाण वाढेल. उदा. मदय व इंधन. याचा परिणाम म्हणून आपल्या देशात 1 जुलै 2017 पासून एक देश एक कर कायदा नव्हे तर किमान 36 कायदे अस्तित्वात आलेत केंद्र सरकारचा मुख्य वस्तू आणि सेवा कायदा अधिक 35 राज्यांचे 35 कायदे अस्तीत्वात आले.

5) जीएसटी 20 लाख रुपये वा अधिक उत्पन्न असलेल्या आस्थापनांनाच लागू आहे त्यामूळे 20 लाखापेक्षा कमी उत्पन्न दाखविणाऱ्या आस्थापनांची संख्या वाढू शकते. त्यामूळे करचुकवे पणा वाढू शकतो.

6) या कराने केंद्राच्याच हाती सर्व महसूल जमा होतो. आणि त्याच्या वाटपातून राज्यांवर अन्याय होण्याचा धोका असतो.

7 आहे त्या व्यावसायीकाला महिण्याला तीन आणि वर्षाला 36 व त्याच्या जोडीला एक वार्षिक असे एकूण सदतीस परतावे भराचे लागतील ही कृती व्यापारस्नेही नाही.

8) एक देश एक कर हे वस्तू व सेवा कराचे तत्व परंतु मागील वर्षी मोदी सरकारने घटनादुरूस्ती करून 246-अ या कलमाचा अंतर्भाव केला परंतु त्याच वेळी राज्यांचा वस्तू आणि सेवा कर आकारण्याचा अधिकारही अबाधीत ठेवला. व कराचे चार टप्पे यामूळे एक देश एक कर या तत्वाला हरताळ फासला गेला.

वरीलप्रमाणे जीएसटीचे तोटे असेल तरी जीएसटी अनेक रोगावर एकच औषध आहे. आपल्या अर्थकारणाच्या दीर्घकालीन स्वास्थ्यासाठी हे औषध फलदायी ठरेल म्हणून जीएसटी ही एक अर्थक्रांती आहे.

जीएसटी बील पारीत करणे, निश्चलीकरण, घरघुती गॅस सिलेंडरवरील अनुदान टप्प्या टप्प्याने शुन्य करणे, बँक खात्यासी आधार नंबर जोडणे व सरकारच्या कोणत्याही योजनावरील लाभार्थ्याला मिळणारा पैसा बँक खात्यात जमा करणे इत्यादी धाडसी निर्णय मोदी सरकारने विविध राज्यांच्या निवडणूका समोर असतांना सुध्दा घेतले. यावरुन त्यांच्यात देशाच्या महसुलात वाढ करून देशाचा आर्थिक विकास करण्याची जीद्द व खंबीरपणा दिसून येतो. यावरून भविष्यकाळात भारत एक मोठी आर्थिक महासत्ता म्हणून उदयास येईल असे स्वप्न पाहण्यास काहीच हरकत नाही.


जीवनविकास एज्युकेशन सोसायटी, नागपुर द्वारा संचालित सरकारमान्य



श्री देवेन्द्र काळबांडे

नवप्रतिभा अध्यापक विद्यालय

हिन्दी/मराठी माध्यम

हार्दिक शुभेच्छा !

शैक्षणिक संकुल उमरेड रोड, सक्करदरा, बस-स्टॉप जवळ, नागपुर

फोन : ०७१२-२७४४९६५, मो. : ९४२२१०८०२८





Scanned by CamScanner

# वस्तू व सेवाकर प्रणाली
# रचना व परिणाम जीएसटी

प्रा. रोहीणी अलोणी

प्रस्तावना :-

प्राचीन काळी, वैभवशाली, संपन्न अशी राज्ये होती. उदा. अयोध्या, द्वारका, इंद्रप्रस्थ , मोहन्जोदारो , हरप्पा, मौर्य शासन काल, मोघल शासन काल, ब्रिटीश शासन इ. कर आकारणी प्रत्येक शासन काळात झालेली दिसून येते. राज्य कारभार चालवायला निधी हवा असतो. आणि कर हे निधी गोळा करण्याचे सर्वात मोठे स्त्रोत आहे. त्यामुळे प्रशासन चालवायचे असेल तर कर गोळा करणे अनिवार्य आहे.

व्याख्या :-

कर (Tax) म्हणजे निधी गोळा करण्याचा सरकारचा सर्वात मोठा स्त्रोत आहे.

भारतीय संविधानानुसार कर वसूल करण्याचा अधिकार केंद्र आणि राज्य सरकार असा दोघांमध्ये विभागून दिलेला आहे. याशिवाय काही कर वसूल करण्याचा अधिकार स्थानिक प्रशासन म्हणजेच नगरपालिका, ग्रामपंचायत यांना दिलेला आहे.

करांचे प्रकार :-

1) प्रत्यक्ष कर (Direct Tax)

2) अप्रत्यक्ष कर (Indirect Tax)

1) प्रत्यक्ष कर (Direct Tax) :-

जे कर सरळ सरकारकडे दयावे लागतात त्या करांना प्रत्यक्ष कर असे म्हणतात.

**उदा :- प्राप्तीकर Income Tax**

ज्या व्यक्तीचे उत्पन्न जास्त त्याला जास्त कर आणि ज्या व्यक्तीचे उत्पन्न कमी आहे त्याला कमी कर दयावा लागतो. यामुळे श्रीमंत गरीब ही दरी कमी करण्यासाठी या कराचा उपयोग होतो पर्यायाने भांडवलदाराला खीळ बसते.

**2) अप्रत्यक्ष कर (Indirect Tax) :-**

जे कर सरळ सरकारकडे जमा न करता ग्राहकांकडून मध्यस्थां मार्फत सरकारकडे जमा होतात त्यांना अप्रत्यक्ष कर असे म्हणतात.

उदा :- विक्रीकर , सेवा कर, उत्पादक शुल्क.

अप्रत्यक्ष कराची माहिती :-

ग्राहकांच्या दृष्टिकोनातून विचार केला तर अप्रत्यक्ष कर हा एक प्रकारचा ग्राहकावर लादलेला बोझा आहे आणि सरकारच्या दृष्टिने विचार केला तर अप्रत्यक्ष कर हा सरकारी उत्पन्नाचा महत्वपूर्ण स्त्रोत आहे. त्यामुळे सरकारी तिजोरीत पैसा जमा होऊन समाजाच्या कल्याणाचे कार्य चांगल्या प्रकारे होऊन देशाची प्रगती साधता येते. (हा अप्रत्यक्ष कर उदाहरणाद्वारे अधिक स्पष्ट करू या )




उत्पादक वितरक घाऊक व्यापारी किरकोळ व्यापारी ग्राहक

कर

**सरकार**

ज्या ज्या वस्तूंचा आपण झोपेतून उठल्यापासून ते पुन्हा झोपेपर्यंत वापर करतो त्या त्या सर्व वस्तूंवर टॅक्स दयावा लागतो. या टॅक्सला अप्रत्यक्ष कर असे म्हणतात हा अप्रत्यक्ष कर आपण कसा देतो हे लक्षातच येत नाही

स्पष्टीकरण :-

उत्पादकाने वितरकाला वस्तू विकल्या व सरकारला कर दि सरकार उत्पादकाने वितरकाकडून वसतूंची किंमत कर सरकारला दिलेला क वसूल केला. वितरकाने वस्तू घाऊकव्यापाऱ्याला विकल्या घाऊक व्यापाऱ्याकडून वितरकाने वस्तूंची किंमत उत्पादकाला दिलेला कर वसूल केला. घाऊक व्यापाराने किरकोळ व्यापाऱ्याला वस्तू विकल्या आणि किरकोळ व्यापाऱ्याकडून घाऊक व्यापाऱ्याने वस्तूंची किंमत वितरकाला दिलेला कर वसूल केला किरकोळ व्यापाऱ्याने वस्तू ग्राहकाला विकल्या आणि ग्राहकाकडून वस्तूंची किंमत घाऊक व्यापाऱ्याला दिलेला कर वसूल केला. म्हणजेच या व्यवहारात उत्पादकाला कर भरावा लागला नाही कारण त्याने तो वितरकाकडून वसूल केला. वितरकालाही कर भरावा लाग



Scanned by CamScanner

नाही कारण त्याने घाऊक व्यापाऱ्याकडून वसूल केला. घाऊक व्यापाऱ्यालाही कर भरावा लागला नाही कारण त्याने किरकोळ व्यापाऱ्याकडून वसूल केला. किरकोळ व्यापाऱ्यालाही कर भरावा लागला नाही कारण त्याने ग्राहकाकडून वसूल केला अशा प्रकारे या मध्यस्थामार्फत उत्पादकाने सरकारला द्यावयाचा टॅक्स हा शेवटी ग्राहकाच्या खिशातून वसूल केला. ग्राहकाने हा कर अप्रत्यक्षरित्या सरकारला दिला म्हणून याला अप्रत्यक्ष कर म्हणतात.

या अप्रत्यक्षकरामध्ये अनेक दोष होते.

उदा :- सेल्स टॅक्स :- या कररचनेत Tax वर Tax लागत होता. हे खालील उदाहरणाने स्पष्ट होईल.



कापड उत्पादकाने व्यापाऱ्याला 1000 ची कापड विक्री केली त्यावर 10 टक्के सेल्स टॅक्स लावला म्हणजे रु 100, उत्पादकाने हा टॅक्स राज्य सरकारला दिला. व्यापाऱ्याने त्या कापडापासून शर्ट तयार केले कापडाची खरेदी किंमत 1000 टॅक्स 100 व्यापाऱ्याला नफा 500 म्ह 1600 शर्टाची किंमत लावली हा शर्ट ग्राहकाजवळ येई पर्यंत पुन्हा 10 टक्के कर लागला म्हणजे 160 रु. त्यामुळे तो शर्ट ग्राहकाला रु. 1600160 म्ह 1760 रु ला पडला या ठिकाणी Tax वर Tax लागत असल्यामुळे किरकोळ व्यापराने ग्राहकाला रसीद देणे बंद झाले. त्यामुळे काळा पैसा वाढत गेला.

2) यावर उपाय म्हणून Vat कर प्रणाली अस्तित्वात आली यात ही दोष आढळून आले. प्रत्येक कर पध्दतीत अंतीम करांचा बोजा ग्राहकास. भोगावा लागायचा कर आकारणी वरून अनेक वाद न्यायालयात येत असत त्यामुळे वेळ, पैसा आणि शक्ती यांचा अपव्यय होत असे.

सदोष अप्रत्यक्ष कर प्रणालीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर उद्योगधंद्यावर तसेच वस्तू व सेवांच्या किंमत निर्धारणावर सखोल परिणाम झाला प्रत्येक राज्याचा कर कायदा वेगळा असणे व त्यामुळे प्रत्येक राज्यात वस्तूंवर करावा दर वेगळा असणे इत्यादी कारणांमुळे कुठल्या राज्यात उद्योग वा व्यवसाय करावा किंवा करू नये हे ठरवितांना साधनसंपत्ती व मनुष्यबळापेक्षा जास्त महत्व त्या राज्याची कर रचना तसेच कराचे दर याला देण्यात आले व त्यामुळे सामाजिक अर्थव्यवस्थेकडे दुर्लक्ष झाले आणि एकच देश असूनही राज्या राज्यांमध्ये वेगवेगळी परिस्थिती निर्माण झाली करांवर कर लागणे, प्रत्येक टप्प्यावर कर आकारल्यामुळे वस्तूंच्या शेवटच्या किमतीवर विपरित परिणाम होणे यामुळे खरेदीदाराला जास्त पैसे मोजावे लागत होते या शिवाय भारतीय उत्पादने आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत सुध्दा महाग होत होती.

ही सदोष कर प्रणाली (Reform) करण्या साठी 1999 मध्ये वाजपेयी सरकार असताना GST ही संकल्पना मांडण्यात आली त्यावर अभ्यासही झाला पुढेही संकल्पना रखडल्या गेली. मात्र मोदी सरकारच्या काळात ही कर प्रणाली लागू करण्यात आली. भारतात GST कर प्रणाली लागू GST एक महत्वाचा Tax Reform त्वरित भारतात 1 जुलै 2017 पासून वस्तू व सेवाकर ऊँ हा एकच अप्रत्यक्ष कर लागू करण्यात आला ' एक देश एक कर' ही आदर्श कर प्रणाली लागू करणे असा उद्देश यामागे होता. त्यानुसार केन्द्र आणि राज्य सरकारद्वारे त्यापूर्वी लागू असलेले अनेक अप्रत्यक्ष कर रद्द करून ही करप्रणाली भारतात लागू करण्यात आली.

ही करप्रणाली लागू करण्यासाठी भारताच्या राज्य घटनेत दुरुस्ती करून नवीन कायदे करण्यात आले या कर प्रणालीचे नियमन गुडस् अँड सर्व्हिसेस काउंसिल ही मध्यवर्ती संस्था करीत असते. केन्द्रीय अर्थमंत्री हे या काउंसिलचे प्रमुख असतात.

GST लागू करण्यासाठी 30 जून 2017 ला रात्री संसदेचे विशेष अधिवेशन बोलवण्यात आले त्या अधिवेशणात मध्यरात्रीच्या सुमारास राष्ट्रपतींनी जीएसटी लागू झाल्याची अधिकृत घोषणा केली.

**GST ची व्याख्या**

GST म्हणजे वस्तू व सेवा कर होय. हा एक अप्रत्यक्ष कर आहे.

**GST ची वैशिष्ट्ये**

1) सर्व वस्तू आणि सेवांवर एक समान कर
2) विविध कर संपुष्टात येऊन एक कर प्रणाली लागू
3) देशभरात वस्तूंची किंमत एक समान
4) व्यवहारात पारदर्शकता
5) Tax Online भरण्याची सोय
6) 0%, 5%, 12%, 18%, 28% असे कर दर वस्तू व सेवामधील,

फरक वस्तू व सर्वामध्ये नेमका काय फरक आहे?

| वस्तू | सेवा |
|---|---|
| कच्चा मालाची किंमत | कच्चा मालाची किंमत |
| मजुरी | मजुरी |
| + इतर खर्च | इतर खर्च |
| + नफा | नफा |
| = विक्री किंमत | प्रविक्री किंमत |

सेवांना कच्चा मालाची आवश्यकता नाही त्यामुळे वस्तुंच्या तुलनेत सेवा स्वस्त होत्या परंतु GST लागू झाल्याने वस्तू व सेवांवर एकसमान कर आकारल्या जाईल आणि त्यामुळे सेवा महाग होतील. GST मध्ये उत्पादन, विक्री आणि सेवा या तिघांना बाजुला सारून वस्तू व सेवांसाठी एक शब्द आला तो म्हणजे पुरवठा 1) वस्तूंचा पुरवठा 2) सेवांचा



Scanned by CamScanner

पुरवठा

**Dual Control Tax System**

आतापर्यंत वस्तूवर तिन टॅक्स लागत होते.

1) उत्पादन शुल्क
2) वॅट
3) CST

यात उत्पादन शुल्क केंद्राकडून आकारले जाईल. वॅट राज्यांकडून तर Cenvat केंद्राकडून आकारल्या जात असे. सेवेवर मात्र केंद्राकडूनच कर आकारल्या जात असे. GST मुळे यात बदल झाला आहे. केंद्राबरोबर राज्यालाही सेवेवर कर आकारता येणार आहे. म्हणजेच सेवांवर Goods of Servises Tax राहील.

उदा. 1) एखादया व्यक्तीची उलाढाल (Turnover) 1.5 करोड पर्यंत आहे. यावर 90 टक्के राज्याचे तर 10 टक्के केंद्राचे नियंत्रण राहणार आहे.

उदा 2) एखादया व्यक्तीचा Turnover 1.5 करोडपेक्षा जास्त आहे अशा परिस्थितीत त्यावर 50 टक्के राज्याचे नियंत्रण व 50 टक्के केंद्राचे नियंत्रण राहणार आहे.

याकरीता दोन प्रकारचे कायदे पास झाले.

**कायदे**

1) केंद्राचा GST 2) राज्याचा GST
म्हणजेच GST म्हणजेच SGST यानुसार

1) CGST - Central Goods & Services Tax
2) SGS - State Goods & Services Tax
3) IGST - Integrated Goods & Services Tax
4) UGST - Union Territories Goods & Services Tax

तयार झाले. जर व्यापार Intra State trade म्हणजेच CGST +SGST/UTGST राज्यातल्या राज्यात होत असेल तर IGST म्हणजेच एका राज्याचा दुसऱ्या IGST त्यात म्हणजे राज्याशी व्यापार होत असेल तर Integrated Goods & Services Tax) (म्हणजेच केंद्र व राज्य मिळून तयार झालेला टॅक्स)

**राज्यानुसार GST ची विभागणी**

भारतात एकूण 29 राज्य आणि 7 केंद्रशासित प्रदेश आहेत. म्हणजे एकूण 36 जागा आहेत.

29 राज्यात GST लागू होईल 7 केंद्रशासीत प्रदेशापैकी दिल्ली आणि पॉंडिचेरी येथे विधान सभा असल्यामुळे या दोन केंद्रशासीत प्रदेशांना CGST लागू होईल वउर्वरित 5 केंद्रशासीत प्रदेशांना CGST, म्हणजे CGST लागू होईल.

**GST कायदे**

सर्व राज्य व केंद्र शासीत प्रदेशांना GST व UGST लागू करण्यासाठी GST अंतर्गत पुढील कायदे लागू करण्यात आले.

1) CGST ACT 2017
2) SGST ACT 2017
3) UTGST ACT 2017
4) IGST Act 2017
5) GST compensation Act

वरील नियमानुसार 20 लाख पर्यंत टर्नओव्हर असलेल्या छोटया व्यापारी वर्गाला संरक्षण म्हणून GST मधून वगळण्यात आले आहे.

त्याचप्रमाणे नॉर्थ इस्ट मधील 11 राज्यांना 10 लाखापर्यंत टर्नओव्हर असलेल्या व्यापाऱ्यांना GST मधून वगळण्यात आले आहे.

ही 11 राज्ये पुढील प्रमाणे

1) अरूणाचल प्रदेश 2) आसाम 3) नागालॅन्ड 4) सिक्कीम 5) त्रिपुरा 6) मिझोराम 7) मेघालय 8) मणिपूर 9) हिमाचल प्रदेश 10) उत्तराखंड 11) जम्मू आणि काश्मिर

GST लागू होणसाठी ज्या व्यापाऱ्यांचा टर्न ओव्हर 50 लाखापर्यंत आहे त्यांना GST रजिस्ट्रेशन करणे अनिवार्य आहे. हे करत असतांना त्यांना कम्पांउडींग स्कीमचा लाभ मिळणार आहे यात एक ठराविक रक्कम टॅक्स म्हणून भरावी लागेल.

ज्या व्यापाऱ्यांचा टर्न ओव्हर 1 करोडच्यावर आहे त्यांना GST अंतर्गत ऑडिट करणे अनिवार्य आहे हे ऑडिट CA किंवा Cost Accountant यांच्या कडून करावे लागेल.

**GST चे फायदे**

1) कर भरणे सुलभ 2) कर आकारणे सुलभ 3) कर चोरीचे प्रमाण कमी 4) कर दात्यांच्या संख्येत वाढ 5) देशभरात वस्तूंचे दर समान 7) देशाचा जी डी पी वाढण्यास मदत 8) संपुर्ण देशात एका वस्तू साठी एकच कर 9) वेगवेगळे कर भरण्यापासून सुटका 10) वस्तुची किंमत कमी होण्यास मदत 11) टॅक्स रचनेत पारदर्शकता 12) असंघटित उद्योग करांच्या जाळयात 13) विदेशी कंपन्यांना व्यापार करण्याकरीता आकर्षित होतील. 14) विदेशी चलनात वाढ

**तोटे**

1) राज्यांच्या उत्पन्नात घट 2) केंद्र सरकारवर आर्थिक बोझा 3) सेवा महागणार 4) ग्राहक व व्यापारामध्ये संभ्रम 5) इंटरनेटची सर्व ठिकाणी सोय नसणे 6) कॉम्प्युटर शिक्षणाचा अभाव 7) कित्येक ठिकाणी विजेची सोय उपलब्ध नसणे 8) वीज प्रवाह वारंवार खंडीत होणे 9) छोट्या व्यापाराकडून ग्राहकांची फसवणूक 10) सरकारी अधिकाऱ्यांना विशेषाधिकार 11) अनेक वस्तुना केंद्रिय आकारणी सुट 12) पेट्रोल डिझेलवर समान कर नाही.

**परिणाम**

1) 'एक देश एक कर' हे तत्व असले तरी 4 पातळ्यांवर या कराची अंमलबजावणी होणार असल्याने एक देश चार कर अशी स्थिती राहील. कर पात्र वस्तूंचे वर्गीकरण 5 टक्के, 12 टक्के, 18 टक्के आणि 28

टक्के अशा कर आकारणीत केले गेले आहे. त्यामुळे एक देश एक कर हे सुत्र कागुस ठेवल्या गेले आहे.

2)देशात कराची सुरवात चार विविध कर दरांनी होणार आहे. चाल चैनीच्या वस्तूंवर 28 टक्के कराची आकारणी होणार आहे. तर दैनंदिन गरजेच्या वस्तूवर 5 टक्के इतकाच कर आकारला जाणार आहे हे त्रुटीचे आहे कारण अ) वस्तुंची वर्गवारी करण्याचा विशेषाधिकार सरकारी अधिकाऱ्यांना प्राप्त झाला आहे. व जेथे असे अधिकार प्राप्त होतात तेथे भ्रष्टाचारास वाव मिळतो.

ब) जीवनावश्यक वस्तू ठरविणे कठीण आहे कारण एखादया राज्याला ज्या वस्तु चैनीच्या वाटतात त्याच वस्तु दुसऱ्या राज्यात जीवनावश्यक वाटू शकतात. उदा. मद्य ही चैनीची वस्तू आहे असे बिहार राज्याला वाटत असेल. तर गोवा सरकारला ती जीवनावश्यक वाटेल. त्यामुळे एकाच वस्तूची किंमत दोन राज्यात वेगळी असेल त्यामुळे अश्या वस्तू कमी कर असलेल्या राज्यातून जास्त कर असलेल्या राज्यात जाणल्या जातील आणि त्यामुळे ही योजना अपयशी ठरेल.

3)ज्या प्रगत देशात जीएसटी लागू झाला आहे तेथे कोणत्याही वस्तुला कराच्या कक्षेच्या बाहेर ठेवलेले नाही. पण आपल्या देशात जवळपास 40 वस्तू अशा आहेत की ज्यांना करातून वगळण्यात आले आहे. काय वर्षासाठी का होईना पण पेट्रोल डिझेल यांनाही करातून सुट मिळाली आहे.

4)प्रत्येक राज्य पेट्रोल डिझेलवर आपली स्वतंत्र कर आकारणी करीत असेल तर वस्तुच्या किंमती निश्चित करीत असताना हा खर्च महत्वाचा असतो. तोच नेमका वेगवेगळा असल्याने वस्तुच्या किंमतीतही तफावत राहणार आहे. याशिवाय इंधनाचा दर कमी असलेल्या राज्यातून जास्त दर असलेल्या राज्यात पेट्रोल डिझेलची तस्करी होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

5)वस्तु व सेवाकराने राज्याचा कर आकारण्याचा अधिकार काढून घेतल्याने राज्यांच्या उत्पनावर गदा येणार आहे. त्यामुळे राज्य सरकार अधिकाधिक नुकसान भरपाई मागतील आणि केंद्रावर त्याचा आर्थिक बोझा वाढेल. केंद्रानेही पाचच वर्ष नुकसान भरपाई देण्याचे आश्वासन दिलेले आहे. या प्रकारात केंद्राजवळ सर्व उत्पन्न येवून त्याच्या वाटपातून राज्यांवर अन्याय होवू शकतो. आता हा धोका आपण पत्करणार आहोत.

6)प्रगत आणि छोटया देशांमध्ये जीएस.टी लागू आहे आणि यशस्वीरित्या त्याची अंमलबजावणी होत आहे.

वरील त्रुटी जर टाळता आल्या तर जीएसटी कर प्रणाली अधिक स्वागतार्ह ठरू शकेल.

**संदर्भ :-**


1) विविध वृत्तपत्रातील संकलन

2) दुरदर्शनवरील केंद्रिय अर्थमंत्री श्री अरुण जेटली यांची भाषणे

3) इंटरनेटवरील जीएसटी इंफॉरमेशन प्रोग्राम

4) तरुण भारत दिवाळी अंक दिपोत्सव 2017

5) दुरदर्शनवरील जीएसटी वर तज्ञांच्या चर्चा


Scanned by CamScanner

# अप्रत्यक्ष करप्रणाली व GST अंमलबजावणी

प्रा. मनिष संबरे
मो. 937186900
श्री गजानन कनिष्ठ
महाविद्यालय
नागपूर

भारतातील अप्रत्यक्ष करप्रणालीत सुधारणा व्हावयास व कररचना सर्वांना सुलभ व सहज वाटणारी असावी. याबाबत अनेकवर्षांपासुन या विषयावर विचारमंथन सुरु होते. भारताने या बाबींकडे लक्ष देण्यास फार वर्षापुर्वीपासुनचे प्रयत्न सुरु केल होते. सन 1947 च्या स्वातंत्र्य प्राप्ती नंतर भारतातील प्रत्यक्ष कर व अप्रत्यक्ष करांचा ढाचा कसा असावा यावर अनेक मते नोंदविली गेल्याचे स्पष्ट आहे. कारण कर रुपातुन राज्य सरकार व केन्द्र सरकार यांना महसूल प्राप्त होतो. व या महसूलातुनच केन्द्र व राज्ये खर्च करित असतात. भारताच्या संविधानातही याबाबत तरतुद केली आहे. केन्द्र सरकार कोणते कर आकारते व राज्याचा अधिकर कोणत्या वस्तुवर किती लावणार हे ठरविण्याचे हक्क राज्यांना दिलेले आहे. विविध वस्तुच्या प्रत्यक्ष उपभोग्य वस्तुवर अप्रत्यक्ष रुपाने सरकारे (राज्य) कर लावीत आले परंतु प्रत्येक राज्यांची स्थिति वेगवेगळी आहे. काही राज्य अतीप्रगत तर काही राज्यातील आर्थीक प्रगती सावकाश होती यातुनच कर लावण्याचा पध्दतीतील भिन्नता प्रत्येक राज्या-राज्यात दिसुन येत होती. यातुनच एक देश एक कर या बाबींवर शासन स्तरावर व जनप्रतिनिधी स्तरावर विचार विनीमय सुरु होता. सन 2000 मध्ये सर्व प्रथम GST च्या बाबत असीमदास गुप्ता यांनी प्रस्ताव ठेवला होता. या प्रस्तावावर चर्चाकरुन निर्णय घेण्याकरिता संमतीपण दर्शविण्यात आली होती. व GST एप्रिल 2010 पासुन लागु करण्याविषयाचा विचार 2007 मध्ये अंदाजपत्रकीय विश्लेषणात ठेवण्यात आला होता. GST विषयीची सखोल चौकशी त्याची उद्दीष्टे, व्याप्ती, रचना, या करिता केन्द्रसरकारव्दारा एका समीतीची स्थापना करण्यात आली होती. मार्च 2011 मध्ये GST लागु करण्याकरिता घटनेच्या 115 व्या कलमाबद्दल सुधारणा विधेयक बिल मंजुर करण्याकरिता संसदेसमोरठेवण्यात आले. व ते सम्मत करुन घेण्यात आले. सर्वप्रथम GST ची अंबलबजावणी फ्रान्स या देशात 1954 साली सुरु करण्यात आली व आज एकुण 132 देशात GST चा वापर केला जात आहे. हंगेरी मध्ये 2014 पासुन GST अंमलात आणण्यात आला आहे. अप्रत्यक्ष करातुन शासनाला जो महसुल प्राप्त होतो तेवढा महसुल GST च्या दरापासुन प्राप्त व्हावा जेणेकरुन शासनावर अतिरिक्त खर्चाचा भार पडणार नाही. त्यामुळे कराचे दर अशा संरचनेत असावे की जेणेकरुन ते उपभोक्त्याला पण सुसाहय होईल. व शासन कार्यास देखील योग्य व विवेकी राहील. यालाच Revenue NEUTRAL RATE (RNR) म्हणतात. थोडक्यात RNR म्हणजेच RNR

"RNR is the rate which Neutralize revenue about of state and central govt due to change in tax system, means. The rate of GST which will give at least the same line is revenue that to by state and central govt from indirect taxes is known as RNR. As per the thirteen finance comunission the RNR.

**स्पष्टीकरण:-**

थोडक्यात RNR म्हणजे GST ची अंबलबजावनी सुरु झाल्या नंतर GST प्रमाणे निश्चित करण्यात आलेले विविध वस्तुंवरील कराचे दर व GST अगोदर शासनाला प्राप्त होणारा महसुल या नविन करदरामुळे कमी होऊ नये तो सारखा राहावा ज्यामुळे शासनाला आपला खर्च चालविणे शक्य होईल. देशात आज 7 % ऐवढी महसुलाची रक्कम अप्रत्यक्ष कर 5% प्रत्यक्ष कर व उरलेली रक्कम पेट्रोल, अल्कोहोल व शासनाने विक्रीला ठेवलेली स्टॅम्प पेपर यातुन प्राप्त होते, व या सर्व प्राप्तीतुन शासन आपला खर्च पुर्णकरण्याचा प्रयत्न करते. भारतात GST चे दर निश्चित करीत असतांना सरकारने GST Councilor ने ठरवुन दिलेले दर विचारात घेतले व त्यानुसार विविध टप्यातील कराचे दर निश्चित केले. जिवनावश्यक वस्तु, अनब्रॅन्डेड मिठ, दही, दुध यातुन वगळण्यात आले. नंतरच्या वस्तु करिता कराचे दर 5% 12% 18% व 28% इतके ठेवण्यात आले. याचा परिणाम असा झाला की, काही वस्तुंवर राज्याव्दारे लावण्यात येणारा कराचा अप्रत्यक्ष दर हा 5% असतांना तो नविन कर रचना प्रणालीत 28% ऐवढा झाला. उदा. मार्बलवर आकारलेला नविन कर प्रणालिनुसार दर यामुळे मार्बलच्या किंमतीत वाढझाली व मागणीत कमी झाली. यामुळे राजस्थान मधील धौलपुर व अन्य अनेक ठीकानच्या

लोकांना बेरोजगार व्हावे लागले. GST तून बेकारी निर्माण होऊ नये. याबाबत शासनाव्दारे सर्व काळजी घेतली गेली परंतु कापडउद्योग, मार्बलचा व्यवसाय करणारे किंवा मोठ्या उद्योगांना कच्चामाल पुरविणारे उद्योग यांच्या वस्तुवरील GST मधील करदरानुसार कर वाढवल्यामुळे उद्योगात तात्पुरती तरी बेरोजगारी निर्माण झालेली दिसुन येते वर्तमान स्थितीत GST बाबत असलेली उपभोक्ता वर्ग व उत्पादक वर्गातील गोंधळाची स्थिती ही GST तीलसुधारणा करुन दूर करणे शक्य होईल. GST सर्व सामान्यांना समजेल व त्यातील क्लिष्टता काढून टाकण्याकरिता शासनस्तरावर प्रयत्न सुरु आहे. दिल्लीत आयोजीत बैठकीत यात बऱ्याच सुधारणा घडवुन आणण्याचा प्रयत्न केलेला दिसुन येतो. लहान उद्योग व व्यापाऱ्यांकरिता एका महिन्यात परतावा भरण्याऐवजी ती मुदत वाढवून तिन महिने करण्यात आली आहे. 70%पेक्षाजास्त कर देणारे एकूण करात त्याचा वाटा 2 % पेक्षा जास्त नाही फक्त ते करदेयप्रणालीशी जुळलेले आहे. यातून मोठ्या उद्योगांना व व्यापाऱ्यांना सवलत प्राप्त झाल्याचा त्याचा लाभ अर्थव्यवस्थेला होईल. या शिवाय प्रत्येक कंपनीला ज्या ज्या राज्यांत त्यांचा व्यवसाय आहे त्या ठीकाणी एकदा पंजियन झाल्यावर पून्हा-पुन्हा पंजियन करणे अनिवार्य करु नये, यात त्यांच्या करिता सुविधा निर्माण करणे गरजेचे आहे. यातून कर आदान समायोजन ला बाधा निर्माण होण्याची शक्यता दिसून येते असे होऊ नये याकरिता यात सुधारणा करणे आवश्यक आहे. GST च्या संपुर्णसंरचनेत बाजारातील अर्थप्रणालीतील क्लिष्टता सरळ करण्याकरिता प्रयत्न व्हावे. आर्थिक क्षमतेव्दारे प्राप्त होणारे GST चे लाभ लक्षात घेता GST परिषदेने या सर्व बाबींनास्थिर करण्याकरीता प्रयत्न करावे. एकुण 27 वस्तूंवरचा GST चा पुर्वीचा कर दर कमी केला आहे हे स्वागतार्ह आहे. असाच जर बदल वारंवार करण्यात येत असेल तर तो पण उपभोक्त्याच्या व विक्रेताच्या विश्वासाकरिता योग्य होणार नाही याची काळजी GST परिषदेने घेणे गरजेचे आहे. GST चे सर्वांना समांतर फायदे उपलब्ध करुन देण्याकरिता हे आवश्यक आहे. भारतात GST ची अंमलबजावणीनंतर व ती सुरळीत होऊन बाजारातील प्रकिया सरळ व सुलभ झाल्यास त्याचा लाभ जवळपास भारतातील सर्व लोकांना होईल हे स्पष्ट आहे परंतु ती आंतरराष्ट्रीय बाजाराकरिता विदेशी गुंतवणुक जर देशात अधिक आणण्याची व आकर्षीत करण्याकरिता कर सुधारणा करणे अधिक गरजेचे आहे. या करिता हे गरजेचे आहे कारण भारत देश वैश्विक अर्थव्यवस्थेचा एक पैलु आहे. व जगात आर्थिक विकासाचा दर हा भारताचा दुसऱ्या क्रमांकावर आहे. जगात सर्व व्यवस्थेकडुन आपापसात स्पर्धा वाढत आहे. देशी विदेशी बाजारपेठेतुन वस्तु विक्री करण्याकरीता एका ठिकाणातुन दुसऱ्या ठिकाणी प्रवेश करणाऱ्याची संख्या अधिक गतिमान होत आहे. यातुनच नवप्रवर्तनातुन निर्माण झालेल्यावस्तु बाजारपेठा काबीज करण्याचा सतत प्रयत्नात आहे. ही वाढती आव्हाने पेलण्याकरिता जागतीक स्तरावरील उद्योगात आणल्या आण्याच्या कररचनेत भारताने सुधारणा घडवून आणने आवश्यक आहे. पारदर्शकता व सरळ भरणा याकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. व आज जगातील सर्व देश कररचना अधिक कशी सुलभ होईल याकडे अधिक लक्ष पुरवित आहे. यातूनच भारतीय कंपन्यांचा ओघ विदेशाकडे वळण्याचा इशारा प्राप्त होतो. अर्थव्यवस्था एकदा सर्वांकरिता आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत असेल तर आर्थिक विकासदर उंच करण्याकरिताचा मार्ग मोकळा होतो व नव नवीन कंपन्या अशा बाजारपेठेत वस्तु विक्री करण्याकरिता आकर्षीत होतात व बाजारपेठेतील नवीन गुंतवणुकीमुळे देशाच्या अर्थव्यवस्थेतील रोजगाराची पातळी वाढुन बेकारी व विषमता कमी होण्यास मदत होते या करिता नविन येणाऱ्या कंपन्याचा कर दर कमी ठेवणे नविन करसुधारनेस आवश्यक आहे. जगातील विकसीत व विकसनशील देश या करिता प्रयत्न करीत आहे. OECT देशात हा कराचा दर 2005 ते 2015 पर्यन्त 28.2% पासुन 25 : कमी करण्याकरिता प्रयत्न केले. ब्रिटनचा दर 20% पासून 17 % पर्यन्त कमी करण्याचा प्रयत्न सुरु आहे. फ्रान्सने हादर 33 : पासुन 25 : कमी केले आहे. अमेरिका देखील हादर 33 % वरुन 15% पर्यन्त कमी करण्याकरिता प्रयत्नशील आहे. अशाच प्रकारचा कर दर कमी करण्याकरिता कॅनडा, पेरु, ईन्डोनेशिया, फिलीपीन्स या देशात घडून आणन्याचे प्रयत्न सुरु आहे. नविन कर सुधारणा धोरणात कंपन्याचे कर कमी करणे यामागील महत्वाचा उद्देश म्हणजे विदेशी गुंतवणुकीत वाढ करुन आणने विदेशी गुंतवणूकीत आकर्षीत करणे व नविन पर्यायी बाजारपेठेचा यातून विकास करणे होय, अशा करपध्दतीतील सुधारणा भारतासारख्या मोठ्या देशात सहज गतीने होऊ शकणे शक्य नाही तरी कंपन्यांवर आकारण्यात येणारा भारतातील कराचा हा 25% हा स्पर्धाक्षम आहे असे म्हणता येईल. यापलीकडे या सुधारणाचा फायदा दुसऱ्याही क्षेत्रात आणवतो तो म्हणजे अंशधारकांना वितरीत करण्यात येणारा लाभांश .....कर एकुण करबिलातून याची रक्कम वाढलेली दिसुन येते. जागतीक कर सुधारणा मोहिमेतुन अर्थव्यवस्था अधिक गतिमान करण्याकरिता प्रेरणा प्राप्त होत आहे. यातून प्रत्येक देश नविन सुधारणांना गति देत आहे उदा. नवप्रवर्तन, नविनबाजारपेठ, स्पर्धाक्षमता यातील वाढ व बदल होय. यातील एक आणखी महत्वाची संधी म्हणजे ज्या भूप्रदेशात कंपनी कार्यकरित असेल त्या कंपनीला तेथील यावा लागणारा कर होय. या बाबतीत OECT कंपनीने सुध्दामान्यता प्रदान केली आहे, युएस,कॅनडा, व ब्रिटनने एखादया संशोधन व विकास कार्यात कार्य करणाऱ्याकंपन्यांना करदरातुन सवलत दिली आहे. विदेशीकंपन्यांना आकर्षीत करण्याकरिता भारताव्दारे देखील करांचे आळे सुलभ करण्याचा प्रयत्न करित आहे. ज्याचा फायदा अर्थव्यस्थेतील आर्थिक विकासदरात वाढ घडून देशातील मुळभुत समस्या कमी करण्यामध्ये होईल. वास्तविक कर सुधारणा धोरणा अंतर्गत एकुण कर बिलातुन प्राप्ती व स्पर्धाक्षमता एकूण अर्थव्यवस्थेतुन तपासल्या जाते. या दोन्ही घटकातील बदल वास्तविक कर सुधारणेतुन तपासून पाहणे आवश्यक आहे. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे कर सुधारणा करित असतांना सरकारप्रती असलेली विश्वासाची पातळी जनसंख्येत, प्रर्वतक, व नियमक यामध्ये कायम असणे महत्वाचे आहे. या करिता अमेरिका हे उदाहरण होय भारताच्याही संदर्भात



Scanned by CamScanner

असे घडु नये या करिता आवश्यक ती धोरणे राबविणे गरजेचे आहे. या करिता देशात संख्यागत व्यवस्थेने सरकार व उद्योजक यांच्यात मध्यस्थाची भूमीका वठविणे अतिशय गरजेचे आहे. भारतातील कर सुधारणा व कर सुधारणेतील दर यातुन भारताचा आर्थिक विकास दर व वैश्वीक विकासाचा दर कीती वाढून गतिमान होतो हे या कर सुधारणेचे संकेत ठरु शकेल.

भारतातील अप्रत्यक्ष कराच्या रचनेत सुधारणा घडुन आणल्यामुळे दिर्घकालावधीत त्याचा परिणाम सर्वच ठिकाणी अर्थव्यवस्थेतुन दिसुन येतील. यातील सर्वात महत्वाची बाब म्हणजे आंतरराष्ट्रीय गुंतवणुकीकरिता या सुधारणाचा सकारात्मक फायदा झाल्यास आज चीनच्या तुलनेत भारताची जी विदेशी गुंतवणुक किती तरी कमी आहे त्यात वाढ होऊन व निर्यातीचे क्षेत्र अधिक सुलभ करुन निर्यातकर दर स्पर्धात्मकठेवल्यास विदेशी गुंतवणुक व व्यापार सुधारणेस मदत होईल. विदेशी व्यापार अधिक स्पर्धात्मक झाल्यास त्याचा परिणाम शोधन दोषावर होऊन विदेशी व्यापारातील तुट व अंदाजपत्रकीय तुट कमी होण्यास मदत होईल.

GST सुधारणेतील महत्वाची अडचण म्हणजे व्यापारी उद्योजक किंवा उपभोक्ता यांची असलेली मानसीकता व विचार होय. परंपरागत पध्दतीने विचार करणारा व कराची भिती बाळगणारा व्यापारी वर्ग या नविन पध्दतीला अजुनही समोर जाण्यास धजतनाही. या नविन कररचना प्रणालित CA सारखा व्यक्ती नेमावा लागेल. विवरण पत्रे भरावी लागतील आणि बन्याच अशा बाबींची अगदी सविस्तर माहीती ठेवावी लागेल. याचीच जास्त विंवचना त्याला सतावणारी ठरत आहे. विविध वस्तुकरिता विविधदर व त्याकरिता आज बाजारात GST दर ठरविण्याकरिता उपलब्ध असलेले स्वाफ्टवेअर बाजारात उपलब्ध आहे परंतु याची कीमंतही लहान व्यापारी वर्ग देऊ शकत नसल्यामुळे प्राथमिक अर्थव्यवस्थेत याचा अधिक बोजवारा उडालेला दिसुन येतो. अर्थातच निर्यात करदेय निश्चितीची सीमा वाढविल्यामुळे काही कालावधीकरिता व्यापारीवर्गाला दिलासा प्राप्त झाला आहे. असेच म्हणता येईल. सर्व जगातील कररचना पध्दतीत आमुलाग्र बदल होत असेल तर परंपरागत चालत आलेली कररचना भारतात देखील बदलविणे गरजेचे होते व तो बदल घडुन यावा या करिता अनेक वर्षापासुनचे सरकारचे प्रयत्न सुरु होते.या नविन कररचना पध्दतीत व्यापारी किंवा उद्योजक कर न चुकवण्याकरिता विविध उपलब्ध असलेल्या त्यांच्याकडील कागदपत्राने तो जोडला गेला आहे. याचाच अर्थ आरंभीच्या काळात व्यापारी किंवा उद्योजक ऐवढ्या विविध बाबींनी तो जोडला गेला नव्हता त्यामुळे कर भरणाकरित असतांना कर चुकविण्याकरिताजे विविध मार्ग उपयोगात आणले जात होते. ते सर्व मार्ग नविन कर धोरणा अंतर्गत बंदझालेले आहे. यातुन एकुणच अर्थव्यवस्था अधिक पारदर्शक होईल. व उत्पन्नाचे मोजमाप देखील सहज करणे शक्य होईल. नविन कररचनेचा स्वीकार झाल्यानंतर व्यवसायातील एकुण स्थिरावलेली श्रृंखला तुटलेली असली तरी कालांतराने ती पुर्वस्तरावर येईल कारण याचा अर्थव्यवस्थेवर तिहेरी प्रभाव व परिणाम झाला म्हणजे एस.एम.ई.एस. लहान व मध्यम गटात काम करणारे उद्योजक अचानपणे बंद झाले त्याचा परिणाम त्या उद्योजकाद्वारे होणाऱ्या पुरवठयात झाला या कारणाने बाजारातील पुरवठा संकुचित झाला. उद्योग बंद पडल्याने बेरोजगारी निर्माण झाली GST पुर्वे वर्तमान आकडेवारी नुसार 5 लाख लोकांपेक्षा अधिक बेरोजगार निर्माण झाले, लहान व मध्यम उद्योगातुन जी आयात करुन निर्यात होत होती तिचाही दर मंदावला अशा तिहेरी सापळ्यात सध्या भारताची अर्थव्यवस्था सापडलेली आहे. म्हणुनच आर्थीक विकासाचा दर 7.5 % वरुन 5.4 % इतका झाला. भारताच्या अर्थव्यवस्थेचे तिमाही पतधोरण 4 आक्टोंबरला जाहीर झाले, तेव्हा आर.बी.आय. गव्हर्नर यांनी भारताचा आर्थीक विकास दर 2017-18 करिता 6.7 : इतका वर्तविला आहे. 12 आक्टोंबरला विविध रेटींग ऐजन्सीने देखील भारताचा आर्थीक विकास दर 7: पेक्षा जास्त राहणार नाही, हे स्पष्ट केले आहे. IMF व वर्ल्ड बँक यांनी देखील ही संभावता राहील याला दुजोरा दिला आहे.

अर्थातच आज जगाच्या पातळीवर भारताचा विकास दर जास्त आहे. पण या विकासदराचा फायदा भारतातील तळागाळात राहणाऱ्या लोकांना किती झाला आहे हे पाहणे महत्वाचे आहे. थॉमस पिकेटी यांच्या चालू लिखाणातुन असे दिसुन येते की, From British era to licenece raj भारतातील स्वातंत्र्यानंतरच्या कालावधीत वाढलेली आहे. याचा अभ्यासाचा महत्वाचा घटक म्हणजे यांनी विषमतेचा अभ्यास करित असतांना वरुन खाली असे संशोधन करित असतांना विविध उत्पन्न पातळी व त्यातील लोकसंख्या या पध्दतीने केलेला दिसुन येतो. त्यांचा लिखानातुन असे स्पष्ट होते की, भारतातील 1 % लोकांजवळ 22 % पेक्षा अधिक संपत्तीचा संग्रह झालेला आहे. यावरुन भारतातील उत्पन्नाच्या विषमतेतील तफावत कशी वाढत आहे, हे दिसुन येते. अर्थातच नंतर लगेच स्वामीनाथन अंकलेश्वर अय्यर यांनी पिकेटी यांचे म्हणणे कसे चुकीचे आहे. हे त्यांनी जीनी सहगुणाचा वापर करुन स्पष्ट केले आहे.

सर्व बाबीचा सारांश रुपाने अभ्यास केल्यास भारताच्या अर्थ विकासातील वाटचालीत आर्थीक विकास हा अधिक पुढे ठेवायचा असेल तर त्यात नवप्रवर्तनाद्वारे व विदेशी गुंतवणुकीला आकर्षीत करुन अधिक स्पर्धाक्षम होऊन साध्य करता येईल. हे सर्व करण्याकरिता चांगल्या मनुष्यबळाची देशाला गरज असते व ते मनुष्यबळ शिक्षण पध्दतीतुन व संशोधनाच्या मुलभूत प्रवृत्तीतुन तयार होते म्हणुन आधुनिक शिक्षणाची पध्दती हि संशोधन समावेशक असावी ज्यामुळे अर्थ व्यवस्थेत नविन व उमदेपणा निर्माण होऊन जुन्या विचारा ऐवजी नविन पारदर्शकता व सर्वांना कार्याची समान संधी उपलब्ध करुन देणे शक्य होईल. व देशातील कोणतीही नविन कार्यपध्दतीसर्वांना सहज स्वीकारणे शक्य होईल.

संदर्भ :-


1) Economic Times 13/7/2017 Mara Weinberger.

2) Times of India 11/09/2017 the times news Networn

3) Times of India Editorial - 10/10/2017 Simplily G.S.T.





Scanned by CamScanner

# अप्रत्यक्ष कर, वस्तु व सेवाकर व रचना

प्रा. नामदेवराव घोडे

भारतात अनेक वर्षांपासून जीएसटीचा उपयोग अप्रत्यक्ष कर रचना अधिक पारदर्शक व्हावी याकरिता विचारमंथन सुरु होते. प्रत्यक्षात अप्रत्यक्षकर वसूल करणे ही राज्यातील सरकारांची जबाबदारी होती. अप्रत्यक्ष करातून जो महसूल प्राप्त होईल तो राज्यांच्या विकासाकरीता वापरण्यात येतो. परंतु अप्रत्यक्ष कर प्रत्येक राज्यांचा अधिकार असल्यामुळे राज्याअंतर्गत तो भिन्न भिन्न होता. आंतरराज्य व्यवहारावर त्याचा परिणाम होऊन वस्तुंच्या व सेवांच्या किंमतीतील बदलचा परिणाम उपभोगत्यांच्या शक्तीवर दिसून येत होता. अर्थातच कराचे निर्धारण करणे व त्याची अंमलबजावणी करणे हे शासन स्तरावर निश्चित होते. तर रुपी प्राप्त उत्पन्नातून शासनाचा महसूल तयार होतो. व तो नागरिकांच्या कल्याणार्थ वापरल्या जातो. आरंभीच्या काळी म्हणजे शासन लोकशाही प्रणीत होण्याच्या पूर्वी राजे, महाराजे, सम्राट किंवा नागरीकांचे काम करणारे शासनातील दरबारी लोक कर आकारणी करीत होते. परंतु या कर आकारणीत सुलभता, एकवाक्यता, नियम, करातूनसूट अशा कोणत्याही प्रकारच्या नियमांच्या बाबींची लेखी वास्तविकता नव्हती. परंतु लोकशाही शासन प्रणालीत कर हे कसे असावे व कराचे दायीत्व एका कायद्याच्या चौकटीत बसवून कोणत्याही नागरीकांवर अन्याय होणार नाही यांची दक्षता घेऊनच कराचे दर निश्चित केले जातात.

शासनाला व स्थानीक स्वराज्य संस्थेला कर देणे हे कायद्यानुसार प्रत्येक नागरीकांचे कर्तव्य आहे. व दायीत्व देखील आहे. पण भारतीय उत्पन्न-प्राप्त करणाऱ्या नागरीकात कर देणे हे दायीत्व किंवा कर्तव्य याबाबतीत पाहिजे तेवढा आधूनिक विचार पसरलेला नाही. आणी कदाचीत याचा परीणाम आयकर संकलनात दिसून येतो. शासनाच्या मागील कित्येक वर्षांच्या अनुभवावरून असे दिसून येते. प्रत्यक्ष करांचे संकलन केंद्रसरकार द्वारा केल्या जाते. तर अप्रत्यक्ष करांचे संकलन राज्य व केंद्र यांचे द्वारे केले जाते. प्रत्येकवर्षी अंदाजपत्रिकेत विश्लेषणाचे प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष करांचे शासनाकडे झालेले संकलन यात अप्रत्यक्ष करांची रक्कम प्रत्यक्ष कराच्या रकमेपेक्षा जास्त असते. म्हणजे करातील संकलनातील तफावत दिसून येते. अप्रत्यक्ष करांची रचना व अप्रत्यक्ष कराचे निर्धारण करीत असताना अनेक प्रकारच्या बाबींचा अंतर्भाव होत असल्यामुळे कर आकारणीतील क्लिष्टता व वस्तुंची अधिक किंमत यामुळे किंमतीतील वाढीचा परिणाम उपभोगत्यावर होणे निरपेक्ष होते. यातुनच भार सरकारने जीएसटी सारख्या कर प्रणालीची व्यवस्था अंमलात आणण्याकरिता प्रयत्न केले. भारत स्वतंत्र्य झाल्यानंतर, लगेच जीएसटी वस्तु व सेवाकर म्हणून उपयोगात आणण्याचे प्रयत्न झाल्याचे दिसून येते परंतु ते शक्य न झाल्यामुळे अप्रत्यक्ष कराची रचना बदलविण्याकरिता जवळपास 70 वर्षांचा कालवधी संपल्यावर अंमलबजावणी करणे सुरू झाले. जीएसटीचे दायीत्व शेती हा व्यवसाय आहे. जीएसटीच्या अंतर्गत असे स्पष्ट केले आहे की, शेतकरी हा करपात्र व्यक्ती नाही. यात शेतकरी कोणाला म्हणावे हे स्पष्ट केले आहे. "शेतकरी म्हणजे जी व्यक्ती स्वतः जमीन कसते ती व्यक्ती म्हणजे शेतकरी म्हणून संबोधण्यात यावे" स्वःताहा अंग मेहनत करून, कुंटूबांतील व्यक्तीद्वारे अंगमेहनत करून किंवा तिच्या स्वताःच्या किंवा कुंटूबातील कोणत्याही सदस्यांच्या प्रत्यक्ष देखरेखी खाली रोखीने किंवा वस्तुच्या स्वरुपात देय असलेल्या मजुरीवर नोकर नेमून किंवा भाड्याने मजुरांची नियुक्ती करून जमीन कसतो अशी व्यक्ती अथवा हिंदु अविभक्त कुटुंब म्हणजे शेतकरी होय.

**स्पष्टीकरण:-** स्वतःहा शेती करणारा अन्य काही व्यवसाय करीत असेल त्याला त्या व्यवसायाबाबत करपात्र समजले जाईल दुसऱ्याच्या शेतीतील माल विकणारी व्यक्ती शेतकरी समजल्या जाणार नाही तर त्याचा दर्जा व्यापाराचा राहिल अशा स्थितीत जर शेतमाल करमाफ नसेल तर तो करपात्र समजल्या जाईल असा व्यवहार करणाऱ्या व्यक्तीचा समावेश करपात्र व्यक्तीमध्ये केल्या जाईल. कंपनी, विश्वस्तनिधी, कॉर्पोरेशन, शासन इत्यादी मालकीच्या शेतजमीनी असल्यातरी त्यांना शेतकरी समजले जाणार नाही. ते करपात्र व्यक्ती समजले जातील.

अन्नधान्ये, कडधान्ये, भाजीपाला, फळे-फुले, गवत व स्वरूपाचे शेतातून घेतले जाणारे पीक शेतमाल समजले जाईल. चाराउ रान, पशुपालन, दुग्ध उत्पादन, कुकुटपालन, प्राणीपालन, बी-बीयाणे, गवत-फळे, झाडे तोडणे, जंगल निर्मिती हे उद्योग सामान्यतः शेती व्यवसायाच्या कक्षेत येत असले तरी कायद्याने ते शेतीच्या व्याख्येतून वगळण्यात आले आहे. या सर्व व्यवसायांना जीएसटीच्या कराच्या तरतुदी लागू असेल.

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ नागपूर १९वे चर्चासत्र २०१७ ला आमच्या शुभेच्छा

Scanned by CamScanner

कलम 7 (2)ख यानुसार जीएसटी परिषदेच्या शिफारशीप्रमाणे केंद्र शासन, राज्य शासन अथवा स्थानिक प्राधीकरण, सार्वजनिक प्राधिकरणे व त्यांनी हाती घेतलेले सर्व कार्य, अधीसुचित उद्योगावर जीएसटी चे निर्धारण होयील. शासनातर्फे दिल्या जानाऱ्या बहुतेक नागरी सुविधा जीएसटी करच्या कक्षाच्या बाहेर ठेवण्यात आले आहेत. परंतु खालील सेवांचा अंतर्भाव जीएसटी अंतर्गत करण्यात आला आहे.

1. पोस्ट विभागाच्या स्पिडपोस्ट, एक्सप्रेसपार्सल, आयुर्विमा आणि एजन्सी सेवा.

2. विमान, जहाजाच्या आत अगर बाहेर तसेच विमानतळ, बंदराशी संबंधित दिल्या जाणाऱ्या सेवा.

3. प्रवासी अथवा माल वाहतुक सेवा.

केंद्रशासन, राज्यशासन आणि स्थानीक स्वराज्य संस्था, या तिन्ही शासनातर्फे वेगवेगळ्या नागरी सुविधा दिल्या जातात. शासनातर्फे दिल्या जाणाऱ्या सेवा ज्यांचा मोबदला 5000 रुपया पेक्षा कमी आहे. ही रक्कम करपात्र समजली जाणार नाही. ज्या सेवेकरीता 5,000 रुपयापेक्षा जास्त आकारणी केली जाते. अशा दिलेल्या सेवेवर जीएसटी कराप्रमाणे कर आकारण्यात येईल. व्यवसाय या व्याख्येत बसणाऱ्या प्रत्येकाला जीएसटी कर प्रणालीत अमंलात आनावी लागेल. शासनाने काही वस्तु जीएसटी बाहेर ठेवल्या आहेत. धान्य, पीठ, अंडी, मास, नॉनब्रँडेड सॉल्ट, शेतीची अवजारे, वर्तमानपत्रे, गुळ, पाव, दही, मासे, सेंद्रीय खते, भाजी व फळे, इत्यादी तसेच रुग्णालये, शाळा या समाजास आवश्यक सेवा देणाऱ्या संस्थाना कर लागणार नाही. मात्र याकरिता काही अटी निश्चित केलेल्या आहेत. मद्य किंवा दारू याला जिएसटी मधुन वगळण्यात आले आहे. कारण राज्य सरकारांना अधिक महसूल मद्य परवाने व विक्रीपासून प्राप्त होते.

कराचे केंद्रीयकरण वस्तु आणि सेवा करात सर्व महसूल केंद्रसरकारच्या संकलन व्यवस्थेत जमा होयील कारण अनेक वस्तुवर कर लावण्याची राज्य सरकारचा अधिकार यात समाप्त होतो. अशास्थितीत केंद्रसरकार सर्व कर जमा करणार आणि राज्यसरकारांना त्याप्रमाणे त्यातून वाटा त्याचा देणार हे दिसण्यात सहज वाटत असले तरी ते अतिशय क्लिष्ट व क्लेषदायक आहे. आजपर्यंत राज्यसरकार याचा स्वतंत्र पणे उपयोग करीत होता. वस्तु आणी सेवा करात सर्वच महसूल केंद्राकडे जमा होत असल्याने प्रचंड आकाराच्या संघराज्यीय व्यवस्थेत यामुळे नाराजगी व असंतोष निर्माण होणे संभवणीय आहे. केंद्राकडून महसूलाचे राज्यपातळीवर वितरण न झाल्यामुळे जम्मू आणि काश्मीर या राज्यात महसूलाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पंजाब व हरीयाणा सरकारला देखील महसूलाचा प्रश्न जाणवत आहे. जीएसटी मधील दुसरे मोठे व महत्वाचे अरीष्ट म्हणजे विवरणपत्रे, आवश्यक कागदपत्रे, व्यापारी, उद्योजक, निर्माता यांना 3 महिन्यातून एकदा जीएसटी भरणे अनिवार्य केले आहे. ज्यांची वार्षिक उलाढाल 1 कोटी रुपया पेक्षा कमी आहे. व यापेक्षा जास्त असणाऱ्यांना जीएसटीच्या नियमाप्रमाणे कर विवरणपत्रे आदान कर पध्दत (Input Tax Credit From) अर्ज भरणे आवश्यक व अनिवार्य करण्यात आले आहे. हि सर्व कर विवरणपत्रे ऑनलाईन भरण्याची सक्ती केली आहे. आज भारतात अनेक मागासलेल्या जिल्हयात इंटरनेट सुविधा उपलब्ध नाही आणि असल्यास त्यावरील भार वहन क्षमतेच्या बाहेरचा आहे. अशा स्थितीत दिलेल्या तारखांना कर विविर पत्र सादर न केल्यास दंडाची कार्यवाही केल्या जाऊ शकते असे जीएसटी कायद्यात प्रावधान करण्यात आले आहेत. वस्तु व सेवा कर प्रणाली अर्थात जीएसटीच्या अमंलबजावणीने निर्मित उद्योगावर विपरीत परिणाम झाला खाजगी क्षेत्रातील गुंतवणूक कमी होऊन त्याच्या परिणामाने गुंतवणूकीत वाढ करून रोजगार निर्मिती करणे वर्तमानात शक्य दिसत नाही. याचे स्पष्टीकरण स्वतः आरबीआय गव्हर्नरनी ऑक्टोबर 04 ला घोषीत केलेल्या पतधोरणातून दिसून येते. जीएसटीच्या अंमलबजावणीतून अर्थव्यवस्थेपुढे सध्यातरी समस्या निर्माण झाल्याचे पतधोरणातून स्पष्ट होतांना दिसते. पतधोरण जाहीर झाल्यानंतर गव्हर्नर उर्जित पटेल म्हणाले की, औद्योगिक उत्पादन निर्देशांक अधिच्या वर्षाच्या तुलनेत जुलैमधील 4.5 टक्के तुलनेत यावर्षाच्या जुलैमध्ये 1.2 टक्के एवढा झाला. निर्मीत क्षेत्रातील मुख्यतः भांडवली वस्तु उत्पादकांच्या अनुउत्पादकीय कामगीरीचा हा परिणाम आहे. छोटे व्यावसायीक आणि निर्यातदारही जीएसटीच्या अमंलबजावणीने अशक्त झाले आहे. व त्यातूनच रोजगाराचा प्रश्न निर्माण होतो आहे. जीएसटी बाबत भारतात जी खरी समस्या लोकांच्या मनात निर्माण झाली आहे. त्यातील विविध वस्तुच्या विक्रीकरीता व सेवेकरीता व काहींना जीएसटी मधून सुट या चक्रीय दरातुन झालेली आहे. यामुळे व्यापारी वर्ग व उपभोक्ता वर्ग या दोघाचाही गोंधळ उडतो आहे. जीएसटीचे दर रोज बदलतांना दिसतात. सप्टेंबरमध्ये हैद्राबादेत जिएसटी कौन्सीलने निश्चित केलेले दर दिल्लीत घेण्यात आलेल्या सभेमध्ये बदलविण्यात आले. विवरणपत्राचेही वेळापत्रक बदलविण्यात आले. जीएसटीची सीमा पण बदली. यावरून हे स्पष्ट होते की सरकार जीएसटी बाबत जुलैपासून आजपर्यंत निश्चित असे धोरण राबवू शकले नाही. कराचे दर विविध ठेवल्यामुळे एक देश एक कर हे धोरण साध्य करता येऊ शकले नाही. सोन्याचे उदाहरण द्यावयाचे झाल्यास सोन्यावर जीएसटी आकारणी 28 टक्के इतकी पूर्वी ठेवण्यात आली होती. नंतर ती कमी करून 3 टक्के इतकी निश्चित करण्यात आली. कारण सोन्याच्या विक्रीवर किंवा मौल्यवान धातुवरील कराचे दर जास्त राहिले असते. तर त्याची तस्करी मोठ्या प्रमाणात होणे संभवनिय होते. म्हणून नंतरच्या कालवधीत हा जीएसटी कमी करण्यात आला.

जीएसटीचा सर्वात मोठा धक्का राजस्थान मधील मार्बल विक्रेत्यांना झाला पूर्वी राज्याचा अप्रत्यक्ष कर मार्बलच्या विक्रीवर 5 टक्के इतका होता तो जीएसटी मध्ये 28 टक्के इतका ठेवण्यात आला आहे. त्यामुळे राजस्थान राज्यातील संपूर्ण मार्बल विक्री ठप्प झाली आहे. त्याचबरोबर कपडा व्यापारी जीएसटी मुळे त्रस्त झालेले दिसून येत आहे. सुरत मधील कपडा व्यापारी यांनी आपली कपड्याची विक्री अनेक दिवसापासून बंद ठेवली आहे. याचा परिणाम निदर्शनामध्ये झाला. कापड व्यवसायात कामकरणारे हजारो श्रमीक बेकार झालेले आहेत. इचलकरंजी, भिवंडी येथील हातमाग तर येवला येथील साड्यांचा उद्योग बंद होण्याच्या मार्गावर आहे. यातून कापड व्यापारात मंदीचे व व्यापारी वर्गात संभ्रमतेचे वातावरण निर्माण झाले आहे. जीएसटी बाबत उद्योग व व्यापारी वर्गात जी संभ्रमता आहे. त्यातूनच व्यापार करण्याची भिंती



Scanned by CamScanner

त्यांच्यात निर्माण झाली आहे. यातूनच भारतीय अर्थव्यवस्थेत मंदी सदृश्य स्थिती निर्माण झालेली दिसून येते. आर्थिक व्यवहाराची गती मंद झाल्यामुळे आर्थिक विकासाचा दर 5.7 टक्के वर आला जगातील जेडीपी चा दर 3.5 टक्के वरून 3.6 टक्के होण्याचा कल दिसतो आहे. चिनची अर्थव्यवस्था 6.5 टक्के पेक्षा जास्तीच्या दराने वाटचाल करीत आहे. युरोप, अमेरीका मंदीतून बाहेर येत आहे. अशास्थितीत भारताचा विकास दर कमी होणे म्हणजे हा आर्थिक विरोधाभास होय.

जीएसटी भारताकरिता आज जरी नवप्रयोग असला तरी भविष्यात व्यापारी व उद्यमी याना एकदा जीएसटी परिचीत झाल्यावर त्यांच्यावरील समस्येचे ओझे हलके होण्यास मदत होईल प्रत्येक कार्याकरिता आज व्यापरी वर्गांना संघर्ष करावा लागत आहे. व 01 जुलै पासून जीएसटी लागू केला असल्याने Input Tax Credit From ची रक्कम परत करण्यात यावी अशी मागणी व्यापारी वर्गाद्वारे होत आहे. दिल्लीत झालेल्या बैठकीत एकूण 27 वस्तुवरील कराचे दर कमी करण्यात आले. यात गुजरातमधील लोकप्रिय खाकऱ्याच्या दरात विशेष लक्ष ठेवून कपात करण्यात आली आहे. विविध वस्तुवरील कराचे दर कमी केले असले तरी चैनी वस्तुवरील जीएसटीचा दर कमी होण्याऐवजी वाढविण्यात आला याचा परिणाम भविष्य कालवधीत कार विक्रीवर होणे संभव आहे. कोल्हापुरमध्ये शेतकऱ्याने निदर्शने करून लालमिरची व खडी हळद, यांचेवरील जीएसटी चे दर कमी करावे याची मागणी केली आहे. याचाच अर्थ जीएसटी मध्ये विविध वस्तुच्या विक्रीवर ठेवलेले विविध दर हे एकतर जास्त आहे. त्यामुळे किंमतीतील वाढीचा परिणाम मागणीवर होयील. जीएसटी मुळे अनेक लहान मोठ्या उद्योगासमोर वस्तु विक्रीची समस्या निर्माण झाली आहे. मागणीवर अशा वस्तुच्या विक्रीचा परिणाम झाल्यामुळे जवळपास 15 लक्ष लोक दोन्ही प्रभावाने प्रभावी झाले आहे. जीएसटी चा परिणाम दिर्घकालवधीत राहिल्यास पुढील वर्षी भारताचा आर्थिक विकासाचा जागतीक क्रमांक 74 व्या स्थानापेक्षा जास्त राहणार नाही हे IMF ने स्पष्टकेले आहे. विविध विकासदर निर्धारण कंपन्यापैकी Standard and Poor या विकासदर निर्धारण खाजगी एजन्सीने देखील भारताच्या आर्थिक विकासाबाबत चिंता व्यक्त केली आहे.

जीएसटी बाबत अनेक मते बाहेर येत असली तरी त्याबाबत असलेले फायदे व दोष यांचे विवेचन पुढील प्रमाणे केले आहे.

1.जीएसटी कररचना अंमलात आणल्यामुळे सरकारच्या महसूलात वाढ होईल.

2. प्रत्येक उद्यमी व उत्पादकाला, विवरणपत्रे वेळेनुसार भरण्याचा फायदा शासन व उद्यमांना होईल.

3. सर्वत्र किंमत सारखी होण्याचे किंमतीतील विषमता कमी होईल.

4.CGST व SGST चे दर निर्धारण केल्यामुळे महसुलाचे वितरण सरळ व सोपे होईल.

5.कायद्यातील पळवाट प्राप्त करून जीएसटी चूकविणे शक्य होणार नाही.

6.Input Tax Credit चा फायदा व्यापारी वर्गांना होईल.

जीएसटीचे दोष:-

1. सद्यातरी किचकट व क्लिष्ट वाटणारी पध्दत.
2. सर्व उद्यमांना Software व CA चा वापर करणे कठीण
3. प्रतिमाह किंवा तिमाहीतून विवरण सादर करणे हे कठीण कार्य ठरेल.
4. जीएसटी पंजीयन क्रमांक घेणे अनिवार्य
5. विविध वस्तुवरील करांचे भिन्न दर यामुळे विक्रीतील क्लिष्टता."

वरील फायदे व दोष दिसत असले तरी भविष्यात व्यापारात पारदर्शकता आणण्याकरिता जीएसटी चा उपयोग होईल.

सदर्भ:-


1. राजस्व - सु.रा. ओझरकर
2. जीएसटी कायदा- अॅड. गोविंद पटवर्धन
3. लोकसत्ता 11/09/2017
4. महाराष्ट्र टाईम्स 08/09/2015
5. लोकसत्ता 05/10/2017
6. इंडियन एक्सप्रेस 11.10.2017



विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ,
नागपूर द्वारा आयोजित द्वैवार्षिक चर्चा सत्र
२०१७ ला हार्दिक शुभेच्छा !



Pro. Vinod Lanjewar

Lanjewar

Cycle Agencey

Dealers of Cycle:
HERCULES BSA, HERO ATLAS,
Spare Parts And All Types
Of Tyers & Tube Available Here

Ayodhya Nagar Chowk, Nagpur-24
Cell: 9423054405


Scanned by CamScanner

# वस्तु एवं सेवा कर और रचना

प्रा. विजय ल. बालपांडे
एस. एम. वडे कनिष्ठ
महाविद्यालय,
नागपूर.

**प्रस्तावना**

भारत सरकारने GST को प्रारंभ करने की प्रक्रीया को गती देने का कार्य 2003 के बाद करना शुरू किया. GST यह एक अप्रत्यक्ष करप्रणाली का हिस्सा है, जिसके अंतर्गत वस्तू और सेवाओ को करदा एकही व्यवस्था के अंतर्गत निश्चित करने का प्रयास किया जाता है। हेतू यह है की वस्तू एवं सेवाओंका जो विनिमय होता है जिसके अंतर्गत अंतिम वितरक या विक्रेता और द्वारा बेची और क्रय का व्यवहार होता है उन शृंखला के अंतंत एकही वस्तू पर कई बार कर की अवधारणा को निश्चित किया जाता है और शृंखला से बाहर आते आते उपभोक्ताओंको एकही वस्तू के निश्चित किंमत के लिए कई बार कर Tax दिये जाते। परिणामता वस्तू की किंमत और सेवाओं किंमत में इजाफा होना और वस्तू तथा सेवाओं के दाय महँगाई तौरपर उपभोक्ता को क्रय करना होता है। इसतरह महत्वपूर्ण किंमत संदर्भ संघर्ष भारत वर्ष मे यह रहा है की असिमीत बिचौलीया का बिक्री शृंखला मे मौजूद होणे से वस्तू और सेवाओ की किमते अधिक होती है और वस्तू और सेवाओ के कर का जो महान शासन को प्राप्त सेवा चाहिए वह इसके अंतर्गत अनेक त्रुटीयो के कारण नही होता था और कर की राशी को छीपाया जाता था। ऐसा होनेसेही भारत मे अनेक वस्तुओंको विदेशासे वस्तू की छुपी आयात कर के तस्करी कीयी जाती थी। विशेषताह सोने की अवैध आयात क्रॉकरी, ज्वेलरी परिणामता सरकार का कर प्रापत न होनेसे नुकसान होता रहा और अर्थव्यवस्था पर उसका प्रतिकुल परिणाम दिखाई दीखने लगा। इस सारे अव्यावार्य चिजो को समाप्त करने के लिए GST प्रणाली का विचार भारत मे किया गया।

**संक्षीप्त अवधाणाएं -**

इस अधिनियम का संक्षिप्त नाम केंद्रीय माल और सेवा कर अधिनियम 2017 है। इसका विस्तार जम्मू-काश्मीर राज्य के सिवाय संपूर्ण भारत मे है। यह उस तारीख को लागू होगा जब केंद्रीय सरकार राजपथ मे अपने अधिसूचना द्वारा नियमीत होगी।

**परिभाषा:-**

1) 'अनुयोग्य दावे' शब्द का वही वह अर्थ होगा जो संपत्ती अंतरन अधिनियम को धारा 3 के तहत हो।

2) 'परिक्षण पत्ता' से वस्तू या सेवाओं या दोनो के पाने वाले का ऐसा पता अभिप्रेत है जो ऐसे वस्तू या सेवाओं का को दोनो के परिक्षण के लिए किसी पंजिकर व्यक्ती द्वारा जारी का बीजक पर निर्देशीत है।

3) न्याय निर्णायक प्राधीकारी से अधिनियम के अधीन कोई आदेश या विनिश्चय देने लिए नियुक्त प्राधीकृत कोई प्राधीकारी अभिप्रेत है किंतु इसके अंतर्गत केंद्रीय उत्पादन शुल्क और सीमा शुल्क बोर्ड पुर्णनिरीक्षण प्राधीकारी अग्रीम विनिर्णय अपील अधिकारी और अपील अधिकरण नही है।

4) अधिकर्ता, इसका अर्थ, दलाल कमिशनर एजंट, अडतिया, प्रायायक अभिकर्ता, निलामकर्ता, या कोई अन्य वाणिज्यिक अभिकर्ता, चाहे जिस नाम से ज्ञात हो, ऐसे अभिकर्ता अभिप्रेत है। जो किसी अन्य व्यक्ती और से वस्तू और सेवाओं या दोनो का प्रदान या प्राप्ती का कारोबार आता है।

व्याख्याओंत स्पष्टीकरण खाते अंतर्गत प्रयोजन हेतू ऐसे कारक जिस पर यह अवधारणा करने के लिए विचार किसको जाना चाहिये जिसके अंतर्गत वस्तू और सेवाओ का अंतर्भाव इसके अंतर्गत समावेशीत निम्न-प्रकारके है।

अ) वस्तू और सेवाओंकी प्रकृती
ब) उत्पादन प्रक्रियाओंकी प्रकृती
क) वस्तू और सेवाओं के ग्राहक के प्रकार का वर्ग
ड) माल के वितरण या सेवाओंके प्रदाय मे प्रयुक्त पध्दतीया

ई) विनिमायक पर्यावरण की प्रकृती इसके अंतर्गत बैंककारी विमा या लोक उपयोगीता है।

इसप्रकार प्रशासकीय व्यवस्था और GST द्वारा पर का संकलन अंतिम व्यक्ति द्वारा प्राप्त होणे से परिभाषा का और अधिक विस्तृत किया गया है।

**GST रचना**

केंद्रसरकार और राज्यसंस्थाओंके अंतर्गत GST का वितरण करना होता है। इसका अर्थ यह है वस्तू और सेवाओ पर जो करदायीत्व निश्चित किया जाएगा उसका वितरण (GST और SGST द्वारा विभाजन होना यह निश्चित करने के लिये, राज्यसरकारके सभी वित्तीय मर्गाद्वारा एक समीती का गठन किया है जो सर्व संपत्तीचे करदर रचना प्रशासन,



Scanned by CamScanner

करसंकलन और कर वितरण और GST से प्राप्त क्षतीपुर्ती का तय करना इसके अंतर्गत निश्चित किया हुआ है। अप्रत्यक्ष कर आदान होने के बावजूदभी अनेक राज्यों की स्थिती अच्छी नही होणे से ऐसी राज्योंकी स्थिती की सुधारणा होणा जरुरी था। परंतु व्हॅट के अंतर्गत करनिर्धारण होणेपर राज्यओंकी स्थिती मे आप अप्रत्यक्ष कर द्वारा अधिक होणे मे साहयता हुओ और छोटे राज्य के आय मे बढोतरी होणे से विकास करने के लिए अधिक राशी का उपयोग होणा आरंभ हुआ राज्य और केंद्र के अंतर्गत GST का संतुलन बनाए रखने के लिए एक सत्याग्रह व्यवस्था का निर्माण होणा आवश्यक समजा गया ओर उसी हेतू प्रयास भी किये गये। कर पध्दतीको अधिक साल स्पष्ट बनाने के लिए ओर मुल्ये अधिक निश्चित हेतु प्राप्त करने के लिए संसिमत रचना अनिवार्य हुयी। GST का संपूर्ण नियमन केंद्र सरकार का है क्यांकी विभीन्न राज्याओंके अंतर्गत विभीन्न प्रशासनीक समस्या के कारण अप्रत्यक्ष कर रचना प्रणाली समस्याओंसे बाधीत थी। राज्यो द्वारा गणीत की गई, प्राधीकृत कमीत जीसके अंतर्गत सभी वित्त मंत्रीयों का अंतर्भाव यह एक अनौपचारीक सुविधा के तौरपर निर्माण किया गया इसलिये यह स्पष्ट नही अुआ की समीतीका कार्य और उसका प्रभाव क्या रहेगा इसलिये GST की सभी धाराओंको और केंद्र राज्य के अंतर्गत प्रशासकीय संतुलन प्राप्त करने के लिए GST परिषद का आयोजन किया और परिषद हा वैधानीक व्यवस्था का स्तर माना गया है।

कर का पदग्रहण और संग्रहण प्रदाय कि परिधि अधिनियम के अंतर्गत 'प्रदाय' पद मे निमनलिखीत घटको का अंतर्भाव किया गया है।

1) किसी व्यक्तीद्वारा कारोबार के दौरान या उसे अग्रेसर करने मे किसी प्रतिफल के लिये किया गया या किया जाने के लिये करार पाया गया। विक्रय अंतरण वस्तुविनिमय, विनिमय, अनुज्ञप्ती, भाड़, या व्ययन जैसे वस्तू या सेवाओंके दोनो के प्रदान सभी प्रारुप का अंतर्भाव किया गया है।

2) किसी प्रतिफल हेतु सेवाओं का आयात, चाहे वह कारोबार के दौरान या उसे अग्रेसर करने के लिये हो या नही।

3) किसी प्रतिफल के बिना किये गए या किये जाने के लिए करार पाए गए अनुसूची मे विनिर्दिष्ट क्रियाकल्प है।

संयुक्त और विभिन्न प्रदायों पर Tax का अस्तित्व किसी संयुक्त या मिश्रीत प्रदाय पर Tax के दायीत्व का अवधारण निमनप्रकार किया जाता है।

1) होय यह अधिक प्रदायो को समाविष्ट करके किये गए किसी संयुक्त प्रदान जिसमे एक मुल्यप्रदान है। ऐसे मुल्य प्रदान की अपूर्ती के रुपमें जाएगा।

2) हो यह अधिक प्रदायो का समाविष्ट करने के लिए किए गये मिश्रति प्रदाय को विशिष्ट प्रदाय की आपूर्ती के रुपमें माना जायेगा।

**उदग्रहण और संग्रहण**

1) उपधारा (2) के अधिन रहते हुये मानविय उपभोग के लिये महासारिकपान के प्रदाय को छोडकर वस्तू और सेवाओं या दोनो के सभी अंतरराज्यीय प्रदायों पर धारा 15 अनुसार आधारीत मूल्य पर और बिस प्रतिशत से अधिक ऐसे दोपर सरकारद्वारा परिषद परिषद की शिफारशीपर अधिसूचीत किये गये केंद्रीयमाक और सेवाकर नामक कर को ऐसे रीती से जो जो विहित की जाए उद्रहण और उस संग्रहण किया जाएगा और जो करधारे व्यक्ती द्वारा संदत किया जाएगा।

2) अपरिष्कृत पेट्रोलीयम, हाईस्पीड डिझल, मोटर स्पिट (सामान्यत पेट्रोल) प्राकृतिक जैसे और विमान टर्बाइन इंधन के प्रदत्त पर केंद्रीय कर उद्रहण तारीख से कीया जाएगा। जो सरकारद्वारा परिषद की शिफारीशपर अधिसूचीत की जाए।

3) सरकार परिषद की शिफारीशोपर अधिसूचना द्वारा वस्तू और सेवा या दोन प्रदाय के ऐसे प्रवर्ग विनिर्दिष्ट कर सकेगी जिस पर कर का संदाए ऐसे वस्तू और सेवा या दोनो के प्राप्तीकर्ता द्वारा विपरीत प्रभार के आधार पर किया जाएगा और इस अधिनियम के सभी उपबंध ऐसे प्राप्तीकर्ता को इस प्रकार लागू होंगे मानो वह ऐसा व्यक्ती है जो ऐसे वस्तू व सेवाओ या दोनो के प्रदान के संबंध मे कर के संदाय का दायी है।

4) सरकार परिषद की शिफारिशो पर अधिसूचना द्वारा सेवाओं के प्रवर्ग विनिर्दिष्ट कर सकेगी। जिसके आंतरराष्ट्रीय प्रदायो पर कर दे सेवाओं का प्रदाय इलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक के माध्यम से किया जाता है। जो उसके द्वारा संदत्त किया जाएगा और इस अधिनियम के सभी उपबंध ऐसे ईलेक्ट्रॉनिक वाणिज्य प्रचालक को इस प्रकार लागू होंगे वह ऐसा व्यक्ती है जो ऐसे वस्तू यह सेवाओं या दोनो के प्रदाय लागू होंगे और प्रदान के सेवार्थ मे करके संदाय का दायी माना जायेगा।

**कर से छुट देने का अधिकार**

1) जहॉं सरकार का यह समाधान हो जाता है की लोकहित मे ऐसा करना आवश्यक है। जैसे स्थिती मे GST परिषद के शिफारिशपर अधिसुचनाद्वारा साधारणतः पूर्ण रुप से या ऐसी शर्त के अधिन रहते हुए उसे विनिर्दिष्ट कीया जायेगा। उस तारीख से जो ऐसी अधिसूचना मे विनिर्दिष्ट की जाए कीसी विनिर्दिष्ट विवरण के वस्तू या सेवाओं या दोनो को उस पर उद्रहणीय संपूर्ण कर से या उसके किसी भाग से छुट दी जायेगी।

2) जहॉं सरकार का यह समाधान हो जाता है की लोक हित मे ऐसा करना आवश्यक है। वहॉं परिषद की शिफारशीयोंपर प्रत्येक मामले मे विशेष आदेश द्वारा ऐसे आदेश मे कथीत अपवादिक प्रकृती के परिस्थियों के अधिन ऐसे किसी वस्तू तथा सेवाओं या दोनो को जो उसपर उद्रहणीय है कर के ये संदाय से छुट दे सकेगी।

स्पष्टीकरण धातू प्रयोजन के लिये किसी वस्तू या सेवा या दोनो के संबंध मे इस पर उद्रहणीय संपूर्ण कर से यह किसी भाग से पूर्ण रुप से छुट दी गई है। वहॉं ऐसे वस्तु या सेवाओं या दोनो का Tax प्रदान करनेवाला व्यक्ती ऐसे वस्तू या सेवाओं या दोनो के प्रदान पर प्रभावी दर से अधिक कर का संग्रहण नही कर सकेगा।

**इनपुट Tax प्रत्यय**

1) इनपुट Tax प्रत्यय निमनलिखीत द्वारा स्पष्ट कीया गया है। पात्रता और शर्ते प्रत्येक पंजीकृत व्यक्ती ऐसे निबंधनों और शर्तो के अधिन रहते हुये, जो विहित की जाए और धारा 49 मे विनिर्दिष्ट रीत से उसे किए गये ऐसे वस्तू या सेवाओं या दोनो के प्रदाय पर प्रभावित इनपुट Tax प्रत्यय या 'आदान कर प्रत्यय' लेने का हकदार होगा। जिसका उसके कारोबार के दौरान या उसे अग्रेसर करने के उपयोग किया जाता है या उपयोग किया जाता है। ऐसी उक्त रकमे ऐसे व्यक्ती के इलेक्ट्रॉनिक खाते मे जमा किये जाएगी।



Scanned by CamScanner

2) उक्त धारा में अंतर्विष्ट किसी बात के होते हुए भी कोई पंजीकृत व्यक्ती उसको किए गए किसी माल या सेवाओंके या दोनों के प्रदान के संबंध में इनपुट (प्रदान) का प्रत्यय प्राप्त करने का तब तक हकदार नही होगा जबतक उसके कब्जे में इस अधिनियम के अधीन किसी पंजीकृत प्रदायकर्ता द्वारा जारी कोई कर बीजक या नामे नोट (डेबीट नोट) या कोई अन्य ऐसा का संदाय दस्तावेज जो विहित किया जाए न हो।

**3) वह वस्तू या सेवाओ या दोनो प्राप्त नही कर लेता।**

स्पष्टीकरण इसके अंतर्गत जो प्रयोजन के लिये यह समझा जायेगा की पंजीकृत व्यक्ती ने वस्तु प्राप्त कर लिया है। जहाँ प्रदायकर्ता द्वारा किसी प्राप्तकर्ता को या ऐसे पंजीकृत व्यक्त के निर्देश पर कीसी अन्य व्यक्ती को चाहे वह अभिकर्ता के रूपमें कार्य कर रहा हो या नही वस्तू के संचलन पूर्व या उसके दौरान वसतू पर हक के दस्तावेजो के अंतरणद्वारा या अन्यथा आय परिहता कीया जाता है।

1) धारा या के उपबंधो के अधीन रहते हुये ऐसे प्रदाय के संबंध मे प्रभारी कर का नगद मे या उक्त प्रदाय के संबंधमें अनुज्ञेय इनपुट कर प्रत्यय का उपयोग करके वास्तविक रूप से सरकार को संदाय न कर दिया जाए।

2) वह धारा 39 के ववरण न दे - परंतु जहाँ वस्तू बीजक के विरुद्ध एक संच या किस्तो में प्राप्त होता है। वही पंजिकृत व्यक्ती अंतिम संच या किस्त की प्राप्ती पर प्रत्यय लेने का हकदार होगा। परंतु यह और की जहाँ कोई प्राप्तीकर्ता ऐसे प्रयोगो से भिन्न जिन पर विपरीत प्रभार के आधार पर कर संदेश है। वस्तू या सेवाओं या दोनो के प्रदायकर्ता, ऐसे प्रदायों प्रदायकर्ता को प्रदान के मूल्य के साथ उस पट सहे व्याज के रक्कमें का प्रदायकर्ता द्वारा बाजिक जारी करने की तारखी से एक सौ अस्सी दिन की, अवधी के पश्चात भी संदाय करने मे असफल रहता है। वही प्राप्तीकर्ता द्वारा उपभोग किए गये इनपुट का प्रत्यय के बराबर रक्कम को उस पर के व्याज के साथ ऐसी रीती मे जो विहित की जाए उसके आऊटपुट कर दायीत्व मे जोड दीया जायेगा। परंतु यह भ की प्राप्तीकर्ता वस्तू या सेवाओंमें या दोनो के प्रदान मूल्य के साथ उस पर संदेह के मुद्दे रकम का उसके द्वारा किए गए संदाय पर इनपुट का प्रत्यय का उपभोग करने का हकदार होगा।

छोटे काम के लिए किए गये निवेशो और भेजे गए पुंजी वस्तु के संबंध मे

1) प्रधान ऐसी शती और निबंधनो के अधीन रहते हुये जो विहित किए जाए छोटे छोटे कायी के लिये व्यक्ती को भेजे गये निवेश पर इनपुट कर प्रत्यय अनुज्ञात होगा।

2) धारा 16 की उपधारा (2) के खंड मे अंतर्विष्ट किसी बात के होते हुये भी प्रधान निवेशो को पहले उसके कारोबार के स्थान पर जाए बिना छुटपूट कार्य के लिए किसी छोटे छोटे खर्च करनेवाले व्यक्ती को सिधे भेजे जाने पर भी निर्देशोपर भी इनपुट का प्रत्यय लेने का हकदार होगा।

**वितरण की निती :**

इनपुट सेवा वितरक ऐसी रीती से जो विहित की जाए कोई ऐसा दस्तावेज जारी करके जीसमें वितरण किए जाने वाले इनपुट कर प्रत्यय की रक्कम अंतर्विष्ट हो। केंद्रीय कर के प्रत्यय का केंद्रीयकरण या एकीकृत कर के रूप मे और एकीकृत कर का एकीकृत या केंद्रीय कर के रूप में वितरण करेगा।

आधीक्य में वितरीत प्रत्यय के वसुली की रीती।

जहाँ निवेष सेवा कर वितरक धारा वीस मे अंतर्वीष्ट उपबंधोंके उल्लंघन प्रत्यका ऐसा वितरण करता है जिसके परिणाम स्वरूप प्रत्यय के एक या अधीक प्राप्तीकर्ताओं का आधिक्य मे प्रत्यका वितरण हो जाता है। वहाँ ऐसे प्राप्ती कर्तावोसे इस प्रकार वितरीत अधिक्य प्रत्यय ब्याज के साथ वसूल किया जाएगा और यथास्थित धारा 73 और 74 के उपबंध वसूल किए जाने वाली रक्कम के अवधारण के लिए यथा आवश्यक लागू होंगे।

इसप्रकार इस्ट शोध निबंध के अंतर्गत मेरे द्वारा कुछ धाराओंको जो GST के अंतर्गत भिन्न हेतू लिये गये है। उसको संक्षिप्त मे स्पष्ट करने का प्रयास किया है। GST यह अप्रत्यक्ष कर संरचना का मुलाधार है और इससे अंतर्गत ऐसी सती कानुनी व्यवस्था को संक्षेप किया गया जास्त सहल कर देना सबको अनिवार्य हुआ है और इसका परिणाम वस्तू और सेवाओंके मुल्य में समानता रखना कीया जाएगा।

संदर्भः-


1) GST - 'वस्तू एवं सेवाकर', मार्गदर्शीका - रुपेशकुमार

2) Economic Times 09/10/17

3) Indian Express 09/10/17

4) GST Various Papers Delhi University Delhi



विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ, नागपूर द्वारा आयोजित द्वैवार्षिक चर्चा सत्र

२०१७ ला

**हार्दिक शुभेच्छा !**



**नाजुकभाऊ भैसारे**

माजी. सरपंच ग्रामपंचायत मोरगाव

तथा

संचालक कृ.उ.बा. समिती, लाखनी

ता. लाखनी. जि. भंडारा





Scanned by CamScanner

# अप्रत्यक्ष कर रचनेतील बदल

**प्रा. संजय ठाकरे**
भागवती गर्ल्स ज्यु. कॉलेज,
नागपूर

प्रस्तावना:- भारतात राजस्व गोळा करणाऱ्या व करण्याच्या निरनिराळ्या संस्था शासन स्वरूपात प्राधिकृत केल्या आहे. भारतात आयकर प्रत्यक्षकर होय परंतु विक्रिकर अप्रत्यक्ष कर होय आयकर मध्यवर्ती सरकारद्वारा गोळा करण्यात येतो तर विविध राज्यांना त्यांच्या अखत्यारी विविध वस्तूवर विक्रीकर लावण्याचे अधिकार घटनेने बहाल केले आहेत. ब्रिटीशकालावधीत जनतेकडून कर वसूल करण्यात येत होता. तेव्हा राज्यसरकार केंद्रसरकार असे विभाजन नव्हते इस्टइंडिया कंपनीच भारतात सर्व आर्थिक व्यवहार व आर्थिक व्यवहारावर नियंत्रण ठेवीत होती. मोगल काळात किंवा चाणाक्य कालावधीत स्वतःच्या राज्या करीता महसूल गोळा करण्याकरीता चाणक्य नितिचा वापर केला जात होता. भारत स्वातंत्र्य झाल्यावर देशाच्या सरकारचे व जनतेचे महसूल संदर्भात घटनात्मक तरतुद करून सरकार - जनता यांचे दायीत्व व कायद्याच्या चौकटीत राहून जबाबदारी निश्चित करण्यात आली. ब्रिटीश जूलमी हुकमशाही पूढे जनता महसूल स्वरूपात ब्रिटीश शासनाला उपलब्ध करून देत होती तो कर आहे, की लादलेला एखादा आर्थिक भार आहे हे समजण्याच्या पलिकडचे होते. ब्रिटीशांच्या या धोरणासंदर्भात डॉ. आंबेडकरांनी मार्मीक विचार प्रस्तुत केले होते ते म्हणजे एखाद्या वर्षी अवर्षण झाले व शेतकऱ्यांची शेती पिकली नाही तरी ब्रिटीशाद्वारे नेमलेले जमीनदार एजंट शेतसारा याची रक्कम कमी करत नसत परंतु उद्योजकांना भराव्या लागणाऱ्या करातून अवर्षण स्थित सुट देण्यात येत होती. यावरून हे स्पष्ट होते की, भारतातील कर रचना व करवसुली किती शोषण करणारी की ज्यामुळे आर्थिक विषमता व देशात गरिबी निर्माण करण्यात त्याचा वाटा सिंहाचा ठरला.

कर देणे हि संकल्पनाच पूर्वीपासून शोषण करणारी व्यवस्था होय असे भारताच्या संदर्भात जनतेचे मत तयार झाले. नागरीक सुशित असो असुशीत असो कर हा शब्द त्यांच्या करीता भीती निर्माण करतो. कराचे जाळे, कर वसूल करण्याच्या संस्था, कर भरण्याची क्लिष्टपध्दत, प्राप्त उत्पन्नातून कर रकमेचे समायोजन, भारतातील अनेक वेतन भोगी असे आहे की, आयकर भरण्याकरीता वर्षाच्या शेवटी कर्ज काढून आयकराचे शोधन करतात. थोडक्यात स्पष्ट करावयाचे झाल्यास घरावरील स्थानिक कर भरण्यापासून तर खरेदी केलेल्या विविध वस्तू वरील कर जो आपणाला माहित होत नाही पण जो आपण रोज विक्रेत्याला त्याची राशी किंमतीत समाविष्ट असल्यामुळे कित्येकवेळा त्याचेकडे कराचा भरणा न चुकता करीत असतो प्रत्यक्ष स्वरूपात असलेले आयकर सेवाकर, उत्पादन कर इत्यादी देखील भरणा ठरून दिलेल्या कालावधीत शासन दरबारी होतो. कर प्रणाली क्लिष्ट, जाचक, नौकरशाहीत गुंडाळलेली विविध कागद पत्रे या चौकटीतून जाऊन ते शासनदरबारी जमा होतात. ही पध्दतच नको या अपेक्षेने किमान रक्कम सरकारला सनदी अधिकाऱ्याच्या मार्फत औपचारीकता पूर्ण करून भरून द्यावयाची व त्यापेक्षा कीती तरी रक्कम कर स्वरूपात न देता तरलतेच्या स्वरूपात संग्रहण करून ठेवायची व संग्रहणाचा स्तर वाढवत ठेवायचा याचेच रूपांतर कालावधीने काळयापैशात होतो, महागाई वाढवण्यात होतो, सरकारच्या अंदाजपत्रकातील तुट वाढवण्याकरीता होतो व बेनामी सारखी संपतीत वाढ करण्यात याचा मोठा वाटा असतो.

म्हणून शासनाने कर प्रणाली सरळ असावी, सामान्यांना समजणारी असावी करादेदर निश्चित असावे. सरकारचे खर्च करातून प्राप्त होणाऱ्या राशीतुन पूर्ण व्हावे, याकरीता शासन स्तरावरील खर्च जाहिर करून प्रतिबंधीत असावे या बाबीचा सखोल विचार झाल्यावरच कर प्रणालीतील पारदर्शकिता किंवा पारदर्शक कर प्रणाली अंमलात येणे शक्य होईल याकरीता भारतात नियोजन पूर्वीच्या 1991 नंतर कर प्रणालीतील सुधारणा करून कररचनेचा पाया भक्कम करणे यासाठी प्रयत्न सूरू आहे. केंद्र व राज्याचे संबंध सलोख्याचे व आत्मनिर्भरतेचे असावे अशी शिफारस सरकारी आयोगाने आपल्या अहवालात स्पष्ट केले आहे. 2009 साली तत्कालीन केंद्रीय अर्थमंत्री यांनी PAN सारखी योजना आणून अनेक वर्षापर्यंत ज्यांनी शासनदरबारात कर जमा केला नव्हता तो वसूल करण्याचा प्रयत्न केला.

अप्रत्यक्ष कराचे जाळे एकरूपरूपी व्हावे याकरीता बऱ्याच अधिपासूनचे प्रयत्न सूरु होते याकरीता 2004 मध्ये विक्री करा ऐवजी VAT चा वापर करून कार्यप्रणालीत बदल करून नविन पध्दतीचा स्विकार केला गेला VAT मध्ये कर गोळा करण्याचे अधिकार राज्य सरकारांनाच होते. GST कार्यप्रणाली अस्तित्वात आल्यावर हा कर केंद्रसरकारच्या



Scanned by CamScanner

अखत्यारीतील विषय झाला. मध्यवर्ती सरकारद्वारे यावर दिर्घ सल्लामसलत झाल्यावरच 1 जुलै 2017 पासून अप्रत्यक्षकराचे धोरण बदलवून GST पारदर्शक कर प्रणाली लागू करण्यात आली. या कर दर पध्दतीत जगातील अनेक देशात एकच कर दर लागू केला जातो. परंतु भारतात त्याची विभागणी वेगवेगळ्या कर दरात करण्यात आली आहे. याचे कारण म्हणजे उपभोक्त्यांच्या क्रयशक्तीतील असलेले भिन्नता होय. गरिबी, आर्थिक विषमता, उत्पन्नप्राप्तीतील सातत्यता, बेरोजगारी व त्याचा उपभोगावर व जीवनमानावर होणारा परिणाम हे महत्वाचे विविध कारणे भिन्न दर ठेवण्याकरीता गृहीत धरले आहे.

भारतात विक्रीकर, केंद्रशासनाचे सर्व कर यांचा समावेश जे अप्रत्यक्ष स्वरुपात संकलीत केले जात होते त्याचा अंतर्भाव GST मध्ये करण्यात आला आहे. या प्रणालीच्या अंतर्गत प्रत्येक वस्तु व सेवेकरीता कायद्याची सूची तयार करण्यात आली आहे. IGST, CGST, SGST, Whibide GST, Dual GST, Input Tax Credit विवरणपत्रे भरणे, विविरणपत्रे भरण्याच्या मुदतीतील बदल, GST देण्याकरीता नोंदणी किंवा त्महभेजतंजपवदए घछ दी आवश्यकता, बँक लेखा/अकाऊंट्स, व्यवसाय किंवा निर्माणी/उद्योगाचा परवाना याचे विश्लेषण सादर करणे अनिवार्य करण्यात आले आहे. अर्थातच या सर्व बाबींची सवय व्यापारी वर्ग, उद्योजक वर्ग, किंवा निर्माणी वर्गाला नाही म्हणून GST बाबत व्यापाऱ्यांचा व ग्राहकांचा असंतोष दिवसेंदिवस वाढत असतांना दिसतो आहे. या संदर्भात पं. बंगाल सरकारने व तेलंगणा सरकारने केंद्राकडे या बाबींची विचारणा केली आहे. व याचा संबंध GST शी आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे केंद्रसरकारकडून नियमीतपणे राज्य सरकारांना दिल्या जात असलेल्या महसुलातील वाटा होय. वस्तू आणि सेवा कर कायदा अमलात आल्यापासून राज्यसरकारच्या महसुलाचे स्त्रोत कमी झालेत. यापूर्वी राज्य सरकारांना विक्री कर व नंतर VAT अबकारी कर या साधना पासून भरपूर कर प्राप्ती होत होती. आपआपल्या राज्यातील पायाभूत सोयीसुविधा करीता लागणारा निधी, राज्यसरकारद्वारे या मार्गाने प्राप्त करीत असे. परंतू GST च्या अंमलबजावनीनंतर सरकारचे प्राप्त आर्थिक स्त्रोत कायमचे बंद झालेत. अन्य सर्व कर कालबाह्य झाल्याने त्याची जागा GST कररचनेद्वारा व्यापल्या गेली. वस्तू आणि सेवा कर हा सर्वसमावेशक असल्याने त्यात अनेक करांचा अंतर्भाव होतो. व हा पूर्णपणे केंद्रशासीत कर होय. आणि त्याचा परिणाम GST कराद्वारे जी रक्कम प्राप्त होते ती संपूर्णता केंद्र शासनाकडे जमा होते. व केंद्राद्वारे राज्यसरकारांना त्याचे वितरण केले जाते म्हणून ही करप्रणाली संघराज्रीय व्यवस्था असलेल्या देशात उपयोगात आणलेली नाही. कारण घटनेद्वारा राज्य सरकारांना कर गोळा करण्याचे अधिकार या प्रणालीतून समाप्त होतात. म्हणून अमेरीका सरकारने ही प्रणाली स्विकारली नाही. असे असले तरी भारताच्या संदर्भात लक्षात घेण्यासारखे म्हणजे नविन करप्रणाली GST आणि राज्यांचा महसूल यामध्ये संतुलन साधणे महत्वाचे होय. आजतागायत केंद्राकडून राज्यांना दिला जाणारा त्यांचा आर्थिक वाटा महिण्याच्या सुरुवातीला देण्यात येते. राज्य सरकार यातून कर्मचाऱ्यांचे वेतन, व्याजापोटी द्यावयाची रक्कम, अन्य बाबींवरील खर्च यातूनच पूर्ण केले जात असे. परंतू ही देय रक्कम आता केंद्राद्वारे राज्यांना महिन्याच्या पंधरा तारखेनंतर देय होणार आहे. मार्च नंतर मात्र हे शोधन राज्य सरकारांना तिन महिण्यानंतर देय होईल. म्हणजेच GST द्वारा प्राप्त झालेला महसूल सर्वच राज्यांना तिन महिन्यानंतर देण्यात येईल. या निर्णयामुळे देशातील सर्वच राज्य सरकारे अडचणीत आली आहे. मागील वर्षी केंद्राकडून राज्यास दिल्या जाणाऱ्या महसूलात मोठ्या प्रमाणात वाढ केली केंद्राने एकत्रीत केलेल्या एकूण करातील 32 टक्के वाटा राज्यांना दिला जात होता आता तो 42 टक्के इतका दिला जातो. यालाच सरकारी संघ राज्य व्यवस्था असे म्हणून संबोधल्या गेले होते. एवढा निधी वाटून दिल्यावरही राज्य सरकारांची आर्थिक स्थिती मजबुत होयील असे वाटत नाही. विक्रीकर संपल्या नंतर VAT GST मध्ये समाविष्ट झाला अबकारी करात घट झाली पेट्रोल, डिझेल पासून मिळणारा कर कमी करण्यात येत आहे. तर संपूर्ण ठिकाणाहून मागणी येत आहे की पेट्रोल, डिझेल यांचाही समावेश GST मध्ये करावा असे झाल्यास राज्य सरकार समोर मोठ्या प्रमाणावर आर्थिक प्रश्न निर्माण होयील राज्यांची हलाखीची स्थिती निर्माण झाल्यास पुन्हा एकदा वस्तू आणि सेवा कराच्या रचनेत दुरुस्तीचा विचार केंद्र सरकारला करावा लागेल. GST मध्ये आतापर्यंत कायद्याच्या चौकटी बदलविल्या गेल्या आहेत प्रत्येक बदलानंतर संगणक प्रणाली ते करआकारणी यात प्रत्येक संबंधितास सुधारणा कराव्या लागलेल्या आहेत. अशाप्रकारची आजपर्यंतची GST प्रणाली कार्यान्वीत होत आहे. GST प्रणाली अंतर्गत धोरणातील स्थिरता असणे अधिक महत्वाचे आहे. कारण रोज GST दरातील धोरण व कर दर यांच्या रचनेमध्ये बदल होत असेल तर शेवटी जनतेच्या विश्वासाचाही प्रश्न महत्वपूर्ण ठरेल. म्हणून करविषय मार्गदर्शक तत्वे किंवा करसंरचनानिश्चित करीत असतांना जी वापरावयाची (Principles of Cannon) आहे त्याची अमलबजावणी गरजेचे आहे. तरच वापरात येणारी कोणतीही कर प्रणाली आदर्श ठरू शकेल.

सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम श्रमप्रधान उपक्रम असुन या उपक्रमांमध्ये रोजगार निर्मितीची क्षमता सर्वाधिक आहे. याक्षेत्रातील रोजगार सरासरीने दरवर्षी 16.13 टक्यांनी वाढला आहे. एकूण वाढ 96.81 टक्के इतकी झाली आहे. 2012-13 या वर्षापर्यंत महाराष्ट्र राज्यात 21,55,215, लोकांना या उपक्रमांनी रोजगार पुरवला आहे.

<u>निष्कर्ष</u> :- महाराष्ट्रा सारख्या औद्योगिक दृष्ट्या प्रगत राज्याला सुक्ष्म, लघु आणि मध्यम उपक्रम क्षेत्राच्या बाबतीत तामिलनाडू या राज्याप्रमाणे किंवा त्याहून चांगली प्रगती करणे शक्य आहे. त्यासाठी सरकारी, प्रशासकीय व लोकांच्या पातळीवर इच्छा शक्तीची गरज आहे.

या क्षेत्रातील उपक्रमांची संख्या, वाढती गुंतवणूक व रोज... यांची स्थिती बघता या क्षेत्रात महाराष्ट्र राज्याची स्थिती चांगली आहे. ... तुलनात्मकदृष्टया अभ्यास केला असता. तामिलनाडू 20.85 ट... उत्तरप्रदेश 14.72 टक्के, गुजरात 11.87 टक्के तर महाराष्ट्रात 5... टक्के उपक्रमांच्या संख्येतील वाढ महाराष्ट्र बराच मागे आहे हे ... करतो.

### 3. राज्याच्या रोजगारविषयक समस्या :

मोठया उद्योगातून मोठयाप्रमाणावर रोजगार निर्मीती होते ... आशावाद प्रत्यक्षात मात्र ओद्योगिकीकरण आणि झोपडपट्टी निर्मीती... अपरिहार्यता या स्वरुपात समोर आला आहे. जिथे उद्योग-तिथे झोपडप... हे चित्र निश्चितच सुखावह नाही. आपल्या उद्योगात कार्यकरणाऱ्या... जीवनमान उद्योगाच्या विकासासोबतच उंचावयास पाहिजे. तरच उत्पन्ना... न्यायपूर्ण वितरण झाले असे म्हणता येते. प्रत्यक्षात, मालक, प्रशास... व्यवस्थापक कर्मचारी व श्रमिक यांच्यात औद्योगिक उत्पन्नाचे वितर... न्यायपूर्ण झालेले दिसुन येत नाही. श्रमिक हा एक मानवीय घटक आ... त्यालाही त्याचे जीवनमान उंचावण्याचा हक्क आहे याचा उद्योगांना विस... पडलेला दिसून येतो ही मोठया उद्योगांच्या संदर्भात निर्माण झाले... महत्वपूर्ण समस्या आहे. शिवाय यंत्रसामग्रीचा महत्तम उपयोग हा... रोजगार निर्मितीच्या संदर्भात महत्वपूर्ण अडथळा असून तो दूर करण्या... आलेले अपयश हि पण एक समस्या आहे. औद्योगिक प्रदुषण हा अत्य... काळजीचा विषय असून पर्यावरण, आरोग्य, पाणी यांच्या समस्यांच... निर्माण झाल्या आहे. जितक्या लोकांना रोजगार-उपलब्ध झाला आ... त्यांच्या अनेक पट लोकांना प्रदुषणाचा सामना करावा लागत आ... श्रमिकांना त्यांच्या कामाचा कमीत-कमी मोबदला दिला जातो. परिणा... तो आपल्या कुटूंबाच्या प्राथमिक गरजाही पूर्ण करु शकत नाही. अन्न आ... तर निवारा नाही निवारा आहे तर वस्त्र नाही अशी परिस्थीती असले... कामगार सर्वत्र दिसून येतात. उद्योगांनीच त्यांची काळजी घेणे गरजे... आहे. कामाचा मोबदला आणि मानवीय सन्मान श्रमिकांना मिळायला... पाहिजे. पदोपदी अपमान, दूर्लक्ष, अन्याय यांचा श्रमिकांना होणारा त्रा... दूर करणे ही त्यांची गरज आहे. ती अजूनही दूर झालेली नाही ही समस्... आहे. श्रमिकांचे स्थलांतरण ही देखील उद्योगांची समस्या आ... स्थलांतरणामुळे श्रमिकांच्या आयुष्यात स्थिरता येत नाही याचा परिणा... त्यांच्या मुलांच्या शिक्षणावर प्रामुख्याने होतो शिवाय प्रत्येक ठिक... नव्याने सर्व गरजा पूर्ण करण्यात अडचणी येतात. उद्योगातून श्रमिकां... कुंटुबातील एखाद्यालाच रोजगार मिळतो. इतर काम करण्यास इच्छु... असणाऱ्यांना रोजगाराची उपलब्धता नसते. शिवाय छोटया... कारणावरुनही श्रमिकांचे काम काढुन घेण्यात येते व त्यांच्या बेरोजगारी... वाढ होते. या सर्व प्रमुख समस्या औद्योगीकीकरणामुळे निर्माण झाले... आहेत. या समस्या दूर करणे ही काळाची गरज असून त्याबद्द... जागरुकता निर्माण करण्याचे कार्य हळूहळू सुरु आहे. त्याला वेग देण्या... आवश्यकता आहे.



Scanned by CamScanner

निष्कर्ष :- कमीत-कमी खर्चात औद्योगिक उत्पादन घेण्याचे प्रत्येक उद्योजकाचे लक्ष असते. आपल्या उत्पादनाच्या किमतीचे निर्धारण करतांना सगळ्यांचा विचार उत्पादक करित असतो सरकारलाही त्यांनी निर्धारित केलेला कर विक्री किमतीत समाविष्ट करण्याची त्याची तयारी असते. श्रमिकाला मात्र कमीत-कमी मोबदल्यावर नियुक्त केले जाते. श्रमिकाच्या या परिश्रमात त्यांच्या कुटुंबाचा किमान उदरनिर्वाह तरी नीट होतो का याचा विचार केला जात नाही. नफ्याचा एक छोटासा हिस्सा त्यांच्याकरिता बाजूला काढून त्यांना दर तीन महिन्यानंतर प्रदान केल्यास ह्या समस्यांवर नियंत्रण ठेवता येते.

**4. राज्यातील रोजगार :-**

देशात आर्थिकदृष्ट्या प्रगतीशील राज्य म्हणुन महाराष्ट्राला ओळखले जाते. राज्यातील औद्योगिक क्षेत्राबरोबरच कृषी आणि सेवाक्षेत्रांची झालेली प्रगती राज्याचे राष्ट्रीयपातळीवरील प्रमुख स्थान टिकविण्याकरीता महत्वपूर्ण राहिली आहे.

स्थूल देशांतर्गत उत्पन्नामध्ये राज्याचा 15 टक्केच्या आसपास वाटा राहिलेला आहे. राज्याची वस्तूनिर्माण क्षेत्राची राष्ट्रीयस्तरावरील कामगिरी उल्लेखनीय स्वरुपाची आहे. राज्याच्या वस्तु निर्माण क्षेत्रातील मुलवृध्दीचा राष्ट्रीयस्तरावरील वाटा 23 टक्यांच्या आसपास आहे. या क्षेत्रातील एकूण रोजगाराच्या संदर्भात राज्याचा वाटा 15 टक्यापेक्षा जास्त आहे.

देशाच्या परदेशीय गुंतवणुकीत सर्वाधिक गुंतवणूक महाराष्ट्र राज्यात झाली आहे. देशातील एकूण गुंतवणूकीच्या 23 टक्के इतके याचे प्रमाण आहे. सहकार क्षेत्रातही जवळपास 2.24लाख सहकारी संस्थांचे योगदान राहिले आहे.

**1 मे 1960 रोजी संयुक्त महाराष्ट्राची स्थापना झाली.**

त्यानंतरच खऱ्या अर्थाने राज्याच्या विकासाला अपेक्षित गती मिळाली स्वातंत्र्यपूर्व काळापासुनच महाराष्ट्राला औद्योगिकरणाची पार्श्वभूमी असल्यामुळे उद्योग क्षेत्राचे राज्याच्या आर्थिक विकासात महत्वपूर्ण स्थान राहिले आहे. उद्योगाच्या विकासामुळे कृषी व सेवाक्षेत्राच्या विकासाला चालना मिळाली तर उद्योगधंद्याच्या विकासामध्ये कृषी व सेवाक्षेत्राचे योगदान महत्वपूर्ण राहिले आहे.

राज्याच्या अर्थव्यवस्थेचा मागोवा घेतला असता संयुक्त महाराष्ट्राच्या स्थापनेपासुन आजपर्यंत राज्याच्या अर्थव्यवस्थेत अमुलाग्र स्वरुपाचे बदल झालेले आहे. स्थूल राज्य उत्पन्न, लोकसंख्या, उत्पादन, रोजगार गुंतवणूक, दरडोई उत्पन्न यात झालेले संक्रमण अभ्यासने तेवढेच महत्वाचे आहे.

स्थूल राज्य उत्पन्न 9,82,452, कोटी रुपयापर्यंत वाढले आहे.

1991 नंतरच्या काळात उद्योग क्षेत्राचा स्थूल राज्य उत्पन्नातील वाटा कमी झालेला आहे.

मानव विकास निर्देशाकांच्या संदर्भात भारताची कामगिरी निराशाजनक असली तरी महाराष्ट्रराज्याची कामगिरी निश्चितच समाधानकारक राहिलेली आहे.

' राज्याच्या दरडोई उत्पन्नात वाढझाली आहे.

' राज्यातील साक्षरता [illegible]

' राज्यातील आयुर्मान 70.5 इतके आहे.

' राज्यातील मृत्युदर 92 वरुन 28 पर्यंत कमी झाला आहे.

' राज्यात आरोग्य सेवेचा विस्तार झाला आहे.

' दारिद्रय निर्मूलनात सरकारी पातळीवरील धोरणांना यश प्राप्त झाले आहे. दारिद्रयाच्या प्रमाणात 53 टक्यावरुन 24.5 % पर्यंत घट झाली आहे.

' देशातील एकूण रोजगारात महाराष्ट्राचा वाटा महत्वपूर्ण आहे.

' औद्योगीकीकरणा सोबत सेवा व कृषीक्षेत्रांचाही विकास घडुन आलेला आहे.

' या विकासामुळे राज्यात रोजगाराच्या संधीत वाढझाली आहे. होत आहे.

' आजही कृषीक्षेत्रात सर्वाधिक रोजगार उपलब्ध आहे.

' कृषी क्षेत्राचा रोजगारामध्ये 51.4 टक्के सेवाक्षेत्राचा 30.6 टक्के औद्योगिक क्षेत्राचा 18.0 टक्के वाटा राहिला आहे.

महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील रोजगाराचा उद्योगनिहाय रचनेमध्ये महत्वपूर्ण संक्रमण झाले आहे. वस्तुनिर्माण क्षेत्रातील उद्योगांचे ग्राहक वस्तु दुय्यम वस्तू आणि भांडवली वस्तू अशा तीन वर्गामध्ये वर्गीकरण केले जाते या वर्गीकरणानुसार 1971 साली राज्यातील औद्योगिक क्षेत्रातील एकूण रोजगारात 53.3% टक्केवाटा ग्राहक वस्तु उद्योगाचा होता. दुय्यम वस्तू उद्योगाचा 24.4 % आणि भांडवली वस्तु उद्योगाचा वाटा 21.1 % इतका होता. 1991 साली अनुक्रमे 38.8, 29.3 व 23.2 % असे हे प्रमाण होते. 2010 साली हेच प्रमाण 29.7, 36.3, आणि 26 होते.

<u>निष्कर्ष</u> :- यावरुन ग्राहक वस्तु उद्योगाचा रोजगारातील वाटा कमी होतांना दुय्यम आणि भांडवली वस्तू उद्योगाचा वाटा वाढलेला दिसून येतो. थोडक्यात याचा अर्थ असा होतो की, ग्राहकवस्तू उद्योगात भांडवलप्रधान तंत्राचावापर वाढत असून दुय्यम आणि भांडवली उद्योगात श्रमप्रधान तंत्राचा वापर वाढत आहे. महाराष्ट्राच्या उद्योग क्षेत्रातील रोजगाराच्या रचनेत झालेले हे संक्रमण महत्वपूर्ण आहे. राज्यातील औद्योगिकक्षेत्राच्या मोठ्याप्रमाणात होत असलेल्या विस्ताराबरोबरच राज्यात रोजगाराच्या संधीत वाढ होत असली तरी राष्ट्रीय पातळीवरील औद्योगिक क्षेत्रातील एकूण रोजगारातील राज्याचा वाटा वाढत आहे. मात्र त्याचवेळी राज्यातील उद्योग क्षेत्रातील उत्पादन तंत्रामध्ये झालेल्या बदलामुळे रोजगारात अपेक्षित वाढझालेली नाही हेही लक्षात घेतले पाहिजे.

<u>समारोपिय निष्कर्ष</u> :-

राज्याच्या एकीकडे स्थूल राज्य उत्पन्नाच्या रचनेमध्ये झालेला बदल सकारात्मक असला तरी स्थूल राज्य उत्पादनातील बदल रोजगार निर्मितीच्या दृष्टीने रुपांतरीत झालेला नाही.

दुसरीकडे राज्यातील दरडोई उत्पन्नात लक्षणीय वाढझाली असली तरी राज्यातील आर्थिक विषमता मात्र वाढलेली आहे.

राज्यातील दारिद्रय रेषेखालील लोकांचे प्रमाण घटले असले तरी दारिद्रय रेषेखालील लोकांच्या प्रत्यक्ष संख्येमध्ये अपेक्षित घट झालेली नाही.

Scanned by CamScanner

राज्यात सर्वाधिक परकीय गुंतवणुक होत असून राज्याच्या औद्योगिक विकासामध्ये महत्वाची भूमिका बजावत आहे.

दुसरीकडे राज्यातील औद्योगिक गुंतवणुकीमध्ये वाढ होत असली तरी त्यामुळे राज्यातील औद्योगिक रोजगारामध्ये अपेक्षित वाढझालेली नाही.

प्रस्तुत निबंधाचा शेवट करतांना ऐवढेच लक्षात आणून द्यावेसे वाटते की, महाराष्ट्रातील केवळ औद्योगिकीकरण राज्याला रोजगार उपलब्ध करुन देण्यास असमर्थ आहे. औद्योगीकीकरणाच्या समस्या सातत्याने वाढत आहे. रोजगार निर्मिती साठी स्वयंरोजगाराचा अधिकाधिक वापर राज्यात झाल्यास रोजगाराच्या समस्येची तिव्रता निश्चितपणे कमी होउ शकते.

धन्यवाद !

संदर्भ सूची :-

1) इकॉनॉमीक सर्व्हे ऑफ महाराष्ट्र, डायरेक्टरेट ऑफ स्टॅटीक्सटीकल ॲन्ड इकॉनॉमिक्स गव्हर्मेन्ट ऑफ महाराष्ट्र.

2) महाराष्ट्राच्या अर्थव्यवस्थेतील संक्रमण : एक मागोवा माधव शिंदे, अर्थशास्त्र विभाग, अहमदनगर महाविद्यालय.

3) एम्लॉयमेन्ट सिनेरिओ इन महाराष्ट्र- ॲन ओव्हरव्यूव सुरुची मिश्रा, रिसर्च असोसिएट, सिंबॉसिस स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स पुणे.

Wishing you a very happy & Prosperous new year

VILAS D. RAUT



Advocate

Mob.: 982203382

E-mail: vdraut@yahoo.com

Res.: RH-32, Nirmal Nagri, Nagpur

off.: T-2, Uttkasrsh Chitra Apartmet, Civil Line, Nagpur

विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक मंडळ,

नागपूर द्वारा आयोजित द्वैवार्षिक चर्चा सत्र २०१७ ला **हार्दिक शुभेच्छा !**



**प्रा. भाष्कर मेश्राम**

पी. डब्ल्यु. एस. महाविद्यालय नागपूर

स्मृती प्रित्यर्थ :- श्रीमती ज्योत्सना मेश्राम, चेतन मेश्राम, आनंद मेश्राम

Scanned by CamScanner

# महाराष्ट्रातील सिमेंट उद्योगातील रोजगार व समस्या

**प्रा. आशिष रा. दरेकर**
एम.ए. (अर्थशास्त्र, सहकार)
एम.एड्., जी.डी.सी.ए.
मो. 9922930133

भारत हा जगातील चिननंतर दुसऱ्या क्रमांकाचा सिमेंट उत्पादक देश आहे. भारतातील सिमेंट उद्योग सुमारे दहा लक्ष लोकांना प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष रोजगार पुरवते. भारतात सिमेंट उद्योगांत मोठी गुंतवणूक असून या उद्योगांनी परदेशी गुंतवणूकदारांना सुध्दा आकर्षित केले आहेत. भारतासारख्या विकसनशिल देशात सिमेंट उद्योग अतिशय महत्वाची भूमिका बजावत आहे. त्यामुळे देशाच्या आर्थिक विकासात मोठी भर पडत आहे. केंद्र सरकारने देशातील प्रमुख 98 स्मार्ट शहरांचा विकास हाती घेतला असल्याने सिमेंट उद्योग व उद्योगांतील रोजगाराला गती मिळणार आहे. शासकीय प्रकल्प पुर्ण करण्यासाठी 2015 पर्यंत दरवर्षी 550-600 दशलक्ष टन अशाप्रकारे पुढील चार-पाच वर्षात 45 दशलक्ष टन सिमेंट अपेक्षित आहे. सिमेंट उद्योग हा भारतातील सर्वात प्रगत उद्योग मानला जातो.

महाराष्ट्र सिमेंटचा सर्वात मोठा ग्राहक असून आंध्रप्रदेश, राजस्थान, कर्नाटक, मध्यप्रदेश, गुजरात आणि केरळ ही भारतातील सर्वात मोठी सिमेंट राज्य आहेत. महाराष्ट्र राज्यातील नागपूर विभागातील चंद्रपूर हा एक जिल्हा आहे. पूर्वी हा 'चांदा' म्हणून ओळखला जात होता. इ.स. 1964 मध्ये या जिल्हाचे चंद्रपूर असे नामकरण करण्यात आले. चंद्रपूर हा भारतातील सर्वात मोठा जिल्हा होता. चंद्रपूर जिल्हाची विभागणी करून आता नव्याने गडचिरोली जिल्हाची निर्मिती करण्यात आली.

विदर्भातील चंद्रपूर जिल्हा सिमेंटसाठी प्रसिध्द आहे. कारण हा जिल्हा सिमेंट उत्पादनासाठी पुरक आहे. जिल्हात सिमेंट उत्पादनासाठी लागणारे चुनखडीचा ल्पउमेजवदमद्ध साठा खुप मोठ्याप्रमाणात आहे. तसेच इरई, अंमलनाला, पकडीगड्डम यासारख्या धरणांमुळे व पैनगंगा आणि वर्धा नदीच्या वास्तव्यामुळे सिमेंट कंपन्यांना उत्पादनासाठी आणखी पुरक वातावरण तयार झाले आहे. तसेच जिल्हात कोळशाचा अफाट साठा आहे. आशिया खंडातील सर्वात मोठे थर्मल पॉवर प्लांट चंद्रपुरात उभे असून महाराष्ट्रात सर्वात जास्त सिमेंट कारखाने चंद्रपूर जिल्हात उभे आहेत.

**रोजगारात वाढ**

चंद्रपूर जिल्हात एकट्या कोरपना तालुक्यात चार सिमेंट कारखाने आहेत. त्यात अल्ट्राटेक सिमेंट कारखाना आवारपूर, माणिकगड सिमेंट कारखाना गडचांदूर, अंबुजा सिमेंट कारखाना उपरवाही व मुरली अॅग्रो सिमेंट कारखाना, नारंडा इत्यादीचा समावेश आहे. तसेच चंद्रपूर तालुक्यात घुग्गुस येथे एसीसी सिमेंट हा कारखाना उभा आहे. या कारखान्यांच्या अस्तीत्वामुळे येथील लोकांच्या रोजगाराच्या संधीत मोठ्याप्रमाणात वाढ झाली आहे. अनेक प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना नोकऱ्या प्राप्त झाल्याने त्यांच्या राहणीमानाच्या दर्जात सुधारणा झाली आहे.

सिमेंट उद्योगांनी विशेषतः ग्रामिण व दुर्गम भागात सिमेंट उद्योग उभारून लोकांना रोजगार मिळवून दिलेला आहे. तसेच सहजतेने सिमेंट उपलब्ध होतील अशी व्यवस्था निर्माण करून दिली आहे. सिमेंट कंपन्यांनी लोकांना रोजगार उपलब्ध करून दिल्याने कंपनी परिसरातील लोकांच्या दरडोई उत्पन्नात वाढ झाली आहे. 1980 पुर्वी सद्याच्या सिमेंट कंपन्यांचा संपूर्ण परिसर जंगलसदृष्य होता. त्यावेळी वाहतुकीची व्यवस्था नव्हती. मात्र जसजसे जिल्हात सिमेंट कंपन्यांचे औद्योगिकरण झाले तसतसा रोजगार वाढत गेला. शेतीव्यवसायासोबतच नोकरी करण्याची संधी कंपनी परिसरातील लोकांना मिळाली. जेथे जंगल होते अशा ठिकाणी आता औद्योगिक वस्त्या उभ्या राहिल्या आहे.

अनेक परराज्यातील लोक सुध्दा रोजगाराची संधी शोधत कारखाना परिसरात स्थायी झाले. त्यामुळे कारखाना परिसरातील लोकसंख्येत झपाट्याने वाढ होत गेली. औद्योगिकरणामुळे सिमेंट कंपन्यांमध्ये लोकांना रोजगार मिळाला. एवढेच नाही तर बहुसंख्य लोकांना इतर रोजगाराच्या संधी प्राप्त झाल्या. शेती व्यवसाय, दुग्ध व्यवसाय, हॉटेल, वाहतूक, छोटे उद्योगधंदे, लघु व कुटीर उद्योग तसेच विविध व्यवसायाला ग्राहक मिळू लागले. खेड्याचे रुपांतर शहरीकरणात झाले. चंद्रपूर जिल्हात पाचही सिमेंट कंपन्यांमध्ये रोजगार मिळालेल्या लोकांची संख्या बघीतल्यास 3000 च्या आसपास आहेत.

**महाराष्ट्रातील एकूण सिमेंट उद्योग**

अंबुजा सिमेंट कारखाना उपरवाही, माणिकगड सिमेंट कारखाना गडचांदूर, एसीसी सिमेंट कारखाना घुग्गुस, हैदलबर्ग सिमेंट कारखाना रायगड, जे.एस.डब्लू. सिमेंट कारखाना, ओरियंट सिमेंट कारखाना जळगाव, मुरली अॅग्रो सिमेंट कारखाना नारंडा, रिलायंस सिमेंट कंपनी, द इंडिया सिमेंट लिमिटेड परळी, अल्ट्राटेक सिमेंट कारखाना आवारपूर, अल्ट्राटेक सिमेंट कारखाना, होतगी, अल्ट्राटेक सिमेंट कारखाना, रत्नगीरी असे एकूण 12 सिमेंट कारखाने महाराष्ट्रात असून या कारखान्यांनी जवळपास 7000 (सात हजार) लोकांना रोजगार प्राप्त करून



Scanned by CamScanner

दिला आहे.

**सिमेंट कारखान्यांसमोरील समस्या**

**1) चुनखडीची कमतरता**

गेल्या 30-35 वर्षापासून सिमेंट उद्योग सुरू असून उद्योगांना आत चुनखडीची कमतरता जाणवू लागली आहे. उत्पादनाच्या अत्याधुनिक तंत्रांमुळे सरासरी उत्पादनात वाढ होत असताना चुनखडीच्या खदाणी कमी पडू लागल्या आहे. त्यामुळे सिमेंट कंपन्यांची डोकेदुखी वाढली असून अनेक कंपन्या चुनखडीचा शोध घेत आहे. अशावेळी कंपन्यांना उद्योगांपासून दूरवर जरी खदान मिळाली तरी तेथून दळणवळण करण्यास कंपन्या तयार आहेत.

**2) अपुरा कोळसा**

सिमेंट उद्योग खनिज संपत्तीवर अवलंबून आहे. कोळसा हा सिमेंट तयार करण्यासाठी लागणारा महत्वाचा घटक आहे.अनेक उद्योगांना कोळशाची समस्या सुध्दा उद्भवतात. त्यामुळे उत्पादकतेवर प्रतिकुल परिणाम होतो.

**3) वीजेची समस्या**

उद्योग म्हटले की वीजेला फार महत्व आहे. अनेक उद्योगांसमोर वीज निर्मिती करणे हे एक मोठे आव्हान असते. अनेक उद्योगांनी स्वताःच पॉवर प्लांट उभारून वीज निर्मिती सुरु केली आहे.

**4) कामगार सुरक्षा**

कामगारांच्या सुरक्षेबाबत सिमेंट उद्योगात खुप मोठ्याप्रमाणात जनजागृती केली जातात. सेफ्टी बेल्ट, सेफ्टी शुज, हेलमेट अशा अनेक सुविधा पुरविण्यात येतात. मात्र कामगार स्वतःच्या सुरक्षेच्या बाबतीत पाहिजे तेवढे जागृत नसल्याने अनेकदा उद्योगात अपघात घडून येतात. उद्योगांसाठी कामगार सुरक्षा एक समस्या बनली आहे.

**5) कामगार संघटना व टाळेबंद**

उद्योगांसाठी कामगार संघटना डोकेदुखी ठरतात. आपल्या मागण्या पूर्ण करून घेण्यासाठी कामगार संघटना अनेकदा टाळेबंद आंदोलन करून उद्योग बंद पाडतात. यामुळे सिमेंट कंपन्यांना मोठी नुकसान सहन करावी लागतात.

**S सिमेंट कारखान्यांमुळे निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या**

**1) जड वाहतुकीमुळे रस्त्यांची दुरवस्था**

सिमेंट कंपन्यांच्या उत्पादनामुळे कंपनीला फायदा होतो. तसेच शासनाला सुध्दा कराच्या माध्यमातून मोठ्याप्रमाणात महसुल मिळतो. कारखाना क्षेत्रातील रस्ते मजबुत व दर्जेदार असणे आवश्यक असतात मात्र तसे चित्र दिसत नाही. उलट जड वाहतूकीमुळे सिमेंट उद्योगाच्या परिसरातील रस्त्यांची दयनिय अवस्था असल्याचे दिसते. त्यामुळे नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते.

**2) पर्यावरणाचा ऱ्हास**

केंद्र व महाराष्ट्र शासनाने ज्या-ज्या ठिकाणी कारखाने विकसीत होत आहे. त्या-त्या ठिकाणी पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने अनेक कायदे व नियमावली तयार केलेली आहेत. मात्र सिमेंट उद्योगांकडून शासनाच्या नियमांची मोठ्याप्रमाणात पायमल्ली होत आहे. पर्यावरणीय समस्या निर्माण होऊन नागरीक, जनावरे व सजिवांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे.

**3) सामाजिक ऋण निधीबाबत अस्पष्टता**

एकुण नफ्याच्या 5 टक्के निधी हा प्रकल्पग्रस्त गावातील सोयी-सुविधांवर खर्च करण्यात यावा यासाठी उद्योगांचा सामाजिक ऋण निधी असतो. कंपन्यांकडून जो सामाजिक ऋण निधी खर्च करण्यात येतो त्यात अस्पष्टता आहे. गावातील पुढारी व पदाधिकाऱ्यांना कंपनीच्या नफ्याबाबत पुरेशी माहिती मिळत नसल्याने आपल्या गावासाठी कंपन्यांनी किती रुपये खर्च करावे याबाबत ते अनभिज्ञ असतात.

**4) जिथे उद्योग तिथे प्रदुषण**

ज्या-ज्या ठिकाणी सिमेंट उद्योग उभारण्यात आले आहेत त्या ठिकाणी प्रदुषणाची भिषण समस्या आहेत. सिमेंट उद्योग कारखान्यांतून निघणारा विषारी धूर यामुळे वायु प्रदुषणात कमालीची वाढ झाली असून लोकांच्या सरासरी आयुर्मानात घट झाल्याचे निदर्शनास आले आहे.

**5) शेती पिकांवर विपरीत परिणाम**

सिमेंटचा धूर शेतातील पिकांवर बसतो. पिकांवर बसलेल्या धुळीमुळे पिकांपासून मिळणाऱ्या उत्पादनाच्या सरासरीमध्ये घट झाली आहे. कंपन्यांच्या डस्टचा पिकांवर होणारा विपरीत परिणाम यामुळे औद्योगिक क्षेत्रातील शेतकरी हैरान झाले आहे. औद्योगिक क्षेत्रातील शेतकऱ्यांना शासनाने विशेष मदत देणे आवश्यक झाले आहे.


विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक संघ
नागपूर द्वारा आयोजित द्वैवार्षिक चर्चा सत्र २०१७
हार्दिक शुभेच्छा !
न्यु. इंग्लीश हायस्कूल
कनिष्ठ व एम.सी.व्ही.सी. महाविद्यालय
चिटणीस पार्क, नागपूर



महेंद्र आर. ऐ. वाट
मुख्याध्यापक


Scanned by CamScanner

# महाराष्ट्रातील औद्योगिकरण रोजगार व समस्या

डॉ. अशोक गव्हाळकर
मुख्याध्यापक/प्राचार्य
रावसाहेब ठवरे कनिष्ठ महा., नागपूर
मोबा.नं.: 8087299329

**प्रस्तावना :-**

**आधुनिक उद्योगाची भारतात सुरवात :-** इसविसन 1853 साली भारतात रेल्वे युगाची सुरवात झाली. व त्याचवेळी लॉर्ड डलहौसीने सार्वजनिक बांधणी खात्याकडे रस्ते बांधण्याचे काम सोपविले. परंतु खऱ्या अर्थाने इसविसन 1890 नंतरच भारतात उद्योगाची सुरवात झाली. दुसऱ्या महायुध्दाच्या काळात (1939 ते 1945) इंग्लंड व युरोपकडील इतर देशांकडून व त्याचप्रमाणे जपानकडून केल्या जाणाऱ्या औद्योगिक वस्तुंची भारतातील आयात संपूर्णपणे थांबली व या युध्दजन्य परिस्थितीमुळे भारतातील विविध उद्योगांच्या विकासाला अनुकुल अशी परिस्थिति निर्माण झाली. इंग्लंडही दीर्घकाळ युध्दात गुंतल्यामुळे शस्त्रास्त्रे व दारूगोळा इत्यादी संरक्षण विषयक मालाच्या उत्पादनावर त्या देशाला आपले लक्ष केंद्रीत करावे लागले. वरील कारणामुळे दुसऱ्या महायुध्दाच्या काळात भारतातील विविध उद्योगांच्या विकासाला अनुकुल परिस्थिती प्राप्त झाली. जुन्या व नव्याने प्रस्तापीत झालेल्या उद्योगांचा विकास घडून आला. कापड, ताग, साखर, कागद, सिमेंट अभियांत्रिकी व रासायनिक उद्योगांचा भारतात बऱ्याच मोठ्या प्रमाणावर विकास घडून आला.

**महाराष्ट्रातील औद्योगिकरण व रोजगार :-**

स्वातंत्र्यानंतरच्या काळात संयुक्त महाराष्ट्र राज्याच्या लढ्यानंतर 1 मे 1960 रोजी महाराष्ट्र राज्याची निर्मिती झाली व महाराष्ट्र राज्याची राजधानी मुंबई बनली. महाराष्ट्र राज्य लोकसंख्येच्या बाबतीत भारतात तिसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. महाराष्ट्राचे 2016-2017 चे एकूण सकल उत्पादन(जी.डी.पी.) 25.35 लाख करोड आहे. तर महाराष्ट्र राज्याचा 2016-2017 चा आर्थिक वाढीचा दर 11.8 टक्के आहे. महाराष्ट्राच्या 2016-2017 च्या आर्थिक पाहणी अहवालानुसार दरडोई उत्पन्न 1,47,939/- रुपये आहे. महाराष्ट्राच्या एकूण सकल उत्पादनामध्ये विविध क्षेत्राचा हिस्सा खालीलप्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| शेती व्यवसाय | - | 10 टक्के |
| औद्योगिक उत्पादन | - | 26 टक्के |
| सेवा क्षेत्र | - | 64 टक्के |

यावर हे स्पष्ट होते की, महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासामध्ये सेवा क्षेत्राचा सहभाग सर्वात जास्त 64 टक्के आहे. तर शेती प्रमुख व्यवसाय असूनही हिस्सा सर्वात कमी केवळ 10 टक्के आहे. औद्योगिक उत्पादनाचा हिस्सा मध्यम प्रतीचा म्हणजेच 26 टक्के आहे.

महाराष्ट्र राज्याच्या श्रमशक्तीचा एकूण हिस्सा खालील प्रमाणे वापरला जात आहे.

| | | |
|---|---|---|
| शेती व्यवसाय | - | 51 टक्के |
| औद्योगिक उत्पादन | - | 09 टक्के |
| सेवा क्षेत्र | - | 40 टक्के |

वरील आकडयावरून हेच स्पष्ट होते की, महाराष्ट्राच्या एकूण श्रमशक्ती पैकी 51 टक्के हिस्सा शेती क्षेत्रात वापरला जातो परंतु शेती क्षेत्रातून सकल उत्पादनात प्राप्त होणारा हिस्सा केवळ 10 टक्के आहे. सेवा क्षेत्रात एकूण श्रमशक्तीचा 40 टक्के हिस्सा वापरला जातो व महाराष्ट्र एकूण सकल उत्पादनात 64 टक्के योगदान दिले जात आहे. तर औद्योगिक क्षेत्रात श्रमशक्ती वापर केवळ 9 टक्के होतो परंतु सकल उत्पादनात पडणारी भर 26 टक्के आहे. याचा अर्थ श्रमशक्तीचा जास्त वापर होऊनही शेती क्षेत्रात फार मोठा बदल दिसून येत नाही उलट औद्योगिक क्षेत्रात 9 टक्के श्रमशक्तीचा वापर करून उत्पादनात 26 टक्के वाढ होत आहे. हे जे राज्याच्या आर्थिक प्रगतीसाठी महत्वाचे आहे.



Scanned by CamScanner

महाराष्ट्र राज्याच्या 2016-2017 चा एकूण प्राप्त महसूल 2.45 लाख करोड असून (38 बिलीयन) होणारा खर्च 2.84 लाख करोड आहे. (44 बिलीयन) याचा अर्थ प्राप्त होणाऱ्या महसूलात होणाऱ्या खर्चापेक्षा 0.39 लाख करोड रूपयाची तूट पडत आहे. हे महाराष्ट्र राज्याच्या आर्थिक विकासाच्या दृष्टीने प्रतिकूल लक्षण आहे. मुंबईला आशिया खंडातील महाराष्ट्राचे सर्वात मोठे शेयर मार्केट आहे. बॉम्बे स्टॉक इक्सचेंज, याच बरोबर मोठे संगणक बाजार केंद्र असून पुणे, मुंबई, नवी मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, लातूर या शहराचा प्रामुख्याने समावेश होतो. 2016-2017 मध्ये एकूण महाराष्ट्र राज्याची निर्यात 18 हजार करोड रूपयाची असून ती भारताच्या एकूण निर्यातीच्या 30 टक्के एवढी आहे. महाराष्ट्रात औष्णिक वीज केंद्र व निक्युलियर विज केंद्राच्या माध्यमातून कारखान्यांना मोठ्या प्रमाणात पुरवठा केला जातो.

महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात शेतीक्षेत्र ज्यामध्ये आधुनिक काळात जाट्रोपाची शेती केली जाते. महाराष्ट्रात मोठे रस्ते, रेल्वे (भारताच्या विविध राज्यात जाणारे) यामुळे आर्थिक विकासाला हातभार लागतो. याचबरोबर महाराष्ट्रात आंतर्राष्ट्रीय दर्जाचे हवाईतळ सुध्दा आहे, ज्यामध्ये मुंबई येथील छत्रपती शिवाजी महाराज विमानतळ जगातील सर्वात जास्त व्यस्त असलेल्या रन-वे चे विमानतळ आहे.

**महाराष्ट्रातील उद्योग :-** भारताच्या विविध राज्यांपैकी उद्योगाच्या बाबतीत आघाडीवर असलेले महाराष्ट्र एक राज्य आहे. भारताच्या एकूण राष्ट्रीय औद्योगिक उत्पादनात 13 टक्के हिस्सा एकट्या महाराष्ट्राचा आहे. राष्ट्रीय उत्पन्नाच्या औद्योगिक उत्पादनात एकट्या महाराष्ट्रातून जवळपास 46 टक्के योगदान केल्या जाते. महाराष्ट्र राज्य भारतात आजही कापड उद्योगाच्या बाबतीत द्रितीय क्रमांकावर आहे. ज्यामध्ये सोलापूर, इचलकरंजी, मालेगांव, भिवंडी, मुंबई ही शहरे उत्पादनाची प्रमुख शहरे आहेत. मागील 34 वर्षापासून महाराष्ट्र राज्याचे सकल उत्पादन खालील प्रमाणे आहे.

महाराष्ट्र राज्य सकल उत्पादन दर्शक तक्ता

| उद्योग वर्षे | सकल उत्पादन (करोड रूपयात) |
|---|---|
| 1980 | 1,66,310 |
| 1985 | 2,96,160 |
| 1990 | 6,44,330 |
| 1995 | 15,78,180 |
| 2000 | 23,86,720 |
| 2005 | 37,59,150 |
| 2011 | 90,13,300 |
| 2014 | 1,68,66,900 |

वरील तक्यावरून हेच निदर्शनास येते की महाराष्ट्राच्या आर्थिक प्रगतीत व सकल उत्पादनात मागील वर्षापासून सतत वाढ होत गेली आहे.

महाराष्ट्राती निवडक उद्योग :-

1) **साखर उद्योग :-** महाराष्ट्राचा साखर उद्योग प्रामुख्याने सहकारी क्षेत्रावर आधारीत स्थापन झालेला आज भारताच्या एकूण साखर उत्पादनाच्या हिस्सामध्ये एकटा महाराष्ट्राचे एकूण उत्पादन 40 टक्के आहे.

याच बरोबर महाराष्ट्र अभियांत्रिकी अन्न प्रक्रिया उद्योग, प्लास्टिक उद्योग स्थापन झाले आहे. पुणे शहरात ऑटोमोबाईल क्षेत्राचे महाजाल परसलेले आहे. पुणे, नाशिक, औरंगाबाद आणि नागपूर या शहरामध्ये कापड उद्योग, रासायनिक उद्योग, विघुत यंत्र स्थापन झाले असून या उद्योगाच्या विकासात 1962 ला स्थापन झालेल्या एमआयडीसी क्षेत्राची महत्वाची भूमिका आहे.

2) **शेती उद्योग :-** महाराष्ट्राचा प्रमुख व्यवसाय शेती आहे परंतु महाराष्ट्रातील बहुसंख्य शेती निसर्गाच्या पाण्यावर अवलंबून असल्यामुळे कृषी क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांची संख्या मोठी असूनसुध्दा उत्पादन मात्र इतर राज्याच्या तुलनेत कमी आहे. महाराष्ट्रात पाणीपुरवठ्याच्या सोयीचा अभाव असून मोठी धरणे, कालवे पाहिजे त्या प्रमाणात बांधण्यात आले नाही. त्याचा परिणाम शेती क्षेत्रावर झालेला आहे तरीही पश्चिम महाराष्ट्र उसाच्या लागवडीबाबत संपुर्ण भारतात अग्रेसर आहे तर उर्वरित महाराष्ट्रात नगदी पिक म्हणून कापसाचे उत्पादन घेतले जाते.

3) **पर्यटन उद्योग :-** महाराष्ट्रात पर्यटन उद्योग हा आर्थिक विकासाला व औद्योगिकरणाला हातभार लावत आहे. यामध्ये मुंबई आणि पुणे शहर महत्वाची भूमिका बजावित आहे. भारताच्या आर्थिक क्षेत्रात मुंबई शहराची महत्वाची भूमिका आहे. एकट्या मुंबईतून 10 टक्के लोकांना उद्योग, रोजगार प्राप्त झाला असून 30 टक्के आयकर, 60 टक्के कस्टम ड्युटी, 40 टक्के हिस्सा विदेशी निर्यात यामधून भारतातला प्राप्त होतो.

4) **नागपूर विभाग :-** महाराष्ट्राच्या आर्थिक विकासात



Scanned by CamScanner

नागपूर शहराची महत्वाची भूमिका आहे. महाराष्ट्रातील हे तिसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर असून महाराष्ट्र राज्याची उपराजधानी आहे. नागपूर शहराच्या परिसर डब्ल्यू.सी.एल., मॉईल, ऑर्डीनन्स फॅक्टरी, सिंथेटीक उद्योग, दिनशॉ डेअरी उद्योग, व्ही.आय.पी. उद्योग, महिंद्रा ॲण्ड महिंद्रा, सनफ्लॅग आयर्न ॲण्ड स्टील इंडस्ट्री, लॉयड मेटल इंडस्ट्री तसेच मिहान उद्योगाने मोठ्या प्रमाणात रोजगार पुरविला आहे. परंतु या विभागाच्या लोकसंख्येच्या मानाने प्राप्त रोजगाराच्या संधी अपुऱ्या आहे.

**महाराष्ट्रातील रोजगार आणि समस्या :-**

महाराष्ट्र हे लोकसंख्येच्या दृष्टीनी तिसरे मोठे राज्य आहे. महाराष्ट्राला एकूण 3 लाख 8 हजार स्के.किलोमीटर भूभाग प्राप्त झालेला आहे. परंतु याच बरोबर महाराष्ट्र राज्याच्या लोकसंख्येची घनता प्रती चौरस किलोमीटर 385 इतकी जास्त आहे. महाराष्ट्र राज्याचे 25 टक्के योगदान औद्योगिक क्षेत्राला प्राप्त झालेले आहे. तरीही महाराष्ट्राच्या बेरोजगारीचा दर इतर राज्याच्या तुलनेत बराच जास्त आहे.

12 महिने किंवा त्यापेक्षा कमी काम प्राप्त होणाऱ्या मजुरांचा तक्ता

| क्षेत्र | 12 महिने काम | 6-11 महिने काम | 1-5 महिने काम | कोणत्याही प्रकारचे काम प्राप्त नाही |
|---|---|---|---|---|
| ग्रामीण | 55.3 | 42.7 | 0.4 | 1.7 |
| शहरी | 84.8 | 12.2 | 0.2 | 2.8 |
| ग्रामीण+ शहरी | 66.9 | 30.7 | 0.3 | 2.1 |

वरील तक्त्यावरून हेच दिसून येते की, महाराष्ट्रात 2013-14 या वर्षात 12 महिने काम प्राप्त होणाऱ्या मजुरांची शेकडा टक्केवारी सरासरी 67 टक्के आहे तर कोणताची रोजगार उपलब्ध न झालेल्या एकूण श्रमशक्तीपैकी लोकांची टक्के 2.1 टक्के आहे.

**15 ते 29 वयोगटात शैक्षणिक गुणवत्तेप्रमाणे रोजगार प्राप्त होणाऱ्या व्यक्तींची संख्या**

| शैक्षणिक वर्गीकरण | रोजगार प्राप्त | बेरोजगार | कामगार क्षेत्राबाहेर तरुण वर्ग |
|---|---|---|---|
| अशिक्षित | 55.1 | 0.3 | 44.6 |
| पूर्व माध्यमिक | 61.2 | 0.4 | 38.4 |
| माध्यमिक | 64.4 | 0.4 | 35.2 |
| उच्च माध्यमिक | 57.6 | 0.9 | 41.4 |
| माध्यमिक | 51.6 | 0.9 | 47.4 |
| उच्च माध्यमिक | 46.8 | 1.7 | 51.5 |
| प्रमाणपत्र (डिप्लोमा) | 51.2 | 3.8 | 45.0 |
| पदवीधर | 60.1 | 4.8 | 35.1 |
| पदवीधर + | 68.1 | 4.1 | 27.6 |

वरील तक्त्यावरून हेच निदर्शनास येते की, महाराष्ट्र राज्यात वाढत्या गुणवत्तेबरोबर बेरोजगारीचा प्रश्न वाढत जात आहे. 15 ते 29 वयोगटात ज्या लोकांनी रोजगाराची तयारी दर्शविली आहे. त्यापैकी उच्च माध्यमिक स्तरावर कार्यक्षेत्रात समाविष्ट न होणाऱ्या तरुणांची संख्या सर्वात जास्त 51.5 टक्के आहे. याचाच अर्थ बेरोजगारीच्या संख्येत वय 19 ते 29 या काळात वाढ झाल्याचे दिसून येते.

महाराष्ट्रातील जिल्हानिहाय कुटुंबातील एकूण व्यक्तीपैकी रोजगार उपलब्ध झालेल्या व्यक्तींचा संख्यादर्शक तक्ता :-

| जिल्हा | एकलाही रोजगार नाही | 1 व्यक्तीला रोजगार | 2 व्यक्तींला रोजगार | 3 व्यक्तीला रोजगार | 4 व्यक्ती+ रोजगार |
|---|---|---|---|---|---|
| नंदुरबार | 04 | 524 | 277 | 165 | 30 |
| धुळे | 32 | 530 | 383 | 55 | - |
| जळगांव | 69 | 538 | 290 | 78 | 25 |
| बुलढाणा | 04 | 565 | 328 | 65 | 38 |
| अकोला | 54 | 591 | 267 | 58 | 30 |
| वाशिम | - | 569 | 288 | 117 | 26 |
| अमरावती | 41 | 369 | 370 | 145 | 74 |
| वर्धा | 63 | 510 | 299 | 101 | 27 |
| नागपूर | 62 | 468 | 281 | 130 | 59 |
| भंडारा | 130 | 461 | 306 | 65 | 37 |
| गोंदिया | 45 | 504 | 242 | 134 | 74 |
| गडचिरोली | 55 | 554 | 253 | 82 | 57 |
| चंद्रपूर | 11 | 553 | 369 | 50 | 17 |
| यवतमाळ | 47 | 510 | 329 | 76 | 30 |
| रत्नागिरी | 195 | 554 | 169 | 33 | 49 |

टिप - आकडेवारील एकूण लोकसंख्या 1000 व्यक्ती यावर आधारीत आहे.

Source : Survey report for the state of Maharashtra 2013-14

वरील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे महाराष्ट्र राज्यातील काही निवडक जिल्ह्याच्या अभ्यासावर असे दिसून येते की, रत्नागिरी जिल्ह्यात सर्वात जास्त 19.5 टक्के कुटुंबातील एकाही व्यक्तीला रोजगार उपलब्ध झालेला नाही तर कमीत-कमी एका व्यक्तीला रोजगार प्राप्त झालेला जिल्हा अकोला आहे त्याची टक्केवारी 59.10 टक्के आहे. एका पेक्षा जास्त म्हणजेच दोन व्यक्तीला रोजगार प्राप्त होणारा जिल्हा धुळे आहे. त्याची टक्केवारी 38.3 टक्के आहे. तर एकाच कुटुंबातील 4 पेक्षा जास्त लोकांना रोजगार प्राप्त होणारा जिल्हा अमरावती व गोंदिया आहे. ज्यांची टक्केवारी 7.4 टक्के आहे. यावर हे स्पष्ट होते की, एखाद्या कुटुंबात एकाही व्यक्तीला रोजगार प्राप्त



Scanned by CamScanner

ोत नाही तर काही जिल्हयात एकाच कुटुंबात 4 पेक्षा जास्त लोकांना रोजगार प्राप्त होणारे जिल्हे आहे. यावरून रोजगाराच्या बाबतीत महाराष्ट्रात विषमता दिसून येते.

औद्योगिकरण व रोजगार समस्या :-

) महाराष्ट्रातील औद्योगिकरणात सर्वात मोठी समस्या भांडवल आहे. व भांडवलासाठी लागणारा पैसा उभा करणे उद्योगासाठी कठीण होत आहे.

) महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रातील रोजगार वाढीचा दर अल्प आहे.

) महाराष्ट्रातील सार्वजनिक क्षेत्र हे अकार्यक्षम आहे. त्यामध्ये व्यवस्थापन ही प्रमुख समस्या आहे.

) महाराष्ट्रातील प्रादेशिक असमानता औद्योगिकरणास मारक ठरत आहे.

) विदेशी कंपन्याच्या उत्पादनासाठी स्पर्धा करणे महाराष्ट्रातील उद्योगांना कठीण होत आहे.

रोजगार समस्या :-

) वाढत्या लोकसंख्येचे उग्र रूप बेरोजगारीच्या समस्येचे मूळ कारण आहे. त्यावर आळा बसावयास पाहिजे.

) महाराष्ट्रातील व एकूणच देशातील संपुर्ण शिक्षण व्यवस्थेतील पुस्तकी शिक्षण बेरोजगारीस कारणीभूत आहे. सामान्य शिक्षणासोबत एका व्यावसायिक शिक्षणाचा समावेश प्रत्यक्ष प्रात्यक्षिक तत्वावर समाविष्ट व्हावा.

3) मध्यम वर्गातील सुशिक्षीत तरूणांमध्ये शारिरीक श्रमांविषयी असलेली अनास्था, श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त झाल्याशिवाय बेरोजगारीचा प्रश्न सुटणार नाही.

4) सामान्य शिक्षणातील पदवी व पदव्युत्तरांची वाढ़ती संख्या त्या मानाने औद्योगिकरणाची मंद गती यामुळेच बेरोजगारीत वाढ होत आहे.

संदर्भग्रंथ :-


1. भारतीय अर्थ व्यवस्था - डॉ. सौ. निर्मला भालेराव ... मु. देसाई

2. महाराष्ट्र 2016, सरकारी प्रकाशन.

3. Employment Scenario in Maharashtra - overview - Suchi Banera Mishra4. Report District Level Estimates for the State of Maharashtra 2013-14 (Ministry of Labour and Employment Labour Bureau - Chandigarh)

5. दैनिक लोकसत्ता

6. दैनिक महाराष्ट्र टाईम्स.



नगर सुधार समिती

द्वारा संचालीत

भारतरत्न इंदिरा गांधी कनिष्ठ महा. कन्हान

यांच्या तर्फे

हार्दिक शुभेच्छा !

प्राचार्य

बि. जी. बोरकर


Scanned by CamScanner

# राज्याचे स्वतंत्र उद्योग धोरण

प्रा. एस. एन. मरस्कुले

राज्याच्या सर्वसमावेशक आणि वेगवान उद्योग विकासासाठी जागतिक बाजारपेठेस जोडणारे प्रत्येक जिल्ह्याचे वैशिष्ट्यपूर्ण आणि स्वतंत्र उद्योग धोरण

देशातले सर्वात प्रगत राज्य अशी जरी आजही महाराष्ट्राची ओळख असली तरी गेल्या काही वर्षांपासून राज्याची ही वाढ थांबली आहे. किंबहुना आपले राज्य अधोगतीकडे जाते की काय असा प्रश्न पडावा अशी परिस्थिती आज निर्माण झाली आहे. एका बाजुला नवीन उद्योगांना वाव मिळत नाही, आवश्यक तेवढया उत्तम दर्जाच्या पायाभूत सुविधा राज्य उभे करू शकलेले नाही, राज्यात होणारी गुंतवणूक घसरत आहे. तर दुसऱ्या बाजुला राज्यातच कमालीची विषमता आहे. प्रगत महाराष्ट्र म्हणतात तो केवळ मुंबई-पुणे आणि काही ठराविक टप्प्यातच आपल्याला दिसतो. उर्वरीत महाराष्ट्राला मुंबई-पुण्यासारखी प्रगती करता आलेली नाही कारण तिथे तसा जाणीवपूर्वक प्रयत्नच झाला नाही.

ही परिस्थिती बदलायला हवी. महाराष्ट्राच्या प्रत्येक जिल्ह्याचा, कानाकोपऱ्याचा विकास होईल हे पाहयला हवं.

## प्रश्नाचे स्वरूप

महाराष्ट्र राज्यात एखाद्या साधारण माणसाला उद्योग धंदा सुरू करणे, असलेला धंदा वाढविणे ही दिवसेंदिवस अतिशय जिकीरीची गोष्ट बनली आहे. त्यातल्या त्यात मुंबई, पुणे सारख्या शहरात कष्ट घेतले व बराच वेळ घलविला तर मिळते कर्ज, कुशल कामगार, माहिती व ज्ञान मिळते व आपल्या आवडीचा उद्योग निदान सुरू तरी करता येतो. इतर सातारा, सांगली सारख्या तुलनेने निमशहरी भागांमध्ये यातील प्रत्योक गोष्टीसाठी बरीच वर्षे मोठाच झगडा दयावा लागतो. गोंदिया, वाशीम, गडचिरोली, नंदूरबार सारख्या जिल्ह्यांमध्ये तर पायाभूत सुविधा म्हणजे रस्ते, पाणी, वीज, शिक्षण, माहिती याचीच वानवा आहे. येथील लोकांना जागतिकीकरणाचे सोडा, पश्चिम महाराष्ट्राच्या विकासाचे थोडेफार फायदे देखील मिळू शकत नाहीत. पूर्व महाराष्ट्राच्या जिल्हयांतील शेतकऱ्याला आणि व्यावसायिकाला जागतिक बाजारपेठ नाही तर किमान मुंबई, पुणे शहरातली खुली बाजारपेठसुद्‌धा मुश्किलीनेच मिळते. उद्योगधंद्यांना पावलापावलावर अडथळा घालणारे शासकीय नियम व तसे वातावरण आज राज्यात सगळीकडे दिसते. महाराष्ट्र हा सुरूवातीपासूनच देशत इतर राज्यांच्या तुलनेत उद्योग व व्यापारात सर्वाधिक प्रगत राहिला आहे. राज्याचे एकूण उत्पन्न (आलेख क्र.1) व प्रति माणशी उत्पन्न देखील इतर राज्यांच्या तुलनेत जास्त आहे. राज्यातील कारखान्यांच्या उत्पादकतेचे प्रमाण इतर राज्यांच्या तुलनेत देशात सर्वात जास्त आहे. सेवा क्षेत्राचा राज्याच्या उत्पन्नातला वाटा (पहा आलेख क्र. 2) अधिक असल्याने महाराष्ट्रातील उत्पादन व कारखाने हे इतर राज्यांतल्या उत्पादन व कारखान्यांपेक्षा जास्त कार्यक्षम आहेत. (पहा आलेख क्र. 3) परदेशी बँकांचे जाळे (पहा आलेख क्र. 4) महाराष्ट्रात सर्वात जास्त आहे. राज्यात रू. 500 कोटींच्या वरचे 207 उद्योग समूह आहेत, ज्यांचा एकत्रित खप वर्षाला 26 लाख कोटी रू. आहे.



आलेख क्र. 1- [illegible]



Scanned by CamScanner

समजते की नवे उद्योग सुरू व्हावेत यासाठी सरकार उद्योजकांना अनुदान देते. परंतु उद्योग सुरू झाला की त्याच उद्योजकाला विविध करांच्या ओझ्याखाली दाबून त्याचे कंबरडे मोडते, हा दुटप्पी कारभार आता बंद करा अशी उद्योजकांची भावना झाली आहे.

**काय करायला हवं?**

सर्वात प्रथम म्हणजे राज्यामध्ये विविध प्रकारचे उद्योग बहरण्यासाठी सुशासन असणे आवश्यक आहे. राज्यात पुणे-मुंबई वगळता उद्योगांचा विकास फारसा झालेला नाही खेडयापाडयांतून उद्योग कसे उभे राहतील, यांचा विचार राज्य शासनाने करायला पाहिजे. गावातच चांगले काम, शिक्षण व आरोग्य सेवा मिळाल्या तर शहरांवरचा ताण कमी होईल. खेडयापाडयातील लोकांनी तेथेच राहावे यासाठी शहरांना जोडणारे रस्ते, वीज, इंटरनेट, मोबाईल सुविधा इ. पोहचवल्या पाहिजेत. राज्यातल्या कोणत्याही प्रामाणिक

उद्योजक/व्यावसायिकाला विचारले तर तो म्हणतो, आम्हाला सबसिडी, सवलती अजिबात नकोत. शासनाने फक्त काम करण्याजोगे वातावरण व मूलभूत सुविधा द्याव्यात. आपल्या महाराष्ट्रात निसर्गस्थळे, ऐतिहासिक वास्तू आणि धार्मिक तीर्थक्षेत्र मुबलक प्रमाणात आहेत. मात्र आपण पर्यटनाची ताकद ओळखलेली नाही. त्यामुळे पर्यटनाकडे आपले अक्षम्य दुर्लक्ष झाले आहे. दुबई व सिंगापूर या दोन स्थळांचा आदर्श ठेऊन त्याप्रमाणे पर्यटनाच्या सुविधा उपलब्ध केल्या तर महाराष्ट्रात पर्यटन हा महत्वाचा उद्योग होऊ शकतो.

छोटया व मोठया उद्योगांना निर्णय घेण्याचे स्वातंत्र हवे. छोटया-छोटया गोष्टींसाठी सरकारकडे जावे लागू नये.

- प्रत्येक जिल्ह्याची विशिष्ट भौगोलिक परिस्थिती लक्षात घेऊन त्याआधारे उद्योग विकासाला चालना द्यावी. उदाहरणार्थ- कोकणात पर्यटन. नगर येथे अन्नप्रक्रिया उद्योग, नाशिक येथे मसाले निर्मिती

- उद्योग सुरू करण्यासाठीची कागदपत्रेही कमी करावीत. हे करीत असताना कोणी कायदा मोडला असेल तर त्याच्यावर सरकारने कडक कारवाई करावी.

- राज्यातल्या उद्योगांच्या वाढीला, खाजगी व परेदशी गुंतवणूक, व्यापाराला चालना देण्यासाठी आवश्यक सुविधा जसे की ऑक्ट्राय, इम्पोर्ट ड्युटी यासारखे वेळ व मनुष्यबळ

वाया घलविणारी कालबाहय असलेली कर पध्दत ब नवीन सोपी सुटसुटीत जीएसटी कर पध्दत आणायला प

- महापालिका, पालिका, जिल्हा शासन का पारदर्शकता, तंत्रज्ञानाचा वापर असे बदल व्हायला पाहि

- एमआयडीसीमधील जागांच्या खरेदीच्या सुसूत्रता आणणे आवश्यक आहे.

- सार्वजनिक क्षेत्रातील उद्योग-व्यवसाय-सेवांचे प्रमाणात निर्गुतवणूक प्रक्रिया हाती घेतली पाहिजे.

जिल्हानिहाय सार्वजनिक उद्योगांचे खास प्रक्रियेमध्ये स्थानिक उद्योगकर्ते, व्यावसायिक, रहिवास भांडवलधारक करून देण्यासाठी प्राधान्य व प्रोत्साह पहिजे. उदा.- गडचिरोली, चंद्रपूर येथील सिमेंट अथ उदयोगाचे खासगीकरण करताना तेथील अस्तित्वात अ उद्योजकांना, व्यावसायिकांना, घरगुती ग्राहकांना उद्यो मालकी हक्क द्यायला पाहिजेत.


विदर्भ कनिष्ठ महाविद्यालयीन अर्थ-वाणिज्य शिक्षक

नागपूर द्वारा आयोजित द्वैवार्षिक चर्चा सत्र २०१७

शुभेच्छा !



चंद्रशेखर पाध्ये


Scanned by CamScanner

36 माहिती तंत्रज्ञान आयटी पार्क विकसीत केले आहे राज्य शासनाने 425 खाजगी आयटी पार्क विकसीत झाले आहे. मुंबई - 41, ठाणे - 9 व पुणे - 38 यातील गुंतवणूक 1403 कोटी रुपयाची असून यामध्ये 1.87 लाख इतक्या लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. 337 माहिती तंत्रज्ञान संकुलामध्ये 6347 कोटी रुपयाची गुंतवणूक भविष्यात केली जाणार आहे. यातून 8.46 लाख इतका रोजगार निर्माण होणार आहे. महाराष्ट्र हे माहिती तंत्रज्ञानामधील आघाडीचे राज्य असले तरी त्याला इतर राज्याकडुन आता आव्हान मिळुलागलेले आहेत. त्याला सामना करण्याकरीता राज्य शासन आपल्या ध्येय धोरणात बदल करीत आहे. लघुउद्योग विकसनशील देशामध्ये लघूउद्योगांना विशेष स्थान असते. भारतासारख्या प्रचंड लोकसंख्येच्या देशात लघूउद्योगांची भूमिका महत्वाची असते. मोठया उद्योगाकरीता लागणारे अधिक भांडवल विकसनशिल देशाकडे उपलब्ध राहत नाही. मात्र लघुउद्योगाकरीता मोठया पुंजीची गरज असत नाही. लघू व मध्यम प्रकल्पाच्या उद्योगातून जो रोजगार निर्माण होतो तो मोठ्याप्रमाणावर आधारीत उद्योगातून निर्माण होत नाही. लघू उद्योगामध्ये श्रम प्रधान उत्पादन तंत्राचा वापर तुलनेने अधिक प्रमाणात केला जातो. त्यामुळे रोजगार निर्मितीच्या दृष्टीकोणातून लघूउद्योग अधिक उपयुक्त ठरतात. भांडवल, बचत, व रोजगार निर्मिती या दोन महत्वपूर्ण घटकांचा विचार करता लघूउद्योग भारतासारख्या विकसनशिल देशात अधिक पूरक ठरतात. भारताच्या आर्थिक विकासाच्या आढाव्यात एकूण ढक्त्ू त लघू उद्योगाचा व मध्यम उद्योगाचा वाटा 42 टक्के इतका आहे. तर निर्यातीच्या क्षेत्रातील वाटा 32 टक्के इतका आहे. महाराष्ट्राचा विचार केल्यास महाराष्ट्राच्या आर्थिक विकासामध्ये व औद्योगीक वाढीमध्ये लघूउद्योगांचा वाटा महत्वाचा आहे. महाराष्ट्रामध्ये अवजारे, हौजअरी, खेळणी, ज्वेलरी यांचा निर्यातीत वाटा जास्त आहे. लघुउद्योग घटकाकरीता कमाल गुंतवणूक मर्यादा 5 कोटी रुपये इतकी आहे. व अन्य लघूउद्योगा करीता ही मर्यादा एक कोटी रुपये इतकी आहे. छोटे उद्योग, सेवा व व्यापार क्षेत्रातील लघु उद्योगाकरीता मुदत कर्जाची एकुण कमाल मर्यादा 5 लाख रुपये इतकी आहे. या उद्योजकांची सुरुवातीला तात्पूरती नोंद करण्यात येते. पण प्रत्यक्ष उत्पादनानंतर त्यांची स्थायी नोंदणी होते. राज्यात एकुण 2.86 लाख नोंदणीकृत लघूउद्योजक होते व एकूण गुंतवणूक अंदाजे 67062 कोटी रुपये इतकी होती. व त्यातून निर्माण झालेला रोजगार 22.45 लाख इतका होतो. राज्यात एकुण 1307341 इतके नोंदणीकृत लघु उद्योग होते. त्यानुसार पूणे जिल्ह्यात सर्वाधीक 26177, ठाणे 7433, मुंबई उपनगर 6718, नागपूर 5761 आणि नाशिक 4731 इतके लघुउद्योग कार्यरत होते.

सहकारी औद्योगीक वसाहती - राज्यातील ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी निर्माण करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाद्वारे व इतर क्षेत्रात सहकारी औद्योगीक वसाहत विकसीत करण्याचा कार्यक्रम राज्य शासनाने धोरणात्मकरीत्या अमलबजावणीस आरंभ केला आहे. सहकारी औद्योगीक वसाहतीमध्ये उद्योग स्थापित करण्याकरीता मात्र भांडवलातील भागीदारी तांत्रीक सेवा उपक्रमींना उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

औद्योगीक उत्पादन निर्देशांक खाणकाम, वस्तुनिर्माण व विद्युत क्षेत्राचा समावेश असलेला औद्योगीक उत्पादन निर्देशांक औद्योगीक उत्पादनात झालेली वाढ स्पष्ट करतो. पायाभूत वर्ष 1993-94 वर आधारीत हा निर्देशांक "अखिल भारतीय औद्योगीक उत्पादनाचे निर्देशांक" म्हणून केंद्रीय सांख्यिकीय संघटनेकडून दरमहिण्याला प्रकाशिक करण्यात येतो. औद्योगीक उत्पादनाच्या निर्देशांकामध्ये वस्तुनिर्माण क्षेत्राचा वाटा 79.4 टक्के इतका आहे. यात 9.1 टक्के इतकी वाढ झाली आहे.

| विभाग | संख्या | | | गुंतवणूक (रु. कोटी) | | | रोजगार | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 2009 | 2010 | टक्के बदल | 2009 | 2010 | टक्के बदल | 2009 | 2010 | टक्के बदल |
| बृहन्मुंबई | 306 | 306 | 0.00 | 1300 | 1400 | 7.70 | 1.35 | 1.20 | −11.1 |
| कोकण | 10365 | 10821 | 4.4 | 8531 | 16529 | 97.90 | 2.55 | 2.55 | 8.50 |
| नाशिक | 5461 | 6057 | 10.90 | 1677 | 2151 | 28.30 | 0.48 | 0.55 | 14.60 |
| पुणे | 7930 | 7903 | 0.10 | 18093 | 20032 | 10.70 | 3.11 | 3.07 | −1.30 |

औद्योगीक विकास महामंडळाची संख्या गुंतवणूक रोजगार दर्शविला आहे.

औद्योगीक आजारपण - औद्योगीक आजारपण ही उद्योगक्षेत्रापुढील एक गंभीर समस्या आहे. औद्योगीकरणाच्या प्रक्रीयेबरोबर जुने उद्योग आजारी पडण्याचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे.

आजारी उद्योग 2003 पर्यंत लघु उद्योग

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| कोल्हापूर | 4152 | 4473 | 7.70 | 1614 | 4303 | 37.20 | 0.51 | 0.53 | 3.90 |
| अमरावती | 1409 | 1441 | 2.30 | 716 | 768 | 7.30 | 0.19 | 0.19 | 0.00 |
| नागपूर | 2422 | 2649 | 9.40 | 7805 | 8609 | 11.70 | 0.66 | 0.71 | 7.60 |
| एकूण | 31713 | 33305 | 5.2 | 35650 | 53792 | 35.60 | 8.65 | 8.80 | 1.70 |

मध्यम व मोठे उद्योग 2003 पर्यंत

| वर्ष | बंद | बाधित कामगार |
|---|---|---|
| 1998—99 | 245 | 13602 |
| 1999—2000 | 95 | 1526 |
| 2000—01 | 333 | 52907 |
| 2001—02 | 203 | 27607 |
| 2002 अखेर 2003 पर्यंत | 339 | 45509 |

Scanned by CamScanner

# महाराष्ट्र औद्योगिक स्थिती एक दृष्टीक्षेप

सौ. अंजली धर्माधिका
न्यु इंग्लीश हायस्कुल
महाल नागपूर

उद्योग हा विषय भारतीय संविधानाच्या समावर्ती सुचि मध्ये समाविष्ट असल्याने, केंद्र व राज्य शासनास उद्योग विकासाची धोरण आखण्याचा अधिकार आहे. स्वातंत्र्या नंतर पहिल्या दोन पंचवार्षिक योजनांमध्ये कृषी विकासावर भर देण्यात आला. तथापी देशाची लोकसंख्या लक्षात घेता सर्वसमावेषक आर्थिक विकास तसेच कृषीवर अवलंबुन असलेल्या लोकांची संख्या कमी करण्याच्या हेतुने तिस–या पंचवार्षीक योजना पासून उद्योग विकासावर भर देण्यात आला. सन् 1991 पासून देशाच्या औद्योगीक धोरणामधे आमुलाग्र बदल करण्यात आले. उद्योगामधे सरकारी हस्तक्षेप कमी करुन मुक्त औद्योगिक धोरण अवलंबिण्यात आले. केंद्र शासनाच्या 1991 च्या मुक्त आर्थिक धोरणानंतर देशात खाजगी व परदेशी गुंतवणुकीचा ओघ वाढीस लागला. केंद्र शासनाच्या या धोरणानुसार प्रत्येक राज्याने त्यांच्या औद्योगीक विकासाकरीता कालानुरुप धोरणांचा अवलंब केला. राज्यातील प्रत्येक विभागाचा समतोल विकास व्हावा, त्याद्वारे रोजगाराच्या संधी निर्माण होउन आर्थिक उत्पन्न वाढावे ही औद्योगीक धोरणांची मुळ उदिष्ट आहेत.

देशाच्या औद्योगीक प्रगती मधे महाराष्ट्र राज्याचे स्थान नेहमीच अग्रेसर राहील आहे. राज्याच्या औद्योगीक प्रगतीमुळे उत्पादनात वाढ, जलद आर्थीक विकास व रोजगाराच्या नविन संधी निर्माण होण्यास मदत मिळते. बदलती परिस्थिती व काळाची गरज लक्षात घेवून औद्योगीक धोरणांमधे कालानुरुप बदल करण्यात आल्याने महाराष्ट्र हे देशातील औद्योगीक दृष्ट्या प्रगत राज्य म्हणुन नाव लौकीकास आले आहे.

उद्योग उभारणीच्या दृष्टीने आवश्यक मुलभुत सुविधा, यामधे जमीन, पाणी, विजेची, भांडवालाची उपलब्धता, जलद दळणवळणाच्या सोई, कुशल मनुष्य बळ, कायदा व सुव्यवस्था तसेच सुटसुटीत कार्यपध्दती असणे आवश्यक आहे. या दृष्टीने योग्य धोरणांची आखणी करुन त्याची अमंलबजावणी केल्यास औद्योगीक विकासाकरीता पुरक वातावरणाची निर्मीती होते.

राज्याचे सर्वकष औद्योगीक धोरण दर पाच वर्षाच्या कालावधीकरीता घोषीत करण्याची प्रथा आहे. 1964 पासून विशिष्ट कालावधी करिता राज्यात औद्योगीक धोरण जाहीर केले जात आहे. सद्य स्थितीत 2013–2018 कालावधीकरिता राज्याचे सर्वकष औद्योगीक धोरण जाहीर करण्यात आले असून याशिवाय खालील क्षेत्र निहाय धोरण ही राबविण्यात येत आहेत.

- महाराष्ट्र इलेक्ट्रानिक्स् पॉलीसी 2016
- वस्त्रोद्योग धोरण 2012-17
- माहिती तंत्रज्ञान व सहाय्यभुत सेवा धोरण
- कृषी उत्पन्न प्रकीया धोरण
- काजू व द्राक्ष प्रकिया धोरण
- जैव तंत्रज्ञान धोरण

राज्यात येणा–या गुंतवणूकदारांना त्यांच्या उद्योग उभारणीसाठी आवश्यक परवाने व मंजुरी एका छत्राखाली प्राप्त होण्याच्या दृष्टीने मैत्री कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. गुतंवणुकदाराने सदर कक्षात ऑनलाईन नोंदणी केल्यावर विवीध विभागाच्या सेवाविशीष्ट कालावधीमधे उद्योजकास मैत्री कक्षाद्वारे उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मदत केली जाते.

राज्याच्या औद्योगिक धोरणांची ठळक वैशिष्टे खालील प्रमाणे आहेत.

## 2. औद्योगिक धोरण

## अ. औद्योगिक धोरण 2013–2018

**उध्दिष्टे :-**

- देशातील औद्योगिक गुंतवणूकीत राज्याचे अग्रस्थान कायम राखणे.
- राज्यातील औद्योगिक दृष्टया मागास भागात गुतवणूकीचा ओघ वाढण्यास चालना देणे.
- रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करणे.

**लक्ष :-**

- दर वर्षी उत्पादन क्षेत्रात 12–13% वाढ साध्य करणे.
- राज्याच्या स्थुल उत्पन्नामध्ये उत्पादन क्षेत्राचा सहभाग 28% पर्यंत वाढविणे.
- पाच वर्षात 20 लक्ष नविन रोजगार निर्मीती करणे.
- पाच वर्षात 5 लक्ष कोटींची गुंतवणूक आकर्षित करणे.

Scanned by CamScanner

उपरोक्त उध्दिष्ट व लक्ष साध्य करण्यासाठी खालील उपाययोजना ची तरतुद

**अतिविशाल व विषाल उद्योगांना प्रोत्साहने :-**

– विशाल प्रकल्पामुळे होणारे फायदे लक्षात घेउन तश्या स्वरूपाची गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी एकत्रित प्रोत्साहने (Customised Package) देण्यात येतील.

– खालील गुंतवणूक किंवा रोजगार निर्मीती करणा–या उद्योगांना अतिविशाल / विशाल प्रकल्प म्हणुन मान्यता देण्यात येईल.

| | तलुका / क्षेत्र | किमान भांडवली गुंतवणूक रू कोटी | किमान प्रत्यक्ष |
|---|---|---|---|
| विशाल उद्योग | अ व ब | 750 | 1500 |
| | क | 500 | 100 |
| | ड व ड+ | 250 | 500 |
| | विना उद्योग जिल्हे व नक्षलग्रस्त क्षेत्र | 100 | 250 |
| अतिविशाल उद्योग | संपूर्ण राज्य | 1500 | 3000 |

उपरोक्त उद्योगांना मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली गठीत समिती प्रकरणनिहाय विविक्षीत एकत्रित प्रोत्साहनांना मान्यता देईल.

**मोठया उद्योगांना प्रोत्साहने**

अतिविशाल / विशाल उद्योगांना मर्यादे पेक्षा कमी परंतु सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योगापेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या मोठया उद्योगांना औद्योगिकदृष्टया कमी विकसित असलेल्या क्षेत्रात गुंतवणूक करण्यास खालील मर्यादेत सात वर्षाच्या कालावधी करिता एकत्रित प्रोत्साहने अनुज्ञेय असतील.



Scanned by CamScanner

| तालुका / क्षेत्र वर्गीकरण | अनुज्ञेय भांडवली गुंतवणूकीच्या टक्केवारीत प्रोत्साहनाची आर्थीक मर्यादा |
|---|---|
| अ | -- |
| ब | -- |
| क | 30% |
| ड | 40% |
| ड + | 50% |
| विना उद्योग जिल्हे (गडचिरोली व हिंगोली) | 70% |
| नक्षलग्रस्त क्षेत्र | 80% |

**सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांना प्रोत्साहने**

राज्यातील अर्थव्यवस्थेत सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांचे महत्त्व लक्षात घेता अशा उद्योगांना एकत्रित आर्थिक प्रोत्साहने खालील प्रमाणे अनुज्ञेय होतील.

| तालुका / क्षेत्र | अनुज्ञेय भांडवली गुंतवणूकीच्या टक्केवारीत प्रोत्साहनाची आर्थीक मर्यादा | पत्रता कालावधी (वर्ष) |
|---|---|---|
| अ | -- | -- |
| ब | 20% | 7 |
| क | 40% | 7 |
| ड | 70% | 10 |
| ड + | 80% | 10 |
| विना उद्योग जिल्हे (गडचिरोली व हिंगोली) | 90% | 10 |
| नक्षलग्रस्त क्षेत्र | 100% | 10 |



Scanned by CamScanner

आर्थिक प्रोत्साहनांच्या बाबी

- औद्योगिक प्रोत्साहन अनुदान – उद्योग घटकाने पात्रता कालावधीमध्ये उत्पादीत उत्पादनावर राज्यास प्रदान केलेल्या
  मूल्यवर्धीत कराचा परतावा
- सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांना विद्युत देयकापोटी रू 0.50 / 1.00 दराने अनुदान
- सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांना भांडवली मुदत कर्जावर 5%
- अन्न प्रकीया उद्योगांना 10% अधिकची प्रोत्साहने
- उर्जा व पाणी वापर लेखा परिक्षणावर झालेला खर्चाचा 75% परतावा
- विज व पाणी बचत करण्याच्या संदर्भात केलेल्या यंत्रसामुग्री वरिल खर्चाच्या 50% परतावा
- सुक्ष्म,लघु व मध्यम उद्योगांच्या दर्जा वाढ व स्पर्धात्मकता विकासासाठी गुणवत्ता प्रमाणपत्र, संशोधन व विकास, तंत्रज्ञान वृध्दी, प्रदुषण मुक्त उत्पादन व पेटंट नोंदणी वर केलेल्या खर्चावर अनुदान
- गुंतवणूक कालावधी साठी मुद्रांक शुल्क माफी
- पात्रता कालावधी मध्ये विद्युत शुल्क माफी

**औद्योगिक विकासाला चालना देण्यासाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे :-**

औद्योगिक पायाभूत सुविधांच्या विकासा करीता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाटबंधारे विभाग, विद्युत निर्मीती कंपनी इ. विविध संस्थाकडून उभारण्यात येणा–या पायाभूत सुविधांचे नियोजन एकत्रितपणे करण्याच्या हेतुने मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र औद्योगिक पायाभूत सुविधा विकास समिती गठीत करण्यास मान्यता.

**उद्योगा करिता जागा उपलब्धता :-**

औद्योगिक विकासा साठी अधिक क्षेत्र उपलब्ध होण्याच्या दृष्टीने चटई क्षेत्र निर्देशामध्ये अभिमुल्य आकारुन वाढ तसेच अधिसुचित न झालेल्या किंवा अधिसुचना रद्द झालेल्या विशेष आर्थीक क्षेत्राच्या जमिनी औद्योगिक वापरासाठी उपलब्ध होण्याच्या दृष्टीने स्वतंत्र योजनांची आखणी करण्यास मान्यता.

Scanned by CamScanner

कुशल मनुष्य बळ :-

विशिष्ट कुशल तंत्रज्ञानाची गरज, त्याची मागणी व पुरवठा यातील तूट निश्चित करण्याकरीता उच्च व तंत्रशिक्षण विभाग तसेच औद्योगिक संघटना यांचे मध्ये समन्वय साधण्यासाठी "कौशल्य विकास आणि वृध्दी कक्षा ची स्थापना".

सामाईक सुविधा केंद्र :-

राज्यातील औद्योगिक दृष्टया अविकसीत क्षेत्रात छोटया समुहांचा समुह विकासाच्या माध्यमातुन विकास होण्याच्या दृष्टीने सामाईक सुविधा केंद्र स्थापन करण्यासाठी आर्थीक अनुदान.

आजारी उद्योगांचे पुर्नवसन :-

पुर्नजिवनक्षम आजारी उद्योगांना संबंधित वित्तीय संस्थेने शुश्रृषा कार्यक्रम मंजुर केल्यास शासनास देय रकमेची फेर आकारणी पुर्नजिवनक्षम नसलेल्या व बंद उद्योग घटकांना सुलभ बर्हिगमना साठी विशेष अभय योजना.

## ब. माहिती तंत्रज्ञान व साहाय्यभूत सेवा धोरण – २०१५.

राज्यात 1998 पासुन माहिती तंत्रज्ञान धोरण राबविण्यात येत आहे. सदर धोरणांमुळे राज्याने या क्षेत्रात मोठी झेप घेतली आहे. सन 2003 ते 2013 या दशकात राज्यातुन या क्षेत्रात झालेली निर्यात रू 5500 कोटी रूपयावरून रू 50,000 कोटी पर्यंत म्हणजे 800% वाढली असुन देशाच्या माहिती तंत्रज्ञान निर्यातीमध्ये राज्याचा 20% इतका वाटा असुन देशात राज्याचा कर्नाटकाच्या नंतर दुसरा कमांक आहे.

सदर धोरणा अंतर्गत राज्यात माहिती तंत्रज्ञान उद्यानाची संकल्पना अस्तित्वात आली. राज्यात 2015 चे धोरणा पर्यंत 45 खाजगी माहिती तंत्रज्ञान उद्यानाव्दारे सुमारे 12 लक्ष चौ मिटर बांधीव क्षेत्र प्रस्तावित करण्यात आले तसेच 37 सार्वजनिक क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान उद्यान विकसीत करण्यात आलेत.

माहिती तंत्रज्ञान धोरण 2015 ची दृष्टीकोन, अभियान व उद्दिष्ट खालील प्रमाणे आहेत.

दृष्टीकोन :–

राज्याला जागतीक स्तरावर एक सर्वसमावेशक वाढीचे स्पर्धात्मक माहिती तंत्रज्ञान केंद्र म्हणुन विकसीत करणे आणि राज्याला देशाची बौध्दिक व ज्ञानाची राजधानी म्हणुन स्थापित करणे.

अभियान :– जागतीक स्तरावरील गुंतवणुक दाराकरिता सर्वाधिक पसंतीच्या ठिकाणामध्ये राज्याचे स्थान निर्माण करणे. तसेच प्रवर्तन व नितीद्वारे स्पर्धात्मक आणि शाश्वत गुंतवणुकीस योग्य वातावरण असलेले राज्य म्हणुन विकसीत करणे.



Scanned by CamScanner

उद्दिष्ट :-

माहिती तंत्रज्ञान धोरण 2015 ची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहे.

- या क्षेत्रात राज्याचे अग्रस्थान कायम राखणे.
- राज्यातील कमी विकसीत भागात गुंतवणुकीचा ओघ वाढविण्यास चालना देणे.
- अधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे.
- राज्याच्या निर्यातीत व स्थुल उत्पादनात वाढ घडवून आणणे.
- या क्षेत्राचा विकासाद्वारे राज्याच्या सामाजिक व आर्थीक विकास घडवून आणणे.
- नविन उत्पादन व B to B व B to C यांना पुरविल्या जाणा-या सेवाकरिता बौध्दिक मत्ता निर्मीतीस प्रोत्साहन देणे.

लक्षांक :-

- या क्षेत्रात राज्यात रू. 50,000 कोटींची गुतंवणुक आकर्षित करणे.
- 10 लक्ष नविन रोजगार निर्मीती करणे.
- या क्षेत्रातील राज्यातुन होणारी निर्यात रू. 10 लक्ष कोटी पर्यत वाढविणे.

**माहिती तंत्रज्ञान धोरण 2015 ची कार्यतंत्रे :-**

- राज्यातील सर्व भागात माहिती तंत्रज्ञान उद्योगाचा प्रसार करणे.
- राज्यात AVGC या सारख्या क्षेत्रांचा विकास करण्यासाठी प्रोत्साहन देणे, सार्वजनिक सेवा वितरण या सारख्या इतर सेवा, आधारकार्ड आधारित सेवांस प्रोत्साहन देणे.
- राज्यात रिसोर्स व इन्क्युवेशन सेंटर्स स्थापण्यास पुढाकार घेणे.
- राज्यातील ग्रामिण व निम शहरी भागात BPO सेंटर्स स्थापण्यास प्रोत्साहन देणे.
- राज्यात डेटा सेंटर्स विकसीत करण्यास प्रोत्साहन देणे.

**प्रोत्साहने :-**

- सदर धोरणा अंतर्गत माहिती तंत्रज्ञान उद्योग विकासकास 100 ते 200 टक्के अतिरिक्त चटई निर्देशांक 10 ते 30 टक्के अधिमुल्य अनुज्ञेय.
- एकात्मिक माहिती तंत्रज्ञान नगर विकसीत करण्याची संकल्पना.
- माहिती तंत्रज्ञान व साहय्यभुत सेवा घटकांना औद्योगीक दराने विद्युत पुरवठा.
- कोणत्याही क्षेत्रात माहिती तंत्रज्ञान व साहय्यभुत सेवा घटकाची उभारणी अनुज्ञेय
- सदर घटकांना मुद्रांक शुल्क व विद्युत शुल्कातुन सुट.
- सदर घटकांना निवासी दराने मालमत्ता कर व प्रवेश करात सुट.

Scanned by CamScanner

## क. जैव तंत्रज्ञान धोरण

ज्ञानाचे शतक म्हणुन गणण्यात आलेल्या या शतकात जैव तंत्रज्ञानाच्या उद्योगाने नवीन संधी उपलब्ध झाली आहे. कृषी, पशुसंवर्धन, आरोग्य, पर्यावरण संरक्षण इत्यादीद्वारे जनतेचे जीवनमान बदलण्याची क्षमता जैव तंत्रज्ञानात आहे. सदर क्षमता मुर्त स्वरूपात साकारण्यासाठी राज्याने जैव तंत्रज्ञान धोरण 2001 जाहीर केले आहे. सदर धोरणाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहे.

- राज्यातील शेतक–यांना प्रचलीत हवामानात सुयोग्य, अधिक उत्पन्न देणारी तसेच अवर्षण व किड प्रतिबंधक बियाणे उपलब्ध करून देणे.
- रोगांचा मुकाबला करण्यासाठी परवडणा–या व किफायतीशीर औषधी व साधने यांचा विकास करणे व रोगांचे प्राबल्य कमी करणे.
- औद्योगीक विसर्गाची अधिक चांगल्या प्रकारे विल्हेवाट लावणे तसेच जलस्त्रोताचे शुध्दीकरणासाठी स्वस्त व प्रभावी तंत्रज्ञान विकसीत करणे.
- जैवीक पध्दतीने पशुधन, सागरी संपत्ती व मत्स्यव्यवसायातील उत्पादकता वाढविणे.
- राज्यातील सर्वसाधारण आहार निर्भयता सुधारणे.
- चांगले आरोग्यमान व पर्यावरणाच्या माध्यमातुन जीवनमानात गुणात्मक सुधारणा करणे.

## ड. इलेक्ट्रानिक्स् धोरण 2016

राज्याच्या आर्थिक समृध्दिमधे ESDM इलेक्ट्रानिक्स् प्रणाली डिझाईन व उत्पादन या क्षेत्राच्या विकासामुळे भर पडणार असल्याने या क्षेत्राच्या विकासाकरिता धोरण पारीत करण्यात आले आहे. सदर धोरणाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहे.

- ESDM क्षेत्रात 2020 पर्यंत 300 कोटी गुंतवणुक, 1200 कोटी वार्षिक उलाढाल व 1 लक्ष रोजगार निर्मीती करणे.
- या क्षेत्रातील सन 2020 पर्यंत राज्यातुन 200 कोटी $ ची निर्यात करणे.
- या क्षेत्रातील संशोधन व विकासासाठी अधिक निधी उपलब्ध करुन बौध्दिक संपदा निर्मीतीस चालना देणे.
- ई कचरा व्यवस्थापनासाठी शास्त्रोक्त पध्दतीचा वापर.

## इ. द्राक्ष प्रकिया धोरण 2001

देशात सर्वाधिक द्राक्षाचे उत्पादन महाराष्ट्रात होते. राज्यात नाशिक, सांगली, सोलापुर, नगर व उस्मानाबाद जिल्हयात द्राक्षाचे उत्पादन केले जाते. नाशिक जिल्हा हे देशाचे वाईन कॅपीटल म्हणुन ओळखले जाते. राज्याच्या द्राक्ष प्रकिया धोरणाची वैशिष्टे खालील प्रमाणे आहेत.

Scanned by CamScanner

– राज्य उत्पादन शुल्क हे वाईन उत्पादन खर्चाच्या 50 टक्के दराने आकारण्यात येते.

– वाईन उत्पादनाकरिता परवाने देण्याचे कामात सुलभिकरण.

– वाईन उत्पादनास चालना देण्याकरिता विशेष संस्थेची स्थापना.

– राज्यात वाईन टुरिझन विकासाला चालना देणे.

– आयातीत वाईन वर शुल्क आकारणी.

## फ. वस्त्रोद्योग धोरण 2011 – 17

देशात शेती नंतर रोजगार निर्मीती मधे वस्त्रोद्योगांचे दुसरे स्थान असल्याने औद्योगिक विकास व रोजगार निर्मीती करिता या क्षेत्राच्या विकासाकरिता चालना देण्याबाबत केंद्र व राज्य शासनाचे धोरण आहे. केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग धोरणा सोबतच राज्यातील कापुस उत्पादक जिल्हयात वस्त्रोद्योगास चालना देण्यासाठी राज्य शासनाने धोरण आखले आहे. सदर धोरणाची वैशिष्टे खालील प्रमाणे आहे.

– धोरण कालावधी मधे या क्षेत्रात रू. 40,000 कोटी गुतवणुक व 11 लक्ष नविन रोजगार निर्मीती करणे.

–कापुस उत्पादक जिल्हयात नविन सहकारी सुत गिरण्याकरिता 5:45:50 धरतीवर भागभांडवल

– कापुस उत्पादक जिल्हयात खाजगी क्षेत्रात स्थापित होणा–या नविन उद्योगांना 6 – 7 टक्के दराने सात वर्षापर्यंत व्याज अनुदान व 10 टक्के भांडवली अनुदान.

## 3. राज्याची आर्थिक व औद्योगीक स्थिती

– सन 2015–16 राज्याचे स्थुल उत्पादन (GSDP) रू. 15,30,211 कोटी इतके असुन मागील वर्षीच्या तुलनेत त्यात 8.5 टक्के वृध्दि झाली. तसेच राज्याचे दर डोई उत्पन्न सन 2015–16 मधे रू. 1,47,399/– होते मागील वर्षापेक्षा त्यात — टक्के वाढ झाली.

– सन 2016–17 च्या अंदाजानुसार राज्याचे स्थुल उत्पादन रू. 16,59,776 कोटी म्हणजेच मागील वर्षीच्या तुलनेत 9.4 टक्के वृध्दि अपेक्षित असून दर डोई उत्पन्न रू. आहे.

राज्यामध्ये कृषी व संलग्न सेवांचा वृध्दि दर 12.5 टक्के तर उद्योग व सेवा क्षेत्रात वृध्दि दर अनुक्रमे 6.7 टक्के व 10.8 टक्के अपेक्षित आहे.

– सन 2011–12 ते 2016–17 मधील राज्याचे स्थुल मुल्य वृध्दि मधे कृषी व संलग्न सेवा क्षेत्राचा सरासरी वाटा 11.8 टक्के असून त्यामधे वार्षिक 1.7 टक्के वृध्दि आहे. उद्योग क्षेत्राचा वाटा 33.8 टक्के असुन त्यामधे वार्षिक वृध्दि 9.4 टक्के इतकी आहे.

**आर्थिक सर्वेक्षण**

देशातील आर्थिक व्यवसाय करणा–या प्रत्येक आस्थापनांचे सर्वेक्षण केंद्र शासना मार्फत करण्यात येते. राज्यात सहावे आर्थिक सर्वेक्षण ऑक्टोबर 2013 ते एप्रिल 2014 या काळात करण्यात आले. या सर्वेक्षणातील महत्वाचे आकडे खालील प्रमाणे आहे.

– राज्यात गैरकृषी व्यवसायात काम करणा–या 45.46 लक्ष आस्थापना असुन त्यात 118.73 लक्ष लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे. यापैकी 9.20 लक्ष आस्थापना विविध उत्पादने करित असुन त्यात 29.18 लक्ष लोकांना रोजगार प्राप्त झाला आहे.

**उद्योगाचे वार्षीक सर्वेक्षण (ASI) :–**

उद्योगाचे वार्षीक सर्वेक्षणाद्वारे महत्वाची आकडेवारी गोळा करण्यात येते. यामधे रोजगार, स्थिर व खेळते भांडवल, मुल्य वृध्दि, लागत व उत्पादीत मुल्य ईत्यादी बाबत नोंदणीकृत उद्योगांची माहिती गोळा करण्यात येते. सन 2014–15 वार्षीक सर्वेक्षणानुसार राज्याचा देशात नक्त मुल्य वृध्दि व कामगार वेतन यामधे देशात पहीला कमांक आहे. देशाच्या एकुण नक्त मुल्य वृध्दित राज्याचा वाटा 20.5 टक्के असुन कामगारांना दिल्या जाणा–या वेतनात 15.7 टक्के वाटा आहे. सदर सर्वेक्षणामधे Indian factory Act मधील 2(m)(i) व 2(m)(ii) या कलमा अंतर्गत नोंदणी झालेल्या उद्योगांचे वार्षीक सर्वेक्षण केले जाते.

**राज्यातील औद्योगिक गुतंवणुक**

केंद्र शासनाच्या 1991 मधील नविन औद्योगीक धोरणानुसार राज्यात सर्वाधिक 19,347 औद्योगीक गुंतवणुकीचे प्रस्ताव प्राप्त झाले असुन याद्वारे एकुण रू. 11.37 लक्ष कोटी गुंतवणुक अपेक्षित आहे. यापैकी 44.6 टक्के म्हणजे 8664 प्रकल्पात उत्पादन सुरू झाले असुन 2107 प्रकल्पाचे बांधकाम सुरू आहे. याद्वारे रू. 3.58 लक्ष कोटीची गुंतवणुक व सुमारे 12 लक्ष लोकांना प्रत्यक्ष रोजगार प्राप्त झाला आहे. देशात सर्वाधिक 18 प्रकल्प महाराष्ट्र राज्यात मंजुर झाले

Scanned by CamScanner

असुन त्यांनतर गुजरात व आंध्रप्रदेश राज्याच्या अनुकमे दुसरा व तिसरा कमांक आहे.

राज्यात सन 2005 पासुन विशाल प्रकल्प संकल्पना राबविली जात आहे. या अंतर्गत राज्यात एकुण 488 विशाल प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली असुन यामधे रू. 3.80 लक्ष कोटी गुंतवणुक व 4.2 लक्ष रोजगार निर्मिती अपेक्षित आहे

राज्याच्या अर्थव्यवस्थेत सुक्ष्म, लघु व मध्यम उपकमांचे महत्वाचे स्थान आहे. कमी गुंतवणुकीद्वारे जास्त रोजगार निर्मिती सोबतच राज्याच्या उत्पादन व निर्यात मधे त्याचा महत्वाचा वाटा आहे.

राज्यात 2.44 लक्ष सुक्ष्म लघु व मध्यम उपकम नोंदणी कृत असुन याद्वारे रू. 0.56 लक्ष कोटी गुंतवणुक व 30 लक्ष लोंकाना रोजगार प्राप्त झाला आहे.

राज्याने सन 2006 मधे विशेष आर्थिक क्षेत्राचे धोरण अवलंबिल्या पासुन राज्यात एकुण 243 प्रस्ताव प्राप्त झाले. यापैकी 25 विशेष आर्थीक क्षेत्र कार्यान्वीत झाले असुन यामधे रू. 32,255 कोटी गुंतवणुक व 3.6 लक्ष लोंकाना रोजगार प्राप्त झाला आहे.

माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात देशात राज्याच्या कर्नाटकानंतर दुसरा कमांक आहे. राज्यात 36 सार्वजनिक माहिती तंत्रज्ञान उद्योगाद्वारे रू. 18,000 कोटी गुंतवणुक व 2.68 लक्ष रोजगार निर्मिती झाली आहे. तसेच 170 खाजगी तंत्रज्ञान उद्योग कार्यरत असुन याद्वारे 5.04 लक्ष रोजगार निर्मिती झाली आहे.

### उद्योगाकरिता मुलभुत सुविधा

राज्याच्या जलद औद्योगीक विकासाकरिता आवश्यक मुलभुत सुविधांनी युक्त अश्या औद्योगीक क्षेत्र राज्यात विकसीत करण्यात आली आहेत. यामधे रस्ते, विज व पाणी यांचे उपलब्धतेसह भूखंड गुंतवणुकदारांना उपलब्ध करून देण्यात येतात. राज्यात महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ, सहकारी औद्योगीक वसाहती व काही स्थानिक स्वराज्य संस्थेच्या माध्यमांतुन अशी औद्योगीक क्षेत्र विकसीत करण्यात आली आहेत.

## 4. सहकारी औद्योगीक वसाहती

सहकारी तत्वावर स्थापित होणा–या वसाहती या सरकारी अथवा खाजगी जमिनीवर स्थापित आहेत. सुविधा विकासा करिता राज्य शासना मार्फत 20 टक्के भागभांडवल दिले जाते. 60 टक्के हे वित्तीय संस्था मार्फत तर उर्वरित 20 टक्के सभासदांचे भागभांडवल असते. राज्यात एकुण 107 सहकारी औद्योगीक वसाहती कार्यरत असुन यामधे सुमारे 8000 उद्योगांत 1.80 लक्ष रोजगार निर्मीती झाली आहे.

Scanned by CamScanner

राज्यात औद्योगीक क्षेत्रे विकसीत करण्यासाठी महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळाची स्थापना करण्यात आली. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात तसेच तालुका स्तरावर औद्योगीक क्षेत्र निर्मीतीचे काम महामंडळाने केले आहे. राज्याचे औद्योगीक विकासाच्या दृष्टीने महामंडळाने मोठा हातभार लावला आहे. महामंडळाने राज्यात 50 हजाराचे वर औद्योगीक भुखंड विकसीत व वाटप केले असुन त्यावर 46,000 चे वर उद्योग कार्यरत आहेत. याद्वारे 1.5 लक्ष कोटी गुंतवणुक व 12.50 लक्ष रोजगार निर्मिती झाली आहे.

केंद्र शासनाच्या महात्वाकांक्षी DMIC( दिल्ली, मुंबई इंडस्ट्रियल कॉरीडोर) प्रकल्पा अंतर्गत राज्यात शेंद्रा, बिडकिन ही औद्योगिक क्षेत्र व दिघी बंदराचा समावेश आहे. या प्रकल्पा अंतर्गत औद्योगीक स्मार्ट सिटी निर्माण करण्यात येत आहेत.

## राज्यातील सहकारी तत्वावरील उद्योग

राज्यातील ग्रामिण भागात उपलब्ध शेती उत्पादनावर प्रकिया करुन आर्थिक विकास व रोजगार निर्मीती मधे सहकारी उद्योगांचे महत्वाचे स्थान आहे. राज्य शासनाद्वारे अश्या उद्योगांना आर्थिक सहाय्य केले जाते. राज्यात सहकारी तत्वावर साखर उत्पादन, जिनिंग व प्रेसिंग, सुतगिरण्या, हातमाग, दुध व मत्स्य प्रकिया उद्योग कार्यरत आहेत.

देशातील साखर उत्पादनामधे राज्य प्रथम कमांकावर असुन देशातील एकुण उत्पादनाच्या 34 टक्के साखर उत्पादन राज्यात होते. राज्यात 202 सहकारी तत्वावरील साखर कारखाने स्थापित झाले असुन त्याची सुमारे 500 लक्ष मे. टन ऊस गाळप क्षमता आहे. साखर उत्पादना सोबतच मोठया प्रमाणावर मद्यार्क व विजेचे उत्पादन केले जाते.

राज्यात सुमारे 15000 सहकारी दुध संकलन संस्था स्थापीत झाल्या असुन याद्वारे वार्षीक 700 कोटी रुपयाचे दुध उत्पादने विकली जातात. राज्यात 83 सहकारी जिनिंग प्रेसिंग संस्था स्थापीत झाल्या असुन याद्वारे वार्षीक रु. 75 कोटी कापसाचे जिनिंग केले जाते. राज्यात 278 सहकारी सुतगिरण्या स्थापीत झाल्या असुन या मधे 15 लक्ष चात्या (Spindles) असुन याद्वारे वार्षीक रु. 3000 कोटी सुत उत्पादन केले जाते.

12

राज्यात 600 हातमाग व 1500 पावर लुम संस्था स्थापीत झाल्या असुन याद्वारे अनुक्रमे रु. 65 कोटी व रु. 195 कोटी किंमतीचे कापड व इतर उत्पादने तयार होतात.

राज्यात 3500 सहकारी मत्स्यविकास संस्था कार्यरत आहेत. या संस्थाद्वारे सुमारे रु. 650 कोटी मत्स्यउत्पादने विकली जातात.

Scanned by CamScanner

## 5. औद्योगिक प्रदुषण

वाढते औद्योगिकरण, नागरिकरण व स्थानांतर इत्यादी कारणामुळे नैसर्गिक संसाधनाचा वापर वाढत असल्यामुळे पर्यावरणास हानी पोहचत आहे. विकासामुळे होणारी पर्यावरणाची हानी रोखण्यासाठी व औद्योगिक प्रदुषण नियंत्रणात ठेवण्यासाठी प्रदुषण नियंत्रण मंडळ कार्यरत आहे. राज्यामधे पर्यावरण विषय विविध अधिनियमाची अंमलबजावणी करणे, शास्त्रोक्त पध्दतीने आकडेवारी गोळा करून तंत्रज्ञानाच्या मदतीने प्रदुषणास आळा घालण्यासाठी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाची स्थापना करण्यात आली.

मार्च 2016 अखेर राज्यात प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे नोंदणीकृत 83,400 उद्योगापैकी 13 टक्के वायुप्रदुषण, 23 टक्के जल प्रदुषण व 80 टक्के घातक कचरा निर्मिती करणारे उद्योग आहेत. उद्योगातील प्रदुषण शक्यतेनुसार उद्योगांचे लाल, नारिंगी व हिरव्या प्रवर्गात वर्गीकरण करण्यात येते. केंद्र व राज्याच्या आर्थिक साहाय्यातुन सामाईक विसर्ग प्रकिया केंद्र (CETP) राज्यात उभारण्यात येत आहेत. राज्यात 24 औद्योगिक क्षेत्रात सुमारे 8,000 उद्योगाकरिता CETP कार्यान्वीत करण्यात आले आहेत. याद्वारे प्रतिदिन 200 दशलक्ष घन मिटर विसर्गावर प्रकिया केली जाते.

उद्योगातुन निघण्या–या घातक टाकाऊ पदार्थांवर प्रकिया करण्यासाठी रांजणगांव जिल्हा पुणे व बुटीबोरी जिल्हा नागपुर येथे प्रकिया केंद्र स्थापित करण्यात आले आहे. या केंद्राद्वारे 26 लक्ष मे. टन औद्योगिक घातक टाकाऊ पदार्थावर प्रकिया केली जाते.

माहिती तंत्रज्ञानाच्या युगात तयार होणा–या ई–कचरा व्यवस्थापना करिता प्रदुषण नियंत्रण मंडळाने 42 संकलन केंद्र व 38 उद्योगाद्वारे वार्षीक 55,000 मे. टन ई–कचरावर पुर्नप्रकिया केली जाते.

## 6. राज्याची औद्योगिक प्रगती कायम राहण्याच्या दृष्टीने उपाय योजना

राज्यकर्त्यांची दुरदर्शिता व कालानुरुप आखलेल्या धोरणामुळे महाराष्ट्र राज्य देशात औद्योगिक दृष्टया आघाडीचे राज्य ठरलेले आहे. तथापी देशातील काही राज्य जसे गुजरात, कर्नाटक, तेलंगणा या सारखे राज्य त्यांचे गतिशील धोरणांमुळे महाराष्ट्राशी औद्योगिक क्षेत्रात चांगली स्पर्धा करीत आहेत. राज्याचे औद्योगिक प्रगतीमध्ये असमतोल दिसुन येतो. राज्यातील मुंबई, पुणे व नाशिक या टप्यात चांगली औद्योगिक गुंतवणुक दिसुन येते.

तर विदर्भ, मराठवाडा व उत्तर महाराष्ट्र या विभागात औद्योगिक गुंतवणूक कमी प्रमाणात आढळुन येते. त्यामुळे यापूढे राज्यास औद्योगिक प्रगती मध्ये अंमलबजावणी करावी लागेल. त्यासाठी खालील उपाय योजना सुचविण्यात येत आहे.

– राज्यातील विजेचे दर हे शेजारील राज्याच्या तुलनेत अधिक असल्याने उद्योगाच्या स्पर्धात्मकते मधे कमी येते. त्याकरीता राज्यातील विज उत्पादन व वितरण व्यवस्थेचे योग्य व्यवस्थापन करून औद्योगिक विजेचे दर शेजारील राज्यांचे तुलनेत कमी किंवा किमान सारखे असावे.

Scanned by CamScanner

– उद्योग उभारणी व व्यवस्थापनाच्या दृष्टीने आवश्यक परवाने / मंजुरी यांची संख्या कमी करून उद्योजकास कालबध्द व पारदर्शकतेने मिळविण्याच्या दृष्टीने जास्ती जास्त माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे.

– राज्यातील औद्योगिक दृष्ट्या मागास भागात गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने या भागात उच्च दर्जाच्या व किफायतशीर भावात मुलभुत सुविधा विकसीत करून या भागातील उद्योगांना जादाची प्रोत्साहने देणे.

– राज्याच्या प्रत्येक विभागात उपलब्ध असलेले नैसर्गीक साधन संपत्ती व कृषी उत्पन्नावर स्थानिक रित्या मुल्यवृधी करणा–या उद्योगांना त्या त्या विभागात प्रोत्साहन देणे.

– राज्यातील आज पर्यंत झालेल्या औद्योगिकरणाचा अनुभव पाहता मागास भागात वाढीव सवलती देउन उद्योग आकृष्ठ होत नाहीत. प्रत्येक मागास विभागात शासनाने विशेष प्रयत्न करून मोठी खजगी / सार्वजनिक उद्योग आणावा जेणे करून त्या विभागात सदर गुंतवणूकीस पोषक / साहाय्य भूत उद्योगांचे जाळे तयार होईल.

– राज्यातील उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होण्याचे दृष्टीने कौशल्य विकासाचा व्यापक कार्यक्रम राबविणे गरजेचे आहे.

– सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना वेळेवर व पुरेसे भांडवल उपलब्ध होण्याकरीता वित्तीय महामंडळाचे पुर्नरूजीवन करावे.

14

– महाराष्ट्राचे आर्थिक सर्वेक्षण 2016-17

– उद्योग संचालनालयाचे संकेत स्थळ di.maharashtra.gov.in

Scanned by CamScanner

# महाराष्ट्रातील औद्योगिकीरण रोजगार व समस्या

डॉ. सौ. दिपाली अ. [illegible]
धनवटे नॅशनल [illegible]
नागपूर

**सारांश :–**

प्रत्येक देशाचा आर्थिक विकास हा त्या देशाच्या अर्थव्यवस्थेतील कृषी, औद्योगिक व सेवा या तीन क्षेत्राच्या कामगिरीवर अवलंबुन असतो. या तिन्ही क्षेत्रांचा विकास हा अर्थव्यवस्थेचा विकास मानला जातो. भारतीय अर्थव्यवस्था ही कृषीप्रधान मानली जात असली तरी 1970–71 नंतर कृषी क्षेत्राचा सकल अंतर्गत उत्पादनातील हिस्सा कमी होतांना तर सेवाक्षेत्राचा आणि उद्योग क्षेत्राचा हिस्सा वाढत असल्याचे दिसून येते. म्हणजेच भारतीय अर्थव्यवस्था उद्योगप्रधान अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचाल करीत असल्याचे मानले जाते.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर लघू उद्योग व कुटीर उद्योग यांचा विकास व्हावा म्हणुन औद्योगिक धोरण अवलंबिण्यात आले. औद्योगिक क्षेत्राला चालना व गती मिळावी म्हणुन पंचवार्षिक योजनेत आवश्यक बदल करण्यात आले. आर्थिक विकास होण्याकरीता जास्तीत जास्त उद्योग क्षेत्राची प्रगती होऊन रोजगार निर्माण व्हावा आणि जनतेला आवश्यक व आरामदायी वस्तुंचा पुरवठा जास्तीत जास्त प्राप्त व्हावा. भारताने हळूहळू परकीय गुंतवणूकी वरील आणि व्यापारावरील नियंत्रण कमी करून आपली अर्थव्यवस्था आर्थिक सुधारणांव्दारे खुली करायला सुरूवात केली. यामुळे खाजगीकरणाला महत्व दिले गेले.

भारताच्या आर्थिक विकासाबरोबर पर्यावरणाच्या विकासाकडे देखील योग्य लक्ष दिले पाहिजे कारण शहरी भागातील जनतेच्या आरोग्याचा प्रश्न देखील फार महत्वाचा आहे. यादृष्टीने योग्य ते उपाय योजावेत.

**प्रस्तावना :–**

औद्योगिकीकरण म्हणजे आर्थिक विकास होय. उत्पादन प्रकियेत अधिक भांडवलाचा वापर करून कामगारांच्या कार्यक्षमतेत वाढ घडवून आणणे म्हणजे औद्योगिकीकरण होय. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक विकासाच्या दृष्टिने 6 एप्रिल 1948 रोजी सरकारने पहिले औद्योगिक धोरण जाहीर केले. देशाच्या औद्योगिक क्षेत्रामध्ये गुंतवणूकीविषयी विविध उद्योगांच्या वार्षिक वृद्धी विषयी उद्योगांची स्थान निश्चिती, उद्योगांना लागणारा पत पुरवठा, उद्योगांतील श्रम, भांडवल, मालकीहक्क, उद्योग संबंधीचे कायदे, निरनिराळे करार ई. बाबींचा विचार औद्योगिक धोरणात करण्यात आला.

स्वातंत्र्य प्राप्तीनंतर विविध धोरणांच्या माध्यमातुन 1948 ते 2012 पर्यंत विविध धोरणांची अंमलबजावणी करून देशाचा औद्योगिक विकास साधने सरकारचे प्रमुख उद्दीष्ट होते. त्यामुळेच भारतासारख्या देशात अतीलघु, लघु व मध्यम आकाराच्या माध्यमातुन रोजगार उपलब्ध झाला. त्यानंतरच औद्योगिक विकासाला सुरूवात झाली. सोबतच रोजगारासाठी जनतेचे शहरीभागात स्थलांतराचे पमाण फार मोठया प्रमाणात वाढायला सुरूवात झाली आणि कालांतराने पर्यावरणावर दुष्परिणाम दिसून येत आहे. यासाठी सरकारने काही निर्बंध लावायला हवेत.

Scanned by CamScanner

...:-

कृषी व सेवा क्षेत्रात वाढ घडवून आणणे व रोजगार उपलब्ध करून उत्पन्न व उत्पादन यात वाढ करणे.

शेती उपयोगी आदानांचा पुरवठा वाढवुन देखील श्रमीकांना रोजगार प्राप्त न झाल्याने ग्रामीण जनतेचा कल शहराकडे असतो.

- नवीन तंत्रज्ञान, नविन आणि वैविध्यपूर्ण कौशल्य, मोठे उद्योगधंदे या बाकी उद्योगांच्या विकासातून साध्य होवून देशातील बचत व गुंतवणूक होवून वस्तु व सेवांच्या मागणीत वाढ होते.
- उद्योग धंदयाच्या विकासामुळे अर्थव्यवस्था स्वंयपूर्ण होऊन उत्पन्न पातळीत वाढ, रोजगार प्रमाणात वाढ, तांत्रिक ज्ञानात सुधारणा होतात.
- भारतासारख्या विकसनशील देशात लोकसंख्येत होणारी वाढ, दारिद्रय, बेकारी, आर्थिक विषमता, निकृष्ठ राहणीमान, निरक्षरता या समस्या सोडवून उद्योगधंदयांना महत्व दिले.
- औद्योगिक विकासासोबतच जनतेच्या आरोग्याचा विचार करून सरकारने निरनिराळया योजना आखावयास पाहिजे.
- कारखान्यापासुन होणारे ध्वनी व जल प्रदुषण रोखणे.

अभ्यासाची उद्‌दिष्टे :-

- औद्योगिकीकरणामुळे रोजगाराच्या जास्तीत जास्त संधी उपलब्ध करणे.
- महाराष्ट्रातील औद्योगिकदृष्टया विकासीत नसलेल्या भागांमध्ये गुंतवणुक करण्यास प्रोत्साहन देणे.
- उत्पादन क्षेत्रामध्ये वृद्धीदर वाढवुन आर्थिक विकास साधने.

अभ्यासाची व्याप्ती :-

- संशोधन करीत असतांना मुख्यत: औद्योगिक विकासावर भर दिलेला आहे.
- संशोधन करीत असतांना औद्योगिक विकासाबरोबर अनेक समस्यांचा विचार करण्यात आला.
- संशोधन करीत असतांना औद्योगिकीकरणासोबत वाढते प्रदुषण, झोपडपट्टीची निर्मिती तसेच श्रमीक स्थालांतर यांचा विचार करण्यात आला.

गृहित कृत्ये :—

- औद्योगिक विकासामुळे सेवा क्षेत्रातील उद्योगांचा विकास करून आर्थिक विकास साध्य करणे.
- सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांमुळे अनेक कार्यक्षम लोकांना रोजगार प्राप्त होऊन समाजाचे महत्तम हि साधणे.
- औद्योगिकीकरणामुळे पर्यावरणावर होणारा प्रदुषण व श्रमिक स्थलांतर यांचा अभ्यास करणे.

**अभ्यासाच्या मर्यादा :—**

वरील शोध निबंधाला खालील मर्यादा आहेत —

- अभ्यास करीत असतांना प्राथमिक तसेच दुय्यम माहितीचा उपयोग करण्यात आला.
- महाराष्ट्रातील उद्योग संस्थेमध्ये फक्त कुशल व तांत्रिक जनतेलाच रोजगार उपलब्ध.
- महाराष्ट्रातील जनतेचे ग्रामीण भागातून शहरी भागाकडे स्थलांतर
- औद्योगिकीकरणामुळे वाढत्या प्रदुषणाचा जनतेवर होणारा परिणाम.

**संशोधन पध्दती :—**

प्रस्तुत संशोधन करीत असतांना मुख्यतः पुस्तक व दस्तएवेजाचा वापर करून माहिती संकलीत करण्यात आली. दुय्यम माहिती ही पुस्तक, वर्तमानपत्रे, मासिके, इंटरनेट, वेब साईट यावरून माहिती गोळा करून शोध निबंध तयार करण्यात आलेला आहे.

**माहितीचे विश्लेषण :—**

देशाचा आर्थिक विकास घडवुन आणण्यासाठी नियोजन आवश्यक आहे. नियोजन काळात लघु उद्योग, मध्यम उद्योग, मोठे उद्योग, मुलभूत व अवजड उद्योग अशा सर्वच प्रकारच्या उद्योगांच्या विकासासाठी प्रयत्न करण्यात आले.

वर्षानुसार लघु व मध्यम आकारांच्या उद्योगांची गुंतवणूक व रोजगाराची स्थिती

| वर्ष | लघु व मध्यम आकाराचे उद्योग | गुंतवणूक (रू. कोटी) | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|
| 2011–12 | 15,606 | 4443 | 2.07 |
| 2012–13 | 16,136 | 5455 | 2.06 |
| 2013–14 | 19,814 | 6358 | 2.48 |
| 2014–15 | 36,992 | 7180 | 3.50 |
| 2015–16 | 20,220 | 4090 | 1.66 |

स्त्रोत :— Directorate of Industries Gom + upto September.



Scanned by CamScanner

श्रेणीनुसार लघु व मध्यम आकाराच्या उद्योगांची माहिती

| क्षेत्र | लघु व मध्यम आकाराचे उद्योग | श. भाग | रोजगार (लक्ष) | श. भाग |
|---|---|---|---|---|
| मुंबई | 24,786 | 10.2 | 4.0 | 13.9 |
| कोकण | 39,269 | 16.1 | 6.32 | 21.7 |
| नाशिक | 27,458 | 11.3 | 3.15 | 10.8 |
| पूणे | 92,233 | 37.8 | 10.5 | 34.4 |
| औरंगाबाद | 18,751 | 7.8 | 1.93 | 6.6 |
| अमरावती | 14,510 | 5.9 | 1.14 | 3.9 |
| नागपूर | 26,714 | 11.0 | 2.55 | 8.7 |
| एकुण | 2,43,721 | 100.00 | 29.19 | 100.00 |
| स्त्रोत :– Directorate of Industries Gom. | | | | |

**निष्कर्ष व सुचना :–**

❖ औद्योगिक धोरणात निरनिराळे बदल करून देखील आर्थिक विकासामध्ये हा अपेक्षेपेक्षा कमीच वाढ झालेली दिसुन आली.

❖ वाढत्या औद्योगिकीकरणामुळे उद्योग क्षेत्रात वाढ करण्यात येत आहे त्यापेक्षा जास्त वाढ ही प्रदुषणात होत आहे. वायू प्रदुषण, भूमिप्रदुषण, जलप्रदुषण यामुळे पर्यावरणाचा समतोल ढासळत चाललेला दिसून आला.

❖ महाराष्ट्रात औद्योगिकरणासोबत खाजगी उद्योगापेक्षा सार्वजनिक उद्योगाला जास्त महत्व देण्यात आले कारण सार्वजनिक उद्योगात जनतेला सेवा प्रदान करण्यासोबतच आर्थिक विकासाचा विचार करण्यात येतो.

❖ औद्योगिकीकरणामुळे जनतेला रोजगार प्राप्त होण्याकरीता गावाकडुन शहराकडे स्थलांतर होऊ लागले आहे. परंतु शहरात अतिरिक्त लोकसंख्या वाढत आहे. अशा परिस्थितीत लोकांची राहण्याची सोय व घरे व अन्य गरजांसाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष तोड सुरू आहे.

❖ औद्योगीकरणाच्या वाढी सोबतच कच्चा मालाच्या जास्तीत जास्त वापरासाठी मोठमोठ्या जंगलाची तोड सुरू आहे. त्यामुळे वायू प्रदुषणास फार मोठ्या प्रमाणात वाव मिळत आहे.

❖ औद्योगिकीकरणामुळे जनतेला शहरात रोजगार प्राप्त होऊ लागल्यामुळे शेतीचे महत्व दिवसेंदिवस कमी होत चाललेले आहे.

❖ ग्रामीण भागातील लघु उद्योग व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन मिळावे म्हणुन सरकारने जनतेला योग्य त्या सोयी व सवलती प्राप्त करून द्यायला हव्यात जेणे करून ग्रामीण भागातील शेतीला महत्व प्राप्त होईल.



Scanned by CamScanner

**उपाय योजना :—**

- ❖ भारतात औद्योगिक प्रदुषण रोखण्याच्या दृष्टिने राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर काही नविन व कार्यक्षम कायदे व नियम करायला हवे.
- ❖ औद्योगिक क्रांतीमुळे देशांतर्गत व आंतरराष्ट्रीय व्यापार वाढुन महाराष्ट्रातच नाही तर संपूर्ण जगभर माल संपूर्ण बाजारपेठेत उपलब्ध होऊन स्थानिक बाजारपेठेला जास्तीत जास्त महत्व प्राप्त होईल.
- ❖ महाराष्ट्रातील औद्योगिक प्रदुषण रोखण्यासाठी उपाय योजना करण्यात यावी.
- ❖ ग्रामीण भागातील जनतेचे स्थलांतर थांबविण्यासाठी उपाय योजना करावी.
- ❖ औद्योगिक घटकांना आम्ल पदार्थ, रासायनिक पदार्थ, टाकाऊ पदार्थ इ. कारखान्यातुन बाहेर टाकण्यासाठी अटकाव करून मार्गदर्शक सूचना कराव्यात.
- ❖ महाराष्ट्रात जास्तीत जास्त बेरोजगारांना रोजगार प्राप्त होण्याकरीता लघु उद्योग व मध्यम उद्योग स्थापन करण्यावर भर दयावा.
- ❖ महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील स्त्रियांना तसेच पुरुषांना रोजगार प्राप्त व्हावा या दृष्टिने शेतीवर आधारीत उद्योगांची स्थापना करावी.

**संदर्भग्रंथ सुची :—**


औद्योगिक अर्थशास्त्र :— प्रा. रायखेलकर, डॉ. दामजी

दुसरी आवृत्ती : जून 2011

महाराष्ट्रातील आर्थिक सर्वेक्षण :— 2016—17

वर्तमान पत्रे :— लोकमत

इंटरनेट


Scanned by CamScanner

# महाराष्ट्रातील औद्योगीकीकरण रोजगार व समस्या

प्रा. सुंदरम आनंदराव बुराणकर
एम.ए. (समाजशास्त्र, अर्थशास्त्र,)
बी.एड

**तावना –**

ब्रिटीश काळापासून मुंबई हे महाराष्ट्राच्या औद्योगीक व्यवस्थेचे केंद्र होते. या केंद्रातही महत्वाचा कापड उद्योग होता. तो नंतर नागपूर मालेगाव भिवंडी इचलकरंजी सोलापूर अशा शहरातही वाढला 1960 नंतर अहमदाबाद व सुरत ही कापड केंद्रे गुजरात मध्ये गेली. नंतरच्या काळात रायगड, ठाणे, पूणे व नाशिक या ठिकाणी यंत्रोद्योग झपाट्याने वाढले. 1960 नंतर कोल्हापूर येते फाउंड्री उद्योगाचे एक अत्यंत गतीमान केंद्र विकसीत झाले. 1970 नंतरच्या काळात औरंगाबाद शहरातही औद्योगीकीकरण होत गेले.

महाराष्ट्राने संतूलीत व प्रादेशीक दृष्ट्या विकेंद्रीत औद्योगीकीकरणासाठी महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ (MIDC) ही यंत्रणा उभी केली. सुरुवातीच्या काळात सहकारी औद्योगीक वसाहतीचाही प्रयोग करण्यात आला. MIDC च्या माध्यमातून जवळजवळ सर्वच जिल्ह्यात व काही ठिकाणी तालूका पातळीवरही औद्योगीक वसाहती सूरु करण्यात आल्या. काही ठिकाणी पंचतारांकीत औद्योगीक वसाहती सुरु झाल्या.

शासनाचा विधायक धोरनात्मक पाठींबा उद्योजगतेचा वाढता पुरवठा कुशल कामगाराचा वाढता पुरवठा रेल्वे व रस्ते व्यवस्थेचा विकास अशा विविध पुरक घटकामूळे हा औद्योगीक विकास झाला.

## . औद्योगीक धोरण रचना, व्याप्ती, मर्यादा–

अर्थव्यवस्थेचा रचना म्हणजेच अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्राचे स्थान सुरुवातीला कशे असते. व विकास प्रक्रीयेमध्ये ती कशी बदलत जाते. याचे विवेचन अर्थशास्त्रीय सिध्दांताने केले आहे. अर्थशास्त्रीय सिध्दांतानुसार सुरुवातीच्या काळात अर्थव्यवस्थेची रचना ही शेती क्षेत्राचे वर्चस्व असलेली असते. म्हणजेच अर्थव्यवस्थेचा विकास प्रक्रीयेतील सुरुवातीच्या काळात शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेचे योगदान एकूण उत्पन्न एकूण रोजगार निर्यात हे फार मोठे होते. व इतर क्षेत्राचे औद्योगीक सेवा क्षेत्रे योगदान त्यामानाने कमी असते. परंतू ही स्थिती कायम न राहता विकास प्रक्रीया तशी पुढे जाईल तशी अर्थव्यवस्थेचीही रचना बदलत जाते. व शेती क्षेत्राचे अर्थव्यवस्थेचे महत्व कमी होयून इतर दोन क्षेत्राचे महत्व वाढत आहे

Scanned by CamScanner

औद्योगीक व सेवाक्षेत्रामध्ये पहीले औद्योगीक क्षेत्राचे महत्व वाढून नंतर कमी होतो. व शेवटी फक्त सेवा क्षेत्राचे महत्व मोठया प्रमाणात वाढते. आर्थीक विकास प्रक्रीयेच्या अंतीम टप्प्यात सेवाक्षेत्राचे एकूण उत्पन्न रोजगार निर्यात इत्यादी योगदान मोठयाप्रमाण वाढते. तर त्या बदल्यात शेती क्षेत्राचे थोडया प्रामाणात औद्योगीक क्षेत्राचे योगदान कमी होते. विकसित देशाच्या बाबतीत अर्थशास्त्रीय केलेले विवेचन तंतोतंत लागू पडते.

## 2. महाराष्ट्राचे औद्योगीक धोरण व अंमलबजावणी –

कॉंग्रेस सरकारणे 1980 मध्ये नवे औद्योगीक धोरण जाहीर केले हे धोरण 1956 च्या औद्योगीक धोरणावरच आधारलेले असले तरी अनेक बाबतीत मोठे बदल घडवून आणणारे होते. औद्योगीक गुतवणूकीचा वेग वाढवीणे जागतीक दर्जानूसार तंत्रज्ञान अद्यावत असावे. उद्योग धंदयांनी संशोधन व आधूनिकीकरण करावे. या दृष्ठीने हे नवे धोरण आखले गेले. शिथीलीकरण विकेंद्रीकरण परवाण्याच्या अटी रद्द करणे त्या सोप्या करणे प्रशासनात सोपेपणा आनणे परकीय भांडवलाचे स्वागत करणे हे धोरण महत्वाचे आहे.

महाराष्ट्र शासनाचे 2006 चे औद्योगीक धोरण महाराष्ट्र शासन देशाच्या औद्योगीक धोरणाशी सुसंगत असे धोरण ठेवत असते. राज्यशासनाने नोव्हेंबर 2006 मध्ये नविन औद्योगीक गुतवणूक व पायाभूत सुविधा धोरण जाहीर केले.

1. संतूलीत प्रादेशिक विकासावर भर देवून मोठयाप्रमाणावर व टिकावू स्वरुपाचे आर्थिक वाढ साध्य करणे.

2. औद्योगीक व पायाभूत सुविधांचा विकासामध्ये अधिक मोठया प्रमाणावरील खाजगी व सार्वजणीक गुंतवणूकीव्दारे रोजगार निर्मीती करणे.

3. अर्थव्यवस्थेतील महत्वाचे क्षेत्रे निच्छीत करणे दर्जेदार पायाभूत सूविधा निर्माण करणे गुंतवणूकीस उत्तेजन देणे. व विदेशी व देशांअंतरर्गत मोठया गुंतवनुकी आकर्षीत करणे.

## 3. महाराष्ट्रातील खाजगी व सार्वजणीक क्षेत्रातील कार्यरत उद्योग –

दळणवळण व संपर्क व्यवस्था – कोणत्याही अर्थव्यवस्थेत दळणवळण व संपर्क व्यवस्थेला अत्यंत महत्वाचे स्थान असते. व्यक्ती संस्था शासन यांना धंदा व्यापार व प्रशासकीय सेवांचा

Scanned by CamScanner

संचालन व विस्तारासाठी कार्यक्षम संपर्क व्यवस्थेची गरज असते. त्यामूळे आर्थीक व्यवहास प्रशासकीय सेवा शिक्षण करमणूक यांत क्रांती झाली.

1. टपाल सेवा – महाराष्ट्रात 12860 टपाल कचेऱ्या असून त्यातील 89 टक्के ग्रामीण भागात आहेत. एक टपाल कचेरी राज्यात सुमारे सहा हजार व्यक्तींनां टपाल सेवा पूरविते.
2. तार सेवा – महाराष्ट्रात 2452 तार कचेऱ्या आहेत. भारतातील सर्वात मोठी तार कचेरी मुबईत असून देशाअंतर्गत व आंतरराष्ट्रीय सेवा या केंद्रामार्फत पुरवील्या जातात. .
3. टेलीफोन – स्वयंचलीत दुरचित्रवाणी केंद्र आंतरराष्ट्रीय दूर वाहीनी संपर्क जहाजावरुन जमीनीवर मिळणारा दुरवाणी संपर्क मागणी नुसार ट्रक सेवा अश्या सर्व सेवा महाराष्ट्रात उपलब्ध आहे.
4. मोबाईल – खाजगी व सार्वजणीक उपक्रमातील सेवा कंपण्यापूर्वीत आहे. डिसेंबर 2011 पर्यंत 1058.34 लाख सेलफोन एकटया महाराष्ट्रात होते.
5. इंटरनेट – भारतात इंटरनेट व ब्रॉडबॅन्ड वापरणाऱ्याची सर्वाधीक संख्या महाराष्ट्रराज्यात असून 31 मार्च 2011 पर्यंत ती अनुक्रमे 14.93 लाख व 22.88 लाख होती.

## 4. सहकारी क्षेत्रातील सेवा उद्योग व इतर क्षेत्रे –

सन 1991 नंतर अर्थिक उदारीकरणानंतरच्या काळात भारतीय अर्थव्यवस्थेतील सेवाक्षेत्राची वाढत गेलेले महत्व व विस्तार आर्थीक विकासाचे महत्वाचे आहे. उदारीकरणानंतरच्या काळात शेती व उद्योग क्षेत्रापेक्षा सेवा क्षेत्राची वाढ वेगाने झाली आहे. सेवाक्षेत्राचा स्थूल देशांतरगत उत्पादनातील हिस्सा वाढविणे बरोबरच या क्षेत्रात रोजगार वृध्दी ही मोठया प्रमाणात झाली आहे. सेवा क्षेत्राअंतर्गत बॅंकींग विमा वित्तीय सेवा व्यापार पर्यटन हॉटेलींग शिक्षण आरोग्य वाहतूक व संदेश वहन रिअल इस्टेट आणि व्यवसाय सेवा बांधकाम याशिवाय सामाजीक व्यक्तीगत सेवांचा समावेश होतो.

## 5. उद्योग व्यवस्थेतील रोजगार –

1. कच्च्या मालाची उपलब्धता ज्या उत्पादनाची सुरुवात घडवून आणावयाची असेल त्या भागात कच्चा माल उपलब्ध असावयास पाहीजे. महाराष्ट्रात कापड उद्योगासाठी साखर



Scanned by CamScanner

2. खाजगी क्षेत्राचा मोठा वाटा – महाराष्ट्राच्या एकूण औद्योगीक प्रगतीच्या खाजगी क्षेत्रातील मोठया कारखाण्यांचा वाटा फार मोठा आहे. राज्यात 500 पेक्षा अधिक कामगार असलेले कारखाने संखेने 2.6 टक्के आहे. परंतू त्यांच्या ताब्यात 57 टक्के भांडवल 42 टक्के रोजगार व 48 टक्के एकूण उत्पादन आहे. 1 कोटी व त्याहून जास्त भांडवल गुंतलेले महाराष्ट्रात फक्त 11.01 टक्के कारखाने आहेत.

3. असंतूलीत विकास – महाराष्ट्र औद्योगीक दृष्या देशातील इतर राज्यापेक्षा पुढे असले तरी महाराष्ट्रात औद्योगीक प्रगती सर्वदूर सारखी झालेली नाही. मुबई, ठाणे, पूणे या त्रिकोणात राज्यातील एकूण 25 टक्के लोकसंख्या आहे. तर राज्याच्या एकूण 8.4 टक्के क्षेत्रफळ आहे. परंतू 70 टक्के कारखाने 62 टक्के रोजगार 69 टक्के उत्पादक भांडवल व उत्पानदाच्या स्थूल मूल्यापैकी 82 टक्के हिस्सा येथे आहे. राज्यातील 30 टक्के उद्योग ग्रामीण भागात आहेत. यावरुन तेथे औद्योगीकीकरण फारसे झालेले नाही.

महाराष्ट्रातील चालू कारखान्यांची संख्या व त्यातील रोजगार

| वर्ष | महाराष्ट्रातील कारखाने | रोजगार |
|---|---|---|
| 1961 | 8233 | 788 |
| 1971 | 10241 | 998 |
| 1981 | 16594 | 1192 |
| 1991 | 24119 | 1169 |
| 2001 | 28324 | 1201 |
| 2004 | 29256 | N.A. |
| 2005 | 30365 | 1258 |
| 2010 | 19457 | 1063 |

## 8. औद्योगीकीकरण झोपडपट्टी –

नागरी जमीनीचा मोठा भाग हा सरकारी व खाजगी कार्यालये कारखाने दुकाने शाळा बँका वाहानतळ बागा क्रीडांगणे रस्ते बाजारपेठा करमणूक कंद्रे इत्यादीसाठी व्यापला जातो त्यामूळे निवासासाठी जागेची टंचाई निर्माण होते. परीणामी जमीनीच्या किमती वाढल्या आहेत. म्हणून सामान्य लोकांना स्वतःची घरे बांधने अशयक्य बनले आहे. त्यामूळे नगरात निवासाची समस्या गंभीर बनली आहे. अनेक लोकांना लहान लहान घरात दाटीवाटीने राहाणे भाग पडत आहे. गरीब लोक झोपडपट्टीत राहतात. झोपडपट्टीत राहणाऱ्या लोकांची अवस्था अत्यंत



Scanned by CamScanner

भयानक आहे. झोपडपट्ट्यात नागरी सुविधांचा अभाव असतो. नागरी भागातील निवासाची समस्या एवढी गंभीर बनलेली आहे की, अनेक लोकांना रस्ते बसटॅंड रेल्वे स्टेशन किंवा कोणत्याही उघडया जागेवर राहाने भाग पडत आहे.

## 9. औद्योगीकीकरण प्रदूषण –

पर्यावरणाच्या प्रदूषणाची समस्या ही एक नागरी समूदायातील ज्वलंत समस्या आहे. नगरात हवा प्रदूषण जल प्रदूषण ध्वनी प्रदूषण यांची तिव्रता वाढत चालली आहे. विविध वाहने व कारखाने हे त्यांच्या धूरांडयातून धूर व विषारी वायू यासारखी प्रदूषके वातावरणात सोडतात. प्रदूषीत हवेमूळे लोकानां फुफ्फूसाचा कर्करोग अस्थमा डोकेदूखी चक्कर येणे उलटया होणे इत्यादी आजार होतात. अनेक शहरातील टाकावू पदार्थ औद्योगीक सांडपाणी हे जवळपासच्या नद्या व तलावात सोडतात. त्यामूळे त्यांच्यातील पाणी प्रदूषीत होते. दूषीत पाण्यामूळे हगवण, विषमज्वर काविळ इत्यादी आजार लोकांना होतात. विविध कारखान्यातील यंत्राचा खळखळाट व वाहतूकीच्या साधनामूळे होणारा कर्कष आवाज यामूळे ध्वनी प्रदूषण होते. ध्वनी प्रदूषणामूळे डोकेदूखी बहीरेपणा मळमळणे उच्च रक्तदाब मज्जा संस्थेतील बिघाड यासारखे आजार जळतात.

## 10. औद्योगीकीकरण स्थलांतर इत्यादी–

औद्योगीकीकरणामूळे महाराष्ट्रात नागरीकरणास चालना मिळाली. शहरे ही व्यापार वाणिज्य उद्योग शिक्षण इत्यादींची केंद्रे बनली. त्यामूळे ग्रामीण भागातील लोक शहराकडे स्थलांतर करु लागली. औद्योगीकीकरणामूळे विवाह कूटूंब जात यासारख्या विविध सामाजीक संस्थामध्ये संरचनात्मक आणि प्रकार्यात्मक बदल घडवून आणले बाल विवाहाची जागा प्रौढ विवाहाने घेतली आहे. आंतरजातीय आणि आंतरधर्मीय विवाहाची संख्या वाढत आहे. संयुक्त कुटूंबाची जागा आधूनिक केंद्र कुटूंबानी घेतली आहे. जातीसंस्थेचे नियम शितील झाले आहे. धार्मीक विश्वास आणि कर्मकांडाचे महत्त्व कमी झाले आहे. औद्योगीकीकरणामूळे महाराष्ट्रात आधूनिक अर्थव्यवस्थेचा उदय झाला. भांडवलदार प्रशासक संशोधक तंत्रज्ञान कामगार यासारखे नविन सामाजीक वर्ग उदयास आले.



Scanned by CamScanner

# महाराष्ट्रातील उद्योग व रोजगार स्थिती

प्रा भरत क
सी. पी. ॲन्ड बेरार महाविद्या
महाल, नाग

मध्यवर्ती सरकारने 1991 नंतर जागतीक अर्थव्यवस्थेतील आर्थिक सुधारणा या बाबीकडे लक्ष देऊन अर्थव्यवस्थेतील रचनात्मक बदल धोरण स्विकारल्यानंतर देशाच्या औद्योगीक धोरणात बदल घडून आणण्यास आरंभ केला. उद्योगांचा विकास व विस्तार करण्याकरीता कोणत्याही देशात गुंतवणूकीची गरज असते. म्हणूनच भारताची 9 वी पंचवार्षिक योजना ही गुंतवणकिचे प्रमुख उदिष्टे ठेवून तीची रचना करण्यात आली होती. एकूण उत्पननतून सर्व खर्चाची वजावट केल्यावर बचत व त्यातून गुंतवणूक निर्माण करण्यास जे आधिक्य स्वरुपात वित उपलब्ध होते त्या आधिक्याचे रुपांतर गुंतवणूकीत झाल्यावर उद्योग क्षेत्रात रोजगार क्षमता वाढविणे शक्य होते. परंतू भारत हे एक विकसशील राष्ट्र असल्यामुळे गुंतवणूकीचा दर कमी व रोजगार निर्मितीक्षमता कमी असे अर्थव्यवस्थेचे एकूणच दृष्टचक्र बेरोजगारीत रुपांतरीत होऊन आर्थिक विकासाचे वातावरण तयार करण्यास एक मोठे संकट निर्माण होण्यास मदत होते. म्हणून विकसशिल देशातील गुंतवणूक व रोजगार हया दोन्ही बाबी विकासाकरीता मुलभूत मानल्या गेल्या आहेत. जगात जागतीकीविकरणाचे वारे वाहू लागल्यावर केंद्रसरकारने आपल्या औद्योगीक धोरणात परिवर्तन केले त्याच आधारावर राज्यसरकारांनी आपल्या आपल्या औद्योगीक धोरणात बदल घडून आणण्यास आरंभ केला. सुक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना शासनाकडून मदतीची आहे कारण वित्तीय सुविधा उपलब्ध झाल्याशिवाय विकेंद्रीत अर्थव्यवस्था निर्माण होणार नाही. व रोजगार व रोजगारक्षमतेचा विकास करणे शक्य होऊ शकणार नाही हे निश्चित झाले. या संदर्भात मागासलेल्या भागात औद्योगीकरणास चालना व प्रोत्साहन देणारे पूरक धोरण राज्याद्वारे स्विकारल्या गेले व महाराष्ट्र सरकारनेही या धोरणाचा स्विकार केला. अल्पविकसीत व विकसनशील अर्थव्यवस्थेच्या विकासामध्ये उद्योगक्षेत्र महत्वाची भूमीका पार पाडते. महाराष्ट्राचा विचारकरता महाराष्ट्र हे भारतातील औद्योगीकदृष्टया पूढारलेले राज्य मानले जाते. इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राचा आर्थिक विकास शेत आहे. असेच म्हणावे लागेल. याचे सर्व श्रेय मुंबईला जाते. कारण सर्वच उद्योगाचे केंद्रिकरण व त्यांच्या कार्यालयाचे केंद्रीकरण मुंबईला झाले आहे. एवढेच नव्हेतर मुंबई ही देशाची आर्थिक राजधाणी होय. मुंबई महानगरपालिकेचे अदांजपत्रक त्रिपूरा सारख्या छोटया राज्याचे जास्त आहे. महाराष्ट्रातून मुंबई शहराची वजाबाकी केल्यास उरलेल्या जिल्हयाचा औद्योगीक विकास पाहिजे त्याप्रमाणात झाला नाही. सर्व जिल्हयातील महाराष्ट्र औद्योगीक विकास निगम ची स्थिती वेताळ आहे. यातून अपेक्षेप्रमाणे रोजगार निर्माण होऊ शकत नाही.

राज्यातील महत्वाचे उद्योग राज्यातील महत्वाच्या उद्योगामध्ये मोटार वाहन, अभियांत्रीकीवस्तू, पोलाद व लोखंड उद्योग, ओतिवकाम, विद्यूत यंत्रे, औषध निर्माण उद्योग, ट्रेलर्स रसायने व रासायणीक उत्पादने, मूलभूत धातूंचे उद्योग, कोक व शुद्ध पेट्रोलीयमचे उत्पादने, अणूशक्ती इंधन, खादय उत्पादने, यंत्रे व यंत्रसामुग्री, फर्निचर व जडजवाहीर इत्यादी उद्योगांचा समावेश होतो. महाराष्ट्राच्या एकूण औद्योगीक उत्पादनामध्ये विविध उद्योग व उद्योगयंत्राचा वाटा यावरुन महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राच्या विकासाचा अंदाज येतो.

| उद्योग | औद्योगीक उत्पादनातील प्रमाण टक्के |
|---|---|
| 1) मोटार वाहने व ट्रेलर्स | 11.3 |
| 2) रसायन व रासायणीक उद्योग | 13.3 |
| 3) मुलभूत धातू | 11.3 |
| 4) कोक शुध्द पेट्रोलियमची उत्पादन अणूशक्ती इंधन | 16.4 |
| 5) खादय उत्पादन व पेय | 9.9 |
| 6) यंत्रे व यंत्रसामुग्री | 37.8 |

राज्याचे औद्योगीक धोरण (2006) - राज्य शासनाने 2006 मध्ये नविन औद्योगीक धोरण जाहिर केले होते. थोडक्यात या धोरणाची काही उद्दीष्टे खालील प्रमाणे आहे.

1) समतोल प्रादेशीक विकास साध्य करणे.

2) बृहत्प्रमाणावर व टिकाऊ स्वरुपाची आर्थिक वाढसाध्य करणे.

3 औद्योगीक व पायाभूत सुविधांच्या विकासामध्ये अधिक मोठ्या प्रमाणावर खाजगी व सार्वजनीक गुंतवणूकीच्या माध्यमातून रोजगार वृध्दी करणे.



Scanned by CamScanner

वरील त्रिसूत्रीत उद्दीष्टे साध्यकरण्याकरीता काही महत्वाच्या बाबी उद्दिष्टांची सफलता प्राप्त करण्याकरीता निश्चित केले आहे.

उद्योगाच्या विकासाकरीता महत्वाची क्षेत्रे निश्चित करणे.

पायाभुत सुविधा निर्माण करण्याच्यावर भर देणे.

एकूण गुंतवणूकीत वाढ घडून आणने.

विविध गुंतवणूकीत आकर्षीत करणे. धोरणाची

औद्योगीक विकासाकरीता नविन प्रकल्पांना अनुदान देणे.

लघु व मध्यम उद्योगाच्या विकासाकरीता विविध सवलती प्रदान करणे.

मानव विकास निर्देशांक कमी असणाऱ्या जिल्हयात येणाऱ्या उद्योगांना विशेष सवलत देणे.

मोठ्याप्रकल्पांकरीता विशेष पॅकेज योजना राबविणे.

गट आधारीत विकासावर गटाच्या क्षेत्रातील काही क्षेत्र विशिष्ट उद्योग व त्यांचे साहयक उद्योग यांच्याकरीता राखून ठेवणे यावर भर देण्यात आला.

नविन औद्योगीक नगरांचा आणि विशेष आर्थिकक्षेत्राचा विकास करणे.

खादी व ग्रामउद्योगांना प्रोत्साहन देण्याकरीता प्रत्येक जिहयात ग्रामदयोग वसाहतीची स्थापना करणे.

जागतीक दर्जाची आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र स्थापन करणे.

एक खिडकी योजनेच्या माध्यमातून कामकाज आरंभ करणे.

विदेशी क्षेत्र गुंतवणूकीवर भर देणे.

वरील निर्देशित धोरणाची कालमर्यादा मार्च 2011 पर्यंत चालू ठेवण्याचे निश्चित केले होते. याकरणाने विकासाकरीता पूढील लक्ष निर्धारीत केले होते.

औद्योगीक क्षेत्रातील वाढीचा दर 10 टक्के इतका निश्चित केला होता.

सेवा क्षेत्रातील वाढीचादर 12 टक्के ठेवण्यात आला होता.

अतीरिक्त रोजगार निर्मिती 20 लाख असेल.

औद्योगीक गुंतवणूक औद्योगीक धोरणातील सुधारणामुळे ... स्थान प्राप्त करण्याकरीता आवश्यक असणाऱ्या ... घटनात्मकी करण्यात आल्या. उद्योगातील गुतवणूकीवरील व ... काढून टाकण्यात आली. आणि विदेशी तंत्रज्ञान व थेट ... करण्याकरीता मार्ग मोकळा करण्यात आला. राज्यामध्ये ... आणण्यात यावे याकरीता 2010 पर्यंतच्या कालावधीत भारत ... 21,884 प्रस्ताव प्राप्त झाले. त्यातील एकूण गुंतवणूक ... कोटी रुपये एवढी होती. देशातील प्रस्तावित औद्योगीक ... मुळे निर्माण होणारा रोजगार यात महाराष्ट्राचा वाटा ... 10 ते 15 टक्के इतका होता. देशाच्या औद्योगीक

गुंतवणूकीकरीता एक आधूनीक राज्य म्हणून महाराष्ट्राने आपले स्थान सुरुवातीपासूनच कायम ठेवले आहे. उदारीकरणाच्या कालावधीत देशांतर्गत तसेच विदेशी या दोन्ही प्रकारच्या संस्थाकडून औद्योगीक गुंतवणूकीतील मोठे प्रमाण आकर्षीत केले आहे.

**राज्यातील औद्योगीक गुंतवणूक 2010 पर्यंत (आकडेवारी रुपयात)**

| अ. क्र. | तपशिल | मंजूर प्रकल्प | | | कार्यान्वीत प्रकल्प | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | संख्या | गुंतवणूक | रोजगार | संख्या | गुंतवणूक | रोजगार |
| 1 | अर्जांची संख्या | 16140 | 695000 | 3024376 | 9057 | 152716 | 845293 |
| 2 | निर्यातीभिमुख प्रकल्प | | | | | | |
| | अ) विदेशी गुंतवणूक प्रकल्प | 4176 | 83770 | – | 1665 | 42611 | – |
| | ब) सामंजस्य करारावर झालेले प्रकल्प | 186 | 140826 | 213423 | – | – | – |
| | एकूण प्रकल्प | 20484 | 920121 | 3237803 | 8322 | 195407 | 845293 |

**अन्य राज्यातील औद्योगीक गुंतवणूक 2010 पर्यंत (गुंतवणूक कोटी रुपयात)**

| राज्य | संख्या | गुंतवणूक | देशाशी टक्के | रोजगार | रोजगाराशी टक्के |
|---|---|---|---|---|---|
| आंध्रप्रदेश | 7237 | 694640 | 9.53 | 13.74 | 6.94 |
| गुजरात | 10666 | 859787 | 11.80 | 19.49 | 9.85 |
| महाराष्ट्र | 16140 | 695616 | 9.54 | 30.24 | 15.23 |
| तामिलनाडू | 8502 | 354710 | 4.87 | 23.77 | 12.01 |
| उत्तरप्रदेश | 7380 | 226232 | 3.10 | 19.35 | 9.78 |
| संपूर्ण भारत | 91598 | 7287324 | – | 197.94 | – |

विशेष आर्थिक क्षेत्र - महाराष्ट्र शासनाने आर्थिक क्षेत्र धोरण फेब्रुवारी 2006 पासून स्विकारले उद्योजांना चालना देणे आणि रोजगार निर्मित या उद्येशाने विशेष आर्थिक धोरण क्षेत्र स्विकारले आणि या क्षेत्रास करमुक्त बंधनमुक्त व पोषक व्यापार धोरण याकरीता प्रेरणादायी वातावरण तयार करण्यात आले. या अंतर्गत खालील बाबींचा समावेश करण्यात आला होता.

1) एक खिडकी योजनेमार्फत संबंधीत सर्व प्रस्तावांना मान्यता देणे.
2) पायाभुत सुविधाचा विकास करणे.
3) नविन रोजगाराच्या संधी निर्माण करणे.
4) उत्पादीतवस्तू व सेवा निर्यातीस प्रोत्साहन देणे.
5) देशातंर्गत तसेच विदेशी गुंतवणूकीस प्रोत्साहन देणे.
6) अतिरिक्त अर्थोत्पादनाची साधने निर्माण करणे.

विशेष आर्थिक क्षेत्रातील पायाभुत सुविधा व उत्पादन क्षमता



Scanned by CamScanner

यांचेकडे मोठ्या प्रमाणावर विदेशी व त्याचप्रमाणे स्थानिक गुंतवणूक आकर्षित होणे अपेक्षीत आहे. त्याद्वारे अधोत्पादनाची साधने आणि रोजगाराच्या संधी निर्माण होण्याच्या अपेक्षा व्यक्त करण्यात आल्या. राज्यातील विशेष आर्थिक क्षेत्राकरीता डिसेंबर 2010 अखेरपर्यंत 223 प्रकल्पांचे प्रस्ताव प्राप्त झाले होते. त्यापैकी 143 प्रकल्पांना केंद्रसरकारने मान्यता दिली होती. व 63 प्रकल्प अधिसूचीत झाले.

सुक्ष्म लघू आणि मध्यम उपक्रम विकास अधिनियम 2006 अधिनियम ऑक्टोबर 2006 पासून अमलात आणल्या गेला. उद्योगाबाबतची नोंदणी प्रक्रिया करीत साधी व सरळ केली आहे. यापूर्वीची उद्योग ही संकल्पना बदलून उपक्रम हया संकल्पनेचा वापर सूरू करण्यात आला. उपक्रमाची सामान्यता (1) उत्पादक (2) सेवा पुरविणारे अशी विभागणी करण्यात आली. या दोन्ही प्रकारातील उपक्रमांचे त्यांच्या प्रकल्प व यंत्रसामुग्रीतील गुंतवणूकीच्या आधारे किंवा त्याच्या साधन सामग्रीचे आधारे सूक्ष्म, लघू व मध्यम आणि मोठे अशी केलेली आहे.

**1विशेष आर्थिक क्षेत्रामधील गुंतवणूक व रोजगार 2010**

| विभाग | संख्या | क्षेत्र हेक्टर | गुंतवणूक कोटी रु. | रोजगार (लाख) |
|---|---|---|---|---|
| कोकण | 73 | 25291 | 125422 | 43.25 |
| पश्चिम महाराष्ट्र | 48 | 6600 | 48115 | 12.95 |
| मराठवाडा | 12 | 3750 | 3835 | 1.52 |
| विदर्भ | 10 | 4316 | 11594 | 5.86 |
| एकुण | 133 | 39966 | 188967 | 63.58 |

2) सुक्ष्म, लघू व मध्यम मोठ्या उपक्रमांची माहिती – 2010

| अ.क्र. | विभाग | सुक्ष्म, लघू व मध्यम | रोजगार | मोठे उपक्रम | रोजगार |
|---|---|---|---|---|---|
| 1 | मुंबई | 14923 | 214126 | 211 | 97595 |
| 2 | कोकण | 18606 | 242708 | 716 | 108042 |
| 3 | नाशिक | 24215 | 181622 | 256 | 76309 |
| 4 | पुणे | 78106 | 373333 | 768 | 247620 |
| 5 | औरंगाबाद | 11824 | 107001 | 293 | 67511 |
| 6 | अमरावती | 5607 | 43541 | 79 | 10890 |
| 7 | नागपूर | 14943 | 137788 | 278 | 83617 |
| | महाराष्ट्र | 163214 | 1300947 | 2623 | 691544 |

सामुहीक प्रोत्साहन योजना औद्योगीकदृष्टया अविकसीत व विकसनशिल भागात मोठ्या प्रमाणात औद्योगीक गुंतवणूक याकरीता नवीन प्रकल्पासाठी राज्य शासनाची सामुहीक प्रोत्साहन योजना आहे. योजनेत आवश्यकतेनुसार बदल करण्यात आले. सामुहीक प्रोत्साहन योजना 2007 साली अमलात आणल्या गेली. राज्यातील पात्र खाजगी भागीदारी राज्य शासनाचे उपक्रम संयुक्त क्षेत्र व सहकारी क्षेत्र यांना या योजनेचा लाभ घेण्यात येईल योजनेची वैशिष्टे खालील प्रमाणे ठरविण्यात

1) लघु मध्यम, मोठ्या उ... उद्योगांच्या विस्तारास त्यांच्या स्थिर भांडवल गुंतवणूकीत औद्योगी प्रोत्साहन अनुदानाद्वारे उत्तेजण देणे.

2) वस्त्रउद्योग, इंजिनीअर तयार केलेले कपडे व या क्षेत्राती नविन सुक्ष्म लघु व मध्यम उपक्रमांना मदत व सहकार्य केले.

3) सुक्ष्म लघू व मध्यम उपक्रमांच्या उत्पादनाच्या गुणवत्ते कार्यक्षेत्रात वाढ होण्याकरीता अनुदान देणे.

4) प्रतिष्ठेच्या आणि अतिविशाल प्रकल्पांना प्रकल्पानुरुप विशे प्रोत्साहन देणे.

5) सुक्ष्म, लघू व मध्यम उपक्रमावरील विविध कर व अन्य शुल्क यांचा भार करणे.

6) माहिती तंत्रज्ञान जैव तंत्रज्ञान घटक आणि अतिविशाल प्रकल्पामध्ये मोठ्या प्रमाणावरील गुंतवणूक आकर्षित करण्याकरीता वातावरण निर्माण करणे.

**विदेशी थेट गुंतवणूक:-**

अर्थव्यवस्थेच्या विकासाकरीता अधिक प्रमाणावरील भांडवल गुंतवणूकीची आवश्यकता असते. परंतू भांडवल उपलब्ध करण्यास सार्वजनीक क्षेत्राच्या मर्यादा निश्चित आहे. खाजगीकरण, उदारीकरण, जागतीकीकरणाच्या काळात भांडवल गुंतवणूकीचे महत्व दिवसेंदिवस वाढत आहे. विदेशी थेट गुंतवूणूकीचे महत्व मोठयप्रमाणावर वाढतांना दिसत आहे. मुक्त भांडवल होण्याकरीता व विदेशी मुद्राबाजारातील भांडवल आयात करण्याकरीता खुल्या भांडवली बाजाराला चालना देण्याकरीता अनेक प्रकारच्या ध्येय धोरणामध्ये बदल करण्यात आले आहे. आर्थिक उदारीकरणानंतरच्या कालखंडातील औद्योगीक विकासाचे प्रमुख वैशिष्ट अनिवासी भारतीय आणि विदेशी थेट गुंतवणूक यांचे मोठे सहकार्य लाभले आहेत. महाराष्ट्र शासनाने निर्माण केलेल्या पोषक वातावरणामुळे महाराष्ट्रात विदेशी थेट गुंतवणूक अधिक प्रमाणात होत आहे. इतर राज्यांच्या तुलनेत महाराष्ट्रात विदेशी थेट गुंतवणूक सर्वात जास्त झाली आहे. महाराष्ट्रात हि गुंतवणूक देशातील एकुण गुंतवणूकीच्या 21 टक्के इतकी आहे.

राज्यातील क्षेत्र निहाय विदेशी थेट गुंतवणूक ऑगष्ट 2010 पर्यंत

| अ.क्र. | उद्योग गट | एकुण प्रकल्पांची संख्या | गुंतवणूक (कोटी) |
|---|---|---|---|
| 1 | माहिती व तंत्रज्ञान | 782 | 12768 |
| 2 | औद्योगीक यंत्र सामुग्री | 261 | 271 |
| 3 | रसायनक्रिया | 173 | 1539 |
| 4 | वस्त्रउद्योग | 122 | 1051 |
| 5 | रसायने व खनिज उत्पादने | 197 | 2668 |
| 6 | विद्युत व विद्युत विद्युत यंत्र सामुग्री | 212 | 1497 |
| 7 | मोटार वाहने | 112 | 893 |
| 8 | इतर | 732 | 25468 |

महाराष्ट्रातून झालेली निर्यात देशाप्रमाणेच राज्याचे स्थान निर्यातीच्या बाबतीत महत्वाचे असते. महाराष्ट्रातून होणाऱ्या निर्यातीमध्ये अलिकडील काळात सातत्यपूर्ण वाढ होत आहे. हि निर्यातवाढ खालील प्रमाणे दर्शविले आहे.

| वर्ष | महाराष्ट्र (कोटी रू.) | भारत (कोटी रू.) |
|---|---|---|
| 2005-06 | 113700 | 454800 |
| 2006-07 | 142944 | 571779 |
| 2007-08 | 172846 | 640172 |
| 2008-09 | 226794 | 839978 |
| 2009-10 | 228184 | 845125 |

निर्यातीत वाढ होऊन आर्थिक विकासाचा दर साधणे शक्य ते. अन्य राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र हे प्रगत राज्य आहे असे असले तरी हाराष्ट्रातील मुंबईचा व प. महाराष्ट्रातील साखर कारखाने व त्यांची भराट राज्याच्या आर्थिक विकासात भर टाकणारी आहे. त्या तुलनेत कण, मराठवाडा, व विदर्भाचा विकास झाला नाही. राज्यातील लहानिहाय उद्योग रोजगारक्षमता बनले नाही. दिवसेंदिवस मुंबईत वकाल वस्त्यांचे प्रमाण वाढत आहे. रोजगार प्राप्तीकरीता लोकांची शहराकडे हजारोच्या संख्येने स्थलांतरण होत आहे. यातूनच विषमता गुंडगीरी, टोळीयुध्द, शांतता व सुव्यवस्था यांचा रोज भंग होत आहे. ग्रामीण नागरीकांचे शहरात स्थलांतरण होत असल्यामुळे शेतीत काम करणाऱ्यांची संख्या रोज घटत आहे. शेतीवर काम करण्यास आज मजूर मिळत नाही. अशी स्थिती निर्माण झाली आहे. शेतकरी श्रीमंत नसल्यामुळे सर्वच कार्याकरीता शेतीतून उत्पादन काढण्याकरीता यंत्र सामग्री विकत घेऊ शकत नाही, किंवा शेतमजूरांचे मजूरी वाटून देऊन मजुरांची मागणी शेतकरी करू शकत नाही मजूरीचे कमीदर यंत्र सामुग्रीचा अभाव यातूनच ग्रामीण क्षेत्रात हलाखिची स्थिती निर्माण झाली आहे. राष्ट्रीय उत्पन्नात कृषीचा वाटा 14 टक्के व रोजगार निर्भर लोकांची क्षमता 65 टक्के ही विषमता विचार करायला लावणारी आहे. जि.एस.टी. मध्ये शेतीक्षेत्राचा वाटा राष्ट्रीय उत्पननात 3.5 टक्के इतका आहे. व रोजगार निर्मितीही 3.5 टक्के आहे. समान रोजगार समान उत्पन्न कृषीही आर्थिक विकासाची जणनी होय. कृषीचा किंवा प्राथमिक क्षेत्राचा विकास झाल्यावरच राज्यात औद्योगीक विकास साधून रोजगाराची क्षेत्रे निर्माण करणे शक्य होईल.

संदर्भ -


1) महाराष्ट्र, तुकाराम जाधव, 2012, आवृती.

2) भारतीय अर्थव्यवस्था, मिश्रापूरी

3) Website – mahatra Govt. Industril and Employment








Scanned by CamScanner